# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ०८/१२/२०१७**

आज शुक्रवार दि. ०८/१२/२०१७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. २८/११/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| २) | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| ३) | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सभापती, स्थायी सामिती** |
| ४) | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| ५) | **भोईर सुनिता शशिकांत** | **सदस्या** |
| ६) | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| ७) | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| ८) | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| ९) | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| १०) | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| ११) | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| १२) | **शेट्टी गणेश गोपाळ** | **सदस्य** |
| १३) | **ढवण निलम हरीश्चंद्र** | **सदस्या** |
| १४) | **कदम अर्चना अरुण** | **सदस्या** |
| १५) | **नलावडे दिनेश दगडु** | **सदस्य** |
| १६) | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| १७) | **पाटील प्रभात प्रकाश** | **सदस्या** |
| १८) | **गुप्ता कुसुम संतोष** | **सदस्या** |
| १९) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| २०) | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| २१) | **रावल मेघना दिपक** | **सदस्या** |
| २२) | **शाह राकेश रतिशचंद्र** | **सदस्य** |
| २३) | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| २४) | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| २५) | **जैन सुनिता रमेश** | **सदस्या** |
| २६) | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| २७) | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| २८) | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| २९) | **व्यास रवि वासुदेव** | **सदस्य** |
| ३०) | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| ३१) | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| ३२) | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |
| ३३) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |

| | | |
|---|---|---|
| ३४) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३५) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३६) | सय्यद नुरजाहाॅ नाझर हुसेन | सदस्या |
| ३७) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३८) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३९) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ४०) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४१) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ४२) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४३) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४४) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४५) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४६) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४७) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४८) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४९) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ५०) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ५१) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५२) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५३) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५४) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५५) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५६) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५७) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५८) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५९) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ६०) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६१) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६२) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६३) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६४) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६५) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६६) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६७) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६८) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६९) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ७०) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ७१) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७३) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७४) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ७५) | **भट दीप्ती शेखर** | **सदस्या** |
| ७६) | **जैन दिनेश तेजराज** | **सदस्य** |
| ७७) | **भावसार वंदना संजय** | **सदस्या** |
| ७८) | **शाह सीमाबेन कमलेश** | **सदस्या** |
| ७९) | **दुबे मनोज रामनारायण** | **सदस्य** |
| ८०) | **विराणी अनिल रावजीभाई** | **सदस्य** |
| ८१) | **सपार उमा विश्वनाथ** | **सदस्या** |
| ८२) | **अहमद साराह अकरम** | **सदस्या** |
| ८३) | **इनामदार जुबेर अब्दुल्ला** | **सदस्य** |
| ८४) | **शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम** | **सदस्य** |
| ८५) | **भोईर जयेश भानुदास** | **सदस्य** |
| ८६) | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| ८७) | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |
| ८८) | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |
| ८९) | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| ९०) | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |
| ९१) | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १) | **गेहलोत हसमुख मोहनलाल** | **सदस्य** |
| २) | **हसनाळे ज्योत्सना जालींदर** | **सदस्या** |
| ३) | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | **सदस्य** |

**रजेचा अर्ज -**

| | | |
|---|---|---|
| १) | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |

**प्र. नगरसचिव :-**

सर्वांनी राष्ट्रगीतासाठी जागेवर उभे रहायचे आहे.

**मा. महापौर :-**

नमस्कार उपस्थित मा. उपमहापौर, उपआयुक्त, स्थायी समिती सभापती, सभागृहनेते, सर्व समितीचे सभापती, सर्व पक्षाचे गटनेते, नगरसेवक, नगरसेविका तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार बंधु व प्रेक्षक वर्ग यांचे स्वागत आहे. आज आपल्याकडे इंडिया इन्स्टीट्युट ऑफ डेमोक्रेटीक लिडरशिप संस्थेचे चौदा विविध राज्यातुन ३२ सदस्य आलेले आहेत. राजकीय विचारवंतांकडून प्रशिक्षण घेणेकरिता आपल्या सभागृहातील प्रेक्षक कक्षात उपस्थित आहेत. त्यांचे स्वागत आहे. सर्व मान्यवरांनी खेळीमेळीच्या वातावरणात व शांततेत सभा पार पाडावी. दि. २५ डिसेंबर पासून सुरु होणाऱ्या नाताळ ख्रिसमस सणाच्या व आगामी नविन वर्षाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद. सचिव महोदयांनी सभेला सुरुवात करावी.

**प्र. नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने **मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. 08/12/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र . ०४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे .** आजच्या सभेसाठी प्रश्नोत्तरे आहेत प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. ११.२० मिनिटे झालेली आहेत. पहिला प्रश्न आहे सौ. निलम ढवण यांचा प्रश्न आहे.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब प्रश्नोत्तर सुरु होत आहे. माझाही प्रश्न दिला होता तो लागला नाही.

**प्र. नगरसचिव :-**

नंतर येणार.

**जुबेर इनामदार :-**

यांच्या प्रश्नानंतर. यांचा प्रश्न समजा अर्ध्या तासात संपला तर.

**प्र. नगरसचिव :-**

पुढच्या वेळेस येईल कन्टीन्युशनमध्ये येणार.

**जुबेर इनामदार :-**

पण आज लागला असता ना म्हणून विचारतो.

**प्र. नगरसचिव :-**

पुढे आहेत ऑलरेडी यांचे प्रश्न आधी आलेले आहेत. आपण फक्त पाच प्रश्न घेतो. आपली सभासुचना निघाल्यानंतर तुमचा प्रश्न आलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

ॲटलिस्ट अर्ध्या तासाचा असतो. प्रश्न किती तासाचा असे कुठे उल्लेख नाही. आपण फक्त "ज" चे प्रस्ताव अर्ध्या तासात घेतो.

**प्र. नगरसचिव :-**

११.२० झालेले आहेत. १०.५० पर्यंत राहील. प्रश्नोत्तराची वेळ तेवढी राहिल.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, मी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये विविध विकास कामे आणि विविध योजनाची कामाची सुरुवात झालेली होती. परंतु काही काम अजूनही अर्धवट स्थितीत दिसून आलेली आहेत. आणि त्यासंदर्भातली माहिती ह्या प्रश्नाद्वारे विचारलेली होती. आपल्याला विनंती आहे की भुयारी गटार योजनेची माहिती देण्यासाठी त्या विभागाच्या प्रमुखांना येथे बोलविण्यात यावे. महापौर मॅडम आणि उपआयुक्त म्हसाळ साहेब आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये याचा पाण्याचा निचरा व्हावा म्हणून भुयारी गटार योजना चालू करण्यांत आली. परंतु त्याचा पिरेड काहीतरी असेल ना?

**सुरेश वाकोडे :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो भुयारी गटार योजनेची जी कामे आहेत महानगरपालिकेमध्ये चालू आहेत. त्याची मुदत ही सुरुवातीला २०११ ची होती. नंतर या योजनेत आपण मुदतवाढ दिलेली आहे. त्याप्रमाणे त्याचे सात झोन, दोन, तीन, चार, पाच, सहा, बी सिक्स, सेवन असे सात झोन आहेत. तर त्याला आपण २०१२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. आणि दुसरा झोन एकसाठी आपण नोव्हेंबर २०१३ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. आणि सिक्स बीसाठी २०१४ पर्यंत दिलेली आहे. आणि दोन नंबर आठसाठी २०१३ पर्यंत दिलेली आहे आणि हे जे दोन डिले झालेले आहे त्यासाठी ती रक्कम आपण आठ कोटी रुपये त्यांच्या याच्यातून कट करुन आपण आपल्या डिपॉझीटमध्ये आपण आपल्याकडे ठेवलेले आहे.

**निलम ढवण :-**

मुदतवाढ कुठे दिली म्हणजे महासभेमधून दिली का कशी दिली?

**सुरेश वाकोडे :-**

मुदतवाढीचा विषय हा स्टॅन्डिंगने पास केला ठरावानुसार बिल लिहिले त्यावेळी.

**निलम ढवण :-**

मग शेवटची तारीख काय म्हणालात?

**सुरेश वाकोडे :-**

शेवटची तारीख त्यांची जानेवारी २०१४ पर्यंत होती. त्यावेळेमध्ये पूर्ण नाही म्हणून आपण काय दिलेल नाही. तो आपला निविदेमध्ये पेनॅल्टीचा फॉल्ट असतो. त्यानुसार आपण पॅनल्टी त्याची आठ कोटी रुपये खर्च कट करुन आपण ठेवलेली आहे.

**निलम ढवण :-**

मग त्या कंत्राटदाराला तुम्ही मुदतवाढ जी दिली आहे त्यावेळेत काम न झाल्यामुळे जे नुकसान आहे ते तुम्ही किती घेतल?

**सुरेश वाकोडे :-**

निविदेच्या कंडीशननुसार आपण त्याच्याकडून आठ कोटी रुपये कट करुन ठेवलेले आहेत. त्यांना नोटिस पण दिलेली आहे. पण कसे आहे की इथली भौगोलिक परिस्थिती बघता जे काम करताना इथल्या

ज्या अडचणी आहेत तर त्याच्यामुळे ह्या कामाला डिले झालेला आहे. आताच्या परिस्थितीमध्ये आपले सहा एस.टी.पी. सुरु झालेले आहेत त्यामध्ये. आपण ह्यामध्ये ९० कि.मी. पर्यंत पाईप लाईन टाकलेली आहे. आपला त्यामध्ये साधारणतः आता झोन नंबर ५, १७ एम.एल.डी. आहे. झोननंबर सहा १३ एम.एल.डी. झोन नं. सीक्स सी ११ एम.एल.डी., झोन नंबर सहा १२ एम.एल.डी. झोन नंबर दोन ८ एम.एल.डी., झोन नंबर आठ १४ एम.एल.डी. असे ७५ एम.एल.डी.चे आपण एस.टी.पी. सुरु केलेले आहे. आता उर्वरीत आपला सहा बी चा एस.टी.पी. आहे. एक आठ ते दहा दिवसात सुरु होईल त्यामध्ये आणि दोन एस.टी.पी. ला मार्चपर्यंत आपला टार्गेट आहे.

**निलम ढवण :-**

मार्च २०१८ तुम्ही आठ करोडचे कंत्राटदाराकडून आपण ठेवलेले आहेत. बॅलेन्स भुयारी गटार योजनेचे पूर्ण हे कितीचे होत.

**सुरेश वाकोडे :-**

४९१ कोटी.

**निलम ढवण :-**

४९१ कोटीमध्ये २०११,२०१२,२०१३,२०१४ आता २०१७ संपलेले आहे. जवळ जवळ आतापर्यंत जो कंत्राटदार आहे त्याला फक्त ८ कोटीच पडत का?

**सुरेश वाकोडे :-**

हो निविदेच्या कंडीशननुसार जे आहे ते आठ कोटीचे आहे ते पॅनल्टी आपण कट केलेली आहे ते सगळे टेंडरमध्ये जे कंडीशन असतात त्याप्रमाणे असते. आता त्यामध्ये कसे होते काही गोष्टींमध्ये आपण सिवरेज म्हटल ना साहेब. सगळ्या जागा मिळणे त्या जागा त्याला हॅन्डओवर करण ह्या गोष्टीसाठी विलंब होतो. आता बऱ्याच ठिकाणी शहराच्या तुम्ही सिवरेज स्कीमचा विचार करा की एवढ्या डीपला काम करुन बऱ्याच वेळा हे कंत्राटदार शोधा दुसरे कंत्राटदार, तिसरे कंत्राटदार अशा पध्दतीने होते. आपण आजच्या परिस्थितीला आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने ते काम पूर्ण चालू झालेल आहे. आपण ९६ टक्के, ९७ टक्के काम कम्पलीट झालेले आहे. आता थोडेसे राहिलेले आहे. आता कसे आहे की जोपर्यंत एखादा दोन मीटरचा गॅप असेल तो कम्पलीट केल्याशिवाय पुढे जाता येत नाही. ही आपली स्थिती आहे. आपण त्यांच्या प्रशासन कन्टीन्यू फॉलोअप करतो आणि लवकरात लवकर ह्या मार्चपर्यंत कम्पलीट करुया.

**निलम ढवण :-**

मुळ अंदाजपत्रकावर कंत्राटदारास काही वाढीव दिले आहे का?

**सुरेश वाकोडे :-**

नाही आपण ही जी योजना आहे की आपण ह्या ठिकाणी एस्कलेशन त्याचा रिस्टीक करुन टाकल आता मला सांगा २०१२ पर्यंत ठेवले आहे. ही मूळ योजना होती तिथेच आपण रिस्टीक करुन टाकल कारण त्याला काम माहिती आहे का पुढचा जो त्यावेळेला टेंडरप्रमाणे जे एस्कलेशन मिळणार तेच ते होते. पुढचा आपण ठेवलेला नाही. कारण वाढीव काम डिले झाल त्यामुळे त्याची जबाबदारी आपण घेतली नाही. जो खर्च झाला तुझ्यामुळे झाला आहे त्याचा ॲडीशनल खर्च तुला क्लिअर करायचा आहे.

**निलम ढवण :-**

त्यासाठी महासभेची मान्यता घेतली का?

**सुरेश वाकोडे :-**

हे एक्सटेंशन टेंडरमध्येच आहे वेगळे नाही. हे टेंडर मधलाच भाग आहे. वेगळे काही नाही. आणि टेंडरला महासभेने मान्यता दिलेली आहे. एक्सटेंशनला स्टॅन्डिंगने मान्यता दिलेली आहे.

**निलम ढवण :-**

भुयारी गटार योजनेसाठी आजपर्यंत आपल्या महानगरपालिकेच्या निधीतून महानगरपालिकेची किती रक्कम खर्च झाली?

**सुरेश वाकोडे :-**

याच्यामधून निधी ४७३ कोटी त्यामध्ये येणार, प्राप्त निधी आपला स्टेट गर्व्हमेंटचा १४१ कोटी आहे.

**निलम ढवण :-**

आपले पालिकेचे किती आहेत?

**सुरेश वाकोडे :-**

उर्वरीत आपण युज केलेले आहेत ३३१ करोड आपला महापालिकेचा निधी आहे.

**निलम ढवण :-**

३३१ आणि ४९१ ची म्हणजे जवळ जवळ ७५-८० टक्के पालिकेचीच आहे. ह्या आता २०१७ एन्डींग किंवा २०१८ पर्यंत पूर्ण होणार. भुयारी गटार योजनेच्या मूळ प्रकल्पात भाईंदर पश्चिम आणि भाईंदर पूर्व ह्या भागात देखील ही योजना मंजूर होती. परंतु तिथे ती काम झालेली नाहीत.

**सुरेश वाकोडे :-**

मॅडम काय आहे की भाईंदर पूर्वमध्ये काही भागामध्ये कसे आहे की दाट वस्ती आहे. तिथल्या त्या बिल्डींग आहेत त्या कोटींवर उभ्या केल्या आहेत. आता भुयारी गटार करताना कसे आहे की पाणी हे ग्रॅव्हेटीने आल पाहिजे. त्या उत्तरान झाले पाहिजे. आपण जेव्हा खोदाई करायला गेलो होतो पोकलन तो मोठी अडीचशे एच.पी. चा पोकलन लागतो. पोकलन उभा केला तिथे नुसता त्या पोकलनच्या आवाजाने तिथल्या त्या बिल्डींगमध्ये हादरे बसायला लागले. आणि ही परिस्थिती आहे. मग त्या वेळेला आपण अशी ती कुठली बिल्डींग पडून काहीतरी हानी होण तर म्हणून आपण काय केल की त्या ठिकाणी करता येत नाही म्हणून आपण स्टॉप झालो. आपण प्रयत्न केला त्याठिकाणी तर त्या ठिकाणी आपण काहीतरी वेगळे तंत्रज्ञान वापरुन करावे लागेल. आपण काय केले त्या ठिकाणी मेन लाईन नवघरची ती टाकून दिली पण पण ज्या ब्रॅन्चेस लाईन जोडायच्या आहेत त्या करायच्या आहेत ना ते करु शकलो नाही. कारण काय आहे की ज्या जुने गाव ज्याठिकाणी आहेत. कोटींवर आहेत त्या ठिकाणी कसे आहे की त्या पडण्याची शक्यता आहे. कारण डेप प्लींथ ७, ८ मीटर खाली जाणार आहे.

**निलम ढवण :-**

ठीक आहे परंतु त्या अशीच चर्चा मागे एकदा महासभेत झाली होती आणि त्यावर तोडगा म्हणून महापालिकेचे काही अधिकारी आणि आपण लोक सगळे फॉरेन टूर करुन आला होतात. आधुनिक तंत्रज्ञानाचा आपल्या मिरा भाईंदर शहरातून वापर करण्यासाठी तर त्याचा वापर किती करण्यात आला?

**सुरेश वाकोडे :-**

जे आपण तिथल तंत्रज्ञान बघितल ना तिथली पॉप्युलेशन फार कमी वापरली आहे शहरात. कमी पॉप्युलेशनमध्ये झालेली योजना होती. आपली कशी आहे की ती एकदम डेन्स पॉप्युलेशन आहे त्या ठिकाणी. डेन्स पॉप्युलेशनच्या ठिकाणी तिथलं तो फॉर्मुला होणार नाही. त्यावर आणखी काही पर्याय ते आपण काढलेला आहे.

**निलम ढवण :-**

हा जो भाईंदर पूर्वेचा आणि पश्चिमेचा हे आहे ते तुम्ही कुठे वगळलात आणि वगळण्यासाठी.

**सुरेश वाकोडे :-**

वगळलेला नाही. मॅडम काय आहे हे बघा आपण भाईंदर पूर्वेला एस.टी.पी. तयार केलेला, एस.टी.पी. करुन ठेवलेले आहे. जी लाईन टाकायची ती टाकलेली आहे. आता भविष्यामध्ये त्याठिकाणी रिडेव्हलपमेंट झाले याचा नविन टेक्नॉलॉजी आणली आपण ती लाईन जोडूया. आपण वगळणार नाही ना त्यामध्ये.

**निलम ढवण :-**

मग ह्या टेंडरमध्ये तुम्ही तेव्हा पुढे कधी भविष्यात होईल तेव्हा तुम्ही करणार का? त्या निधीचा वापर तुम्ही कुठे करणार आहात? किंवा केलात का?

**सुरेश वाकोडे :-**

कसे आहे की टेंडर हे पूर्ण मिरा भाईंदरचे आहे. मिरा भाईंदरमध्ये लाईन टाकायचा टेंडर आहे. आता मिरा भाईंदरचे टेंडरमध्ये लाईन टाकताना कस आहे की सुरुवातीला हे टेंडर झाल तर त्यावेळेला बरेचशी डी.पी. रोड झालेला नव्हता. पण ते एक्सटेंड करताना ज्या काही लाईन सुटल्या असतील त्या ॲडीशनल आपण घेवून टाकल्या त्यामध्ये आपण ॲडीशनल आपल्या मिरा भाईंदरमध्ये.

**निलम ढवण :-**

त्यामध्ये तुम्ही घेतल आहे. प्रस्तावामध्ये भाईंदर पूर्व, भाईंदर पश्चिम टाकली होती मग त्यानंतर तुम्ही वगळलात त्यावेळी परमिशन घेतली का?

**सुरेश वाकोडे :-**

वगळलेला नाहीच आहे मॅडम.

**निलम ढवण :-**

तिथे करायचे नाहीच आहे.

**सुरेश वाकोडे :-**

वगळलेला नाही हे काय आहे माहिती हे का आजच्या स्थितीला त्याठिकाणी काम करता येत नाही. टेक्नीकली अडचण आहे त्याच्यामध्ये.

**निलम ढवण :-**

करता येत नाही म्हणजे करणारच नाही. शेवटी प्रॉब्लेमच आहे ना. टेक्नीकल प्रॉब्लेम आहे. ते करणार नाही.

**सुरेश वाकोडे :-**

टेंडरमध्ये आपली टोटल ९० कि.मीटर जागा होती. आपण ९० किलो मीटर लाईन टाकली. आणखी याच्यानंतर सहा सात किलोमीटर आपण ॲडीशनल टाकणार आहोत. आता ठीक आहे. आता एखादे कसे आहे की त्या गल्लीमध्ये लाईन नाही टाकली आणि शहरामधल्या काही गल्ल्या सुटल्या असतील. तर त्याठिकाणी लाईन टाकून काय करतो किंवा सुविधा देण्याचा प्रयत्न करतो.

**निलम ढवण :-**

सुविधा देत आहेत चांगल आहे. शहराच्या विकासासाठीच आहे परंतु लहान लहान बाकीच्या गोष्टी करताना देखील कागदपत्राची परमिशन त्याची परमिशन असते एवढे मोठे मोठे प्रकल्प राबवताना त्यावेळी तो निधी किंवा भाईंदर पूर्वेचा पश्चिमेचा एरिया तुम्ही टाळत आहेत. बाकीच्या ठिकाणी वापरतात त्यावेळी महासभेची किंवा स्टॅन्डींगची मंजुरी तुम्ही घेतली आहे का?

**सुरेश वाकोडे :-**

वेगळ्या ठिकाणी मॅडम टेंडर आहे त्या टेंडरमधलाच तो पार्ट आहे. तो पार्ट आपण तिथे वापरतो वेगळ अस काही केल नाही ना आपण. हे सोडून वेगळ काही केल नाही.

**निलम ढवण :-**

तुम्ही पहिल्यांदा जे टेंडर काढल ते ऑल ओवर काढल होत ना.

**सुरेश वाकोडे :-**

मॅडम कस आहे की त्यामध्ये आपण मिरा भाईंदर क्षेत्र म्हटले आहे. मिरा भाईंदर क्षेत्र मेन्शन करतो. आता काही ठिकाणी ज्या काही अडचणीमुळे ती लेन्थ झाली नसेल तर ॲडीशनल कुठे डी.पी. रोड सोडला असेल तर तो आपण कव्हर करु त्याच्यामध्ये. लेन्थ तेवढी कव्हर करतो ना मॅडम.

**निलम ढवण :-**

मला तेच माहिती आहे. ऑल ओवर लेन्थ मागूनच सगळ काढल होत मग एवढा मोठा नवघर रोड आधी वेस्टचे तेवढा जो एरिया राहतो तर तो एरिया तुम्ही म्हणत आहेत इतर ठिकाणी कव्हर करणार म्हणजे ज्या ठिकाणी तेव्हा गरज नव्हती का जेव्हा एकत्रित टेंडर काढल तेव्हा.

**सुरेश वाकोडे :-**

मॅडम काय होते एखादी कुठली योजना हाती घेतो त्यावेळेला कस होत काही ठिकाणी डी.पी. रोड नसतात. काही ठिकाणी घरे नसतात घर नसताना आपण लाईन टाकायला लागलो काय होत आपल्या लोकांची ऑब्जेक्शन यायला लागतात. इथे घरे नसताना तुम्ही का टाकतात.

**निलम ढवण :-**

मग तेच म्हणते मला काय म्हणायचं आहे घर नसताना तिथ कशाला टाकतात. लोकाचं ऑब्जेक्शन आपण सर्व्हे करतो ना? पहिल्यांदा जेव्हा एखादे कामकाज करायचे म्हणतोय तर त्यावेळी महानगरपालिकेचा एक सर्व्हे होतो की तिथे आवश्यक काय आहे जिथे जिथे आवश्यक असेल त्या-त्या ठिकाणचा सर्व्हे होऊन त्यानुसार प्लान तयार होतो. मग आता तुम्ही सांगता लोकांचे जेव्हा ऑब्जेक्शन येतात की तिथे गरज नसते तिथे डावलतो आणि दुसरीकडे करतो.

**सुरेश वाकोडे :-**

मी ज्या ठिकाणी सुरुवातीला ज्यावेळेला २००९ च्या वेळेला काही ठिकाणी डी.पी. रोड नसते त्या ठिकाणी करतो की फ्युचरमध्ये प्रस्तावित लाईन असते त्याठिकाणी पण आपण करताना करत नाही त्याठिकाणी. टेंडरमध्ये घेतलेले नसते त्यामध्ये. पण कसे होते की ह्या टेंडरमध्ये विलंब झाला तीन चार वर्षाचा विलंब झाला आहे. त्यामध्ये काही ठिकाणी डी.पी. रोड झालेले आहेत. काही ठिकाणी घर झालेली आहेत. आता डी.पी. रोड परत नविन तो डांबरी रस्ता करणार त्याच्या ऐवजी आपण तसे लाईन टाकून परत परत खर्च होऊ नये म्हणून टाळतो आपण. ह्या गोष्टी आपण कव्हर करतो मॅडम.

**निलम ढवण :-**

भविष्यात डी.पी. रोड आणि नवघर रोड ह्यात आहेत. त्यावेळी नविन तरतूद करणार की ह्याच्यातले करणार आहात.

**सुरेश वाकोडे :-**

भविष्यामध्ये ह्यामध्ये नविन टेक्नीकलने काय करता येईल हे सगळे अभ्यास करुन ह्या ठिकाणी करणार काम.

**निलम ढवण :-**

करणार आहेत ठिक आहे.

**गिता जैन :-**

महापौरांच्या परवानगीने बोलते वाकोडे साहेब मी त्या ट्रायलपील मागितली आहे. कुठपर्यंत पोहोचले ते.

**सुरेश वाकोडे :-**

मॅडम ह्यासाठी कसे आहे की आय.आय.टी. ला नेलेल आहे. आयटील आपण काय म्हटले की ह्या ठिकाणी आपण सांगितले की अस अस कम्पलेन्ट आहेत काही. व्हेरीफाय तुम्ही करुन घ्या आय.ए.टी.ला नेमल आहेत आपण. आयटीने व्हिजीट दौरा केला आहे. त्यावर त्याचा डाटा वगैरे घेतला आहे. आता पुढचे काम ते करणार.

**गिता जैन :-**

मी तेच विचारते आय.आय.टी करुन घेत आहे.

**सुरेश वाकोडे :-**

पुर्ण रिपोर्ट नाही आलेला त्यांचा.

**गिता जैन :-**

कधीपर्यंत रिपोर्ट येणार?

**सुरेश वाकोडे :-**

नविन करतो मॅडम, फॉलोअप करतो मी त्यांचा.

**गिता जैन :-**

मग का अजून फॉलोअप झाले नाही. एक वर्ष झाले.

**सुरेश वाकोडे :-**

आपण कस आहे की आय.आय.टी जी माहिती मागितली आपण ते त्यांच्या वेळेनुसार हे करणार. म्हणून एकदा त्यांची व्हिजीट पण झालेली आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो वाकोडे साहेब सध्या शहरामध्ये ही भुयारी गटार योजना शंभर टक्के कुठे कुठे चालू आहे?

**सुरेश वाकोडे :-**

साहेब काय आहे माहिती आहे का. आपण एस.टी.पी. जोडले आहेत. झोन नंबर पाचला एस.टी.पी. सुरु केलेले आहे.

**अनिल सावंत :-**

सर एरिया सांगा ना. जैसल पार्कला चालू आहे.

**सुरेश वाकोडे :-**

शांतीनगर, शांती पार्क, कनकिया गाळला आहे. नंतर इंद्रलोक आणि गोल्डन नेस्टचा रोड, भाईंदर वेस्टला टेंबा रोड आणि घोडबंदर असे चालू आहे.

**अनिल सावंत :-**

घोडबंदरला चालू आहे? शांतीनगर, सृष्टी, जैसल पार्क आता तुम्ही सांगितले की ९७ टक्के काम पूर्ण झालेले आहे. हा जर एरिया बघितला मिरा भाईंदर महानगरपालिकेचे क्षेत्र ७९ किलो मीटर त्यातला मला वाटत ४० टक्के सुध्दा चालू नाही. आणि तुम्ही कॉन्ट्रॅक्टरवर कारवाई केली. प्रत्येक वेळा आपण डी.पी. आर बनवतो. डी.पी.आर बनवतो मला वाटते त्या स्कीमसाठी कन्सल्टंट नेमला होता फार मोठी स्कीम होती ही जे.एन.एन.यु.आर.एम.च्या अंडर कॉन्ट्रॅक्टरवर कारवाई केली कन्सल्टन्टवर काय कारवाई केली? सर्व जबाबदारी त्याची होती. काम करुन घेण्याची आता तुम्ही सांगता की नवघरमध्ये होऊच शकत नाही. मग त्याच्याकडून काय रिपोर्ट दिला होता तुम्हाला. त्याचा डी.पी.आर बनवला असेल ना त्यावेळी

त्यांच्याकडून त्याला किती टक्के फी दिली पूर्ण प्रोजेक्टच्या पाच टक्के की जास्त दिली. टेंडर असेसमेन्ट मला वाटते कन्सलटन्टमध्ये किती दिले आहे.

**सुरेश वाकोडे :-**

आपण टेक्नॉलॉजी जे म्हणत आहेत आता कसे आहे की ज्यावेळेला.

**अनिल सावंत :-**

साहेब कस आहे ते नका सांगु मला फक्त एवढेच सांगा तुम्ही कन्सलटन्टला किती टक्के दिले कमिशन टेंडर असिस्टन्टला किती टक्के दिले आपल्या प्रोजेक्टच्या किती टक्के फी दिली.

**सुरेश वाकोडे :-**

तीन टक्के फी दिली.

**अनिल सावंत :-**

तीन टक्के दिले मला वाटते जास्त दिली. तीन टक्के फी दिली मग कॉन्ट्रॅक्टरचे पैसे थांबवल्यानंतर कन्सलटन्टने तुम्हाला रिपोर्ट दिला होता का? त्यामध्ये म्हटल होत का नवघर बी.पी. रोड ह्या ठिकाणी होऊ शकत नाही.

**सुरेश वाकोडे :-**

सिवरेजमध्ये जे काम करणे ही आपण काय करतो डिसिरेलाइस सिस्टीम करणे ह्या आठ मीटर टेपला जाणे.

**अनिल सावंत :-**

साहेब हे सर्व त्या कन्सलटन्टला सांगितल असत तुम्हाला टेक्नीकली तुम्ही सांगु नका. कन्सल्टन्टने तुम्हाला जो रिपोर्ट दिला त्यामध्ये फक्त एवढे सांगा नवघर रोड होऊ शकत होता की नाही. बाकी डिटेलमध्ये जावूच नका.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब काय आहे माहिती आहे का आपण जेव्हा कामाला सुरुवात केली त्यावेळेला कुठल्याही ठेकेदारालाही माहित नव्हते की ह्या टेक्नॉलॉजीने ही फेल पडणार आहे म्हणून.

**अनिल सावंत :-**

मग कन्सल्टन्टने काय रिपोर्ट दिला तुम्हाला कसली फी दिली त्याला. आपल्याकडचे ग्राऊंड जे आहे ना रिफिल केलेला ग्राऊंड आहे. आणि त्याच्यामध्ये रिफील आहे आणि खाली स्लशीन आहे स्लशीन रिफिल गेलेला ग्राऊंड आहे. ह्या टेपला आपण आता जे बघताना साहेब आठ मीटरला ते लोखंडाचे प्लेट टाकतो. प्लेट टाकून ते अँगल टाकून ते काम करावे लागते. त्या प्रेशरने त्या प्लेट सुध्दा फाटायला लागतात.

**अनिल सावंत :-**

साहेब हे सगळे तुम्हाला कन्सल्टन्टने रिपोर्टमध्ये सांगितले नाही का?

**सुरेश वाकोडे :-**

ह्या गोष्टीला सुरुवातीला..........

**अनिल सावंत :-**

पूर्ण मिरा भाईंदर असूनही, मुंबई असूनही, ठाणे असूनही हीच परिस्थिती आहे. जागा अशीच आहे जमीन अशीच आहे स्लम एरियाच आहे. तर त्या कन्सलटन्टने रिपोर्ट देतेवेळी तुम्हाला सांगितले नाही का? नवघर आणि बी.पी. रोडमध्ये होणार नाही. आज जवळ जवळ सहा ते सात वर्ष तुम्ही विशेष स्वच्छता कर ह्या लोकांना जवळून घेता राई मुर्धा मोर्वा जवळून घेता, उत्तनच्या लोकांजवळून घेत आहेत. आणि स्कीम किती चालू आहे. फक्त ४० टक्क्यामध्ये मग कशासाठी डी.पी. आर बनवलात तुम्ही आणि कसला टेंडर काढलात आणि कसल्या कंडीशन टाकल्यात पुढे तुमचा विषय आहे. डी.पी.आर बनवण्याचा ते सुध्दा काम असेच होणार आहे का? तुम्ही कन्सलटन्टवर काय कारवाई केली कॉन्ट्रॅक्टवरची ८ करोड रुपये तुम्ही जमा करुन ठेवले आहेत. ठिक आहे कन्सलटन्टवर काय कारवाई केली. त्यांची पूर्ण फी दिली ना. त्याच्यावर कारवाई करणार आहात की नाही. तरच हा जो प्रश्न विचारला गेला आहे महासभेमध्ये त्यातून काही तरी निष्पन होईल नाहीतर आम्ही प्रश्न विचारायचे थातूरमातून उत्तर तुम्ही द्यायची आणि शहराचा सत्यानाश. ह्या स्कीमसाठी शहराने फार भोगल आहे. ५-५,६-६ महिने रस्ते खोदून ठेवले आहेत तसेच राहिलेले आहेत रस्ते. लोकांचा काम धंदा १-१, २-२ वर्ष बुडालेला आहे. ही सर्व कॉन्ट्रॅक्टरची मेहरबानी आहे. कॉन्ट्रॅक्टरला तुम्ही काम दिल त्यांनी सब लिडींग करुन टाकलं. छोट्या कॉन्ट्रॅक्टरला काम दिलं हं तुमच नॉम्समध्ये टर्मस् ॲन्ड कंडीशन होत्या ना तुमच्या फक्त आठ करोड रुपये बाजुला ठेवलेत आणि बाकीच्या पैशाचे काम लोकांचा पैसा गेलेला आहे तो. तुम्ही तो कन्सल्टंटवर कारवाई

करणार आहात की नाही? महापौर मॅडम हा अत्यंत महत्वाचा विषय आहे पुढे सुध्दा आहे. लोकांचे पैसे आपण डी.पी.आर बनवण्यासाठी वापरतो. कॉन्ट्रॅक्टरला द्यायला लोकांचे पैसे वापरतो. कॉन्ट्रॅक्टर आणि कन्सल्टंट असेच सुटतात. ऑफिसमध्ये बसून रिपोर्ट बनवायचे आणि त्यानुसार आम्ही टेंडरींग करायचे नंतर यांना कळत की ही जमीन खोदल्यानंतर येथे पाणी आहे. आम्ही काम करु शकत नाही. मग कन्सल्टंटला कसले पैसे दिले माझी आपल्याजवळ मागणी आहे. निलम ताईने चांगला प्रश्न विचारलेला आहे. त्या कन्सल्टंटवर आणि त्या कॉन्ट्रॅक्टरवर दोघांवर सुध्दा कारवाई करा.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय, ज्वलंत विषय आहे ह्या शहराचा खर तर हा ऐतिहासिक विषय आहे हा इतिहास घडवणार आहे शहरामध्ये आता कसा इतिहास घडवतो तेही सांगता. हा प्रकल्प २००८ मध्ये पूर्ण शहरामध्ये कार्यान्वीत झाला पाहिजे होता. बरोबर आहे वाकोडे साहेब दिलेल्या करारनाम्याप्रमाणे आज २०१७ संपले. म्हणजे २०१८ कुठे चाललो म्हणजे दहा वर्षे हा एक योजना आपण ह्या शहरामध्ये पूर्ण करु शकलो नाही. साहेब सुरुवात झाली हा जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत हा प्रकल्प आपल्याला ह्याला मंजूरी प्राप्त झाली. ४९१ कोटी रुपयांचा आपल्याला ही योजना मंजूर झाली. तेव्हा ५० टक्के फक्त महानगरपालिकेला लागणार होते बरोबर आहे साहेब तितकच होत आपल आज पालिकेचे ३३१ कोटी रुपये लागले ते कसे लागले लागायला पाहिजे होते अडीचशे कोटी रुपये आज ते ३३१ कोटी रुपये वर गेले साहेब त्याचे कारण कॉस्ट एस्कलेशन आणि कॉस्ट एस्कलेशन कारण म्हणजे हा डीले आणि का झाला स्वाई टेस्ट, जमीन बरोबर नाही, रस्ते बरोबर नाही अडीअडचणी आल्या साहेब ही कंपनी एवढी मोठी अस्टमो कंपनी ज्यांनी नियोजन केले आहे. पूर्ण प्रकल्पाचा त्याला चारशे पाचशे रुपयांची एक स्वयंम कंपनी काम करणारी पूर्ण देशामध्ये काम करते. त्याला एवढे समजत नाही की ह्या भूमीची माती कशी असणार व आमच्या कुठल्यातरी शेतकऱ्यांना काकांना विचारल असते तरी त्यांनी सांगितल असतं माती कशी आहे. इथली जमीन कशी आहे, इथे एक फुट खोदल्यानंतर याच्यानंतर काय लागेल हाती. साहेब हे सगळ काही असताना यंत्रणा आपल्याकडे असताना सुध्दा अशाप्रकारे झालेला डिले दुसरा काही नाही आपल्याला भुर्दंड आहे. म्हणजे असे होणार आहे उद्या की अजूनही योजना पूर्ण झालेली नाही. ही योजना पूर्ण व्हायला जवळपास दहा वर्षे लागणार आहेत. म्हणजे आपण जिथून सुरु केले होते ना साहेब ती योजना त्याच आपल्याला औषध शोधून काढावे लागतील. ऑर्कीलॉजीकल डिपार्टमेंटची कसे शोधते तो प्रकार त्या औषध शोधून काढावे लागणार आहे. म्हणजे एवढी वाईट परिस्थिती ह्या पूर्ण योजनेची आहे. ह्याला कुठेतरी नविन दिशेने बघण्याची एक गरज आहे. नविन डी.पी.आर. तयार करायला बरोबर आहे. मग तेही करताना तसच विषय आहे पूर्ण परत डी.पी.आर. चा म्हणून आम्ही यांच्या हाती झालेल्या चुका ह्या प्रश्नोत्तराच्या माध्यमातून काका तुम्ही आणि मी काही इंजिनियर नाही. हे करायला तरी आम्हाला एक सामान्य लोकप्रतिनिधीला हा विषय समजून येतो तसेच ज्यांनी कॉलीफाईड आपण आज एवढे अभियंता आपल्याकडे ठेवलेले आहेत त्यांना ही वस्तु का समजत नाही. त्याचे कारण काय आहे. साहेब आज कमीत कमी १०० कोटी रुपये जास्त पालिकेचे खर्च होणार आहेत. त्याच्यावरती कुठेतरी विचार करण्याची गरज आहे.

**निलम ढवण :-**

वाकोडे साहेब मी ह्या सगळ्या गोष्टींचा विचार करुन ह्या कामामुळे लोकांना होणारे अडथळे, ट्रॅफीकची समस्या आणि इतर बऱ्याच सगळ्या गोष्टी खोदलेल्या असतात. येता जाता काहीतरी चालणारी व्यक्ती पण त्याच्यात पडते. बरेचशे असे हे बाकीचे मुद्दे आहेत. परंतु होणारा खर्च आणि त्या महानगरपालिकेच्या लोकांचा पैशांचा चांगला विनिमय कमी वेळात लोकांना चांगली सेवा देण्यासाठी व्हावा हा आमचा उद्देश आहे आणि त्यामुळे लवकर लवकर ही योजना पूर्ण करुन कंत्राटदार आणि कन्सल्टंट ह्यांना पाठीशी न घालता जे झालेले नुकसान आहे. लोकांचे पैसे ह्याच्यात गेलेले आहेत ते पूर्ण त्यांच्याकडून वसूल करुन ही योजना लवकरात लवकर पूर्ण करा अशी मी ह्या सभागृहात आपणाला विनंती करते आणि जास्तीत जास्त चांगल्या सुविधा कमी पैशाने चांगली सुविधा आणि कमी वेळात लोकांना द्यावी अशी मी आपल्याला विनंती करते. महापौर मॅडम आपल्याला विनंती आहे. ह्या एका प्रश्नामध्ये माझे चार विषय होते हा एकच विषय आज पूर्ण झाला आहे. पुढचे जे उर्वरीत आहेत. ते विषय पुढच्या महासभेमध्ये घेण्यात यावे अशी मी आपल्याला विनंती करते.

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे.

**निलम ढवण :-**

मॅडम ह्या संदर्भात आपण देखील संबंधित विभाग प्रमुखांना आदेश द्यावेत. आपल्याला विनंती करते की आपण आता त्यांना त्या संदर्भात आदेश द्यावेत.

**मा. महापौर :-**

विषय आहे का?

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम जी चर्चा झाली त्यासंदर्भात आपण रुलींग द्या आणि आपण त्या संदर्भात आदेश द्यावेत. आणि उर्वरीत जे प्रश्न आहेत ह्याच प्रश्नामधले कॉंक्रीट रस्ते, बी.एस.यू.पी. उत्तन कचरा घनप्रकल्प हे सगळे विषय पुढच्या महासभेत प्रश्नोत्तरासाठी घेण्यात यावे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे. आजच्या सभेसाठी दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी आहे सन्मा. सदस्य अनिल सावंत यांची लक्षवेधी आहे. फेरिवाल्यांसाठी बाजार पेठ इमारत करण्याच्या संदर्भात आहे. आणि दुसरी लक्षवेधी आहे. नगरसेविका निला सोंस यांचा विषय आहे. शिवार तलाव व वर्धमान फेंन्टासीच्याबाबत. दोन्ही लक्षवेधी मी मा. महापौरांकडे सुपुर्त करतो.

**मा. महापौर :-**

दो लक्षवेधी आई है। निला सोंस और अनिलजी सावंत. मी निला सोंसची लक्षवेधी मी स्विकारत आहे. सचिव साहेब तुम्ही सगळ्याची लक्षवेधी घ्या.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, लक्षवेधी कुठली घ्यायची हा तुमचा अधिकार आहे. तुम्ही ती स्विकारली माझी लक्षवेधी वाचून जरी दाखवली असती.

**मा. महापौर :-**

आपको जो लक्षवेधी का विषय है, वो तो विषय भी है उसके बारे में तो उसमे चर्चा कर सकते है।

**अनिल सावंत :-**

मी लक्षवेधी सचिव साहेब आता आलेली आहे. कारण मला वाटत मागच्या मिर्टींगमध्ये जशी लक्षवेधी होती ती नाही दिली.

**निला सोंस :-**

महापौर मॅडम इस विषय को गंभिरता से लेने के लिए क्योंकी समस्त मिरा भाईंदर के लिए एक मात्र पर्यटन स्थल है, जिसको हम शिवार गार्डन के नाम से जानते है वो आज वर्धमान फेन्टासी से नाम से जानते है। मैं आप सभी को कहना चाहूँगी की हमने निरीक्षण किया है और बहुत दयनिय स्थिती है। शिवार तालाब जो की बहुत ही गंधा है, और बदबू है जितने वहाँ पे नागरिक आते है घुमने के लिए यहाँ सुबह मॉर्निंग वॉक के लिए वो स्वास्थ के बदले में बिमारीयों का शिकार होते है। क्योंकी वो हमने प्रायव्हेट वर्धमान को दिया हुआ है। चलाने के लिए और वहाँ व्यवस्था और साफसफाई के नाम पर कुछ भी नही है। वहाँ जितने भी लोग आते है अगर जो उन्होंने डेव्हलपमेन्ट भी किया है। वो अगर कोई निचे बैठा है तो कब पी.ओ.पी. उनके सर पे गिर जाएगी। उसकी कोई गॅरंटी नही है। अगर वहाँ नगरपालिका निरिक्षण करेगी तो सारी चिजे वहाँ पे देखने उनको मिलेगी। इसके अलावा वहाँ पर एम्यूझमेंट पार्क में जितने भी इलेक्ट्रॉनिक उपकरण है वह एक बडी दुर्घटना का कारण बन सकते है। क्योंकी नाही उनका मेन्टेनन्स हो रहा है और बेकायदा वहाँपर जंग लगे हुए उपकरण है। और कोई मेन्टेनन्स कोई वहाँ उसके लिए टिम नही है। जो उसको मेन्टेनन्स करते हो इसकी साथ साथ वर्धमान को जो हमने डेव्हलपमेंट के लिए दिया हूआ है शिवार गार्डन वहाँ उनको एक ओपन प्लॉट दिया गया था जिसपे ५० टक्के डेव्हलप करके उनको नागरिक सुविधा देनी थी। वह नागरिक सुविधा किसी खेलकुद के रुप में या जिम के रुप में वो दे सकते थे लेकिन वहाँ सभी नियमों का उल्लंघन करके आज सोमवार बाजार चालु है। जिसके कारण गंदगी भी फैल रही है वहाँ के रहिवासीयों को तकलीफ हो रही है। यातायात की प्रॉब्लेम हो रही है। और सबसे बडी बात है की यह उनके जो भी कॉन्ट्रॅक्ट है उसकी नियमो का उल्लंघन है तो मैं आप सभी को रिक्वेस्ट करना चाहूँगी। नागरिको की हेल्थ को आरोग्य के हिसाब से और वहाँ पर जिस प्रकार गंदगी के अलावा दुर्घटना का बडा कारण बन सकती है। इलेक्ट्रॉनिक उपकरण, उन सभी के हिसाब से और जो सोमवार बाजार है जो की कानुनो का उल्लंघन है उस पर कडी कारवाई कि जाए और हो सके तो वर्धमान फेन्टासी का कॉन्ट्रॅक्ट भी रद्द किया जाए क्योंकी बिलकुल भी वहाँ पर कोई सुविधा नही है और मेन्टेन नही है। शादीयों को अभी देना शुरु किया है तो वो भी हमने नॉलेज में डाला है। शादीयाँ अंदर होने लगी है और बहार भी तो मतलब सभी टाईप की कमर्शियल ॲक्टीव्हीटी हो रही है। एक तरफ

नागरिक को सिर्फ दो रुपये की फी लेते है की वो नागरिको के लिए है। और दुसरी तरफ हम सारी चिजो के अंदर कमर्शिअल चार्जेस करते है। तो किसी भी रुप में ना साफसफाई के रुप में ना कानूनी रुप में किसी भी रुप में वर्धमान फेन्टासी का यह कॉन्ट्रॅक्ट मुझे नही लगता की नागरिको के हित में है और जायज है। इसे महानगरपालिका के अपने अंतर्गत लेना चाहिए ताकी साफसफाई मेन्टेन हो और कार्य सुचार रुप से चल सके।

**दिपीका अरोरा :-**

महापौर मॅडम विथ युअर परमिशन महापौर मॅडम ऐसा मेने भी पत्र डाला था की दो साल पहिले मैंने आयुक्त को और म्हसाळ साहब को मिलकर यह बात बताई थी की वहाँ पर सेव्हन वंडर्स नाम का हमने उसके एक टायटल दिया है। वो गार्डन को और उसको जस्टीफाय करने के लिए वहाँ सेव्हन वंडर्स ऑफ द वर्ल्ड के मॉन्युमेस के नेचर रुप में बनाए गए है। ताकी हमारे नागरिक और बच्चे वो देख करके सिख सके और वहाँ पर जा के एक टुरीस्ट के तरफ वो प्लेस को वापर सके पर जब हम अंदर जाते है दो रुपये भरते है पर अंदर इस बंदे ने वहाँ पर एक बस लगाई है। मिनी बस जिसकी वो लोग शुल्क लेते है अराऊंड हंड्रेड रुपीज पर हेड और पुरा जो सेव्हन वंडर्स है उसको उन्होंने कव्हर करके रखा है टीन के पत्रे से। ताकी हम लोग नेकी डाय से भी नही देख सके आप मुझे पता है की, अगर कोई ॲव्हरेज घर का बंदा वहाँ पर जाता है पांच बच्चे को लेकर के व्हिल ही पे फाईव्ह हंड्रेड रुपीज फॉर गोईंग इनसाईड द ट्रेन. डब्बा क्या यह जस्टीफाईड है की हम लोग एक तरफ रिक्रीएशन के लिए चिजे बना रहे है और उसपे टॅक्स की मतलब २० रुपीज, १५ रुपीज ओके आय अंडरस्टॅन्ड बट हंड्रेड रुपीज तो क्या यह हमारे उसमें नही आता की हमने जो दो साल से हम लोग बात को बोल रहे है। किसी ॲडमिनिस्ट्रेशन के बंदे ने जा कर के क्यों नही रोका क्योंकी हमारी सुनवाई नही होती है। तो मॅडम मैं चाहती हूँ की आप एक महिला आपको पता है एक बजेटेड घर कैसा चलता है। तो अगर इस तरफ से हम लोगो को नॉर्मल घर को यह सुविधा देनी है पर्यटक स्थल देना है तो आय थिंक सो धिस थिंग शुल्ड बी मेड ओपन टू द पब्लिक. क्यों चार्ज कर रहे है हम लोग.

**मा. महापौर :-**

ह्याविषयी संबंधित अधिकारीने खुलासा करावे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम त्या संदर्भातच एक प्रश्न म्हणजे साहेब एकदमच खुलासा करतील. एक त्या संदर्भातच प्रश्न आहे. साहेब माझ्या माहिती प्रमाणे एवढा कमर्शिअल यूज होत असताना देखील वर्धमान फेन्टासीची पूर्ण भाडे पालिकेला पेड नाही अशी माझ्याकडे माहिती आहे. खर खोट माहिती नाही. म्हणून खांबित साहेबांनी त्याचा खुलासा करावा.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो महापौर मॅडम जैसा की अभी सब सदस्योने गंभीर विषय आपको बताया मेरा एक ही मानना है की दो सालसे इस पर जो आवाज उठ रहा है की वर्धमान फेन्टासी उसका भाडा भी नही आ रहा है। इललिगल दुकान बना रहा है अभी दो दिन पहले देखा उधर शादी हो रहा है। कचरा पडा है मॉर्निंग वॉक पे लोग जा रहे है। बदबू आ रही है सब ऐसा चल रहा है। सदस्य का काम है की प्रशासन और उनका कुछ भी दायीत्व नही बनता उस पर अंकुश लगाने की उनकी जबाबदारी नही है। हम सदस्य आकर आपको नॉलेज देना है तो प्रशासन क्या कर रहा है। खांबित साहब खडे है वो सब जानकारी देंगे वो बताऐंगे इसके उपर स्टे आया है वो सब चीजे हमको भी पता है। स्टे आने के बाद में मुझे जो जानकारी है स्टे आने के बाद हमारा फर्ज नही बनता की स्टे हमारे उपर लागू होता है। तो मैं पुरी जानकारी चाहूँगा और मेरे जो सवाल है वो मैं रखूँगा।

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, पालिकेच्या गार्डनमध्ये गणपती विर्सजन आणि नवरात्र विर्सजन झाले त्यानंतर तो तलाव साफ केलाच नाही. स्थीर पाण्यावर मच्छर येतात त्यावर कोणी कारवाई करत नाही. आरोग्य विभागाला मी लेटर दिलेले तिथे लग्न करायला परवानगी दिलेली आहे का आणि ज्या जागेमध्ये डेव्हलपमेंट करायला पाहिजे त्या जागेमध्ये फेरिवाले बसतात आणि तिथे हफ्ते घेतले जातात. तिथे साफसफाईला गाड्या मिळत नाही तर ती साफसफाई आम्ही का करावी.

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आरक्षण क्र. २६२ टाऊन पार्क हे आपण २००७ मध्ये वर्धमान डेव्हलपरला बी.ओ.टी. तत्त्वावर विकसित करण्यासाठी दिले होते. त्यांनी ८५ टक्के भागामध्ये प्लॉट ए आणि प्लॉट बी असे केले होते. ८५ टक्के भाग पब्लिकसाठी यूज करायचे होते आणि १५ टक्के कर्मशियल

यूज करायचे होते त्याला आपण परमिशन दिली होती ८५ टक्के भागामध्ये खेळणी बसवून बिझनेस करायचा होता त्याप्रमाणे तो करतो. परंतु बी प्लॉट आहे. क्लब हाऊस जो करायचा होता तो केला नाही. तसेच मेन्टेन केला नाही. त्यामुळे २०१६ मध्ये त्याचा करारनामा रद्द केला ते ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी कोर्टामधून स्टे घेतला आहे. टेंडरच्या अटीशर्तीनुसार आपण आर.बी.ट्रेडर्सची नेमणूक केली आहे. तलावाची साफसफाई होत नाही किंवा त्यांनी नो मार्केट सुरु केला आहे त्या बाबतीत आर.बी.ट्रेडर्स समोर सर्व डॉक्युमेंट प्रुफ दिलेले आहेत. त्यानुसार कारवाई सुरु आहे. परवा त्याला पत्र दिले की हे सगळे बंद करा आणि लग्न जे करतो ते लग्न त्यामध्ये करु शकतो. ह्याचे आपल्याला वर्षाला ४५ लाख रु. द्यायचे होते. २०१४ ला ४५ लाख भरले त्यानंतर २०१५ पासून तीन वर्षाचे पैसे त्यांनी भरले नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम सभागृह ही अपेक्षा करते पैसे देणे घेणे उत्पन्नाचा पार्ट वेगळा आपले ॲग्रीमेन्ट कोर्ट केसेस हा विषय वेगळा. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये आरोग्याचा जो विषय आहे त्याच्या कर्तव्यात कसूर करतो. त्याच्यावर आपण काय कारवाई करु शकतो की नाही त्यांनी नाही केले तर आम्ही तसेच ठेवणार आहोत का? त्याचे इलेक्ट्रीक इस्ट्रूमेन्टचा कोणाला शॉक लागला कोण वारल तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहेत. हा विषय महत्वाचा आहे ती पहिली कारवाईनंतर तुमची प्रोसेस चालू करा. तलाव साफ नाही डेंग्युची साथ शहरात पसरत चालली आहे. आपल्या आरोग्याचा रिपोर्ट आहे पेशन्ट वाढत चालले आहे. त्याच्यावर काय कारवाई करणार.

**रिटा शहा :-**

खांबित साहेब आपने बोला उन्होंने स्टे लिया है। तो कौनसे कोर्टसे और कब स्टे लिया है।

**दिपक खांबित :-**

थाना कोर्ट से २००६ में।

**रिटा शहा :-**

उनको स्टे कब मिला।

**दिपक खांबित :-**

१ साल हो गया।

**रिटा शहा :-**

१ वर्ष झाले आणि आपली एवढी व्हॅल्यूएबल वास्तू आहे ज्या वास्तूच्या हिशोबात जो कार्यभार चालला आहे त्या कार्यभाराच्या हिशोबाने मिरा भाईंदर महानगरपालिका परिसराच्या लोकांचा आरोग्याचा प्रश्न उद्‌भवत आहे. तो स्टे उडवण्यासाठी आपण काय कारवाई केली.

**दिपक खांबित :-**

त्यांनी स्टे घेतला आहे टेंडरच्या कंडीशननुसार आपण आर.बी.ट्रेडर्स नेमलेले आहेत.

**रिटा शहा :-**

साहेब मी ते नाही विचारत टेंडरमध्ये काय होते आणि काय नाही. ते सर्व त्यांनी संपवले आहे. ती एक वर्षापासून जी स्थगिती मिळाली आहे. ती स्थगिती व्हेकेट करण्यासाठी आपले काय प्रयत्न चाले आहेत. ठाणा कोर्टामध्ये स्टे व्हेकेट करण्यासाठी काय कारवाई केली आहे.

**दिपक खांबित :-**

जो आहे त्यांनी पण ह्याला स्टे दिला आहे.

**प्रभात पाटील :-**

आता शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी लॉजिंग आणि बोर्डिंगवर धडक कारवाई होते. त्याच्यामध्ये असे काही लॉजिंग बोर्डिंग आहेत त्यांना हात लागला नाही म्हणून जेव्हा चैकशी केली तेव्हा असे कळले की ह्या लॉजिंग बोर्डींगला स्टे आहे त्या बारला स्टे आहे. मग आपले विधी विभाग काय करते? आपले स्टे का उठत नाही. आपले स्टे का व्हेकेट होत नाही. महत्वाची गोष्ट आहे की तिथे आरोग्याचा प्रश्न आहे. डोक्यावर छत पडून काल एक झाड पडून मुंबईमध्ये माणसे मरतात. सतत दुर्घटना होतात ती लहान फेंटसीमध्ये जाणारी माणस तुमच्या आमच्यासारखी नाहीत. आमच्यासारखी असली तरी थोडी आहेत लहान मूल जास्त आहेत. त्याच्यावर छोटस जरी काय पडले तरी त्यांचा मृत्यू होऊ शकतो. आणि ह्याची जबाबदारी पालिकेची नाही विधी विभागाची नाही ज्या विधी विभागात बऱ्याचशा बदल्या केल्या होत्या त्या विधी विभागाला हटवा आणि नविन अपॉईन्ट करा. त्याच्याकडून काहीच काम होत नाही.

**रिटा शहा :-**

मला माझ्या प्रश्नाचे उत्तर पाहिजे की जी स्थगिती एक वर्षापासून भेटली आहे. ती स्थगिती हटवण्यासाठी आपण आपली वास्तू वाचवू शकत नाही. तर आपण मिरा भाईंदरचे काय करणार? ती आपली वास्तू आहे. लिगल डिपार्टमेंट त्याच्यावर काय करते.

**अनिल सावंत :-**

खांबित साहेब त्यांनी आपल्या ग्राऊंडवर स्टे घेतला तर त्यांना स्टे कसा मिळाला. महानगरपालिका जेव्हा एखादे ॲग्रीमेन्ट बनवते तेव्हा टर्म्स ॲन्ड कंडीशन टाकल्या असतात. त्याला कोणत्या ग्राऊंडवर स्टे मिळाला.

**दिपक खांबित :-**

स्टे एवढा म्हणजे त्याचा ताबा काढू नये एवढा स्टे आहे. ह्यावर आर्कीटेक्ट नेमलेला आहे.

**अनिल सावंत :-**

कोर्टामध्ये आर्कीटेक्ट गरज काय आहे. आपण कोर्टामध्ये कुठे कमी पडलो.

**रिटा शहा :-**

ह्याचा असा अर्थ झाला की आपला विधी विभाग सक्षम नाही.

**दिपक खांबित :-**

तो जो स्टे आहे तो आर्कीटेक्ट सुध्दा आहे.

**अनिल सावंत :-**

मला सांगा स्टे व्हेकेट करु नये तरी तिकडे कार्यक्रम व्यवस्थित चालू आहे. त्याचे इन्कम चालू आहे. पालिकेला फक्त भाड मिळत नाही. खांबित साहेब तुम्ही म्हणता बाजूचा फ्लॅट लग्नाला देऊ शकता. आपल्या कंडीशनमध्ये कुठे आहे. मा. महापौर मॅडम आपल्या माहितीसाठी सांगतो लग्नाचे भाडे दिवसाला दीड लाख रु. घेतो. माझ्याकडे रिसीप्ट आहे. त्याचा सगळा कचरा महानगरपालिकेनी उचलायचा महानगरपालिकेला उत्पन्न काही नाही.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम शिवार गार्डनचा जो विषय आता आलेला आहे. त्यासंदर्भात मी स्वतः चार महिन्यांपूर्वी गेलो असता माझी गाडी पार्किंग आतमध्ये आहे. गाडी बाहेर काढली की पैसे भरा तर आम्ही पार्कींग करुन देऊ. सगळ्या गाड्या बाहेर लागतात आतमध्ये जागा मोकळी पडलेली असते. मा. महापौर मॅडम लॉजींग बोर्डींगच्या कामावर हातोडा पडला परंतू दबंग खबरे ह्याच्यामध्ये बातमी आली आहे. आज आम्हाला एका गोष्टीचा फार आनंद होतो की सत्ताधाऱ्यांनीच हा मुद्दा उपस्थित केला. जे सत्य आहे ते सत्ताधाऱ्यांनी बोललेले आहे. आपण ह्याच्यावर लक्ष द्या. मा. महापौर मॅडम जे लॉजिंग बोर्डींग आहेत त्याच्यावर गोलमाल न करता सगळ्यांना समान न्याय द्यावा अशी आमची मागणी आहे.

**मा. महापौर :-**

सभागृहाची भावना आहे आपण महानगरपालिकेमार्फत टाऊन पार्क विकसित केला पाहिजे आणि त्या संदर्भात तातडीने आयुक्तांनी आणि प्रशासनाने पाठपूरावा करावा.

**सुरेश खंडेलवाल :-**

एक सुझाव बहुत जरूरी है मिरा भाईंदर शहर के अंदर कोर्ट में ऐसे केसेस चल रहे है। खांबित साहेब जो स्टे आया उसका रिझन यह है की टेंडर के अंदर एक कंडीशन ओपन डालते है की कुछ भी होगा ना आर्बिट्रेटर बिठाने का और कोर्ट में स्टे मिलता है। कोर्ट बोलती है आर्बिट्रेटर बीठा दिया अभी आर्बिट्रेटर बैठके दो चार साल पाच साल है वो काम करता रहेगा। कुछ रिझल्ट आएगा नही। मेरा एक निवेदन है की अगली बार ऐसी कोई भी वास्तू या कोई ॲग्रीमेन्ट को अप्लाय नही करता है। तो तुरंत उसका रद्द करके उसको आर्बिट्रेटर पॉईन्ट नही डालना चाहिए ताकी कोर्ट के अंदर उसको स्टे ना मिले और तुरंत कॅन्सल हो जाए। नही तो सालोसाल यही चलता रहेगा। कमसे कम ४-५ केसेस अपने चल रहे है। लाखो रु. ॲडव्होकेट को जा रहे है और हमारा नुकसान हो रहा है।

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम ह्या सगळ्या गोष्टी कळल्यानंतर त्या वर्धमानचे पहिल्यापासूनचे भाडे तेवढेच आहे. की वाढवले आहे.

**मा. महापौर :-**

इस संदर्भ में चर्चा हो चूकी है मैंने बोल दिया है।

**निलम ढवण :-**

मॅडम हा विषय कसा आहे बघा सर्व सामान्य लोकांनी एक दिवस टॅक्स भरला नाही तर एक दिवसाच्या टॅक्सची पॅनल्टी त्यांना लागते. त्यांच्याच पैशानी आपण पालिका चालवतो. तरी त्यांनी एक दिवस टॅक्स लेट भरला तर त्यांना पॅनल्टी लागते. मग ह्या फेन्टासी व वर्धमानवाल्याला जर तीन वर्षाचे भाडे देत नाहीत तर पॅनल्टी सहीत आणि भाडे दुप्पट करुन द्यायचे ती तीन वर्षाची रक्कम आपण जमा करावी.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३६, **दि. ०२/०३/२०१७, दि. १९/०५/२०१७ व दि. १९/०६/२०१७ रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**रोहिदास पाटील :-**

दि. ०२/०३/२०१७, दि. १९/०५/२०१७ व दि. १९/०६/२०१७ रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ३६ :-**

**दि. ०२/०३/२०१७, दि. १९/०५/२०१७ व दि. १९/०६/२०१७ रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ३३ :-**

दि. ०२/०३/२०१७, दि. १९/०५/२०१७ व दि. १९/०६/२०१७ रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी २ के खाली विषय आला आहे तर हा विषय घेण्यासाठी सभागृहाची मान्यता आहे का? सभागृहाची मान्यता आहे त्यामुळे विषयपत्रिकेवरचे सर्व विषय संपल्यावर हा विषय घेण्यात येईल. प्रकरण क्र. ३७, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) दरवाढीबाबत.**

**रिटा शहा :-**

मॅडम यह जो पे ॲन्ड पार्क का जो विषय आया है उसके अंदर पे ॲन्ड पार्क गोषवारा में आप देना चाहिए की कहाँ पे ॲन्ड पार्क चालू है सचिव साहेब।

**प्र. नगरसचिव :-**

गोषवारा दिलेला आहे.

**रिटा शहा :-**

भाईंदर (प.) स्टेशनजवळ फक्त स्काय वॉकच्याखाली सॅक्शन आहे. परंतु बालाजी नगर विनायक रोड आणि स्टेशन रोड तिथे पूर्ण पार्किंग असते. त्या लोकांचे असे म्हणणे आहे की आम्ही पैसे भरतो म्हणून पार्किंग करतो. जेव्हा आपल्याकडे स्काय वॉकखालीच सॅक्शन आहे.

**गिता जैन :-**

उपरोक्त विषयानुसार सादर करण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रमुख रस्त्यांवर वाहने उभी रहात असतात. सदर वाहनांकडून पे ॲन्ड पार्क तत्वावर भाडे वसूल केल्यास महानगरपालिकेस त्यातून चांगले उत्पन्न मिळू शकेल या उद्देशाने मा. महासभा ठराव क्र. ०३ दि.१०/०४/२००८ अन्वये पे ॲन्ड पार्क बाबत निर्णय पारीत केला होता. त्याअनूषंगाने महापालिका हद्दीत सद्यस्थितीत १) मिरा रोड आरक्षण क्र. १८४, २) भाईंदर (प). रेल्वे स्टेशन जवळ स्कायवॉक खालील जागेत, ३) नवघर आरक्षण क्र. २६४ अे या जागेत पार्किंग चालू करण्यात आलेले आहेत. सदर चालू पे

ॲन्ड पार्क ठिकाणी उभ्या असलेल्या वाहनांकडून मा. महासभा ठराव क्र. ३ दि. १०/०४/२००८ मधील मंजूर केलेल्या दरानूसार वसूली करण्यात येत आहे. परंतू सदरचे दर हे बऱ्याच वर्षापुर्वीचे आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात काही अंशीच वाढ होत आहे. मुंबई महानगरपालिकेच्या तुलनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे दर कमी आहेत. महानगापालिकेच्या महसूलात वाढ होण्याच्या दृष्टीने पे ॲन्ड पार्क च्या दरात वाढ होणे आवश्यक आहे.

तसेच वाहनचोरी, पेट्रोलचोरीच्या प्रमाणात वाढ झाली असल्याकारणाने वाहने सुरक्षित असणे आवश्यक आहे. त्याकरीता महानगरपालिका क्षेत्रात काही बंदिस्त पे ॲन्ड पार्क उभारण्यात आलेली आहेत. म्हणजेच वाहनांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बंदिस्त जागेत ठेवलेली वाहने जास्त सुरक्षित असल्याकारणाने खुल्या जागेतील पे ॲन्ड पार्कच्या सुधारीत दरात ५० टक्के ने वाढ करुन खालील 'क' तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३ अ(२) अन्वये दरात वाढ करण्याचे अधिकार मा. आयुक्त याना असल्याने मुंबई महानगरपालिका पे ॲन्ड पार्क दरपत्रकाच्या आधारे सदरचे दर लागु करण्यात यावेत. सदरचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

**(अ)**

**पे ॲन्ड पार्कचे सध्याचे दर**

| अ.क्र. | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | खाजगी वाहने | ६ तासा करीता | १२ तासा करीता | २४ तासा करीता | महिन्याचा पास |
| i. | सायकल | रु. १ | रु. ३ | रु. ५ | रु. १०० |
| ii. | दुचाकी वाहने | रु. ५ | रु. ८ | रु. १२ | रु. २७५ |
| iii. | चारचाकी वाहने | रु. १० | रु. १५ | रु. २० | रु. ४५० |
| | २. व्यावसायिक वाहने | | | | |
| i | दुचाकी/तीन चाकी/चार चाकी (टॅक्सी, टेंपो इ. हलकी वाहने) | रु. २० | रु. २५ | रु. ५० | रु. १२०० |
| ii | चार/सहाचाकी वाहने(ट्रक, बस, टुरीस्ट बस,इ. जड वाहने) | रु. २५ | रु. ५० | रु. १०० | रु. २५०० |

**ठराव:-**

सद्यस्थितीतील बाजारभावापेक्षा मिरा भाईंदर महानगरपालिकेचे दर बऱ्याच अंशी कमी असल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने पे ॲन्ड पार्कचे खुल्या जागेतील सुधारीत दर व बंदिस्त जागेतील प्रस्तावित दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

पे ॲन्ड पार्कचे सुधारीत दर (खुली जागा)

| अ.क्र. | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | खाजगी वाहने | ६ तासा करीता | १२ तासा करीता | २४ तासा करीता | महिन्याचा पास |
| i. | सायकल | रु. ३ | रु. ५ | रु. १० | रु. १५० |
| ii. | दुचाकी वाहने | रु. १५ | रु. २० | रु. २५ | रु. ३५० |
| iii. | चारचाकी वाहने | रु. ५० | रु. ७५ | रु. १०० | रु. १००० |
| | २. व्यावसायिक वाहने | | | | |
| i | दुचाकी/तीन चाकी/चार चाकी (टॅक्सी, टेंपो इ. हलकी वाहने) | रु. ६० | रु. १०० | रु. १५० | रु. २००० |
| ii | चार/सहाचाकी वाहने(ट्रक, बस, टुरीस्ट बस,इ. जड वाहने) | रु. ७० | रु. १२५ | रु. १७५ | रु. ४००० |

पे ॲन्ड पार्कचे प्रस्तावित दर (बंदिस्त जागा)

| अ.क्र. | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | खाजगी वाहने | ६ तासा करीता | १२ तासा करीता | २४ तासा करीता | महिन्याचा पास |
| i. | दुचाकी वाहने | रु. २०.०० | रु. ३० | रु. ४०.५० | रु. ८०० |
| ii. | चारचाकी वाहने | रु. ६० | रु. ८० | रु. १०० | रु. १२०० |
| | २. व्यावसायिक वाहने | | | | |
| i | दुचाकी/तीन चाकी/चार चाकी (टॅक्सी, टेंपो इ. हलकी वाहने) | रु. ६० | रु. १०० | रु. १५० | रु. २००० |

वरीलप्रमाणे पे ॲन्ड पार्क चे दर लागु करुन सद्यस्थितीत सुरु असलेली निविदा रद्द करुन नविन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच नविन निविदा मागवून कार्यादेश देईपर्यंत जुन्या ठेकेदाराकडून जुन्या दराने काम करुन घेण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**रिटा शहा :-**

माझे अनुमोदन आहे. देशपांडे मॅडम माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. भाईंदर स्टेशन स्कायवॉकच्या खाली आपले पार्किंग सॅक्शन आहे. परंतु विनायक नगर, बालाजी नगर आणि स्टेशन रोडला जी मोकळी जागा आहे. तिथे पण पार्किंग होते आणि पैसे वसूली होतात. रोडवर पण पार्किंग दिले आहेत का? बालाजी नगर विनायक नगर आणि स्टेशन रोडचा जो पूर्ण रेल्वे समांतर रोड आहे त्याच्यावर लॉरी, बाईक, हात लॉरी हे सगळ तिकडे पार्किंग असते. त्याला आपण सॅक्शन दिले आहेत का?

**स्वाती देशपांडे :-**

आपण पे ॲन्ड पार्क भाईंदर (प.) इथे दिले आहेत. समोरच्या रस्त्यावर आपण पे ॲन्ड पार्कसाठी दिलेले नाही. त्यासंदर्भात आपण ट्राफीकला पण कळविले आहे.

**रिटा शहा :-**

मॅडम तिथे वसूली होते. बालाजी नगर विनायक नगरला पण वसूली होत आहे. सर्वांच्या बिल्डींगसमोर ॲक्टीवा, बाईक गाड्या लावण्यात येत आहेत. पूर्ण बालाजी नगर गाड्यांनी भरलेला आहे.

**स्नेहा पांडे :-**

मॅडम पूर्ण मिरा भाईंदरमध्ये पे ॲन्ड पार्क किती ठिकाणी चालू आहे.

**स्वाती देशपांडे :-**

अनधिकृत पार्किंगच्या बाबतीत आपण ट्राफीक डिपार्टमेंटला वेळोवेळी कळवतो आहे. आणि त्यांच्याकडून टोईंग इत्यादीची कारवाई अपेक्षित आहे.

**रिटा शहा :-**

मॅडम निवडून आल्यानंतर ४ महिन्यापासून पार्किंगची एकच कम्पलेंट येते. कोणाच्या बिल्डींगसमोर, कोणाच्या दुकानासमोर तिथे कन्टीन्यू पार्किंग चालू आहे.

**स्वाती देशपांडे :-**

अनधिकृत पार्किंगबाबत हे ट्राफीक विभागाचे काम आहे.

**रिटा शहा :-**

आपण ज्या ठेकेदाराला ठेका दिला आहे त्याला नोटीस द्यायची कारण तो तिकडे पण पैसे वसूल करतो.

**गिता जैन :-**

मला फक्त एक सांगा जिकडे आपण ठेका दिला नाही तिथे तो वसूल करु शकतो का?

**स्वाती देशपांडे :-**

अजिबात नाही.

**गिता जैन :-**

मग आपण त्याच्यावर कायदेशीर कारवाई करु शकत नाही का?

**स्वाती देशपांडे :-**

ज्याठिकाणी आपण परवानगी दिली नाही. आपण एरिया कार्यक्षेत्र दिले नाही त्याठिकाणी तोच ठेकेदार वसूल करत असेल तर आपण कारवाई.......

**गिता जैन :-**

तोच नसेल एक्स.वाय.झेड कोणीही असेल.

**स्वाती देशपांडे :-**

निश्चित करणार.

**सुरेश खंडेलवाल :-**

त्याचे टेंडर कॅन्सल करा.

**गिता जैन :-**

कुछ दिया होगा तो कॅन्सल करोगे ना कुछ दिया नही तो क्या कॅन्सल करोगे। जो माणूस वसूल करतो त्याच्यावर कायदेशीर कारवाई करु शकता की नाही?

**स्वाती देशपांडे :-**

जर ठेकेदारामार्फत अन्य ठिकाणी आपण जे कार्य क्षेत्र दिले आहे. त्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी वसूली चालू असल्यास संबंधीत ठेकेदारावर नोटिस देऊन कारवाई करण्यांत येईल.

**गिता जैन :-**

मॅडम तुम्ही ठेका घेतला आहे. मी जाऊन वसूली करते तर ठेकेदार सांगणार हा माझा माणूस नाही तेव्हा तुम्ही काय करणार?

**स्वाती देशपांडे :-**

मॅडम त्याबाबतीत प्रत्येक ठेकेदाराकडे पावती पुस्तक असते. जिथे अनधिकृत पार्किंग आहे.

**गिता जैन :-**

मॅडम ते छापायला किती वेळ लागते. मला फक्त विचारायचे आहे की तुम्ही कसे करणार? हे ठेकेदारांनी केले नसेल. समजा दुसरा कोणी व्यक्ती असेल मिरा भाईंदरचा किंवा बाहेरचा कोणी असो हे ठेकेदारांनी केले नसेल बाहेरचा व्यक्ती तिथे वसूली करतो मग ते तुम्ही कसे थांबवणार. कायदेशीर कारवाई करणार की नाही.

**स्वाती देशपांडे :-**

हे सर्व पार्किंग अनधिकृत पार्किंग आहे. त्याबाबत वेळोवेळी आपण ट्राफीक डिपार्टमेंट वेळोवेळी कळवले आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते मॅडम सुभाषचंद्र बोस गार्डनला पार्किंगचे काय चालवले आहे. सुभाषचंद्र बोस मैदानला एवढ्या गाड्या लागतात त्याच्यावर काय कारवाई करणार आहेत.

**स्नेहा पांडे :-**

मॅडम पूर्ण मिरा भाईंदरमध्ये किती ठिकाणी पे ॲन्ड पार्क आहे.

**स्वाती देशपांडे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ३ ठिकाणी आहे.

**स्नेहा पांडे :-**

माझ्यामते २००८ ला जो ठराव झाला त्याप्रमाणे ६ ठिकाणी आहे. २ जुने होते आणि ४ नविन कुठले चालू आहेत कुठले बंद आहेत ती माहिती कळू द्या. तुम्ही दरवाढ करता जिथे लोक पे करुन ठेवतात तिथे दरवाढ आणि जिथे रोड आहे विमल डेरीचा लेन आहे. गोल्डन नेस्ट सर्कल फाटकच्यामध्ये रस्त्यावर पूर्ण गाड्या अशाच पार्क होतात. त्याच्यावर काहीच कारवाई नाही. आम्ही कीतीही कम्पलेन्ट केली तरी कारवाई होत नाही. आणि जिकडे लेक पे करुन पार्क करतात त्यांचा तुम्ही रेट वाढवता. शाळेची मूल कॉलेजची मूल किंवा गरीब माणूस सायकल चालवतात आणि पार्क करतात तिकडे तुम्ही ५० टक्के दरवाढ करता. हा कूठला रुल आहे. प्रत्येक ३ वर्षामध्ये दर वाढ करायचा आपला नियम आहे. आपल्याकडे कलम ७९ आहे त्याच्यामध्ये दर तीन वर्षानी १० टक्के वाढ करतात आणि तुम्ही इकडे ५० टक्के वाढ करता.

**स्वाती देशपांडे :-**

ह्यापूर्वी २००८ ला दरवाढ झालेली आहे. २००८ ला दर निश्चित झालेली आहे. आता २०१७ आहे ९ वर्षामध्ये दरवाढ झाली नाही म्हणून हे प्रपोज केले आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते पे ॲन्ड पार्कचा जो विषय आलेला आहे आणि व्यवस्था संदर्भात पश्चिमच्या साईडने त्या लोकांनी जो विषय मांडला आहे दोन वर्ष झाली नवघर रोड आणि बी.पी. रोड चालताना पण मुश्किलीचा रस्ता आहे. त्याठिकाणी रस्त्यावर वाहने उभी केली जातात.

**मिरादेवी यादव :-**

कौन कौनसे बंद हो गए उनकी सुचना दिजीए।

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम मागच्या वेळी दोन वर्ष झाली ह्या महासभेत पे ॲन्ड पार्कसाठी मागणी केली होती. कारण आपण जेव्हा कारवाईची भूमिका घेतो त्यावेळी प्रथमतः रस्त्यावर गाड्या उभ्या केल्या जातात. त्याच्या मागे कारण आहे. ग्रामपंचायत काळातल्या ज्या बिल्डींग आहेत त्यांना पार्किंग नाही. त्यामुळे प्रत्येक जण गाडी घेऊन आपल्या घराखाली गाडी उभी करतो किंवा रोडवर उभे करतात. कारण त्यांना त्यांच्याशिवाय पर्याय पण नाही. त्या संदर्भात मी दोन वर्षापूर्वी महासभेत विषय घेतला होता की पहिल्यांदा त्यांची सोय करा. पर्यायी व्यवस्था द्या. त्यानंतर आपण टेंडर काढले होते मी ठरावात सुचना देते की जे टेंडर काढले होते त्याच्यात अटीशर्ती खुप टाकल्या आहेत. त्यामुळे कोणी भरत नाही. आरक्षण क्र. ११० मध्ये नवघरसाठी पे ॲन्ड पार्क करावे अशी मी मागणी केली होती. एकदा टेंडर काढले होते. अटीशर्ती एवढ्या टाकल्या आहेत त्यामुळे कोणी टेंडर भरत नाही. त्या अटीशर्ती थोड्या कमी कराव्या त्यानुसार ते टेंडर आता चालू आहे. त्याच्यात अटीशर्ती जेव्हा रिकॉल कराल तेव्हा कमी करुन त्यानुसार त्याची कारवाई करावी आणि आरक्षण क्र. ११० व पे ॲन्ड पार्क चालू करावे. जेणेकरुन त्याचा लाभ नवघर परिसरातील सर्व लोकांना होईल. ते आपल्या गाड्या तिथे ठेवतील आणि तो रस्ता मोकळा होईल.

**मिरादेवी यादव :-**

मॅडम मेरा जवाब तो दो कौनसा चालू है और कौनसा बंद है।

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम अवैध पार्किंग जिसपर हमारा नियंत्रण नही है। जो हमने ठेका नही दिया है उसपे ट्राफीक पोलिस कार्य करेगी हम नही करेंगे। न्याय की ग्रुप से बिलकूल गलत बात है। जिस जमिन पर आप टेंडर अलाऊड कर सकते हो उसपे आपका अधिकार है। आप पार्किंग का टेंडर अपॉइन्ट कर सकते हो पर उस जगह का अवैध पार्किंग आपके अड्डे में नही है। आपका टेंडर नही है। वहाँ जब हटा नही सकते यह बिलकूल गलत चीज है। आपके अधिकार में नही है तो पे ॲन्ड पार्क भी मत दिजीए। अगर आपको अधिकार है आप पे ॲन्ड पार्क कर सकते है इसका मतलब यह भी है तो पार्किंग हटाना आपकी जिम्मेदारी है। आप ट्राफीक पोलिस के उपर नही डाल सकते यह आपकी जिम्मेदारी है।

**गिता जैन :-**

मॅडम माझी अशी सुचना आहे आपण ज्या-ज्या ठिकाणी पे ॲन्ड पार्क देतो. त्या-त्या ठिकाणी त्या ठेकेदारांनी फलक लावायचे की हे ठिकाणी आमचे पे ॲन्ड पार्क आहे. धीस आर द चार्जेस. आपण ४० पार्क केलेले आहेत तर ते ५० वसूली करतात. त्यापेक्षा त्यांना एक कम्पलशन लावा. तिथे एक बोर्ड लावा. ठेकेदाराचे नाव, एरिया इथून तिथपर्यंत वसूली करायची आहे. रेट अटीशर्ती टाका. कारण फेरिवाल्याचे पण तसेच होत आपण २० ठरवतो ५० देतो. मग तसेच पे ॲन्ड पार्कचे पण होणार.

**रिटा शहा :-**

जय अंबे नगरला बस स्टॉप आहे. आपल्या बसेस चालतात त्यांचे बस स्टॉप बनवले आहे. तिथे प्रायव्हेट बस पण पार्किंग होतात. त्याच्यावर आपण काय कारवाई केली ते आपल्या अधिपत्यामध्ये आहे.

**स्वाती देशपांडे :-**

जैन मॅडमच्या प्रश्नाला उत्तर देते मागच्या वर्षी मिरारोड येथे कम्पलेन्ट प्राप्त झाली होती की आपल्या महानगरपालिकेचे शुल्क आहे त्या व्यतिरिक्त जास्त केले होते. मी आणि उपायुक्त स्वतः गेलो त्याच्या पंचनामा वगैरे केला आणि त्यांचे ३६ लाख दंडात्मक शुल्क म्हणून ताब्यात घेतले आहेत. म्हणजे आपली ८० लाखाची जी डिमांड ती एक कोटी १० लाख वसूली झाली आहे.

**स्नेहा पांडे :-**

मॅडम जहाँ पतले पतले रास्ते है विमल डेअरी लेन है वहाँ पे प्रायव्हेट स्कूल की बसेस खडी रहती है। प्रायव्हेट स्कूल पे हम कारवाई कर सकते है। विमल डेअरी की गल्ली जो इंद्रलोक के लिए रस्ता जाता है। उधर शाम से लेकर सुबह तक प्रायव्हेट स्कूल की बस खडी रहती है।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम विषय पे ॲन्ड पार्कचा आहे. प्रशासनाने ठराव केलेला आहे तो ठराव मंजूर होणार आहे. माझी एक विनंती आहे त्यामध्ये सायकलसाठी महिन्याला १५० रु. चार्ज केले आहेत. आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी सायकलला प्रमोट करायचे म्हणून मुंबईला सायकल ट्रॅक बनवतात. आणि इकडे तुम्ही सायकलला १५० रु. चार्ज करणार ते तेवढा गाळा आणि बाकीचा ठराव मंजूर करुन घ्या. मा. महापौर मॅडम मी तुम्हाला विचारतो बंदिस्त पार्किंग कुठे आहे. ते तुम्ही चार्ज दिले आहेत.

**स्वाती देशपांडे :-**

स्टार बाजारच्या मागच्या बाजूला एक बंदिस्त पार्किंग आहे.

**अनिल सावंत :-**

तिकडे कोण पार्किंग करते.

**स्वाती देशपांडे :-**

तिकडे आपण पे ॲन्ड पार्क दिलेले आहे.

**अनिल सावंत :-**

दिलेले आहे बरोबर आहे पण तिकडे पार्किंग कोण करते. स्टेशनला जाणारे तिकडे पार्किंग करणार आणि स्टेशनला जाणार.

**स्वाती देशपांडे :-**

पार्किंग टेंडर झाले आहे आणि आपल्या शुल्काचे भरणा करतो.

**अनिल सावंत :-**

ज्या ठिकाणी पालिका टेंडरीज करुन चार्ज घेते बरोबर आहे. ज्याठिकाणी प्रायव्हेट बिल्डर पार्किंग चार्जेस घेते त्यावर महानगरपालिका काही कारवाई करणार की नाही. मिरारोडमध्ये शांती शॉपिंग आहे तिथे प्रायव्हेट कॉन्ट्रॅक्टर आहे. रोडवर गाड्या उभ्या राहतात त्याच्याकडून पार्किंग चार्ज घेतो.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो पहिली गोष्ट आपल्या पे ॲन्ड पार्कचे जे स्पॉट होते ते द्यायला पाहिजे होते. त्याच्यामुळे कन्फ्युजन असे आहे की गोल्डन नेस्ट ते इंद्रलोकचा रस्ता तो एवढा ब्रॉड आहे त्याच्यावर हेवी ट्रॅक, खाजगी बसेस, टेम्पो, फोर व्हिलर ट्रक ड्रायव्हर असतात त्याची माणस स्टोव्ह लावून स्वयंपाक करतात. त्या लोकांना पे ॲन्ड पार्कचा स्पॉट दिला असता तर कळले असते. पण पे ॲन्ड पार्कचा त्याच्यामध्ये स्पॉट नसेल तर असे स्पॉट घाला जिथून तुम्हाला जास्तीत जास्त पैसा येईल. आपण हे सगळे कशासाठी करतो. आपल्या उत्पन्नाची बाब आणि त्या लोकांना शिस्त लागावी म्हणून ते स्पॉट दिले असते तर मला बोलाव लागल नसत पण ते स्पॉट दिले नाहीत. अशा ठिकाणी स्पॉट घालण्याचे अधिकार प्रशासनाला पाहिजे. तिथे तुमची वसूली चालू करावी. अशी ठिकाण शोधा. आणि त्याठिकाणी पे ॲन्ड पार्क चालू करा.

**स्नेहा पांडे :-**

मॅडम उधर का ट्रॅफीक गुजरने के लिए आधा आधा घंटा लगता है। वो मेरा वॉर्ड है विमल डेअरी से इंद्रलोक क्रॉस करने के लिए आधा घंटा लगता है। स्कूल बस, ट्रक, टेम्पो खडी रहती है। उसपे कुछ कारवाई नही होती।

**सुरेश खंडेलवाल :-**

विषय पत्रिकेवर पार्किंग नो पार्किंग आहे. माझे सर्व सदस्यांना निवेदन आहे की पार्किंग नो पार्किंगच्या विषयावर कुठे पार्किंग करायचे कुठे नाही करायचे त्या वेळी ते डिस्कस करु आणि फायनल करु. प्रत्येक सदस्याची जी भावना आहे.

**स्नेहा पांडे :-**

नो पार्किंग झोनमध्येच पार्किंग होते. त्यात काही कारवाई नाही. मग कसे काय करायचे.

(सभागृहात गोंधळ)

**स्नेहा पांडे :-**

कारवाई काहीच होत नाही नो पार्किंगचा बोर्ड लावून काय उपयोग होणार.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम सायकल कट करता ना.

**स्नेहा पांडे :-**

मॅडम सायकल पार्किंगवर माझी सुचना आहे. आलपे मुख्यमंत्री साहेब सायकलींग झोन चालवतात आणि इकडे १०० चे १५० ५० टक्के वाढ करतात. सायकल पार्किंग फ्री ठेवा अशी माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**निलम ढवण :-**

मॅडम सुचनेसहित बोला. सुचना घ्यायची नाही का? लोकांच्या हिताचा विषय आहे.

**मा. महापौर :-**

लोकांच्या हितासाठीच आम्ही करतो.

**निलम ढवण :-**

मग आमच्या सुचना घ्यायला नको.

**स्नेहा पांडे :-**

मॅडम सुचनेसह ठराव मंजूर करा.

**निलम ढवण :-**

जी नविन निविदा केलेली आहे. मग पे ॲन्ड पार्क करायचा तुमचा विषय नाही का? सचिव साहेब थांबा मी लेखी सुचना दिली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

सुचना घेत नाहीत तर ठराव घ्या.

**सुरेश खंडेलवाल :-**

तुम्ही जे बोलता ते बरोबर आहे. पण पार्किंग नो पार्किंगचा ठराव आहे त्याच्यामध्ये......

**निलम ढवण :-**

मग तुम्ही ठराव का केला.

**सुरेश खंडेलवाल :-**

फक्त रेटचा ठराव आहे. पार्किंग नो पार्किंगमध्ये आपण घेऊ.

**जुबेर इनामदार :-**

गोरगरिब जे गाड्या घेऊ शकत नाही ते सायकल ठेवतात.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

दरवाढीचा विषय आहे ना.

**मा. महापौर :-**

आपने पहले ठराव है ऐसा नही बोला था।

**जुबेर इनामदार :-**

मॅडम मी तुम्हाला बोललो ठराव वाचायचा आहे पण हे सदस्य बोलत होते म्हणून मी थांबलो.

**मा. महापौर :-**

असे चालत नाही बसून जा.

**निलम ढवण :-**

तुम्हाला सभागृहात गोंधळच पाहिजे का?

**जुबेर इनामदार :-**

आम्ही ठराव आहे असे स्पष्ट सांगितले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) दरवाढीबाबत प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याप्रमाणे मात्र त्यातुन साईकलवर आकारण्यात आलेले शुल्क रद्द करावे व इतर दर फक्त २५ टक्के वाढ करण्यात यावी. आरक्षण क्र. ११० मध्ये निविदा काढताना अटीशर्ती शिथील करुन निविदा काढण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**निलम ढवण :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

आमच्या ठरावामध्ये निलम मॅडमची सुचना घ्या.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम सुरुवातीलाच आपण सांगितले की बाहेरच्या राज्यातले प्रतिनिधी सभा बघायला आले आहेत. आम्ही सभा खेळीमेळीने शांततेने करतो. त्यांची सुचना घेतली असती तर काय फरक पडला असता.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब मतदान घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३७ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. गिता जैन, अनुमोदक श्रीम. रिटा शहा. दुसऱ्या ठरावाचे सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदक श्रीम. निलम ढवण सुचना ह्या ठरावात समाविष्ठ केलेली आहे. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. गिता जैन यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

श्रीम. गिता जैन यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५६, विरोधात ३३ तटस्थ ० श्रीम. गिता जैन ह्यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ३७ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) दरवाढीबाबत.**

**ठराव क्र. ३४ :-**

उपरोक्त विषयानुसार सादर करण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रमुख रस्त्यांवर वाहने उभी रहात असतात. सदर वाहनांकडून पे ॲन्ड पार्क तत्वावर भाडे वसूल केल्यास महानगरपालिकेस त्यातून चांगले उत्पन्न मिळू शकेल या उद्देशाने मा. महासभा ठराव क्र. ०३ दि.१०/०४/२००८ अन्वये पे ॲन्ड पार्क बाबत निर्णय पारीत केला होता. त्याअनूषंगाने महापालिका हद्दीत सद्यस्थितीत १) मिरा रोड आरक्षण क्र. १८४, २) भाईंदर (प). रेल्वे स्टेशन जवळ स्कायवॉक खालील जागेत, ३) नवघर आरक्षण क्र. २६४ अे या जागेत पार्किंग चालू करण्यात आलेले आहेत. सदर चालू पे ॲन्ड पार्क ठिकाणी उभ्या असलेल्या वाहनांकडून मा. महासभा ठराव क्र. ३ दि. १०/०४/२००८ मधील मंजूर केलेल्या दरानूसार वसूली करण्यात येत आहे. परंतू सदरचे दर हे बऱ्याच वर्षापुर्वीचे आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात काही अंशीच वाढ होत आहे. मुंबई महानगरपालिकेच्या तुलनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे दर कमी आहेत. महानगापालिकेच्या महसूलात वाढ होण्याच्या दृष्टीने पे ॲन्ड पार्क च्या दरात वाढ होणे आवश्यक आहे.

तसेच वाहनचोरी, पेट्रोलचोरीच्या प्रमाणात वाढ झाली असल्याकारणाने वाहने सुरक्षित असणे आवश्यक आहे. त्याकरीता महानगरपालिका क्षेत्रात काही बंदिस्त पे ॲन्ड पार्क उभारण्यात आलेली आहेत. म्हणजेच वाहनांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बंदिस्त जागेत ठेवलेली वाहने जास्त सुरक्षित असल्याकारणाने खुल्या जागेतील पे ॲन्ड पार्कच्या सुधारीत दरात ५० टक्के ने वाढ करुन खालील 'क' तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३ अ(२) अन्वये दरात वाढ करण्याचे अधिकार मा. आयुक्त याना असल्याने मुंबई महानगरपालिका पे ॲन्ड पार्क दरपत्रकाच्या आधारे सदरचे दर लागु करण्यात यावेत. सदरचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

(अ)

पे ॲन्ड पार्कचे सध्याचे दर

| अ.क्र. | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | खाजगी वाहने | ६ तासा करीता | १२ तासा करीता | २४ तासा करीता | महिन्याचा पास |
| iv. | सायकल | रु. १ | रु. ३ | रु. ५ | रु. १०० |
| v. | दुचाकी वाहने | रु. ५ | रु. ८ | रु. १२ | रु. २७५ |
| vi. | चारचाकी वाहने | रु. १० | रु. १५ | रु. २० | रु. ४५० |
| | २. व्यावसायिक वाहने | | | | |
| i | दुचाकी/तीन चाकी/चार चाकी (टॅक्सी, टेंपो इ. हलकी वाहने) | रु. २० | रु. २५ | रु. ५० | रु. १२०० |
| ii | चार/सहाचाकी वाहने(ट्रक, बस, टुरीस्ट बस,इ. जड वाहने) | रु. २५ | रु. ५० | रु. १०० | रु. २५०० |

ठराव:-

सद्यस्थितीतील बाजारभावापेक्षा मिरा भाईंदर महानगरपालिकेचे दर बऱ्याच अंशी कमी असल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने पे ॲन्ड पार्कचे खुल्या जागेतील सुधारीत दर व बंदिस्त जागेतील प्रस्तावित दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

पे ॲन्ड पार्कचे सुधारीत दर (खुली जागा)

| अ.क्र. | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | खाजगी वाहने | ६ तासा करीता | १२ तासा करीता | २४ तासा करीता | महिन्याचा पास |
| iv. | सायकल | रु. ३ | रु. ५ | रु. १० | रु. १५० |
| v. | दुचाकी वाहने | रु. १५ | रु. २० | रु. २५ | रु. ३५० |
| vi. | चारचाकी वाहने | रु. ५० | रु. ७५ | रु. १०० | रु. १००० |
| २. व्यावसायिक वाहने | | | | | |
| i | दुचाकी/तीन चाकी/चार चाकी (टॅक्सी, टेंपो इ. हलकी वाहने) | रु. ६० | रु. १०० | रु. १५० | रु. २००० |
| ii | चार/सहाचाकी वाहने(ट्रक, बस, टुरीस्ट बस,इ. जड वाहने) | रु. ७० | रु. १२५ | रु. १७५ | रु. ४००० |

पे ॲन्ड पार्कचे प्रस्तावित दर (बंदिस्त जागा)

| अ.क्र. | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | खाजगी वाहने | ६ तासा करीता | १२ तासा करीता | २४ तासा करीता | महिन्याचा पास |
| iii. | दुचाकी वाहने | रु. २०.०० | रु. ३० | रु. ४०.५० | रु. ८०० |
| iv. | चारचाकी वाहने | रु. ६० | रु. ८० | रु. १०० | रु. १२०० |
| २. व्यावसायिक वाहने | | | | | |
| i | दुचाकी/तीन चाकी/चार चाकी (टॅक्सी, टेंपो इ. हलकी वाहने) | रु. ६० | रु. १०० | रु. १५० | रु. २००० |

वरीलप्रमाणे पे ॲन्ड पार्क चे दर लागु करुन सद्यस्थितीत सुरु असलेली निविदा रद्द करुन नविन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच नविन निविदा मागवून कार्यादेश देईपर्यंत जुन्या ठेकेदाराकडून जुन्या दराने काम करुन घेण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. गिता जैन** **अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | भोईर सुनिता शशिकांत | १ | ढवण निलम हरीश्चंद्र | |
| २ | शाह रिटा सुभाष | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | तिवारी अशोक सूर्यदेव | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पांडेय पंकज सूर्यमणि | ४ | पाटील धनेश परशुराम | |
| ५ | पाटील रोहिदास शंकर | ५ | परेरा कॅटलीन एन्थोनी | निरंक |
| ६ | गोहिल शानू जोरावर सिंह | ६ | परदेशी गिता हरीश | |
| ७ | कांगणे मीना यशवंत | ७ | पाटील नरेश तुकाराम | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | शेट्टी गणेश गोपाळ | ९ | शेख अमजद गफार | |
| १० | भोईर गणेश गजानन | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | पाटील प्रभात प्रकाश | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| १४ | शाह राकेश रतिशचंद्र | १४ | शिर्के अनंत गेणू | |
| १५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १५ | पाटील वंदना विकास | |
| १६ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १६ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १७ | जैन गीता भरत | १७ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १८ | जैन सुनिता रमेश | १८ | भोईर कमलेश यशवंत | |
| १९ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १९ | पाटील अनिता जयवंत | |
| २० | मोकाशी दिपाली आनंदराव | २० | भोईर भावना राजू | |
| २१ | व्यास रवि वासुदेव | २१ | भोईर राजू यशवंत | |
| २२ | रकवी वैशाली गजेंद्र | २२ | शेख रुबीना फिरोझ | |
| २३ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २३ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २४ | खंडेलवाल सुरेश जगदीश | २४ | सावंत अनिल दिवाकर | |
| २५ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २५ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २६ | मेहता डिंपल विनोद | २६ | भट दीप्ती शेखर | |
| २७ | शेट्टी अरविंद आनंद | २७ | सपार उमा विश्वनाथ | |
| २८ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २८ | अहमद साराह अकरम | |
| २९ | थेराडे संजय अनंत | २९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ३० | मुखर्जी अनिता बबलू | ३० | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ३१ | वैती चंद्रकांत सिताराम | ३१ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| ३२ | पारधी सुजाता यशवंत | ३२ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| ३३ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | ३३ | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३४ | यादव मिरादेवी  रामलाल | | | |
| ३५ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३६ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३७ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ३८ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| ३९ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४० | अरोरा दीपिका पंकज | | | |
| ४१ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ४२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४३ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४४ | नाईक विविता विवेक | | | |
| ४५ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ४६ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४७ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ४८ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४९ | भावसार वंदना संजय | | | |
| ५० | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ५१ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५२ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ५३ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ५४ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ५५ | भानुशाली वर्षा गिरधर | | | |
| ५६ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३८, **मुर्धा खाडी, बहादूर नगर येथील महानगरपालिकेच्या इमारतीमधील जागा अंगणवाडीसाठी भाड्याने देणेबाबत.**

जयेश भोईर :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुर्धा खाडी, बहादूर नगर येथे महानगरपालिकेची **-33.33** चौ.मी. क्षेत्राची तळ मजल्याची इमारत असून सदर जागा ही बाल विकास प्रकल्पातंर्गत अंगणवाडीसाठी शासनास भाड्याने देण्यात आलेली होती. शासनाने सदर जागेचे रू.750/- प्रति महिना इतके भाडे मंजूर केलेले आहे. सदर अंगणवाड्यामध्ये शासनामार्फत अंगणवाडी चालविण्यात येत असून 0 ते 6 वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना विविध प्रकरणाच्या दैनंदिन सेवा पुरविण्यात येतात.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील सुधारीत कलम 79 च्या खंड (ग) मधील तीन नुसार शासनाच्या उपक्रमांसाठी महानगरपालिकेच्या व राज्य शासनाच्या मंजूरीने सवतलीच्या दरात जागा उपलब्ध करू न देता येते . मुर्धा, बहादूर नगर येथील जागा अंगणवाडीसाठी** शासन मान्यतेने सवलतीच्या दरात भाडयाने उपलब्ध करुन देणेसाठीच्या प्रस्तावास मान्यता देणेचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**ठराव क्र. :-**

प्रशासनाच्या प्रस्तावानुसार सदर जागा **अंगणवाडीसाठी शासन मान्यतेने** सवलतीच्या दरात भाडयाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

विनोद म्हात्रे :-

माझे अनुमोदन आहे.

**प्रविण पाटील :-**

मिरा भाईंदरमध्ये अनेक ठिकाणी अंगणवाड्या चालतात. फक्त मुर्धामध्येच नाही तर काशिगाव, गोडदेव अशा बऱ्याच ठिकाणी अंगणवाड्या चालतात. प्रत्येक अंगणवाडीत ज्या राज्य शासनाने शिक्षिका नेमून दिल्या आहेत त्यांचे नाममात्र भाड त्या ५००-७०० रु. खाजगी जागांना देतात. तर मुर्ध्यालाच हा प्रॉब्लेम नसून इतर ठिकाणी हा प्रॉब्लेम आहे. माझी विनंती आहे मिरा भाईंदरमध्ये ज्या मोकळ्या शाळा असतील किंवा समाज मंदिर असतील त्यांना ही जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेनी उपलब्ध करुन द्यावी त्याच्यासाठी धोरण ठरवावे. ते भाडे जे मुर्ध्याच्या शाळेसाठी ठरवणार आहेत. ते पूर्ण मिरा भाईंदरमध्ये ठरवा अशी आपणांस विनंती आहे.

**प्रभात पाटील :-**

आपली आणि मेहता साहेबांची ह्या विषयावर चर्चा झाली. मेहता साहेबांनी प्रशासनाला एक आढावा बैठक लावायचे निर्देश दिले आहेत. त्यांनी मांडलेला मुद्दा तो चर्चेला येऊ शकतो. मिरा भाईंदरमध्ये जेवढ्या अंगणवाड्या चालतात त्यासंदर्भात माहिती घेण्यासाठी मा. महापौरांना सांगितले की ह्या संदर्भात आढावा बैठक लावावी.

**प्रविण पाटील :-**

मॅडम ती सुचना ठरावामध्ये घ्या.

**प्रकरण क्र. ३८ :-**

**मुर्धा खाडी , बहादूर नगर येथील महानगरपालिकेच्या इमारतीमधील जागा अंगणवाडीसाठी भाड्याने देणेबाबत.**

**ठराव क्र. ३५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुर्धा खाडी, बहादूर नगर येथे महानगरपालिकेची **-33.33** चौ.मी. क्षेत्राची तळ मजल्याची इमारत असून सदर जागा ही बाल विकास प्रकल्पातंर्गत अंगणवाडीसाठी शासनास भाड्याने देण्यात आलेली होती. शासनाने सदर जागेचे रू.750/- प्रति महिना इतके भाडे मंजूर केलेले आहे. सदर अंगणवाड्यामध्ये शासनामार्फत अंगणवाडी चालविण्यात येत असून 0 ते 6 वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना विविध प्रकरणाच्या दैनंदिन सेवा पुरविण्यात येतात.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील सुधारीत कलम 79 च्या खंड (ग) मधील तीन नुसार शासनाच्या उपक्रमांसाठी महानगरपालिकेच्या व राज्य शासनाच्या मंजूरीने सवतलीच्या दरात जागा उपलब्ध करून देता येते . मुर्धा, बहादूर नगर येथील जागा अंगणवाडीसाठी** शासन मान्यतेने सवलतीच्या दरात भाडयाने उपलब्ध करुन देणेसाठीच्या प्रस्तावास मान्यता देणेचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**ठराव क्र. :-**

प्रशासनाच्या प्रस्तावानुसार सदर जागा **अंगणवाडीसाठी शासन मान्यतेने** सवलतीच्या दरात भाडयाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. जयेश भोईर** **अनुमोदक :- श्री. विनोद म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३९, **<u>आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत . ( पाणी पुरवठा विभाग )</u> भुयारी गटार योजना - वाढीव कामाबाबतचा DPR बनविणेबाबत.**

**सचिन म्हात्रे :-**

१) मिरा भाईंदर शहराकरीता ११५ द.ल.ली. क्षमतेची भुयारी गटार योजना मंजूर असून या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. ११५ द.ल.ली. पैकी ७५ द.ल.ली. योजना कार्यान्वीत झाली आहे.

२) या योजनेकरीताचा DPR सन २००७ साली तयार करण्यात आला होता. त्यावेळी मिरा भाईंदर शहराची अंदाजित लोकसंख्या ७.५ लाख होती. तसेच आजची लोकसंख्या ११ लाखाच्या घरात गेली आहे.

३) प्रगतीपथावर असलेल्या भुयारी गटार योजनेचे संकल्पन सन २००७ साली करण्यात आले होते. परंतु त्यानंतर अस्तित्वातील झोन व आसपासचा परिसरात देखील रहिवास क्षेत्र वाढत गेले.

४) सन २००७ नंतर वाढलेली लोकसंख्या, वाढलेले रहिवास क्षेत्र व वाढलेले पाणी याचा विचार करता तसेच पुढील काही वर्षात होणारी वाढ लक्षात घेता संपूर्ण मिरा भाईंदर शहराचे सर्वेक्षण करुन मलवाहिन्यांचे जाळे वाढविणे गरजेचे आहे.

५) या कामाकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत DPR तयार करणे गरजेचे आहे. DPR तयार असल्यास याकामाकरीता शासनाच्या विविध योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन घेणे शक्य होईल.

६) मिरा भाईंदर शहरातील भुयारी गटार योजने अंतर्गत अतिरिक्त मलवाहिनी टाकणेबाबतच्या DPR करणेकामी तसेच विविध विभागाच्या परवानगी प्राप्त करणेकामी प्रस्ताव तयार करणे या करीता निविदा मागविणे योग्य होईल.

**ठराव (        ) :-**

प्रस्तावात नमुद केलेली सदर कामे करणे अत्यावश्यक असल्याने ती करण्यात यावीत तसेच डी.पी.आर तयार करताना मुळ योजनेमध्ये समाविष्ट न केलेले चेणा ते उत्तन या गावांचा अंर्तभाव करण्यात यावा तसेच काही दाट लोकवस्तीच्या ठिकाणी पारंपारिक पध्दतीने काम करण्यास तांत्रिक अडचणी असल्यास नवीन तंत्रज्ञान वापरुन डी.पी.आर तयार करावा. तसेच शहरातील दोन रस्ते नॅशनल हायवे ते रिलायंन्स (घोडबंदर) ६० मीटर रस्ता व सुभाषचंद्र बोस ते मोर्वा रस्ते एम.एम.आर.डी.ए मार्फत क्रॉक्रिटीकरण करावयाचे असल्याने त्या ठिकाणी प्राधान्याने सिवरेज लाईन टाकणे अत्यावश्यक असल्याने अस्तित्वात असलेल्या निविदेतून मे.सुभाष प्रोजेक्ट ऍ़ण्ड मार्केटींग लि. (SPML) या ठेकेदारामार्फत पाईपलाईन टाकण्यात यावीत. तसेच खाजगी संकुलनातील मलनिःस्सारण केंद्र(एस.टी.पी. प्लान) महानगरपालिकेने ताब्यात घेतलेले आहेत त्या जागा देखील महानगरपालिकेच्या नावावर करुन घेण्यात याव्यात असा मी ठराव मांडत आहे.

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

ह्या क्षेत्रामध्ये अजून काम पूर्ण झाले नाही. वाकोडे साहेबांनी उत्तर द्यावे यादी मंजूर आहे. आमचे क्षेत्र ह्याच्यामध्ये गृहित धरले नव्हते ते ठीक आहे. नयानगर परिसर ७ नंबरचा झोन आहे. अजूनही तिथे ५० टक्के काम बाकी आहे. अशा क्षेत्राचे काय?

**सुरेश वाकोडे :-**

ही कामे मार्चपर्यंत पूर्ण करणार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय पावसामध्ये काम बंद केले जाते ते अडचणीचे आहे. काम होऊच शकत नाही. पुढचे दोन महिने सुट्टया सणासुदीचे दिवस असल्यामुळे त्याच्यामध्ये काम होत नाहीत. वर्षातून ६ महिने तरी काम झाले पाहिजे. ह्या वर्षात काम सुरुच करण्यात आलेली नाही. तुम्ही काम सुरु करत नाही त्यामुळे जे रस्ते करायचे ते आम्हाला करता येत नाही. आम्ही नविन रस्ते केले आम्ही त्या दृष्टीकोनातून विचार करतो की महानगरपालिकेचा पैसा वाया गेला नाही पाहिजे. आम्ही ते जुने झालेले रस्ते करुन घेतले तुमच्याकडचे काम बाकी आहे तुम्ही ते काम सुरु करत नाही. आमचे रस्ते होत नाही. अशा परिस्थितीत तुम्ही स्पष्ट करा करायचे काय?

**सुरेश वाकोडे :-**

तुमच्याकडचे काम पूढच्या आठवड्यात सुरु होणार.

**जुबेर इनामदार :-**

एस.पी.एम.एल. ने जे ठेकेदार नेमले होते त्यांना पैसे दिले नाहीत म्हणून काम होत नाही.

**सुरेश वाकोडे :-**

त्यांनी पेमेन्ट केले आहे. सोमवारपासून काम चालू होणार.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय तत्कालीन आयुक्त विक्रमकुमार होते त्यावेळी त्यांना डायरेक्ट पेमेन्ट दिले जात नव्हते. त्याला समोर बसवत होते. त्यांनी अशाप्रकारे विषय हाताळला म्हणून इथपर्यंत गाडी आली

आहे. ह्याला कुठेतरी अंकुश लागला पाहिजे. काम झाले पाहिजे आमची इच्छा काम होण्याची आहे. ह्या विषयावर आम्ही नेहमी सहकार्य करायला तयार आहोत. चांगली योजना आम्हीच आणलेली आहे. आम्हाला त्यांचा गर्व आहे की आम्ही ती योजना सुरु केली. आता ती योजना पूर्ण करा. नविन क्षेत्राचा त्याच्यात समावेश केला पाहिजे.

**गिता जैन :-**

टंडन पण तुम्हीच नेमलेला.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही कुठे नाही बोलतो. तो मनपामध्ये आहे. तुम्ही सत्तेमध्ये अडीज वर्ष काढली. त्याला काळ्या यादीत का टाकले नाही. जी काही काम राहिली आहेत. त्याच्यावर विचार करा. काय करता येईल त्याची उपाययोजना करा. तो करत नसेल तर महानगरपालिकेच्या माध्यमातून करा.

**दिनेश नलावडे :-**

ठराव मंजूर झाला भुयारी गटार योजनेचा त्यावेळेला भाईंदर पूर्व हा ग्रामपंचायतीचा काळाचा विभाग आहे. आज तुम्ही आम्ही सगळे त्या ठिकाणी राहतो. परंतु नवघर रोड, बी.पी. रोड, केबीन रोड, नर्मदा नगर, गोडदेव गाव, नवघर गाव ही सगळी गाव विमल डेरीच्या अलीकडे इंद्रलोकचा अलिकडचा भाग हा संपूर्ण ग्रामपंचायतच्या काळचा आहे. त्याठिकाणी कसलाही प्रकारची त्या विभागातील नागरिकांना ह्या योजनेचा लाभ मिळालेला नाही. परंतु त्यावेळेला आपण हा ठेका काढला सर्व्हे झाला त्यावेळेला सर्व्हेमध्ये ठेकेदाराने आपला सगळा विभाग समावेश करुन घेतला होता. मग आज जी अडचण आलेली आहे त्यावेळेला समावेश केला त्या वेळेला हा बजेटमध्ये संपूर्ण भाग त्याच्यात आलेला आहे. मग आज मला महापौर मॅडम अपल्याकडून जरा उत्तर द्या की ह्या भाईंदर पूर्वच्या विभागाला त्या विभागाच्या नागरिकांना न्याय मिळेल किंवा नाही मिळेल. कारण की ह्या संपूर्ण शहरालगत भुयारी गटार योजनेला लाभ मिळतो तर ह्या नागरिकांना लाभ मिळेल किंवा नाही मिळणार?

**मा. महापौर :-**

मिळणार ना.

**दिनेश नलावडे :-**

मिळणार कारण की, हे महत्वाचे आहे. तांत्रिकदृष्ट्या जे काही अडचण असेल ती महानगरपालिकेने बघायचे आहे. परंतु शहरातील इतर नागरिकांना जो न्याय मिळत आहे तो न्याय भाईंदर पूर्वेच्या सर्व लोकांना मिळावा ही आपल्याला विनंती करतो.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते गेल्या वेळेला २००७ मध्ये जेव्हा ही योजना डी.पी. प्लॅन जेव्हा बनवत होते तेव्हा पण मी सुचविलेले होते आणि तेव्हा बोलले की नेक्स्ट टाईम हे परत बनविणार डी.पी. तेव्हा आपण ह्याच्यामध्ये ही सुचना घेऊया. माझा पत्रव्यवहार पण केलेला आहे. शांतीनगरमध्ये पूर्ण १ ते ११ सेक्टरमध्ये शांतीस्टारने ही योजना बनविलेली होती. त्याला ३५ वर्ष झालेली आहेत. सगळे तुटलेले आहे. तर आम्ही पैसे पण टॅक्समध्ये ते देतो आणि त्यांना ती सुविधा व्यवस्थित भेटत नाही सर्व गॅलेश उघडून बाहेर येत आहे. तर आपल्याला विनंती आहे की जेव्हा डी.पी. प्लान बनविणार तेव्हा १ ते ११ सेक्टरचे नविन त्यांना पण आतमध्ये घेण्यात यावे.

**अनिल सावंत :-**

वाकोडे साहेब जुन २००७ मध्ये शितल नगर, शांती पार्क, गोविंद नगर, नुपुर, नयानगर इथे प्रॉपर्टी कनेक्शन द्यायला केव्हा सुरु करणार आहेत? मगाशी मी तुम्हाला क्वेशन विचारला तुम्ही बोलले जानेवारी मग जे प्रॉपर्टी कनेक्शन द्यायला जो प्रोसेस आहे त्याला १-२ महिने लागणार ना ते इमिजिएट चालु करणार का तुम्ही?

**सुरेश वाकोडे :-**

नाटिस देणे चालु करणार आहोत.

**अनिल सावंत :-**

नोटिस देणे चालु केलेले आहे. आता मॅडम परत हा विषय तोच आला डी.पी.आरचा पहिला डी.पी.आर बनविता वेळी कन्सल्टंन्ट नेमला त्याने पूर्ण शहर कवर केलेले होते. त्यानंतर अडचणी आल्या मग आता त्या कन्सल्टन्टला ॲटलिस्ट हा डी.पी.आर बनविते वेळी त्याला ब्लॅक लिस्ट करा. आणि चांगला कन्सल्टन्ट नेमा.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने वाकोडे साहेब तुम्ही मला २ वर्षापासून सांगत आहात की २००५-०६ मध्ये आणि ०७ मध्ये तो तुम्ही प्लान देणार किती काम बाकी आहे. आणि किती झालेले आहे आणि ६-ए मध्ये फक्त ३ पॉईंट्स बाकी आहेत ते केल्यावर आपले शितल नगर कव्हर होईल. ते तरी तुम्ही लवकर करा. मला दोन महिन्यापासून सांगत आहेत. आता सुरु करतो दिवाळीनंतर सुरु करतो. हे एवढे ढिले झालेल आम्हाला प्रश्न पडतो. लोकांना सांगायला आम्ही पब्लीकला काय सांगायचे.

**सुरेश वाकोडे :-**

करुन घेऊ.

**मर्लिन डिसा :-**

असेच सांगता तुम्ही करुन घेऊ म्हणून.

**सुरेश वाकोडे :-**

आता करुन घेऊ.

**मर्लिन डिसा :-**

कधी स्टार्ट करणार हे तरी सांगा. म्हणजे आम्ही पब्लिकला तसे सांगु.

**सुरेश वाकोडे :-**

पुढच्या विकमध्ये सुरु होणार.

**मर्लिन डिसा :-**

पुढच्या विकमध्ये.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

काशी नगर आणि गोडदेव हा जो इंद्रलोकचा पट्टा आहे. तर प्रॉपर्टी कनेक्शन कधीपासून तुम्ही चालू करणार आहात? आजपर्यंत कुठे जॉईंट झालेली नाही. तुम्ही मागच्यावेळी नोटिस पाठविलेली होती. परत ते काम स्थगित पैसे पण भरलेले आहेत सोसायटीने.

**सुरेश वाकोडे :-**

लाईन वॉश करायची बाकी होती. लाईन वॉश करुन आम्ही चालू करणार आहोत.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

कधीपर्यंत होईल?

**सुरेश वाकोडे :-**

साधारण एक दिढ महिन्यांमध्ये होऊन जाईल.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ठिक आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ३९ :-**

**<u>आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत . (पाणी पुरवठा विभाग)</u> भुयारी गटार योजना - वाढीव कामाबाबतचा DPR बनविणेबाबत.**

**ठराव क्र. ३६ :-**

१) मिरा भाईंदर शहराकरीता ११५ द.ल.ली. क्षमतेची भुयारी गटार योजना मंजूर असून या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. ११५ द.ल.ली. पैकी ७५ द.ल.ली. योजना कार्यान्वीत झाली आहे.

२) या योजनेकरीताचा DPR सन २००७ साली तयार करण्यात आला होता. त्यावेळी मिरा भाईंदर शहराची अंदाजित लोकसंख्या ७.५ लाख होती. तसेच आजची लोकसंख्या ११ लाखाच्या घरात गेली आहे.

३) प्रगतीपथावर असलेल्या भुयारी गटार योजनेचे संकल्पन सन २००७ साली करण्यात आले होते. परंतु त्यानंतर अस्तित्वातील झोन व आसपासचा परिसरात देखील रहिवास क्षेत्र वाढत गेले.

४) सन २००७ नंतर वाढलेली लोकसंख्या, वाढलेले रहिवास क्षेत्र व वाढलेले पाणी याचा विचार करता तसेच पुढील काही वर्षात होणारी वाढ लक्षात घेता संपूर्ण मिरा भाईंदर शहराचे सर्वेक्षण करुन मलवाहिन्यांचे जाळे वाढविणे गरजेचे आहे.

५) या कामाकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत DPR तयार करणे गरजेचे आहे. DPR तयार असल्यास याकामाकरीता शासनाच्या विविध योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन घेणे शक्य होईल.

६) मिरा भाईंदर शहरातील भुयारी गटार योजने अंतर्गत अतिरिक्त मलवाहिनी टाकणेबाबतच्या DPR करणेकामी तसेच विविध विभागाच्या परवानगी प्राप्त करणेकामी प्रस्ताव तयार करणे या करीता निविदा मागविणे योग्य होईल.

**ठराव (        ) :-**

प्रस्तावात नमुद केलेली सदर कामे करणे अत्यावश्यक असल्याने ती करण्यात यावीत तसेच डी.पी.आर तयार करताना मुळ योजनेमध्ये समाविष्ट न केलेले चेणा ते उत्तन या गावांचा अंर्तभाव करण्यात यावा तसेच काही दाट लोकवस्तीच्या ठिकाणी पारंपारिक पध्दतीने काम करण्यास तांत्रिक अडचणी असल्यास नवीन तंत्रज्ञान वापरुन डी.पी.आर तयार करावा. तसेच शहरातील दोन रस्ते नॅशनल हायवे ते रिलायंन्स (घोडबंदर) ६० मीटर रस्ता व सुभाषचंद्र बोस ते मोर्वा रस्ते एम.एम.आर.डी.ए मार्फत क्रॉंक्रिटीकरण करावयाचे असल्याने त्या ठिकाणी प्राधान्याने सिवरेज लाईन टाकणे अत्यावश्यक असल्याने अस्तित्वात असलेल्या निविदेतून मे.सुभाष प्रोजेक्ट ॲण्ड मार्केटींग लि. (SPML) या ठेकेदारामार्फत पाईपलाईन टाकण्यात यावीत. तसेच खाजगी संकुलनातील मलनि:स्सारण केंद्र(एस.टी.पी. प्लान) महानगरपालिकेने ताब्यात घेतलेले आहेत त्या जागा देखील महानगरपालिकेच्या नावावर करुन घेण्यात याव्यात असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सचिन म्हात्रे                    अनुमोदक :- श्रीम. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४०, **<u>आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत . ( पाणी पुरवठा विभाग )</u> २१८ द.ल.ली. सुर्या पाणी पुरवठा योजना - DPR बनविणेबाबत.**

**सुरेश खंडेलवाल :-**

१) मिरा भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत ४०३ द.ल.ली. पाणी पुरवठा राबविण्यांत येणार आहे. या योजनेंतर्गत मिरा भाईंदर शहरास २१८ द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे. यासाठी सुर्या धरणापासून मिरा भाईंदर शहरापर्यंत एकूण ९८ कि.मी. लांबीची जलवाहिनी तसेच चेणे येथे वनखात्याच्या जागेत २० द.ल.ली. क्षमतेची मुख्य संतुलन टाकी बांधून चेणे येथील टाकीपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण २१८ द.ल.ली. पाणी पुरवठा करणार आहे.
२) चेणे येथील टाकी पासून पाणी मिरा भाईंदर शहरात पाणी आणणे व शहराअंतर्गत वितरण व्यवस्था अंथरणे हे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करावयाचे आहे.
३) मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सुर्या धरणातून पाणी उपलब्ध झाल्यावर Augmentation of Distribution System करीता DPR तयार करणेकामी मे.टंडन ॲण्ड असोसिएटस् यांना कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार मे. टंडन ॲण्ड असोसिएटस् यांनी DPR सादर केला होता.
४) त्यानंतर मनपास MIDC मार्फत ७५ द.ल.ली. पाणी उपलब्ध झाल्यामुळे सदर योजना कार्यान्वीत करण्यात आली. त्यामुळे सन २०२१ पर्यंतची जलकुंभ व वितरण व्यवस्थेची अंशत: कामे झाली आहेत.
५) सुर्या प्रकल्पातील २१८ द.ल.ली. पाणी उपलब्ध झाल्यानंतर तसेच सन २०४६ पर्यंतच्या पाणी वितरणाचे संकल्पन करणेकामी DPR मध्ये सुधारणा करुन नवीन DPR करणे गरजेचे आहे.
६) २१८ द.ल.ली. सुर्या पाणी पुरवठा योजनेकरीता DPR करणेकामी तसेच विविध विभागाच्या परवानगी प्राप्त करणेकामी प्रस्ताव तयार करणे या करीता निविदा मागविणे योग्य होईल.

**ठराव :-**

प्रस्तावात नमुद केलेली सदर कामे करणे अत्यावश्यक असल्याने हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व त्याअनुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**रिटा शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, ह्या विषयावर २१८ एम.एल.डी. सुर्या प्रकल्पाची ही स्किम आहे. मा. मुख्यमंत्री ह्या शहरामध्ये भुमीपुजन उद्‌घाटन करुन गेले. पाणी मिळणार की नाही हे अजुन कुठेही नक्की झालेल नाही. तिथले बी.जी.पे. चे स्थानिक खासदार चिंतामण वनगा साहेब यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून कूठल्याही परिस्थितीत मिरा भाईंदर शहराला पाणी देऊ नये असा पत्रव्यवहार आहे. ह्या पत्राची आमच्याकडे कॉपी आहे. आणि त्याच्यावर मुख्यमंत्री काही बोलत नाही आणि आज आपण ही स्किम करिता पहिला डी.पी.आर बनविणेसाठी नागरिकांचे पैसे खर्च करणार आहोत. त्याची वस्तुस्थिती बघितली तर खरोखरच पाणी आपल्याला मिळणार आहे की नाही कारण पाण्याची ह्या शहराला गरज आहे. आणि आता ७५ एम.एल.डी. स्किम आपली चालु आहे बारवी डॅम ह्या स्कीम व्यतिरिक्त तेथुन पण आपल्याला पाणी मिळू शकेल का याच्यासाठी सुध्दा प्रयत्न करा अशी मी विनंती करतो. कारण हे पालघरमधून डॅमचे पाणी येणार स्थानिक खासदारांचा विरोध स्थानिक नागरीकांचा विरोध हे तर मला अशक्य गोष्ट वाटते. डी.पी.आर. बनवायला हरकत नाही. डी.पी.आर ला शेवटी नागरिकांचे पैसे जाणार आहोत. पण त्याच्याऐवजी त्यांनी जर त्या व्यक्तीचा विचार करा खासदारांची पाहिजे तर एक मिटींग लावा आणि त्यांचे मन वळवा. आणि महापौर मॅडम आपल्याला एक विनंती करावी वाटते की हे ठराव वाचले जातात. ठराव सत्तापक्षाचे मंजूर होतात विरोधी पक्षात आम्ही आहोत आम्ही बोलतो. तुम्ही महापौर ह्या सर्वांचे आहात. सत्ताधारींचे नाही तुम्ही फक्त ठराव मंजूर न करता तुमचा आदेश सुध्दा त्याच्याबाबतीत तुम्हाला आमची मते पटली तर तो आदेश सुध्दा ठराव मंजूर करतेवेळी घ्या. तर हे प्रशासन कामाला लागेल.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४० :-**

**आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) २१८ द.ल.ली. सुर्या पाणी पुरवठा योजना - DPR बनविणेबाबत.**

**ठराव क्र. ३७ :-**

१) मिरा भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत ४०३ द.ल.ली. पाणी पुरवठा राबविण्यांत येणार आहे. या योजनेंतर्गत मिरा भाईंदर शहरास २१८ द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे. यासाठी सुर्या धरणापासून मिरा भाईंदर शहरापर्यंत एकूण ९८ कि.मी. लांबीची जलवाहिनी तसेच चेणे येथे वनखात्याच्या जागेत २० द.ल.ली. क्षमतेची मुख्य संतुलन टाकी बांधून चेणे येथील टाकीपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण २१८ द.ल.ली. पाणी पुरवठा करणार आहे.

२) चेणे येथील टाकी पासून पाणी मिरा भाईंदर शहरात पाणी आणणे व शहराअंतर्गत वितरण व्यवस्था अंथरणे हे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करावयाचे आहे.

३) मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सुर्या धरणातून पाणी उपलब्ध झाल्यावर Augmentation of Distribution System करीता DPR तयार करणेकामी मे.टंडन ॲण्ड असोसिएटस् यांना कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार मे. टंडन ॲण्ड असोसिएटस् यांनी DPR सादर केला होता.

४) त्यानंतर मनपास MIDC मार्फत ७५ द.ल.ली. पाणी उपलब्ध झाल्यामुळे सदर योजना कार्यान्वीत करण्यात आली. त्यामुळे सन २०२१ पर्यंतची जलकुंभ व वितरण व्यवस्थेची अंशतः कामे झाली आहेत.

५) सुर्या प्रकल्पातील २१८ द.ल.ली. पाणी उपलब्ध झाल्यानंतर तसेच सन २०४६ पर्यंतच्या पाणी वितरणाचे संकल्पन करणेकामी DPR मध्ये सुधारणा करुन नवीन DPR करणे गरजेचे आहे.

६) २१८ द.ल.ली. सुर्या पाणी पुरवठा योजनेकरीता DPR करणेकामी तसेच विविध विभागाच्या परवानगी प्राप्त करणेकामी प्रस्ताव तयार करणे या करीता निविदा मागविणे योग्य होईल.

**ठराव :-**

प्रस्तावात नमुद केलेली सदर कामे करणे अत्यावश्यक असल्याने हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व त्याअनुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदक :- श्रीम. रिटा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४१, **समावेशक आरक्षण तरतुदीखाली जागा उशीरा हस्तांतरण होत आहे त्याबाबत धोरण ठरविणे**

**रिटा शहा :-**

महापौर मॅडम, सदर ठराव होण्याच्या अगोदर माझ्याकडे एक नोटिफिकेशन आहे. महाराष्ट्र स्टेट गर्व्हमेन्ट आपले लाडके मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस साहेबांच्या अध्यक्षतेखाली आणि त्यांच्यावर अंतर्गत पूर्ण महाराष्ट्राचा नगरविकास खात्यातर्फे एक पेपरमध्ये पण आले होते नोटिफिकेशन की सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, ज्यांना नगररचनेचे कॉमन रुल्स, रेग्युलेशन लागु करण्याकरिता असे झाले होते. त्याच्यामध्ये लोकांचे सजेशन आणि ऑब्जेक्शन पण घेतले गेले आणि ते फाईनल करुन ३०५ पेजचे बुकलेट तयार झाले आहेत आणि ते पुण्याला पाठविलेले आहेत. तर सदर आपण जो ठराव आणलेला आहे तो ठराव त्या याच्यामध्ये मर्ज होणार काय? आणि होऊ शकतो का? याची कॉपी मी पाठवते.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, प्रशासनाने याच्यावर गोषवारा दिलेला नाही. सदस्याला कसे कळणार हा काय विषय आहे. ठिक आहे महापौरांनी विषय दिला प्रशासनाने गोषवारा नाही दिला म्हणजे प्रशासनाची याला मान्यता नाही असे आम्ही समजायचे का? प्रशासनाने आपली भुमिका मांडली पाहिजे. तुमच्या सहिने हा अजेंडा येतो. आणि त्याच्यावर ही नोंद आहे. तुम्हाला मान्य नाही असे आम्ही समजायचे का?

**प्र. नगरसचिव :-**

प्रशासन खुलासा करेल ना.

**अनिल सावंत :-**

आयुक्तांनी खुलासा करावा. जरा आम्हाला सांगा आम्हाला कळूतर द्या विषय काय आहे. महापौरांनी विषय दिला ठिक आहे. पण प्रशासनाने गोषवारा दिला नाही म्हणजे प्रशासनाची मान्यता नाही मग प्रशासनाचा स्टॅन्ड काय आहे. शेवटी अजेंडा तुमच्या सहीने येत आहे. सचिव साहेब विषय तुमचा आहे. मान्यता तुमची आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो महापौरांच्या परवानगीने हा विषय आलेला आहे. आमचे सदस्य तो विषय मांडत आहेत. सभागृहात ठराव वाचत आहेत तो ठराव त्यांना वाचु द्या म्हणजे त्यातली भुमिका स्पष्ट होईल. त्यांना काय बोलायचे आहे. सावंत साहेब विषय समजल्यानंतर आणखीन त्याच्यात भर पडेल. त्याच्यावर अधिक बोलता येईल.

**अनिल सावंत :-**

तुमचा हेतु शुध्द आहे. मान्य आहे ज्यावेळी अजेंडा आमच्याकडे येतो प्रशासन गोषवारा देत नाही हे नेहमीचे आहे माझी मागणी फक्त एवढीच आहे की प्रशासनाने खुलासा करावा. तुम्ही ठराव मांडा तुमची मते आम्हाला माहित आहेत काय आहेत. चांगलीच असणार. शहराच्या हिताची असणार. पण प्रशासनाने खुलासा करावा. काय विषय आहे म्हणजे सदस्यांना कळेल. प्रशासनाने खुलासा करावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या विभागाचे अधिकारी येतील आणि खुलासा करतील तोपर्यंत आम्ही बोलतो.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने ध्रुवजी तुम्ही जो विषय मांडला की त्या डिपार्टमेंटचे लोक येऊन त्यासंदर्भात खुलासा करतील बरोबर आहे. परंतु विषय त्या विषयाचा नाही यांनी जो प्रश्न विचारला तो प्रशासनाचा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते येईपर्यंत आम्हाला खुलासा करु द्या.

**निलम ढवण :-**

ते येईपर्यंत काय घाई एवढी काय आहे. घाई कशाला करता. प्रशासनाने उत्तर द्यावे त्यांचा गोषवारा का नाही आला आणि जर गोषवारा आला नाही तर जो केलेला ठराव आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

संबंधीत अधिकारी येईपर्यंत वेळ आहे म्हणून सभेची परवानगी मागितली.

**निलम ढवण :-**

अधिकारी बाजुला बसतात विषय आला की बाजूला असतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते आले नाहीत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

निलम मॅडम महापौरांना विषय आणण्याचे अधिकार आहेत.

**स्नेहा पांडे :-**

गोषवारा पाहिजे ना.

**निलम ढवण :-**

आमच्या प्रश्नाचे उत्तर द्या ना.

**मा. उपमहापौर :-**

महापौर स्वतःच्या अधिकारात विषय सभागृहात आणू शकतो.

**अनिल सावंत :-**

आम्हाला अधिकार मान्य आहे. फक्त प्रशासनाने एवढा खुलासा करावा.

**प्रभात पाटील :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनूसार विकासक / जागा मालकाना समावेशक आरक्षणात (Accdomodation Reservation) बांधकाम परवानग्या देण्यात येतात, परंतु विकासक / जागा मालक त्यांच्या इमारतीची कामे पूर्ण करतात व महानगरपालिकेस समावेशक आरक्षणाच्या तरतूदीखाली बांधून दयावयाचे बांधकाम बांधून देत नाहीत . त्यामुळे महानगरपालिकेस असे बांधकाम क्षेत्र मिळण्यास विलंब लागतो.**

**समावेशक आरक्षणाचे विकासकाकडून बांधकाम करुन घेण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.**

1) **समावेशक आरक्षणाच्या तरतूदीखाली विकासकास परवानगी देण्यापूर्वी महानगरपालिकेस बांधून दयावयाच्या बांधकाम पूर्ण करुन देण्यासाठी मुदत ठरविण्यात यावी व तसे हमीपत्र घेण्यात यावे. मुदतीत बांधकाम करुन न दिल्यास रु .30 प्रति चौफुट प्रति महिना विलंब दंड वसूल करण्यात यावा . एखाद्या कामात विशेष कारणामुळे विलंब झाल्यास मुदतवाढ देण्याचा अधिकार आयुक्त यांना राहील.**
2) **विकासकाने समावेशक आरक्षणाच्या तरतुदीखाली महानगरपालिकेस बांधुन द्यावयाची वास्तु व स्वत:साठी बांधावयाचे बांधकाम यांचे काम एकत्रितरित्या सुरु करावे.**
3) **महानगरपालिकेस बांधुन द्यावयाच्या कामास ठरवुन दिलेल्या मुदतीपेक्षा विलंब झाल्यास जोपर्यंत महानगरपालिकेचे काम पूर्ण करुन देत नाही तोपर्यंत विकासकाची परवानगी स्थगित करण्यात यावी.**
4) **समावेशक आरक्षणात बांधून घ्यावयाच्या बांधकामाचा नकाशा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनूसार संबधित विभागाचे मत घेऊन तयार करुन घ्यावा व नंतर मंजूर करावा . तसेच सदर वास्तुही स्वतंत्र असावी. विकासकाच्या बांधकामापेक्षा वेगळ्या क्षेत्रावर असावी.**
5) **विकासकास परवानगी देताना महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाच्या नागरी सुविधा क्षेत्र बांधुन द्यावयाची इमारत व सदरची जागा नोंदणीकृत करारनामा करुन घेण्यात यावी.**
6) **मिरा-भाईंदर महानगरपालिकेने आतापर्यंत समावेशक आरक्षणाच्या तरतुदीखाली परवानगी दिलेल्या व आजतागायत हस्तांतरी त न झालेल्या विकासकांना महानगरपालिकेस द्यावयाच्या बांधकाम क्षेत्रासाठी मुदत ठरवुन द्यावी. तातडीने नोंदणीकृत करारनामा करुन घेण्यात यावा . सदर कामांना विलंब झाल्यास वरील धोरणाप्रमाणे कारवाई करावी असा मी ठराव मांडत आहे.**

**सिमा शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, ह्या समावेशक आरक्षणाबरोबर त्यामध्ये आर.जी. आणि ओपन स्पेस यांचा देखील समावेश करण्यांत यावा. कारण शासनाचा जी.आर. देखील यापूर्वीचा आहे की त्या हस्तांतरण करुन त्या विकसित करण्यात याव्यात. आर.जी. आणि ओपन स्पेसच्या ज्या आहेत त्या कारण ज्या ओपन स्पेस किंवा आर.जीच्या जागा आहेत त्या देखील धनाढ्य लोक त्याच्यावर ताबा घेतात. बांधकाम करतात अतिक्रमण झालेले आहे. अशा ब-याचशा जागा आहेत. ज्या हस्तांतरण केल्या गेल्या नसल्यामुळे त्या सगळ्यांवर अतिक्रमण होत आहे. तर ते हे न करता जी सर्वसामान्य लोक आहेत की आपली जीवनातली पुंजी असते आर्थिक जे त्यांचे पैसे जमा असतात ते पूर्ण ह्या सगळ्या सोयी मिळवण्यासाठी त्या इमारतीमध्ये ते टाळत असतात आणि त्याचा लाभ हा फक्त त्या लोकांनाच झाला पाहिजे. आणि त्यामुळे ही तरतुद जास्तीत जास्त ह्या समावेशक आरक्षणाबरोबर आर.जी. आणि ओपन स्पेस यांचा देखील याच्यामध्ये समावेश करण्यांत यावा. आणि ज्या जी.आर ओपन स्पेसवर जे कोणी बिल्डर असतील किंवा इतर लोकांनी कब्जा केलेला असेल तर त्यांच्याकडून घेऊन देखील त्या हस्तांतरीत करण्यात याव्यात. महानगरपालिकेकडे आणि त्यांना कुठची परमीशन किंवा त्यांनी अतिक्रमण केलेले असल्यामुळे अशा यांना काळ्या यादीत टाका आणि त्यांचा फायदा गोरगरिब लोकांना जास्तीत जास्त जे लोक सर्वसामान्य लोक त्याठिकाणी आपले पैसे इनवेस्ट करतात त्याचा लाभ त्यांचा त्यांनाच मिळाला पाहिजे. अशा पध्दतीने आपण त्यामध्ये समावेश करुन घेण्यात यावा.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, सत्ताधा-यांनी विषय अतिशय चांगला आणलेला आहे. प्रशासनाची याच्यामध्ये काय भुमिका असणार आहे. प्रशासन याच्यामध्ये काय निवेदन करेल? करणार आहे की नाही ते एक महत्वाचा विषय आहे.

**मा. उपमहापौर :-**

या विषयात प्रशासनाकडून त्यांनी आपल्याला सहकार्य केले नाही असे आम्ही गृहित धरतो. परंतु महापौरांच्या मान्यतेने ह्या शहरामध्ये अनेक विकास कामे करताना आपण जी रिझर्व्हेशन असतात त्याला अनुसरुन आपण परवानगी देतो. परंतु बांधकाम करणारा स्वतःचे बांधकाम करुन घेतो. त्या रिर्झर्व्हेशनच्यानुसार पहिली परवानगी आपली प्राप्त करुन घेतो आणि महापालिकेला जे द्यायचे आहे त्यासंदर्भात चालढकल करतो. हा विषय महासभेसमोर आणण्याचे प्रयोजन असे आहे की एक चांगला रिपोर्ट अधिका-यांपर्यंत आपल्याकडून गेला पाहिजे. त्यांच्याकडून एक योग्य कारवाई झाली पाहिजे. कारण हा विषय यावा अशी आमची भावना होती. ढवण ताईन सांगितले की याच्यामध्ये आर.जी. चा समावेश करावा. परंतु रिक्रेशन ग्राऊंड हे त्या-त्या सोसायटीच्या हितासाठी आहे कामासाठी आहे. त्याच्यामुळे त्याच्यात समावेश न करता आपले काय धोरण आहे की आपण एखादी परवानगी दिली आणि मार्केट बांधून घ्यायचे आहे किंवा एखादी वास्तु बांधून घ्यायची आहे ती त्यांच्याकडून आपल्याला मिळत नाही. लवकर तर ती व्हावी त्याला विलंब होत असेल ह्या संदर्भात ही आमची भुमिका स्वयंस्पष्ट आहे. आणि प्रशासनाकडे आपण हा ठराव पाठवतो. त्यांच्याकडून आयुक्तांकडून आपल्याला याच्यावरती पॉझीटिव्ह कारवाई अपेक्षित आहे. किंबहुना तसे आदेश ही महासभा आयुक्त साहेबांना देणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम विषय चांगला असताना प्रशासनाने याच्यावरती गोषवारा दिला असता त्याची तांत्रिक बाबी आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम ह्या विषयावर बोला ना पहिला तर हा मुद्दा आहे. समावेश आरक्षण किती तरी सदस्य नविन आहेत त्यांना समावेश आरक्षण हा विषय तुम्ही त्याच्या समोर ठेवला ते त्यांना समजणार सुध्दा नाही हे आहे तरी काय. नागरिक सुविधा क्षेत्र हा त्यांना विचारले तर त्यांना माहिती सुध्दा नाही हा विषय काय आहे. म्हणून प्रशासनाने ह्या विषयावर गोषवारा तुम्हाला इच्छा नाही की आमच्या सदस्यांचा अभ्यास झाला पाहिजे? झाला पाहिजे ना तर त्या दृष्टीकोनातून प्रादेशिक नगररचना अधिनियम याच्यामध्ये काय बोलले. हे महत्वाचे आहे. आपल्या डी.सी. रुल नियमावली ह्याच्यामध्ये त्याचा किती हस्तक्षेप असणार आहे. आम्ही अशाप्रकारे केलेला ठराव होऊ शकतात का? उद्या आमची नामुष्की का. विषय चांगला आणला सत्ताधा-यांनी मात्र त्याला तांत्रिक बाबी किंवा लिगली वैधता किती आहे ते महत्वाचे आहे. केला पाहिजे समावेश आरक्षणामध्ये बांधून दिले पाहिजे. विकासकाने तो देत नाही आपले समावेश आरक्षण तयार होत नाही तो त्याच करुन घेतो. त्याच्यावरती ठरलेले हे धोरण आहे. हा धोरणात्मक निर्णय होता. शासनाने याच्यामध्ये गोषवारा दिला पाहिजे किती लोकांना हा वाचलेला ठराव समजला परमेश्वराला माहिती किंवा वैती साहेबांनी निवेदन केले ते त्यांना माहिती ही खरी परिस्थिती आहे साहेब. हा ऑन रेकॉर्ड विषय आला असता. पालिकेच्या माध्यमातून शासनाकडे गेला असता याला मंजूरी मिळाली असती आज पालिकेच्या माध्यमातून जाईल की नाही त्याची

शाश्वती देता येत नाही. म्हणून आयुक्त साहेब अशा प्रकारे आलेले चांगले विषय त्याला प्रशासनाने गोषवारा द्यावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय आल्यानंतर विरोधकांनी एक्सेप्ट केलेले आहे की हा विषय चांगला आणलेला आहे. आता प्रशासनाने गोषवारा दिला नाही ही प्रशासनाची चुक आहे. महापौर मॅडमने त्यांच्या मान्यतेने हा चांगला विषय आणलेला आहे आणि तुम्ही सुध्दा अप्रिशिएट केलेले आहे. आणि पहिला विरोध केला मग तुम्ही अप्रिशिएट केले निमलताईंनी सुचना सुध्दा मांडली त्याच्यावर वैती साहेबांनी सांगितले की रिक्वेशन ग्राऊंड आहे त्या सोसायटीच्या मालकीचे आहे.

**अनिल सावंत :-**

आम्ही विरोध नाही केला. तुम्ही चुकीचे नका बोलू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय असा आहे की तुमचा ह्या विषयाला सगळ्यांनी अप्रिशिएट केल विषय अतिशय चांगला आहे आणि हे जे धोरण ठरविण्याचा विषय आहे ह्या धोरणामध्ये आम्ही काही ६ मुद्दे सांगितले जर तुम्हाला याच्यामध्ये काही ॲडीशन करावेसे वाटले की ह्याच्यामध्ये थोडा हा फेरबदल करावा की याच्यामध्ये हा पॉईंट टाकावा जेणेकरुन हे समावेशन आरक्षण आपल्याला डेव्हलप करण्यासाठी हे उपयोगी पडेल. तसे तुम्ही सांगा ना. हा आपण धोरण ठरविण्याचा विषय आणलेला आहे ह्या धोरणामध्ये आमच्या पक्षाच्या सगळ्या नगरसेवकांनी अभ्यास करुन हे सहा पॉईंट टाकलेले आहेत. जर तुमचा अभ्यास चांगला आहे तुम्ही आणखी दोन चार पॉईंट टाका.

**अनिल सावंत :-**

आम्हाला गोषवारा पाहिजे आम्ही अभ्यास कसा करणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझी तुम्हाला विनंती आहे की हे जे सहा धोरण आम्ही ठरविलेले आहेत त्यापैकी तुम्हाला आणखी काय वाढवायचे असतील तर द्या. आयुक्त साहेब तुम्ही त्या नगररचना विभागाला नोटिस द्या की, महापौर मॅडमने हा विषय आणला की आपण आपले सर्व्हेक्षण केले नाही ही चुकीची बाब आहे त्यांना तुम्ही अशी नोटिस द्या असे मला तरी वाटत आहे. महापौर मॅडम मला तुम्हाला विनंती आहे की आयुक्तांना सांगा की प्रशासनाने आपल्याला गोषवारा दिला पाहिजे त्यांनी त्यांचे मत मांडले पाहिजे. त्यांनी त्यांचे धोरण सांगितले पाहिजे. त्यांनी सजेशन दिले पाहिजे. तस केल नाही म्हणून आयुक्त साहेब तुम्ही त्यांना नोटिस काढा.

**निलम ढवण :-**

ध्रुवजी आम्ही मगाशी तेच बोलत होतो. प्रशासनाने गोषवारा का दिला नाही. जे काही तुम्ही ठरवणार त्याला प्रशासन देणार का.

**मा. उपमहापौर :-**

कदाचित त्याच्यामध्ये कारण असे असेल की आपल्याकडे नगररचनाकार म्हणून ज्यांनी कार्यभार स्विकारला स्लिप डिस्कच्या कारणास्तव ते तिथे हजर होऊ शकले नाहीत. कदाचित ते ही कारण असु शकते सन्मा. ध्रुवकिशोर साहेबांनी सुचना केली हा विषय सभागृहासमोर आला. याच्यात आपल्या काही सुचना असतील. आपण प्रशासनाकडे देणार आहोत आणि त्यांच्याकडून त्याच्यावरती योग्य ती कारवाई करायला लावणार आहात. परंतु आपल्या काही सुचना असतील तर सुचना सादर कराव्यात.

**निलम ढवण :-**

उपमहापौर साहेब आपण जे आता उत्तर दिले की त्या विभागाच्या प्रमुखांचे काही आरोग्य विषयक तक्रारी असतील जर त्यांनी त्यासाठी तर गोषवारा दिला नसेल तर मग हा विषय पुढच्या महासभेत घ्या. गोषवारा सहीत येऊ द्या.

**मा. उपमहापौर :-**

नाही आजच्या सभेत तो आला आहे म्हणजे तो विषय एकदा आपण आणून मुळ मुद्दयांवर तो सोडवू. आता अधिकाऱ्याचे काम आहे ते त्यांना करावे लागणार. जर हा पुन्हा आणला तर काही मजा नाही. दुसरे काही होणार नाही.

**निलम ढवण :-**

नाही गोषवारा तर पाहिजे साहेब. बरीच नविन सदस्य आहेत सगळ्यांना विषय तर कळला पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही आमच्याकडून हा ठराव मांडला. सभागृहामध्ये पहिल्यांदा ज्या विषयाला विरोधी पक्ष म्हणून आपण सर्वमान्य मुद्दा केला आहे हा ठराव सभागृहाला कारण मिळत नाही ठराव झालेला आहे.

**निलम ढवण :-**

विषय चांगला आहे. पण गोषवारा द्यायला पाहिजे होता तुम्ही म्हणत आहात त्या विभाग प्रमुखांची तब्येत ठिक नाही आहे. पुढच्या वेळी गोषवारा सहीत येऊ देत. मग सगळे नगरसेवकांना कळेल ना काय माहिती आहे ती.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

विषय चांगला आहे. ठराव सुध्दा चांगला मांडलेला आहे. त्याच्यामध्ये समावेश आरक्षणाखाली किती जागा विकासकांनी आपल्याला दिलेल्या नाहीत त्याची नगररचना विभागाकडून माहिती घ्या आणि ज्यांनी दिलेल्या नाहीत त्यांच्यावरती दंडात्मक कारवाई करण्याचा विषय आहे. मला वाटत काही महिन्यापूर्वी महापालिकेच्या मुख्यद्वारासमोर एक उपोषण करता बसला ह्या शहरातील एक सामाजिक कार्यकर्ते समावेशक आरक्षणाखाली २५ टक्के असलेली जागा महापालिकेला मिळाली नाही म्हणून त्यावेळी नगररचनाकार अधिकारी घेवारे साहेबांनी राईटिंगमध्ये पत्र दिलेले होते की ३ महिन्यामध्ये ती जागा आम्ही देऊ. अजूनही महापालिकेला ती जागा दिलेली नाही असे जे कोणी विकासक असतील त्यांच्यावर सुध्दा दंडात्मक कारवाई करा आपण ही सुचना त्या ठरावामध्ये घ्या. ध्रुवकिशोर साहेब तुम्ही चांगला विषय आणला आहे.

**मा. उपमहापौर :-**

हा ठराव सर्वांना लागु असेल तुमच्या सुचनेचा आम्ही स्विकार करतो.

**निलम ढवण :-**

साहेब मगाशी आर.जी. आणि ओपन स्पेसबद्दल तुम्ही बोललात की तो विषय नाही तो बिल्डरचा आहे. तर शासनाचा जो जी.आर. आहे यासंदर्भत हस्तांतर करा आणि विकसित करा म्हणून तर त्यासंदर्भात जी जी.आर. आणि ओपन स्पेस चा तुम्ही नंतर विषय घेणार आहेत किंवा त्यामध्ये इम्पलीमेन्टेशन काही करणार आहात का?

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ४१ :-**

**समावेशक आरक्षण तरतुदीखाली जागा उशीरा हस्तांतरण होत आहे त्याबाबत धोरण ठरविणे**

**ठराव क्र. ३८ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनूसार विकासक / जागा मालकाना समावेशक आरक्षणात (Accdomodation Reservation) बांधकाम परवानग्या देण्यात येतात, परंतु विकासक / जागा मालक त्यांच्या इमारतीची कामे पूर्ण करतात व महानगरपालिकेस समावे शक आरक्षणाच्या तरतूदीखाली बांधून दयावयाचे बांधकाम बांधून देत नाहीत . त्यामुळे महानगरपालिकेस असे बांधकाम क्षेत्र मिळण्यास विलंब लागतो.**

**समावेशक आरक्षणाचे विकासकाकडून बांधकाम करुन घेण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.**

1) **समावेशक आरक्षणाच्या तरतूदीखाली विकासकास परवानगी देण्यापूर्वी महानगरपालिकेस बांधून दयावयाच्या बांधकाम पूर्ण करुन देण्यासाठी मुदत ठरविण्यात यावी व तसे हमीपत्र घेण्यात यावे . मुदतीत बांधकाम करुन न दिल्यास रु .30 प्रति चौफुट प्रति महिना विलंब दंड वसूल करण्यात यावा. एखाद्या कामात वि शेष कारणामुळे विलंब झाल्यास मुदतवाढ देण्याचा अधिकार आयुक्त यांना राहील.**
2) **विकासकाने समावेशक आरक्षणाच्या तरतुदीखाली महानगरपालिकेस बांधुन द्यावयाची वास्तु व स्वत:साठी बांधावयाचे बांधकाम यांचे काम एकत्रितरित्या सुरु करावे.**
3) **महानगरपालिकेस बांधुन द्यावयाच्या कामास ठरवुन दिलेल्या मुदतीपेक्षा विलंब झाल्यास जोपर्यंत महानगरपालिकेचे काम पूर्ण करुन देत नाही तोपर्यंत विकासकाची परवानगी स्थगित करण्यात यावी.**

4) **समावेशक आरक्षणात बांधून घ्यावयाच्या बांधकामाचा नकाशा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनूसार संबधित विभागाचे मत घेऊन तयार करुन घ्यावा व नंतर मंजूर करावा . तसेच सदर वास्तुही स्वतंत्र असावी. विकासकाच्या बांधकामापेक्षा वेगळ्या क्षेत्रावर असावी.**
5) **विकासकास परवानगी देताना महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाच्या नागरी सुविधा क्षेत्र बांधुन द्यावयाची इमारत व सदरची जागा नोंदणीकृत करारनामा करुन घेण्यात यावी.**
6) **मिरा-भाईंदर महानगरपालिकेने आतापर्यंत समावेशक आरक्षणाच्या तरतुदीखाली परवानगी दिलेल्या व आजतागायत हस्तांतरीत न झालेल्या विकासकांना महानगरपालिकेस द्यावयाच्या बांधकाम क्षेत्रासाठी मुदत ठरवुन द्यावी. तातडीने नोंदणीकृत करारनामा करुन घेण्यात यावा . सदर कामांना विलंब झाल्यास वरील धोरणाप्रमाणे कारवाई करावी असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्रीम. प्रभात पाटील अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

तत्पुर्वी दोन छोट्याशा सुचना आहेत. एकतर ज्या सदस्यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम पुस्तक अद्याप घेतलेली नाहीत त्यांनी कृपया माझ्या दालनातून घ्यावे. दुसरी सुचना सर्व सदस्यांचे एस.सी.ओ. पदासाठी नाव गॅझेटमध्ये छापुन आलेले आहे आणि त्याची प्रमाणपत्र आणि ओळखपत्र ह्या दोन गोष्टी आणि शिक्का ह्या तीन गोष्टी आपल्याला मिळणार आहे. एस.सी.ओ. पदासाठी तर सर्व सदस्यांनी त्यांचे ३ पासपोर्ट साईज फोटो सचिव कार्यालयात लवकरात लवकर जमा करावे. प्रकरण क्र. ४२,

**नाटयगृहाची परवानगी रद्द करणेबाबत.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील दहिसर चेकनाक्याजवळील डी.बी. रियालीटी यांच्या गृहसंकुलनास महानगरपालिकेने सन २०१० मध्ये गृहसंकुलनास परवानगी दिलेली होती. सदर मंजुरीप्रमाणे विकासकाने सुमारे १०००० चौ.मी. भुखंड नागरी सुविधा म्हणून महानगरपालिकेस हस्तांतर करणे आवश्यक होते.

त्यानंतर विकासकाने सुधारीत परवानगी मिळणेकरीता प्रस्ताव सादर केला होता त्यानुसार त्यांना महानगरपालिकेने ४४५४.७५ चौ.मी. क्षेत्र हस्तांतर करुन त्यावर स्वखर्चाने उर्वरीत ५,००० चौ.मी. क्षेत्राच्या ऐवजी १८ महिन्यात नाट्यगृह बांधण्याच्या अटीवर परवानगी दिली होती.

सदर क्षेत्रामध्ये नाट्यगृहाचे बांधकाम करणेबाबत महासभेने मान्यता दिल्याप्रमाणे शालेय शिक्षण मंत्री मा.श्री. विनोदजी तावडे व शिवसेना प्रमुख मा.श्री. उध्दवजी ठाकरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत नाट्यगृहाचे भुमीपूजन सोहळा दि.३०/०८/२०१५ मध्ये पार पाडलेला आहे. तेव्हापासुन १८ महिन्याच्या आत विकासकाने नाट्यगृह बांधण्याच्या अटीवर परवानगी दिली होती परंतु अद्यापपर्यंत विकासकाने नाट्यगृह बांधण्याचे बांधकाम सुरु केले नाही व त्याबाबत महापालिकेने वेळोवेळी लेखी नोटीसा देवूनही बांधकाम सुरु केलेले नाही. तसेच सदर गृहसंकुलनाचे बांधकाम आजमितीस बंद असून त्याबाबत पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे. तरीदेखील विकासकाने काम सुरु केलेले नाही. त्यानंतर आयुक्त यांनी दि.१४/०६/२०१७ रोजी विकासकास सुधारीत परवानगी दिलेली आहे सुधारीत परवानगीमधील अटीनुसार सदर काम १२ महिने मुदतीत पूर्ण करावयाचे होते. परंतु त्यापैकी ६ महिने होवून देखील सदर ठिकाणी खड्डा मारण्याशिवाय कोणतेही काम केलेले नाही. यावरुन भविष्यात सदरच्या नाट्यगृहाचे बांधकाम सुरु करण्याची विकासकाची इच्छा दिसून येत नाही. सदर विकासकाने सदर जागा ही मे. मन इन्फ्रास्ट्रक्चर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना विकण्याचे निदर्शनास आले असून भविष्यात याबाबत कायदेशीर बाब निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर काम विकासकामार्फत पुर्ण होईल किंवा नाही याबाबत साशंकता आहे.

त्यामुळे

१) नाट्यगृह, वाचनालय, प्रसुतीगृह व दुकान केंद्र बांधण्यासाठी अंदाजे रु.३५ कोटी खर्च येणार असून तेवढ्या व अधिक १०% वाढीव रक्कमेची बँक गॅरेंटी घेण्यात यावी.

२) सदर बांधकाम विकासकाकडून सुधारीत परवानगीत नमुद मुदतीनुसार पूर्ण करुन घेण्यात यावे. सदर मुदतीत विकासकामार्फत काम न केल्यास त्याची बॅंक गॅरेंटी महानगरपालिका फंडात जमा करावी व महापालिकेने नाट्यगृहाचे बांधकाम पूर्ण करावे.

३) जर विकासकाने बॅंक गॅरेंटी देण्यास नकार दिल्यास विकासकास दिलेली बांधकाम परवानगी तात्काळ रद्द करावी व मुळ मंजुरीनूसार असलेली जागा ताब्यात घेवून त्या जागेवर महानगरपालिकेमार्फत नाट्यगृह बांधण्यात यावे.

४) सदर जागेवर महानगरपलिकेच्या निधीतून नाट्यगृह, वाचनालय, प्रसुतीगृह व दुकान केंद्र विकसीत करण्यासाठी येणाऱ्या खर्चास ही महासभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम, आता नाट्यगृहाचा ठराव मांडलेला आहे. विषय एवढा थोडक्यात दिला तुम्ही की नाट्यगृहाची परवानगी रद्द करणेबाबत. आता आपण जो ठराव मांडला त्याच्यात तुम्ही परवानगी रद्द करायचा कुठेही उल्लेख केलेला नाही. म्हणजे नेमकी तुमची काय भुमिका आहे? विषय वेगळा आहे आणि ठराव वेगळा आहे. तुमची काय भुमिका आहे ते स्पष्ट करा. तुम्हाला नाट्यगृह बांधायचे आहे की नाही बांधायचे आहे?

**मा. उपमहापौर :-**

ह्या प्रकरणात असा ठराव आपण बारकाईने ऐकत होतात मी हे पाहत होतो. दोन वर्षापूर्वी एवढ्या थाटामाटात ह्या विषयाचे भुमीपुजन झाले ह्या शहराला नाट्यगृहाची अत्यंत आवश्यकता आहे. हे तुम्ही आम्ही सगळे मानतो. ज्या विकासकाने त्या परवानगीला त्या नाट्यगृहाला बांधकामाला अनुसरुन ते १० हजार स्क्वेअर मीटर बांधकाम आपल्याला बांधून देतो असे सांगितलेले आणि त्याला अनुसरुन आपण त्याला परवानगी पण दिली आणि मागच्या सहा महिन्यापूर्वी आयुक्तांकडून त्यांनी त्या परवानगीची दुसरी दुरुस्तीची परवानगी घेतली. निवडणूका झाल्यानंतर महापौर मॅडम आयुक्त महोदय आम्ही प्रत्यक्ष पाहणी करायला त्या जागेवर गेलो. फक्त भुमीपुजनाची जी पाटी आहे त्याव्यतिरिक्त कुठल्याही प्रकारची हालचाल झालेली नाही आणि दरम्यानच्या काळात ह्या विकासकाने त्याचे डेव्हलपमेन्ट राईट डेव्हलपमेन्टचे इन्फ्रास्ट्रक्चर ज्याला विकले आहे किंवा त्याला सरेंडर केलेले आहेत. मुळात आपण जी परवानगी त्याला दिली आपल्याला त्याने सांगितले की आम्ही तुम्हाला नाट्यगृह बांधून देतो. आपला ठराव तुम्ही बारकाईने ऐकला असेल तर त्यात स्पष्ट उल्लेख असा आहे की त्याच जागेवरती आपण नाट्यगृह बांधत आहोत.

**प्रविण पाटील :-**

ह्या पध्दतीचा विषय म्हणजे जे अक्षर तुम्ही एका वाक्यातच विषय आणलेला आहे की नाट्यगृहाची परवानगी रद्द करणेबाबत. त्याच्यात विषय तुम्ही मुळात तुमचा गोषवारा पण नाही. प्रशासनाची भुमिका काय होती ती पण तुम्ही मांडली नाही परंतु विषय असा आणला आहे. ह्या शहरामध्ये वातावरण खराब करुन टाकले आहे. आता ठराव तुमचा एकदम युटन झालेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

ह्या गोष्टी आमच्या निदर्शनास आल्या त्यावेळेला दोन्ही गटनेते आणि आपण चर्चा केली त्यावेळेला आमची भुमिका आम्ही स्पष्ट केली की ह्या विषयात नाट्यगृहाची परवानगी रद्द करत नाही तर नाट्यगृहासाठी त्याला दिलेली परवानगी रद्द करायची.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब नाट्यगृहाचा जो विषय होता नाट्यगृहाची परवानगी रद्द करणेबाबत विषयपत्रिकेवर दिलेला आहे. एकतर प्रशासनाचा गोषवारा नाही त्यात तुम्ही काय म्हटले बॅंक गॅरंटी त्यांच्याकडून घेणार पण बॅंक गॅरंटी आजपर्यंत एवढे विकासक आहेत आजपर्यंत कोणाकडून तुम्ही बॅंक गॅरेंटी घेतली नाही.

**मा. उपमहापौर :-**

त्याचा उल्लेख करण्याचे प्रमुख कारण असे आहे की त्याला आपण परवानगी दिली पण त्याने त्याचे ते राईट्स दुसऱ्याला विकले उद्या जो नविन विकासक आला आहे त्याने सांगितले हे त्याला बांधील होते मला नाही तो काय सांगणार तो त्याला राईट्स विकतो तो बांधील होतो. त्याच्याकडून तुम्ही घ्या. मग आपण काय करणार म्हणून आपण बॅंक गॅरंटी सांगितलेली आहे.

**प्रविण पाटील :-**

ह्या सगळ्या बाबी तुम्ही गोषवा-यामध्ये आणून द्यायच्या होत्या सर. एकतर तुम्ही गोषवारा दिला नाही. सभागृहाच्या आणि सर्व नगरसेवकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परवानगी रद्द करु शहरामध्ये वातावरण खराब झाले.

**मा. उपमहापौर :-**

मला व्यक्तीशः वाटले की ते नाट्यगृहाबद्दल पूर्णविचार करणे अशा प्रकारचा विषय आला असता.

**प्रविण पाटील :-**

तसा आला असता तरी चालले असते.

**मा. उपमहापौर :-**

पण तस होणेऐवजी ते रद्द आम्हाला अभिप्रेत असलेला विषय तसा नाही आणि आपल्या शहरात पण आपण स्पष्ट स्वयंस्पष्ट उल्लेख केलेला आहे. त्याची जागा बदलत नाही. तो विकासक असमर्थक असेल तर तो खर्च महापालिका करायला तयार आहे. नाट्यगृह ह्या शहराची गरज आहे. तुमच्या आमच्या सगळ्यांची गरज आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा विषय शब्दखेळ झालेला आहे त्याच्यामुळे...............

**प्रविण पाटील :-**

काका शब्दखेळ करायची गरज नव्हती.

**रोहिदास पाटील :-**

शहराला आवश्यक असलेला विषय.............

**प्रविण पाटील :-**

शब्दखेळ करायची गरज कोणी केली? विषय कोणी आणला. प्रशासनाने आणला की महापौरांनी आणलेला आहे. शब्दखेळ म्हणजे काय त्याचा अर्थ कुठे गेला काका.

**रोहिदास पाटील :-**

काही जरी असल तरी आपले एकमत असावे की ह्या शहराला आवश्यक असेलेले नाट्यगृह.

**प्रविण पाटील :-**

मा. मुख्यमंत्री यांनी याच्यामध्ये हस्तक्षेप घेतला नंतर हा तुमचा ठराव आला काका याच्यामध्ये. तुमची भुमिका रद्द करण्याची होती.

**मा. महापौर :-**

तुम्ही काहीपण बोलू नका.

**मा. उपमहापौर :-**

असा कुठलाही हेतू नव्हता.

**प्रविण पाटील :-**

विषय तोच आहे. विषय दिलेला आहे तोच बोलत आहे. त्याच्या व्यतिरिक्त एकही शब्द नाही बोलतं. तुम्हाला महापौरांनी सांगितले ते गोषवा-यात प्रशासनामार्फत आल असत तर आम्ही मान्य केल असते. पण तुम्ही गोषवारा पण दिलेला नाही.

**मा. उपमहापौर :-**

आपण त्या दिवशी त्या सभेला नव्हता. गटनेत्यांची मिटींग महापौर दालनात झाली.

**प्रविण पाटील :-**

सभा नंतर घेतली.

**मा. उपमहापौर :-**

त्यावेळेला आम्ही खुलासा केला.

**प्रविण पाटील :-**

विषय दिल्यानंतर घेतली सभा मग त्याच्या अगोदर विषय दिला त्यावेळी गोषवारा द्यायचा होता.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो खरतर आपण हा विषय आणला खुप चांगला विषय आणलेला आहे. अडीच वर्ष नारळ फोडून झाले कोणी त्या नाट्यगृहाचा पाठपुरावा नाही केला ना कोणी त्या विषयावरती ज अन्वये प्रस्ताव आणला. ना कधी सभागृहात चर्चा झाली. त्यामुळे आपण आता हा विषय आणलेला आहे आणि काही ह्या मिरा भाईंदरमध्ये वातावरण वेगळी निर्मिती करायची आणि ह्या सभागृहामध्ये पण त्याच भावना आपल्याकडून व्यक्त व्हाव्यात अशा प्रकारची भुमिका..........

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

वातावरण तुम्हीच खराब केले.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, हे दिशाभुल करायची जर भाषा वापरत असतील आमची दिशाभुल झालेली नाही. आम्हाला माहिती आहे विषय काय आहे. आमची दिशाभुल झालेली नाही तुम्ही दिशाभूल करता हा शब्द वापरू नका. आमच्या सदस्यांची कोणाची दिशाभूल झालेली नाही. तुमचे म्हणणे असे होते की वातावरण खराब करायचे नाट्यगृहाची परवानगी रद्द करायची असे तुमचे म्हणणे आहे का?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

कमिशनर साहेब गेल्या महिन्याला १७ तारखेला साईट व्हिजीट करुन तिथे काम चालु आहे.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही जेव्हा हा विषय घेतला आणि हा विषय घेतल्यानंतर ज्यावेळेला त्यांचा सर्व परवानग्या ह्या आता रद्द होतात की काय कारण त्याला अनुसरुन दिलेल्या परवानग्या होत्या आणि म्हणून त्याने काहीतरी कराव म्हणून तो खड्डा खोदला. पण उद्या समजा अस धरुन चाललो आपण अजून वाट बघितली तो खड्डाच खोदून राहणार आहे. आणि त्याने उद्या नाही केल ज्याला तुम्ही परवानगी दिली होती तो तर मला विकून गेलेला आहे. मला हे नाही दिल हे काम विकसित करायला दिल नाही मला त्याने त्याचा इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करायला दिलेला आहे. मग आपण काय करणार मुळात हा विषय समजून घ्या की याच्यामध्ये आम्ही त्यातली एकही जागा एकही जागेत बदल केला नाही. त्याच्या भुमिपुजनाची पाटी बदलविण्याचे प्रयोजन नाही. त्याच्यामध्ये कुठल्याही प्रकारचा आपण जी व्याप्ती ठरविलेली आहे ती व्याप्ती कुठे बदल करणार नाहीत. परंतु ही वास्तु लगेच शहराला उपलब्ध झाली पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

हा विषय दुसऱ्या वाक्यामध्ये लिहू शकला असता दुसऱ्या शब्दामध्ये लिहू शकला असता.

**मा. उपमहापौर :-**

विषय काय आहे त्यापेक्षा तुम्हाला त्या ठरावात चुकीचे काय वाटते ते सांगा. तुम्हाला असे वाटत असेल की ह्या शब्दावर मी बोट ठेवतो ह्या ठरावाच्या वाक्याबद्दल हे आक्षेपार्ह आहे असे तुम्ही सांगा.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आपण विषय चांगला आणला आहे. आपण त्या विषयाची पूर्तता करतो. ह्या मिरा भाईंदरमध्ये नाट्यगृह व्हाव ही सर्व शहरवासियांची इच्छा आहे. आणि म्हणून हा मांडलेला ठराव सर्वानुमते पारित व्हावा.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम हा विषय घेण्यापूर्वी आपणास निदर्शनास आणून देऊ इच्छिते की हा विषय येण्यापूर्वी हे म्हणत आहेत पाठपुरावा केला नाही किंवा विषय घेतला नाही तत्पुर्वी आयुक्त साहेब म्हसाळ साहेब असतील बाकीचे अधिकारी आणि सगळे आदरणीय प्रतापजी सरनाईक साहेब हे सगळे मिळून त्या स्पॉटवर जाऊन त्या बिल्डर आणि सगळ्या लोकांशी तिथे बोलणे करुन झाल्यानंतर त्यांनी डिसेंबरपर्यंतची मुदत दिलेली आहे की डिसेंबरमध्ये मी पूर्ण करुन देतो म्हणून ह्या सगळ्या घटना घडल्यानंतर कामाला वेगाने तिथे सुरुवात झालेली आहे. त्यानंतर हा आता विषय आला आहे. मग ही मिटींग झाली असताना आयुक्त आणि सगळे अधिकारी असताना देखील तेव्हा ठरलेले असताना आता त्यानंतर हा विषय घ्यायचे काय कारण आहे. नाट्यगृहाच्या फंडासाठी त्याने डिसेंबरपर्यंत मुदत दिलेली आहे. त्यानुसार त्यांची चर्चा झाली कामाला सुरुवात झाली आहे.

**मा. महापौर :-**

मुदत तो उन्होंने पहिले ही दि हुई थी। इसकी ये हम ऐसेही बोल रहे थे की बँक गॅरंटी दे और काम शुरु करे।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम तुम्ही त्यांची भुमिका ऐकून घ्या आणि त्यानंतर आपण डिसीजन घेऊ. तुम्ही यांची भुमिका फक्त ऐकून घ्या. प्रत्येकाने आपआपली भुमिका मांडा ना.

**प्रविण पाटील :-**

आमची भुमिका स्पष्ट आहे नाट्यगृह व्हाव.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

नाट्यगृह झालेच पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

विषय काय आहे ह्यापेक्षा तो ठराव काय केला आहे हे महत्वाचे आहे. तुम्हाला ह्या विषयात काय चर्चा करायची आहे तुमची नविन सुचना सांगा.

**प्रविण पाटील :-**

सुचना जेव्हा तुम्ही विषय आणला तेव्हा होत्या. ठराव झाल्यानंतर थोडी सुचना करणार तुम्ही. ठराव एकदम चांगला आहे त्याच्याबद्दल वाद नाही.

**निलम ढवण :-**

याला प्रशासनाचा गोषवारा नाही प्रशासन म्हणून उपायुक्तांनी आपली बाजू मांडावी.

**मा. उपमहापौर :-**

पहिल्यांदा हा असा ठराव होत आहे. सर्वानुमते मंजूर होत आहे असे मी मानतो.

**प्रविण पाटील :-**

ठराव सर्वानुमते होणार परंतु हा विषय तुम्ही फिरवला.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ठराव बहुमतांनी करु पण आम्ही ही ठराव करणार.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम माझी एक विनंती आहे याचा गोषवारा नाही ठिक आहे नाट्यगृह व्हावे सगळ्यांचे मत आहे. पण याचा गोषवारा दिलेला नाही. त्यामुळे प्रशासनाची भुमिका काय राहील. उपायुक्तांनी आम्हाला सांगावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे असे मत आहे की प्रत्येकाने आमगावकर साहेबांनी आपली भुमिका मांडावी. प्रविण पाटील यांनी आपली भुमिका मांडावी, निलम ताईंनी भुमिका मांडावी. सर्वांनी आपआपली भुमिका मांडून त्याच्यानंतर आपण याचा खुलासा करुया.

**प्रविण पाटील :-**

सन्मा. सभापती महोदय कोणाची भुमिका मांडण्यापेक्षा प्रशासनाची भुमिका सांगा ती आम्हाला मान्य आहे.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहामध्ये प्रशासन नाही सभागृह ठरवते. सभागृह सांगणार आहे मग ते भुमिका ठरवतील.

**निलम ढवण :-**

प्रशासन कशाला आहे प्रतिनिधी म्हणून बसले आहेत ना.

**मा. उपमहापौर :-**

अतिशय जुन्या काळात प्रशासनाकडून त्याचे कामकाज झालेले नाही ती वास्तु आपल्याला अपेक्षित होती ती पूर्ण झाली नाही म्हणून तर हा विषय सभागृहाला समजला आणि ज्या दिवशी सभागृहासमोर महापौर मॅडमच्या माध्यमातून हा विषय सभागृहासमोर आला आहे. प्रशासन त्याची काय भुमिका सांगणार आहे.

**निलम ढवण :-**

प्रशासनाला कशासाठी प्रतिनिधी बसवलेले आहेत?

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही सांगाल ती प्रत्येक गोष्ट सत्य नसेल मॅडम.

**निलम ढवण :-**

तुम्ही पण सांगाल ती थोडी सक्सेस होणार आहे. प्रशासनाने आपला निर्णय द्यावा. महापौर तुम्ही सांगा प्रशासनाला जे बसविलेले आहेत त्यांनी पण आपली भुमिका मांडावी.

**मा. महापौर :-**

उनको पहले भी संधी दि थी बना ने के लिए अभी भी उन्होंने खाली खड्डा खोद के रखा है ढाई साल में अगर वह पुरा कामकाज अपने कार्यकाल में करके दे रहे है आयुक्त को जो टाईम दे वह टाईम के हिसाब से अपना कामकाज कर रहे है। तो बँक वॉरंटी दे दे और वह बँक वॉरंटी के आधार पे वह कामकाज अपना करके दे। हमको कोई तकलीफ नही।

**प्रविण पाटील :-**

आजपर्यंत कुठल्या ठेकेदारानी बँक गॅरंटी दिली मला सांगा आणि उद्या त्याने बँक गॅरंटी दिली नाही तर ते काम रखडेल ना.

**निलम ढवण :-**

प्रशासनाची भुमिका मांडा.

**सुरेश खंडेलवल :-**

महापौर मॅडम, ह्या विषयावर दोन मिनिट माझे मित्र विषय असा आहे की याच्या अगोदर पण आपण आता थोड्या वेळा पूर्वी जो ठराव केला ओपन ॲमिनिटी स्पेसचा तुम्ही सांगितले की प्रशासनाने गोषवारा दिला नाही आम्ही ठराव केला शहराच्या हितामध्ये आम्हाला सर्वांना वाटल आम्ही ठराव केला. प्रशासनाला वाटेल की हा कायद्याच्या अनुषंगाने किंवा आम्ही शहराच्या हितामध्ये ते आम्ही इम्पलीमेंट करु शकतो. ते करतील आता विषय असा आहे तुमच्यात आता भांडण कशी चाललेली आहेत. ठराव त्याचा जो हेड आहे त्याच्यावर तुम्ही भांडत आहेत. आता भांडणामध्ये विषय असा आहे की परवानगी रद्द करणे त्यांनी जर काम नाही केले त्यांना आम्ही परवानगी ऑलरेडी त्यांनी काय केल पाच हजार फुट जे आपण त्याला दिले होते ते त्यांनी ऑलरेडी बांधून विकून टाकले. पालिकेचे कसे आहे की आपल्याला जी वास्तु द्यायची आहे अगोदर आम्ही एक ठराव केला होता तुम्हाला माहिती असेल त्याच्यामध्ये दंड वगैरे ३० टक्के वगैरे ते सगळ टाकलेले आहे. तर ते ह्याच्या अनुषंगाने टाकलेले आहे की बिल्डर काय करतात की ॲमिनिटी ओपन स्पेसची जागा ती स्वतःची परवानगी ३-३ वेळा त्यांनी रिव्हाईज करुन घेतली आहे. त्याची बिल्डींगचे काम केले आहे. फ्लॅट विकुन टाकले आहेत. फक्त पालिकेला जी वास्तु द्यायची होती...........

**प्रविण पाटील :-**

स्पष्ट गोषवारा सांगु शकला असतात ना मग गोषवारा कशाला दिला नाही. एका वाक्याचा विषय दिला आणि विषय संपून टाकला.

**सुरेश खंडेलवाल :-**

गोषवारा प्रशासन देतो.

**निलम ढवण :-**

प्रशासनाने भुमिका मांडावी ना. तुम्ही मगाशी उल्लेख केलेला आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

आम्ही सभागृह डिसीजन घेणार प्रशासनाला वाटेल की हे कायद्याप्रमाणे या अनुषंगाने आम्ही याची अंमलबजावणी करु शकतो. तर ते करतील.

**निलम ढवण :-**

आम्हाला ते उत्तर देतील आम्हाला प्रशासनाचे उत्तर पाहिजे.

**सुरेश खंडेलवाल :-**

मॅडम ऐका त्या डि.बी. रियालटीज बिल्डरचा आपण एवढ पाठीशी घालयाचे आपला विषय जो आहे आम्ही ठरावामध्ये काय केले आहे की त्याचे अडीच वर्ष झाले फक्त...............

**निलम ढवण :-**

तुमचा आम्ही ठराव वाचला आम्हाला प्रशासनाने उत्तर देऊ दे ना.

**सुरेश खंडेलवाल :-**

मला असे वाटत अहे डि.बी. रियालटीज बिल्डर तुम्ही तीन-तीन वेळा त्यांना रिव्हाईज करुन घेतल तुम्ही सांगत आहेत आम्ही पाठपुरावा केला पण आम्हाला असे वाटते की डि.बी. रियालटी बिल्डरला आम्ही पाठपुरावा का घातला. कारण प्रशासन जे आहे आम्ही स्पष्ट बोलतो की त्या डी.बी.रियालटी बिल्डरला तुम्ही परवानगी दिली आहे ते पण रद्द करा. पहिला त्याला नाट्यगृह बांधु द्या मग त्याला तुम्ही असा का सपोर्ट करत नाही.

**निलम ढवण :-**

आम्ही चांगल्या गोष्टीला करतो. पण तुम्ही सगळ्या परवानग्या रद्द करायला चालले. प्रशासनाला उत्तर देऊ द्या. प्रशासन जे उत्तर देतील ते आम्ही ऐकायला तयार आहोत.

**मा. उपआयुक्त :-**

नाट्यगृहाच्या कामाची सुरुवात झालेली आहे. खड्डा खोदून काम सुरु आहे. त्यांनी विकासकाने आयुक्तांबरोबर झालेल्या चर्चेमध्ये काम मुदतीमध्ये पुर्ण करु असे सांगितलेले आहे. त्यामुळे नाट्यगृहाचे ऑलरेडी काम याच्यामध्ये सुरु आहे आणि मुदतीमध्ये काम करुन घेण्याचे प्रशासन याच्यामध्ये पाठपुरावा करणार आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

त्या साईट व्हिजीट करताना त्यावेळेला कोण कोण होते?

**मा. उपायुक्त :-**

सन्मा. आमदार साहेब तिथे होते.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

कोणते आमदार?

**मा. उपायुक्त :-**

सरनाईक साहेब होते.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आणि दुसरे?

**मा. उपायुक्त :-**

आयुक्त साहेब होते.

**प्रविण पाटील :-**

हे काम चालु असताना तुम्ही हा विषय याच्या अगोदर काम त्याचे चालु आहे तुम्ही कधीची गोष्ट सांगत आहेत?

**निलम ढवण :-**

गोषवारा निघण्यापूर्वीची.

**प्रविण पाटील :-**

त्याच्यानंतर हा विषय जाणून बुजून आणण्याचा महापौरांचा उद्देश काय होता?

**सुरेश खंडेलवाल :-**

आमचा विषय एवढाच आहे की वेळेवर त्याचे काम पूर्ण झाले पाहिजे. म्हणून त्या बिल्डरला आपण कुठल्या अटीशर्तीमध्ये नाही बांधले तर तो बिल्डर परत तुम्हाला मिसगाईड करणार आहे. आता ते साईटवर बघुन आले डोबरा शिवाय दुसरे काहीच नाही एक वर्षानंतर परत तुम्ही जाणार परत तुम्हाला दोन कॉलम दिसणार माझे म्हणणे एवढच आहे की जर आपण त्याला अटीशर्ती खाली आणतो तर तुम्हाला सभागृहाला काही मला वाटते याच्यामध्ये चुकीचे नाही फक्त अटीशर्ती टाका.

**निलम ढवण :-**

हे नियम सर्व बिल्डरांना लावा.

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम नक्की यांना काय म्हणायचे आहे ते कळत नाही आणि त्यामुळे आयुक्त महोदय महापौर मॅडम माझी विनंती राहील की आपण ठराव नाट्यगृहाच्या बाजूने मांडलेला आहे. फक्त अडीच वर्ष उशीर झाला म्हणून त्याच्यावर अटीशर्ती आपण त्याला लादण्यात आले आहे आणि नाट्यगृहाचे काम सुरु झालेले आहे आणि ते जोरात सुरु होईल मला अस वाटते की आपण मांडलेला ठराव योग्य आहे जर विरोधकांना त्याचे मत पटत नसेल तर त्यांनी आपला ठराव मांडावा.

**जुबेर इनामदार :-**

महापौरांनी विषय घेतला विषय चुकीच्या पध्दतीने आला त्याच्यामुळे शहरामध्ये वातावरण चिघळले. न्यायव्यवस्था सुध्दा बिघडली असती. अशाप्रकारे हा विषय तुम्ही सभागृहासमोर आणला. त्याच्यामध्ये कोणाची चुक झाली असेल त्यांनी मोठे मन करुन ते कबुल करा की आमची चुक झाली. विषय देताना तो विषय नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

काका त्यांना त्यांचे मत मांडू द्या. त्यांना ठराव मांडायचा असेल तर ठराव पण मांडू द्या.

**जुबेर इनामदार :-**

नागरिक सुविधा क्षेत्रामधून बांधून मिळणारी कुठलीही वास्तु एक विकासक आपली जागा त्यातुन त्याचा २ हेक्टर २ हजार चौ.मीटर जास्त जागा असेल त्याचा ५ टक्के इंडस्ट्रीयल बेल्डमध्य तो नागरिक रहिवास केला असेल २०,२५ टक्के अशाप्रकारे वेगवेगळ्या प्रकारे आपल्याला प्राप्त झालेली जागा ॲमिनिटी ओपन स्पेस नागरी सुविधा क्षेत्र त्यातुन कुठल्याही विकासकाने स्वतःची इच्छा दाखवली की मी तुम्हाला बांधून देतो. आपण त्याला डी.आर.सी. देणार, टी.डी.आर. देणार अशा प्रकारे हा पूर्ण योजना आखली गेली आहे. त्या विकासकाने त्याचे काम सुरु केले हे काम करण्यासाठी त्याला लागणाऱ्या परवानग्या प्राप्त

झाल्या नाही. शेवटची परवानगी त्याला आता मध्ये रॉयल्टी ही महत्वाची होती. कलेक्टरकडून प्राप्त होणारी जिल्हाधिका-यांकडून ती १८/११/२०१७ रोजी त्याला प्राप्त झालेली आहे. जेणेकरुन त्याने काम सुरु केले नव्हते. त्याला ती आता परवानगी प्राप्त झालेली आहे. त्यांनी कामाची सुरुवात केली एस्कलेशन लॅन्ड, एस्कलेशन त्याने चालु केले त्याने खड्डा मारायला घेतला. त्याला ते काम माती कुठेतरी टाकायची त्याच्याकडे जिल्हाधिका-यांची त्याला परवानगी गरजेची होती. ही काय विषयाची सुरुवात झाली. विषय चुकीचा आला ठराव युटन घेतला म्हणजे प्रविण पाटील साहेबांनी मांडले. मुख्यमंत्रीपर्यंत लोक गेली ते चांगल झाल. कमीत कमी नाट्यगृह जागेवर आहे. पण त्याच्यामध्ये तुमचा केलेला ठराव त्या ठरावामध्ये ती अट टाकलेली आहे बँक गॅरंटी विकासक आपल्याला बांधून देणार त्याला टी.डी.आर प्राप्त होईल त्याचे बँक गॅरंटी का द्यावी. अशी बँक गॅरंटी घेण्याची नियमावलीमध्ये तरतूद आहे का? नियमावलीमध्ये तरतुद नसली तर शासनाकडे आपल्याला नियमावली सुधारण्यासाठी जाव लागेल. अशाप्रकारे आपण थातुरमातूर ठराव करु शकत नाही. कामकाज प्रशासनाने कायद्याच्या चौकटीत चालतो. तुमच्याकडे त्याची तशी तुम्हाला मान्यता मिळेल का करायला? नियमावलीमध्ये तशी तरतूद आहे का? टाऊन प्लानिंगवाले बोलवा त्याला तो तुम्हाला इथे सांगेल.

**मा. उपायुक्त :-**

टाऊन प्लानिंगचे बोलवा.

**जुबेर इनामदार :-**

विषयपत्रिकेवर विषय आल्यानंतर त्याच्यावर चर्चा होणार त्याच्यासाठी त्याने उत्तर द्यावे. अशी उद्या त्याने बँक गॅरंटी दिली नाही तो बोलला की मी नाही देत त्याचा अर्थ तोच झाला की तुम्हाला कुठेतरी असा पायंडा टाकायचा मध्ये ते प्राप्त करुन नाही झाला पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

जुबेर इनामदार साहेब आपण पोटतीडकीने बोलत आहेत. आता याच्यामध्ये कोणाची भुमिका स्पष्ट दिसते की ते नाट्यगृह व्हावे. पण त्याच्यात आम्हाला नव्याने काय सांगता यावे हा प्रयत्न आपण चालवलेला आहे. तुम्हाला स्पष्ट सांगतो की अडीच वर्षाचा मोठा कालावधी लोटला तोपर्यंत त्याने कुठच्या परवानग्याचा प्रयत्न केलेला नाही. महापौर उपमहापौर पद, सभागृनेता पद ह्या पदांचा निवडी झाल्या आणि ह्या शहरातले थांबलेले प्रोजेक्ट्स काय काय आहेत ते पाहण्याचे दौरे आम्ही सुरु केले. तुम्ही सोबत होतात. तेव्हा आम्ही त्या स्पॉटवर गेलो. त्याला गेट उघडायला पण आम्हाला सांगावे लागले आणि हे सगळ झाल्यानंतर हा विषय आम्ही सगळे असेच विषय तुम्हाला दिसतील की शहराच्या हिताशी निगडीत आहेत परंतु त्याची दखल आजपर्यंत घेतली गेली नाही आणि त्याला आपण १० हजार स्क्वेअर फुटाचे तेवढीच परवानगी दिली नाही. त्या नाट्यगृहासाठीच आपण परवानगी दिली नाही किंवा तेवढा त्याचा प्रोजेक्ट नव्हता. त्याचा प्रोजेक्ट फार मोठा आहे. आणि आपण ज्याच्यासाठी बाजु घेतोय किंवा भांडतोय त्याला काही कारण नसणार तुम्ही त्याला पाठिंबा देत नाही. पण आमच्याशी भांडण्यासाठी काही तरी कारण पाहिजे. म्हणून तुम्ही त्या बिल्डरची बाजू घेत आहात.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

ह्या नाट्यगहाची जागा त्यांच्या भुमिपुजनाची पाटी एक इंच देखील इकडे तिकडे करायचा आमचे नियोजन नाही प्रयोजन नाही. ते जस आहे तस आतापर्यंत काम होत नव्हते आमच्याकडून हे पाऊल उचलले गेले अशाप्रकारची कारवाई होईल अस त्याच्या निदर्शनास आलं त्यानंतर त्याने तो खड्डा मारण्याचे काम केले. आम्ही जे काही करतो ते त्यात आमच्यात कुठल्याही नगरसेवकाचा अधिका-यांचा किंवा तुमचा कोणाचे नुकसान किंवा फायदा नाही. पण जी वास्तु उभारण्याची जबाबदारी त्याने घेतलेली आहे. त्या जबाबदारीला तो बेजबाबदारीने वागला आहे. आणि त्याला त्याची कर्तव्याची जाणीव करुन द्यायची आहे. बँक गॅरंटी ठेवण्याचा ठराव आम्ही मांडला आहे. तुम्हाला पाहिजे असेल तर तुम्ही ठराव मांडा की त्याची बँक गॅरंटी घेता येणार नाही आणि आयुक्तांनी प्रशासनाने जर तस ठरवल की त्याच्यामध्ये आम्हाला तो ठराव विखंडीत करायला पाठवतील पण आमचा ठराव आम्ही केलेला आहे. त्या ठरावाशी आम्ही बांधील आहोत तुम्हाला दुसरा ठराव ठेवायचा असेल तर ठेवा.

**जुबेर इनामदार :-**

३०/०८/२०१५ रोजी या नाट्यगृहाच्या जागेचे भुमीपुजन झाले होते. २०१४ मध्ये मला वाटत गिता जैन मॅडम महापौर झाल्या त्यांचा अडीच वर्षाचा कार्यकाल त्यांच्या उपस्थितीत त्यांनी भाषण केले होते. त्या नाट्यगृहाच्या समारंभामध्ये म्हणजे अडीच वर्ष तुमची सत्ता होती तेव्हा सगळे झोपले होते का?

**प्रशांत दळवी :-**

तेव्हा हे सदस्य पण सत्तेमध्ये होते ना आमचे हितचिंतक.

**जुबेर इनामदार :-**

तेव्हा हा विषय आला नाही तेव्हा आम्ही नाट्यगृहाचा विषय मांडला ना. विषय महापौर घेतात.

**प्रशांत दळवी :-**

सत्तेत होते अडीच वर्ष तेव्हा हा विषय आणला नाही.

**जुबेर इनामदार :-**

विषय आजही आम्ही आणलेला नाही. आम्हाला नाट्यगृह पाहिजे म्हणून आम्ही हे नको ते त्याच्यामध्ये अडचणी आणत नाही. कारण ह्या विकासकाचे बाकीचे कामे आहेत. त्याला आयुक्तांकडे अधिकार आहेत. त्यांनी त्यांच्या सी.सी. वर स्थगिती द्यावी. बाकी जितके कामे आहेत ते बंद करायला लावा. त्याला सांगा आधी काम कर बँक गॅरंटी विषय उद्या न्यायालयात जाईल. आपलेही काम थांबेल आपल्याकडे नाट्यगृह सुध्दा मिळणार नाही. तुम्ही बोलू शकता जाऊ द्या कारण तुमची इच्छा नाही हे स्पष्ट होते. ते नाट्यगृह तिथे रद्द झाले पाहिजे. कदाचित विकासकाबरोबर काही तरी हात मिळवणी झाली असेल.

**मा. उपमहापौर :-**

तुमचा ठराव मांडा.

**जुबेर इनामदार :-**

ठराव तर होणारच. पण हा विषय अशाप्रकारे आहे शहरामध्ये नाट्यगृह याच्याआधी गमावून बसलो आहे.

**रवि व्यास :-**

महापौर मॅडम, सभागृह को मैं जानकारी देना चाहूँगा की २०१२ में जब काँग्रेस, राष्ट्रवादी की जब सरकार थी तभी भी जब नगरोत्थान का जो नाले का बडा टेंडर आया था करीबन ३०० करोड टेंडर का विषय आया था। तो उसमें जेकिंग इंटरप्राईज करके कंपनी थी। जो की मुंबई कें अंदर बी.एम.सी. में ब्लॅकलिस्ट हो चुकी थी और उस कंपनी को हमारे मिरा भाईंदर महानगरपालिका के तरफ से ७० करोड रुपये का टेंडर अलाऊड हुआ था। तभी कुछ पत्रकारोने, नगरसेवकोंने कम्पलेंट दि थी की यह एक ब्लॅक लिस्टेड कंपनी है जो की बी.एम.सी. ने ब्लॅक लिस्टेड हो गई है अगर हम लोग तुमको इतना बडा टेंडर दे देंगे तो हमारा प्रोजेक्ट रुक सकता है। हमारा महानगरपालिका का नुकसान हो सकता है। तभी के जो तत्कालीन आयुक्त थे मा. सुरेशजी काकाणी तभी उन्होने उसी कंपनी को टेंडर दिया लेकिन उनमें से बँक गॅरंटी ॲडीशनल लिखवा के लिया जब की टेंडर के अंदर कोई भी ऐसा फ्रॉड नही था। लेकिन कार्पोरेशन के सेफ्टी के लिए और शहर के विकास के लिए उन्होंने ॲडीशनल बँक गॅरंटी ली और वह जब काम हुआ तभी काँग्रेस राष्ट्रवादी सरकार ही थी। जो की शहर के हित के अंदर हम जो भी निर्णय लेना है तो वह ले।

**जुबेर इनामदार :-**

हा नियमावलीचा विषय आहे. बांधकामाचा नाही.

**मा. महापौर :-**

आपका ठराव है क्या? आपको आपका आन्सर मील चुका है। आपका ठराव है तो आप बोल दिजीए।

**जुबेर इनामदार :-**

सध्या सहाय्यक नगररचनाकार आहेत त्यांना बोलवा.

**मा. महापौर :-**

आपका ठराव हो तो आप दे दिजीए।

**जुबेर इनामदार :-**

हमारा ठराव है।

**मा. महापौर :-**

ठिक आहे मांडा. आपको आपका आन्सर मील चुका है आपको ठराव मांडना है तो आप मांड सकते है।

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, त्यांनी टाऊन प्लानिंग वाल्याला बोलवले आहे लॉ ऑफिसला बोलवले आहे. कोणी आले नाही.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव असेल तर मांडा.

**अनिल सावंत :-**

उपायुक्तांनी बोलवले ना.

**मा. महापौर :-**

मी परवानगी दिली नाही.

**अनिल सावंत :-**

म्हणजे ऑफिसरने आपले मत मांडायचे नाही असे आपले मत आहे.

**मा. महापौर :-**

तुम्हाला ठराव मांडायचा असेल तर मांडा.

**अनिल सावंत :-**

ठराव तर मांडणार.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ठराव मांडणार. पण आयुक्त महोदयांनी बोलवले आहे त्या डिपार्टमेंटचे. बोलवून घ्या.

**मा. महापौर :-**

खुलासा झालेला आहे आम्ही सगळी चर्चा केलेली आहे. तुमचा ठराव असेल तर तुम्ही मांडा.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम तुम्ही चर्चा केली पण आमची काही शंका असतील तर एच.ओ.डी. ला बोलवून आमची शंका निरसन करा. ठराव तर करायचे आहेत.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, शहराच्या हिताचा ठराव आपण केलेला आहे. त्यामुळे त्यांना ठराव मांडायचा असेल तर मांडू द्या. अन्यथा आपला ठराव पास करुन घ्या.

**अनिल सावंत :-**

शहराच्या हितामध्ये ठराव आहे की आणखी कोणाच्या हितामध्ये ठराव आहे. ते उद्या तुम्ही ठराव बनवाल तो कोर्टात जाईल स्टे येईल सेवन वंडरसारखी परिस्थिती निर्माण होईल.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी बसुन जा. तुमचा ठराव असेल तो मांडा.

**गिता जैन :-**

महापौरांच्या परवानगीने बोलते आपण इथे भांडून काही फायदा आहे का? नाही ना मग एक का करत नाही मी तर नव्हती पण सुरेशजीने सांगितले की म्हसाळ साहेबांनी सांगितले आहे. तुम्ही ठराव पाठवा. आम्हाला पटले तर ठेऊ नाही पटल तर विखंडनाला पाठवू. मग प्रशासनावर सोडा. त्यांना वाटल इट इज इन द रुल. कारण त्यांना काही करायला ते रुलमध्ये पाहिजे. तर ते डी.सी.रुलमध्ये असणार असेल तर ठेवणार नाहीतर विखंडनाला पाठवणार. आता भांडायचे बंद करा.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम भांडण नव्हते. जुबेरजीनी एक विषय मांडला की एच.ओ.डी. ना हे नियमात बसते का त्यांची शंका निरसन करावी ना.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

तुमचा ठराव नियमाला धरुन आहे का ते बघु.

**गिता जैन :-**

आता आपल्याकडे टाऊन प्लानिंगचा ऑफिसर नाही मग सल्ला कोण देणार आहे. एकदा ठराव होऊ द्या त्यांना वाटल की इट इज इन द रुल.

**दिप्ती भट :-**

आपण विषय गेला त्याच्यामध्ये आपण बोलले खंडेलवालजी की हा गोषवारा दिला नाही तर मा. आमचे सर्व सदस्यांनी वाचला आम्ही विचार केला आणि आम्ही त्याच्यामध्ये पॉईंट ठेवले म्हणजे ते नगरसेवक आहेत आम्ही नगरसेवक नाही आहोत का? म्हणजे आम्हाला एक पण गोषवारा द्यायचा नाही. आम्हाला काही कळत नाही काय बोलतो. असे नाही साहेब कारण की तुम्ही जे बोलतात आणि तुम्ही जो विषय दिला आहे त्या विषयाने आम्हाला पण तेच वाटल नाट्यगृह रद्द होत आहे. म्हणजे तुम्ही आम्हाला

गोषवारा द्यायचा नाही त्याच्यामध्ये आम्हाला डिटेल्स द्यायची नाही कशाला नाही देत प्रशासनाने खुलासा करावा की त्यांनी द्यायचे नाही. याच्यानंतर तुम्ही देताना आणि घेताना पण अर्धेच देत असतात. आम्हाला देताना अर्धे द्यायचे असतात मी तुम्हाला आणून दाखविणार. गेल्यावेळी पण बोलली मला दिले नाही म्हणजे आम्ही सगळे सदस्य नाही का? आम्हाला लोकांनी निवडून आणले नाही का? त्यांनाच आणले आहे. ते कधीपासून हेच बोलत आहेत मॅडम पण तेच बोलत आहेत. की आम्ही विचार केला विचार एका पक्षाचा नाही इथे आलेल्या सगळ्यांचा आहे आणि महापौर सगळ्यांची आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम हा विषय आताचा नाही. ह्या विषयाला अडीच वर्ष झाली त्यावेळेला नगरसेवक नव्हते का?

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

गोषवारा कधी लागतो ज्या वेळेला आपल्याला वस्तुची माहिती नसेल तर त्या वेळेला लागतो.

**दिप्ती भट :-**

आम्हाला माहिती नाही ना.

**प्रशांत दळवी :-**

अडीच वर्ष झाले नारळ फोडून माहिती नाही.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव आहे का ठराव मांडा.

(सभागृहात गोंधळ)

**मदन उदितनारायण सिंग :-**

महापौर मॅडम, ठराव मांडायचा असेल तर त्यांना मांडू द्या  नाही तर दुसरा विषय घ्या.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम नाट्यगृहाची शहराला गरज आहे. तर हा विषयांतर का होत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम आयुक्त सक्षम आहेत त्यांनी उत्तर द्यावे.

**मा. उपायुक्त :-**

सन्मा. सभागृह कृपया ऐका अजेंडावरती विषय घेणे हे सन्मा. महापौरांचे अधिकार आहेत. त्यानुसार विषय आला होता. आता याच्यावरती जर प्रशासनाने गोषवारा दिला नसेल तर तो ठराव किंवा तुम्ही याच्यामध्ये जी चर्चा करणार अशासकीय ठराव म्हणून याच्यावरती कायद्याला कसोटीवरती तो योग्य आहे की अयोग्य आहे. याचा तपास होऊन त्याच्यावरती नंतर पुढे निर्णय घेऊ.

**दिप्ती भट :-**

पहिला बोलायचे होते ना साहेब.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

ह्या सभागृहामध्ये तत्कालीन आयुक्त अच्युत हांगे साहेबांनी व्यासपिठावरुन जाहिर घोषणा केली होती. मर्दासारखी ज्या विषयाला गोषवारा नसेल तो मी स्विकारणार नाही. तशीच भुमिका प्रशासनाची............

**मा. उपमहापौर :-**

त्यांचे व्यक्तीगत मत होते आता तुम्ही ठराव मांडा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांचे मत होते म्हणून ते इकडून ट्रान्सफर होऊन गेले. अभी यह दुसरे आयुक्त आए हुए है।

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त कितीही आले नियम बदलत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम यह टाईमपास कर रहे है इनको विषय रखना नही है..........

**मा. महापौर :-**

आपण ठराव मांडा.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सर्व्हे क्र. १२, २६० पैकी महाजनवाडी या जागी विकासक मे. निलकलम रिॲलीटीज यांच्या भुखंडामध्ये नागरी सुविधा क्षेत्रात प्रस्तावित नाट्यगृह बांधून घेण्याची उपाययोजना पत्र क्र. मनपा/नर/१०६१/२०१७-१८, दि. १४/०६/२०१७ रोजी अटीशर्तीसह सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आली. दि. ३०/०८/२०१५ रोजी उद्घाटन समारंभ मा. श्री. उध्दवजी ठाकरे साहेब, मा. श्री. विनोदजी तावडे, पालकमंत्री एकनाथजी शिंदे, मा. खासदार श्री. राजनजी विचारे व सर्व मान्यवर यांच्या हस्ते पार पडला. सदरचे नाट्यगृह विकसित करण्यासाठी विकासकाला काही तांत्रिक अडचणी आल्यामुळे विलंब झालेला आहे. मा. आमदार श्री. प्रतापजी सरनाईक साहेब व महापालिका आयुक्त यांनी स्थळ पाहणी करुन विकासकाला काम तातडीने सुरु करुन डिसेंबर २०१८ पर्यंत काम पूर्ण करण्याची सुचना केली. सद्यस्थितीत विकासकाने कामाची सुरुवात केलेली असून ती प्रगतीपथावर आहे. तरी मिरा भाईंदर मनपा प्रशासनाने विकासकाचा पाठपुरावा करुन सदरचे काम जवळच्या समयसिमीमध्ये करुन घ्यावे. या शहराला एक भव्य नाट्यगृह उपलब्ध करुन द्यावे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रविण पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**रिटा शहा :-**

महापौर मॅडम यहाँ में कबसे देख रही हूँ की महापौर मॅडम इतना अच्छा विषय लेके आई है। सिर्फ एक जो नाट्यगृह रद्द करने जो विषय आया वह असमंजस लगा लेकिन नाट्यगृह रद्द करने के उपर जो इतनी सारी चर्चा ये उससे मुझे समज में आता है की प्रशासन खास करके नगररचना विभाग भुल करता है उसकी सजा सारे नगरसेवक भुगतते है। उसके अंदर नाट्यगृह रद्द करना ऐसा विषय नही आना चाहिए था मॅडम। इसके अंदर ऐसा विषय आना चाहिए था की जो भुसंकुल को परवानगी हमने दि थी सी.सी. जिसको बोलते है। बांधकाम परवानगी वह बांधकाम परवानगी हमने उसके लिए हमने दि थी वह भुसंकुल बनाऐंगे तो उसके पहले हमे नाट्यगृह बनाके देगा। इसके लिए उसको सी.सी. दि गई थी। लेकिन इसके पहले सी.सी. के हिसाब से अपना गृहसंकुल बनाना शुरु कर दिया और बांध भी लिया और बेच भी किया। तब तक नगररचना विभाग आराम से सोया हुआ था किसी को कुछ पडी नही थी की नाट्यगृह बनता है नही बनता है। शहर में विकास होता है की नही होता है परंतु जो भी समज में आया की हमारी टिम वहाँ पे गई डिम्पल मेहताजी को मैं मनसे अभिनंदन दूंगी की जब आपकी टिम वहाँ गई और जब वहाँ पे देखा की वहाँ संकुल के नाम पर करोडो रुपयो के फ्लॅट बन चुके है और बिक भी चुके है। लेकिन हमें जो मिलना चाहिए था हमारे शहर को जो मिलना चाहिए था वह चिज हमको मिलही नही रही है वह सिर्फ हमको खड्डा मिल रहा है। वहॉं पर किसकी कबर खोदी जाए ऐसा लगता है की पुरे मिरा भाईंदर का विकास की कबर खोदी गई है और वह विकास उसके अंदर दफन करने की तयारी चालु थी। लेकिन आपकी टिम जब वहाँ पहुँची आपने देखा ठिक है विषय के अंदर गलत चिज आई लेकिन आपको विषय ऐसा लाना चाहिए था की जितनी भी उनको परवानगी दि गई है सारी परवानगी रद्द करके वह नाट्यगृह बनाके नही देता तब तक वह परवानगी..............

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम माझी एक विनंती आहे यांनी जी सुचना केली ती सुचना आपल्या ठरावामध्ये घ्या.

**निला सोन्स :-**

महापौर मॅडम में यही कहना चाह रही थी रिटाजीने कहाँ थोडा और उसमें दो लाईन एंड करना चाहूँगी की, नागरिको के लिए विशेष सुविधाए और जितना डेव्हलपमेंट हो लेकिन जब हम प्राईव्हेट कंपनी को देते है टेंडरींग के रुम में जैसा शिवार गार्डन एक उदाहरण है या सी.सी. रोड जो आज रुके हुए है क्योंकी टी.डी.आर हमने रवि ग्रुपको दिया हुआ है तो हम प्रशासन खुद अपने हाथ काट के दे देता है। और ढाई साल के बाद हम उसके उपर चर्चा कर रहे है तो जब हम देते है तब उसके उपर चर्चा होनी चाहिए यह सारे अटीशर्ती जितने भी शर्त है उस वक्त लगाने चाहिए प्रशासन की लापरवाही के कारण नागरिको के कार्य रुक रहे है या डिले हो रहे है। उस चिजको देते वक्त हम ज्यादा गांर्भियता से ले तो यह मेरी रिक्वेस्ट है की प्रशासन काम देने के बाद भी उतनी गांर्भियता से कन्टीन्यु उसको फॉलो अप रखे ताकी वह इन शॉर्ट प्रशासन शुड टेक केअर ऑल दी सिगेलीटीस थोडी वापस कोई स्टे के बाद यह काम सफल ना हो। क्योंकी नाट्यगृह हम सभी चाहते है यह सुचना में लिखे।

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४२ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. सुरेश खंडेलवाल. दुसरा ठराव सुचक श्री. हरिश्चंद्र आमगावकर, अनुमोदन श्री. प्रविण

पाटील. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. हरिश्चंद्र आमगावकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५२, विरोधात ३३, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ४२ :-**

**नाटयगृहाची परवानगी रद्द करणेबाबत.**

**ठराव क्र. ३९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील दहिसर चेकनाक्याजवळील डी.बी. रियालीटी यांच्या गृहसंकुलनास महानगरपालिकेने सन २०१० मध्ये गृहसंकुलनास परवानगी दिलेली होती. सदर मंजुरीप्रमाणे विकासकाने सुमारे १०००० चौ.मी. भुखंड नागरी सुविधा म्हणून महानगरपालिकेस हस्तांतर करणे आवश्यक होते.

त्यानंतर विकासकाने सुधारीत परवानगी मिळणेकरीता प्रस्ताव सादर केला होता त्यानुसार त्यांना महानगरपालिकेने ४४५४.७५ चौ.मी. क्षेत्र हस्तांतर करुन त्यावर स्वखर्चाने उर्वरीत ५,००० चौ.मी. क्षेत्राच्या ऐवजी १८ महिन्यात नाट्यगृह बांधण्याच्या अटीवर परवानगी दिली होती.

सदर क्षेत्रामध्ये नाट्यगृहाचे बांधकाम करणेबाबत महासभेने मान्यता दिल्याप्रमाणे शालेय शिक्षण मंत्री मा.श्री. विनोदजी तावडे व शिवसेना प्रमुख मा.श्री. उध्दवजी ठाकरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत नाट्यगृहाचे भुमीपूजन सोहळा दि.३०/०८/२०१५ मध्ये पार पाडलेला आहे. तेव्हापासुन १८ महिन्याच्या आत विकासकाने नाट्यगृह बांधण्याच्या अटीवर परवानगी दिली होती परंतु अद्यापपर्यंत विकासकाने नाट्यगृह बांधण्याचे बांधकाम सुरु केले नाही व त्याबाबत महापालिकेने वेळोवेळी लेखी नोटीसा देवूनही बांधकाम सुरु केलेले नाही. तसेच सदर गृहसंकुलनाचे बांधकाम आजमितीस बंद असून त्याबाबत पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे. तरीदेखील विकासकाने काम सुरु केलेले नाही. त्यानंतर आयुक्त यांनी दि.१४/०६/२०१७ रोजी विकासकास सुधारीत परवानगी दिलेली आहे सुधारीत परवानगीमधील अटीनुसार सदर काम १२ महिने मुदतीत पूर्ण करावयाचे होते. परंतु त्यापैकी ६ महिने होवून देखील सदर ठिकाणी खड्डा मारण्याशिवाय कोणतेही काम केलेले नाही. यावरुन भविष्यात सदरच्या नाट्यगृहाचे बांधकाम सुरु करण्याची विकासकाची इच्छा दिसून येत नाही. सदर विकासकाने सदर जागा ही मे. मन इन्फ्रास्ट्रक्चर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना विकण्याचे निदर्शनास आले असून भविष्यात याबाबत कायदेशीर बाब निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर काम विकासकामार्फत पुर्ण होईल किंवा नाही याबाबत साशंकता आहे.

त्यामुळे

१) नाट्यगृह, वाचनालय, प्रसुतीगृह व दुकान केंद्र बांधण्यासाठी अंदाजे रु.३५ कोटी खर्च येणार असून तेवढ्या व अधिक १०% वाढीव रक्कमेची बॅंक गॅरेंटी घेण्यात यावी.

२) सदर बांधकाम विकासकाकडून सुधारीत परवानगीत नमुद मुदतीनुसार पूर्ण करुन घेण्यात यावे. सदर मुदतीत विकासकामार्फत काम न केल्यास त्याची बॅंक गॅरेंटी महानगरपालिका फंडात जमा करावी व महापालिकेने नाट्यगृहाचे बांधकाम पूर्ण करावे.

३) जर विकासकाने बॅंक गॅरेंटी देण्यास नकार दिल्यास विकासकास दिलेली बांधकाम परवानगी तात्काळ रद्द करावी व मुळ मंजुरीनूसार असलेली जागा ताब्यात घेवून त्या जागेवर महानगरपालिकेमार्फत नाट्यगृह बांधण्यात यावे.

४) सदर जागेवर महानगरपलिकेच्या निधीतून नाट्यगृह, वाचनालय, प्रसुतीगृह व दुकान केंद्र विकसीत करण्यासाठी येणाऱ्या खर्चास ही महासभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शाह रिटा सुभाष | १ | ढवण निलम हरीश्चंद्र | |
| २ | तिवारी अशोक सूर्यदेव | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | पांडेय पंकज सूर्यमणि | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | गुप्ता कुसुम संतोष | |
| ५ | गोहिल शानू जोरावर सिंह | ५ | पाटील धनेश परशुराम | |
| ६ | कांगणे मीना यशवंत | ६ | परदेशी गिता हरीश | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | पाटील नरेश तुकाराम | |
| ८ | शेट्टी गणेश गोपाळ | ८ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| ९ | भोईर गणेश गजानन | ९ | शेख अमजद गफार | |
| १० | पाटील प्रभात प्रकाश | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | रावल मेघना दिपक | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १३ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १३ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| १४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १४ | शिर्के अनंत गेणू | |
| १५ | जैन गीता भरत | १५ | पाटील वंदना विकास | |
| १६ | जैन सुनिता रमेश | १६ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १७ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १७ | पाटील प्रविण मोरेश्वर | निरंक |
| १८ | मोकाशी दिपाली आनंदराव | १८ | भोईर कमलेश यशवंत | |
| १९ | व्यास रवि वासुदेव | १९ | पाटील अनिता जयवंत | |
| २० | रकवी वैशाली गजेंद्र | २० | भोईर भावना राजू | |
| २१ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २१ | भोईर राजू यशवंत | |
| २२ | खंडेलवाल सुरेश जगदीश | २२ | शेख रुबीना फिरोझ | |
| २३ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २३ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २४ | मेहता डिंपल विनोद | २४ | सावंत अनिल दिवाकर | |
| २५ | शेट्टी अरविंद आनंद | २५ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २६ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २६ | भट दीप्ती शेखर | |
| २७ | थेराडे संजय अनंत | २७ | सपार उमा विश्वनाथ | |
| २८ | मुखर्जी अनिता बबलू | २८ | अहमद साराह अकरम | |
| २९ | वैती चंद्रकांत सिताराम | २९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ३० | पारधी सुजाता यशवंत | ३० | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ३१ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | ३१ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| ३२ | यादव मिरादेवी रामलाल | ३२ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| ३३ | म्हात्रे मोहन गोपाळ | ३३ | बांड्या एलायस दुमिंग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३५ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ३६ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| ३७ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३८ | अरोरा दीपिका पंकज | | | |
| ३९ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४१ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४२ | नाईक विविता विवेक | | | |
| ४३ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ४४ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४५ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ४६ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४७ | भावसार वंदना संजय | | | |
| ४८ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ४९ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५० | भोईर जयेश भानुदास | | | |
| ५१ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ५२ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४३, **नवघर येथील स्मशानभुमी आरक्षण क्र . १२२ क व ड मधील जागा बोहरा समाजाच्या दफनभूमीकरिता देणेबाबत.**

मदन उदितनारायण सिंग :-

**प्रस्तावना :-**

**मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) मौजे नवघर सर्व्हे क्र. 209 या शासकीय जागेवर दफनभूमी (आरक्षण क्र.1223) आरक्षण आहे. तसेच आरक्षण क्र.122 क मैदानासाठी आरक्षित आहे. सदर दफनभूमीची जागा मा . जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि .7/10/2010 रोजीच्या आदेशानूसार अतिक्रमणा पासून संरक्षणासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेली आहे. तथापी सदर जागा हस्तांतरीत करण्यापूर्वीपासून सदर जागेवर झोपड्या आहेत . तथापी अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सदर झोपड्या हया 2000 पूर्वीच्या समजून झोपडीधारकांनी केलेले अपि ल अशत: मान्य केलेले आहे. तत्पूर्वी सदर झोपड्या या बंदरवाडी येथे रेल्वेच्या जागेवर होत्या व रेल्वेने सदर झोपड्या हटविल्याने 2003 मध्ये ते नवघर येथील दफनभूमीच्या जागेवर स्थलांतरीत झालेले**

**आहेत. सदर झोपड्या ह्या 2003 नंतर सदर जागेवर वसल्याने झोपडी धारकांचे अपिल अमान्य करून सदर झोपड्या हटवून देण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे पाठपूरावा करण्यात येत आहे.**

**सदर जागेवर दफनभूमी विकसित करण्यासाठी सदर जागा हस्तांतरीत करण्याकरीता मा . जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपूरावा करण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात सदर जागा ही सी .आर.झेड. ने बाधित होत असल्याने सदर प्राधिकरणाची परवानगी घेऊन तारेचे कुंपण व माती भराव करून जागा समतल करण्यात आलेली आहे.**

**ठराव क्र.**

**प्रशासनाच्या प्रस्तावानूसार सदर जागा दफन भूमीसाठी विकास आराखड्यात आरक्षित असून उपलब्ध जागेपैकी काही भाग बोहरा समाजाला दफनभुमीसाठी देण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे. तसेच इतर समाजाच्या दफन भुमीसाठी मागणी आल्यास त्याबाबत संबंधीत समाजाला दफनभुमीसाठी जागा दयावयाची असल्यास लोकसंख्येनुसार क्षेत्र निश्चित करुन आयुक्तांनी तसा प्रस्ताव मा. महासभेपूढे सादर करावा**

**शानु गोहिल :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रविण पाटील :-**

सदरचा विषय हा गेल्या १९९७ ला जे डी.पी. प्लान झाले त्याच्यामध्ये आरक्षण असलेली जागा बोहरा त्या विषयावर आहे गेल्या कित्येक वर्षापासून ह्या विभागामध्ये बोहरा समाज किंवा मुस्लीम समाजाची मागणी होती का एकमेव आरक्षण असल्यामुळे हे आरक्षण डेव्हलप करावे परंतु ज्या वेळेला डी.पी. प्लान झाला त्याच्याही अगोदर ह्या विभागाचा आपण सर्व्हे केला असता तर ह्या विभागात ह्या क्षेत्रामध्ये पूर्णपणे मँग्रोज आहेत त्याचप्रमाणे एन.डी. झोन आहे त्याचप्रमाणे हे जे पाणथळ क्षेत्र आहे त्याच्यामध्ये अनेक शासनाचे नियम आले अनेक जी.आर. आले ह्या वेळेला ही जी जागा आहे ही जागा आपल्या महानगरपालिकेचे जे अधिकारी आहेत त्यांच्यामार्फत सर्व्हे करण्याच्या आधी सर्व्हे केल्यानंतर त्यांच्याकडून तसा रिपोर्ट सादर करण्यात आला. मा. जिल्हाधिकाऱ्यांना यांना सादर केल्यानंतर त्याचप्रमाणे दरम्यानच्या काळामध्ये हे जे क्षेत्र आहे मँग्रोज किंवा तिवरांचे झाडे बोलतो त्याला एक वनांचा दर्जा प्राप्त झाला त्याच्यासाठी स्वतंत्र डी.एफ.ओ. तयार झाला. डी.एफ.ओ. झाल्यानंतर ह्या विभागात गेल्या कित्येक दिवसांपासून महानगरपालिका १९९५ साली महानगरपालिकेच्या माध्यमातून इथे कचरा टाकण्यात आला होता. तो टाकल्यानंतर अनेक मँग्रोजच्या झाडांचा तिथे ऱ्हास झाला होता. त्या दरम्यान महानगरपालिकेचे अधिकारी त्याचप्रमाणे कचऱ्याचा जो ठेकेदार आहे त्याच्यावर मिरारोड स्टेशनमध्ये गुन्हे दाखल झाले ह्या सगळ्या गोष्टीचा विचार करता मँग्रोजचे जे डि.एफ.ओ. आहेत त्यांनी स्वतंत्र तिथे पाहणी केली होती आणि मा. न्यायालयाने तिथे असे आदेश दिले होते की सदरच्या जागेवर रिस्टोअर करा म्हणजे त्या जागेवर पुन्हा मँग्रोज लावा. अशा सगळ्या बाबींचा विचार करत असताना ह्या सगळ्यांचे हे जे क्षेत्र आहे हे अतिशय संवेदनशील असल्यामुळे ह्या जागेचा आपण पुन्हा एकदा विचार करावा जेणेकरुन आम्ही तुम्हाला स्पष्ट सांगतो आमची भुमिका अशी आहे. बोहरा समाजाची दफनभूमी व्हावी किंवा मुस्लीम समाजाची व्हावी याला आमचा मुळात खरोखर विरोध नाही. परंतु आपण जर जनगणना बघितली की जातीनिहाय धर्मनिहाय जी जनगणना झाली याचा रिपोर्ट मागवा तुम्ही बघा त्या विभागात किती प्रमाणात लोक राहतात आपण एखादे आरक्षण डेव्हलप करतो. लोकांच्या हितासाठी करतो. ते ह्यांना सोयीचे ठरेल का? याचाही आपण विचार करावा. जेणेकरुन या समाजाची जी लोक आहेत. भाईंदर वेस्टला आहेत, मिरारोडला आहेत परत आपल्याला विनंती आहे की आता जो डी.पी. प्लान चेंज होत आहे तर ज्यांना सोयीस्कर पडेल त्या समाजाचे जिथे लोक असतील तिथे आपण त्यांना ह्या समाजाच्या लोकांना दफनभूमी करण्यात यावी अशी आपल्याला नम्र विनंती आहे.

**मा. उपमहापौर :-**

ह्या विषयात मी अतिरिक्त माहिती देऊ इच्छितो की हा विषय एकतर आपण खूप समजदारीने ही गोष्ट सांगितली की तुमचा त्याला विरोध नाही आणि शहराची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे आणि दफनभूमी असते तिथे त्यांना त्या खाचा काही महिन्याने ते बदलायचे असतात परंतु शहरामध्ये लोकसंख्या ओघ पाहता आणि तुम्ही उल्लेख केला की मिरारोडला बोहरा समाजाचे लोक आहेत किंवा भाईंदर पश्चिमेला तशी भाईंदर पूर्वेला पण आहेत आणि जेव्हा १९९७ साली ह्या सभागृहाचे नगराध्यक्ष म्हणून काम

केलेले स्व. डॉ. प्रफुल्ल पाटील साहेब यांच्या कारर्किदीत ह्या शहराच्या डी.पी. प्लान मंजूर झाला होता आणि हे आरक्षण तेव्हापासून अस्तित्वात आहे. आता त्या आरक्षणा ठिकाणी महानगरपालिकेने सी.आर.झेडची परमिशन घेऊनच त्या जागेमध्ये भराव केलेला आहे. आणि ती जागा समतल केलेली आहे. आपण मॅंग्रोजचा उल्लेख केला त्याच्या आधी तिथे कचरा टाकायचे.

**प्रविण पाटील :-**

सी.आर.झेडची परवानगी तिथे घेतलेली नाही भराव जो केलेला आहे त्याला महानगरपालिकेने टेंडर काढले कम्पाऊंड करण्यासाठी परंतु त्याच्यानंतर तुम्हाला सांगतो जिल्हाधिका-यांचा, तहसिलदार त्यांना नोटिसा आलेल्या आहेत.

**मा. उपमहापौर :-**

आयुक्त साहेबांची स्वयंस्पष्ट अशी आहे की दरम्यानच्या काळात सदर जागा सी.आर.झेडने बाधीत होत असल्याने सदर प्राधिकरणाची परवानगी घेऊन तारेचे कुंपण माती भराव करुन जागा समतल करण्यात आली. सदरचे डिपार्टमेंट म्हणजे सी.आर.झेड आयुक्तांनी सहीनिशी आपल्याला लिहून दिलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

त्या जागेवर ज्यावेळेला टेंडर झाले माती भरावाच त्याच वेळेला त्या अधिका-यांवर गुन्हे पण दाखल झालेले आहेत. जेणेकरुन त्या विभागात असलेले मॅंग्रोजचा ऱ्हास होत आहे. त्याचप्रमाणे त्याच्याही नंतर वन विभाग म्हणजे मॅंग्रोजचा वन विभाग ज्याला स्वतंत्र डी.एफ.ओ. आहे स्वतंत्र वनाचा त्याला दर्जा दिलेला आहे. त्याला ही केसेस झालेले आहेत. मा. न्यायालयाने ती जागा रिस्टोअर करावी म्हणजे तिथे पुन्हा मॅंग्रोज लावावे असे स्पष्ट आदेश आहेत. गोषवारा आयुक्तांनी दिलेला आहे तो परिपूर्ण गोषवारा नाही. त्याला सर्व पूर्ण तुम्ही अभ्यास करा विधी विभागाकडून मागवा न्यायालयाचे आदेश मागवा. वन विभागाचे त्यांचे स्पष्ट गुगलवर त्याचा जुना सर्च असतो जिथे जिथे मॅंग्रोज आहे की नाही साहेब आमचा जन्म गेलेला आहे तिकडे. पूर्ण मॅंग्रोज होते पूर्ण मॅंग्रोजचा तिथे ऱ्हास झालेला आहे. वनविभागाने वनविभागाचे काम केलेले आहे. जिल्हाधिका-याने जिल्हाधिका-याचे काम केलेले आहे. न्यायालयाने न्यायालयाचे काम केलेले आहे. पण हा विषय एवढा गंभीर आहे इथे सगळे सदस्यांना त्रास होऊ शकतो. कारण मा. गोपाळ शेट्टी जे आपले खासदार आहेत त्यांनी फक्त एक आदेश दिला होता. कांदिवलीला फक्त कांदीवलीच्या मॅंग्रोजमध्ये यांचा निधी वापरावा. त्याने कोर्टाचे समक्ष आले त्यांना हरित लवादाची नोटिस आली. मी आपल्याला हा विषय जाणीवपूर्वक बघा जाणीवपूर्वक कोणत्याही सदस्याला याच्यामध्ये अडकवू नका. ह्या विभागाचा खूप गांभिर्याने विचार करा नंतर याच्यावर निर्णय घ्या. कारण मॅंग्रोजचे नियम फार गंभीर आहेत. अनेक केसेस आजही कोर्टात चालू आहेत साहेब. तरी ह्या विषयावर तुम्ही अभ्यासपूर्वक सर्व माहिती घेऊनच निर्णय घ्या साहेब.

**मा. उपमहापौर :-**

पाटील साहेब निश्चितपणे आपण आपली भुमिका परफेक्ट मांडली परंतु जेव्हा हा एक दफनभूमीचा विषय आला त्यावेळेला सन्मा. मुझफ्फर साहेबांनी मिरारोडला जेव्हा हा विषय घेतला तेव्हा त्या मुस्लीम समाजामध्ये एक अशी चर्चा झाली आणि प्रत्येक समाजाचे जेवढे सिया, सुन्नी, बोहरी, तंबोली अशा अनेक फिरक्या आहेत मुस्लीम समाजाचे तर त्या-त्या लोकांनी जाऊन सांगितल की आम्हाला वेगळी दफनभूमी पाहिजे आणि जेव्हा हा विषय विषयपटलावर आला तेव्हा मिरा भाईंदरमध्ये लोक असं गृहित धरतात की मिरारोड वाल्यांची सोय झाली. भाईंदरवाले सांगतात की आमच्यासाठी जी सोय आहे ती अपुरी आहे. मग ही सोय व्हावी जसा बोहरा समाजासाठी हा विषय आला तसा ह्या शहरातल्या तमाम मुस्लीम समाजाच्या लोकांनी संपर्क साधायला सुरुवात केली. आमच्या ठरावात स्वयंम स्पष्ट आम्ही नोंद केलेली आहे की ह्या विषयी अन्य मुस्लीम समाजाच्या गटांनी जर मागणी केली तर आयुक्तांनी निर्णय घ्यावा याच्यासाठी जागा निश्चित करावी आणि एक गोष्ट नक्की आहे आपण सांगितल हे सभागृह अडचणीत येईल सगळ्या सदस्यांना त्रास होईल त्या कॉन्ट्रॅक्टरवर गुन्हा दाखल झाला.

**प्रविण पाटील :-**

अधिका-यांवर पण झाला.

**मा. उपमहापौर :-**

अधिका-यांवर गुन्हा दाखल झाला पण हे जे करण्याची आयुक्तांचा आय.ए.एस. अधिकारी आहेत त्यांच्या अनुमतीने आलेला विषय आहे. ह्या विषयाला आपण पारित केल्यानंतर ह्या संदर्भात असलेल्या सगळ्या शक्यता पडताळून पाहिल्या जातील. आपण आपल्या संभाषणात असे वाक्य उल्लेख केला की याच्यावरती न्यायालयाचे आदेश आहेत. तर त्या न्यायालयाचे आदेश परत तपासणी केली जाईल. हा

सभागृहासमोर विषय आहे. ह्या विषयाला धार्मिक भावनेशी निगडीत आहे. त्याच्यामुळे कोणाचा विरोध असल्याचे कारण नाही...........

**प्रविण पाटील :-**

उपमहापौर साहेब आमचा ह्या विषयाला विरोध नाही मी स्पष्ट बोललेलो आहे. आमचा विषय असा आहे की त्या जागेची पडताळणी करा. जेणेकरुन त्या जागेवर झालेले शासनाचे कोर्टाचे जे आदेश आहेत ते तुम्ही बघा. फक्त बोहरा समाजाने मागणी केली आणि आरक्षण डेव्हलप करायचे हा एवढा विषय नाही मॅडम. हा विषय निट सांभाळून घ्या.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, दफनभूमी संदर्भात आपल्या या मिरा भाईंदर शहरात सर्वधर्माची लोक राहत आहेत. ज्याप्रमाणे हिंदू, ख्रिश्चन यांना सोयी आहेत त्यानुसार खरोखरच कारण बोहरी समाज हा माझ्या प्रभागात देखील काही अंशी आहेत आर.एम.पी. पार्कला त्यांची वस्ती काही त्यांच्या बिल्डींग आहेत. तर त्यांना देखील कोणी त्यांच्या घरातल मृत झाल तर खरोखर आम्ही डोळ्यांनी पण बघितले आहे की त्यांना २-२ दिवस त्यांच्या बॉडी तिथे असतात आणि त्यांना मिरारोड आणि वेस्टला खूप विनवण्या करुन तिथे जागा मिळते. आम्ही पूर्ण सहमत आहोत की त्यांना दफनभूमी मिळाली पाहिजे आणि त्यानुसार मी देखील आयुक्तांना पत्र अगोदर दिलेले आहे. परंतु जर खरोखर मनापासून फक्त बोहरी समाजाला खूश करण्यासाठी नव्हे तर त्यांच्या खेराखर सोयीसाठी त्यांना दफनभूमी ही भाईंदर पूर्वेला मिळालीच पाहिजे. त्यात दुमत नाही. परंतु जे आता जागेच्या संदर्भातीज जे पॉईंट त्यांनी सांगितले ते स्थानिक तिथले नगरसेवक आहेत. खरोखर दफनभूमी त्यांना लवकरात लवकर द्यायची असेल तर ह्या सगळ्या जर मागणीची पूर्तता करा याला फारच वेळ जाणारा आहे. आमचे तर मत आहे ह्या सगळ्या पर्यावरणाची याच्याच त्याला सगळ्या परमीशन एकदा लेटर टाकल्यानंतर दुसऱ्या दिवशी कधी परमीशन मिळत नाही आणि ते अगोदर पण टाकलेल्या आहेत. आतापर्यंतच्या परमिशन देखील मिळालेल्या नाहीत. एवढ्या केसेस झाल्या आहेत. सगळ आहे हे सगळे नजरेसमोर ठेवून आता डी.पी. चे काम चालू आहे ते जवळजवळ संपत चालेले आहे. त्या डी.पी. मध्ये नविन जागेची त्याच्यामध्ये समाविष्ठ केला आणि आर.एम.डी. पार्क सारख्या त्यांच्या जवळच्या एरियात ती जागा जर उपलब्ध करुन दिली तर ह्या जागेपेक्षा लवकरात लवकर दफनभूमी त्यांना मिळेल आणि त्यांना सोयीची होईल. त्यामुळे दफनभूमी व्हावी याच्यासाठी पाठपूरावा आम्ही देखील करत आहोत आम्हीही त्यांचा सपोटीवर आहोत कारण मेल्यानंतर एखाद्या मृत व्यक्तीच्या टाळूवरच लोणी कोणी खाऊ नये कुठच्याही समाजाची लोक असू द्या त्यांचा हक्क त्यांना मिळालाच पाहिजे आणि दफनभूमी ही झालीच पाहिजे. परंतु ह्या सगळ्या शक्यता याने उशीर होणार आहे. आज बोहरी समाज किंवा मुस्लीम बांधवांना आज खुश होतील की आपल्यासाठी दफनभूमी होणार आहे तिथे जागा अलाऊड झाली आहे म्हणून परंतु ते सगळे कागदपत्र त्यांची पूर्तता करेपर्यंत आपण नविन डी.पी. मध्ये जर प्लान टाकला त्यात समाविष्ठ केला तर त्यांच्या शेजारीच त्यांना ती जागा देखील मिळू शकेल आणि एक लवकरात लवकर त्यांना दफनभूमी मिळावी अशी मी आपणाला विनंती करते.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम दफनभूमी गरजेची आहे. त्याला कारण अस ह्या शहरामध्ये मुस्लीम बांधवही बऱ्याच प्रमाणात राहतात. या शहरामध्ये तीन दफनभूमी आहेत. मिरारोडमध्ये विकसीत झाली आहे अशी काशिमिऱ्याला एक आहे आणि भाईंदर पश्चिमेला छोटीशी आहे. समाज ह्या शहरामध्ये आपल्याकडे चांगला इतिहास आहे ह्या शहरामध्ये लोक खेळीमेळीमध्ये राहतात. कधी कुठल्या दंगली झाल्या नाहीत म्हणून लोकांना कुठेही रहायला अडचण वाटत नाही. सुरक्षित वाटते त्यांना म्हणून ते कुठेही जाऊन राहतात त्यांनी जाऊन रहायला सुरुवात केली की त्यांची संख्या वाढत जाते. अशाप्रकारे पुनःश्च मिरा भाईंदरमध्ये लोकांची मुस्लीम बांधवांची जनसंख्या वाढलेली आहे. १९९२ पासून ह्या मिरा भाईंदरने उत्तर दिलेले आहे एक संस्थेने याची मागणी केली होती महाराष्ट्र मिलद इस्लामीचा आणि त्यांनी सातत्याने पुरवठा केलेला आहे. २०१७ पासून ह्या दफनभूमीसाठी काही लोकांची प्रविण पाटील साहेबांनी जसा विषय मांउला. अडचणी असतात कोणालाही आपल्या घराच्या बाजूला दफनभूमी किंवा स्मशानभूमी नको असते. खिडकी उघडल्यानंतर समोर तसे असल्यास तो घर घेत नाही अशा प्रकारची मानसिक मनस्थिती आहे त्याला काही पर्याय नाही गरज आहे. ठेवावी लागेल आरक्षण बदलत असेल तर तो आरक्षण बदलण्याचा विषय ३७ खाली राज्य शासनाकडे आपल्याला जायला लागेल मात्र इथे मांडलेल्या ठरावामध्ये त्याची अंमलबजावणी होणार असेल आयुक्त करणार असतील तर आमच्यामध्ये चार समाज आहेत. बोहरी, सिया त्याच्यानंतर इस्माईल एक समाज आहे. आणि नंतर सुन्नी याच्यामध्ये सुन्नी समाज जो आहे तो ८० टक्के

आहे किंवा ९० टक्के सुध्दा असू शकतो. बाकीचे जे आहेत ते फक्त २० टक्के आहेत म्हणजे भुखंड देताना आणि ते प्रत्येकाची आपआपली प्रथा आहे दफन करण्याची म्हणून त्याप्रकारे आपण त्याला देतो त्या गणितमध्ये त्याला तितकी जागा तितका भुखंड त्यांना देण्यात यावा. जेणेकरून उद्या कुठल्याही प्रकारचा वाद निर्माण होणार नाही.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम मी स्टॅन्डिंग कमिटीचा चेअरमन होतो २०१० मध्ये त्यापासून या दफनभूमीसाठी मी आटोकाट प्रयत्न केलेला आहे. इथले सर्व सदस्यांना ही गोष्ट माहित आहे. माझ्या प्रभागात बोहरी समाज देखील आहे. आणि तेवढाच मुस्लीम समाज देखील आहे. ज्यावेळेला हा विषय आला इलेक्शनच्या अगोदर पासून ज्या वेळेला दोन मयत झाली त्याठिकाणी बोहरी समाजाची त्यावेळेला ते लोक महानगरपालिकेच्या दरवाजावरती आणून ते मयत ठेवणार होते. आम्ही त्याठिकाणी त्यांना समजावले आणि हा विषय चांगल्यापैकी तुम्ही आज ह्या सभागृहामध्ये आणलेला आहे. त्याला आम्ही सगळे स्वागत करतो. आज याच्यासाठी आम्ही स्वागत करतो की आज ह्या ठिकाणी सहपक्षाचे नगरसेवक ह्या सभागृहात आहेत परंतु एका सभागृहाचा मान वाढेल अशा प्रतिचा हा विषय आज आपण ह्या ठिकाणी आणलेला आहे मी ह्या ठिकाणी पक्षपात वगैरे करत नाही. सर्वधर्म समभाव हे नाते आपण जपलेले आहे. परंतु हा विषय आपण फक्त एक बोहरी समाज म्हणून दिलेला आहे. तो विषय थोडासा कुठेतरी इतर याच्यामुळे मुस्लीम समाज आमच्याकडे देखील आलेला महापौर मॅडम ह्याच जागेवरती सर्व समाजाची जागा आहे. समाविष्ठ नगर विकासाला तुम्ही जर विचारुन घेतले तेव्हा आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेब त्यांनी सगळ्यांना बोलवून ह्या ठिकाणी............

**मा. महापौर :-**

मागणी बोहरा समाजाने केली होती म्हणून.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम मी आपल्याला विनंती करतो हा ठराव मंजूर करावा. एवढीच मी आपल्याला आग्रहाची विनंती करतो.

**मा. महापौर :-**

ह्या ठरावामध्ये आम्ही सर्व समाजाचा समावेश केलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम विरोधकांनी पण ह्या विषयाची तारीफ केलेली आहे. आणि अतिशय चांगला विषय आणलेला आहे. मान्य करतो की प्रविणजी हा तुमच्या वॉर्ड शेजारी आणि वॉर्डमधला विषय असल्यामुळे तुम्हाला तिकडच्या लोकांचा विरोध आहे. पण तुमचा विरोध करण्याची जी सिस्टम होती ती सिस्टम चुकीची आहे. तुम्ही हे निषेधाचे पत्र वाटले. निषेध-निषेध-निषेध आणि तुमच्या लोकांना मिसगाईड करता ते थोडस चुकीचे वाटते. कुठलाही विषय दिलदारकीपणे तुम्ही स्विकारला पाहिजे. ही मागणी चुकीची आहे. शेवटी स्मशानभुमी ही प्रत्येक इथे होऊ शकत नाही. ती खुप पुर्वीपासूनची आहे. त्याच्यामुळे ती लांब आहे. आणि हे रिर्झव्हेशन १९९७ साली पडले किती १९९७ आणि त्यावेळी तत्कालीन आपले जे नगराध्यक्ष होते प्रफुल्लजी पाटील साहेब आणि ते पण नवघरचे तुमचे गोडदेव गावचे ग्रामस्थ होते. तो पण त्यांचा एरिया बाजुला आहे. त्यांनी पण तो विचार करायला पाहिजे होता आणि दुसरी गोष्टी जर तुम्हाला ही स्मशानभुमी नको होती तर तुम्ही ३७ एक खाली मोडिफिकेशन तुम्ही करायला पाहिजे होतं.

**प्रविण पाटील :-**

ध्रुवकिशोरजी तुम्ही जो विषय घेतला हा विषय भावनेत होत नाही मी जो विषय बोललो त्या जागेचे............

**ध्रुवकिशोर पाटील :-**

३७ एक खालती मी मोडिफीकेशन केले होते त्याच्यानंतर जुबेरजींनी सुचना केली ती ऑलरेडी आम्ही घेतली. म्हणजे आमची दुरुस्ती किती आहे. आम्ही अगोदर ठरवल की इतर समाजाच्या दफनभुमीसाठी मागणी आल्यास त्याबाबत संबंधीत समाजाला दफनभुमीसाठी जागा द्यायची असल्यास लोकसंख्येनुसार तुम्ही ८० टक्के म्हटले २० टक्के, ३० टक्के लोकसंख्येनुसार क्षेत्र निश्चित करुन आयुक्तांनी तसा प्रस्ताव मा. महासभेत आणावा. म्हणजे समजा आयुक्तांचे कॅलक्युलेशन चुकले असेल तर तुम्हाला माहित आहे तुमचा समाज किती आहे. सिया सुन्नी हे किती परसेन्टेज आहेत. तुम्हाला माहिती आहे. मग त्याप्रमाणे आम्ही ऑलरेडी गोषवाऱ्यामध्ये आणि ह्या ठरावामध्ये व्यवस्थित नमुद केलेले आहे. त्याच्यामुळे मॅडम हा असा कुठलाही चुकीचा ठराव केलेला नाही. माझी तुम्हाला विनंती आहे ह्या लोकांचे पण कन्सेल्ट आहे हा ठराव मंजुर करावा.

**प्रविण पाटील :-**

मॅडम मगाशी बोललो हा विषय मी पहिला स्पष्ट केले. दफनभुमीला आमचा विरोध नाही स्पष्ट केले. दफनभुमीला आमचा विरोध नाही. पण दफनभुमी कुठे होते मी जे मुद्दे बोललो ते कोणी बोललेच नाही. तुम्ही खांबित साहेबांना बोलवा. अजिज शेख होते उपायुक्त त्यांच्यावर गुन्हे झाले नाहीत का त्या जागेवरती भराव टाकले त्यांचे विधी अधिकाऱ्याला बोलवा न्यायालयचे काय निर्देश आहेत. तुम्ही फक्त दफनभुमी व्हावी ह्या समाजाची व्हावी मी बोलत आहे की कुठल्या जागेवर व्हावी.

**मा. महापौर :-**

आता खुप चर्चा झाली आहे.

**प्रविण पाटील :-**

नाही मॅडम कशी चर्चा झाली तुम्ही ज्या जागेचा उल्लेख केलेला आहे त्या जागेबद्दल मी बोलत आहे.

**मा. महापौर :-**

सगळी चर्चा झालेली आहे.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही विषयच समजून घेत नाही जागा तुमच्या ताब्यात आहे का? जिल्हाधिकारीने जी ताबा दिलेली जागा त्याच्यात कंडीशन आहेत का?

**मा. महापौर :-**

आम्ही पाठपुरावा करणार.........

**प्रविण पाटील :-**

त्याच्यात कंडीशन आहेत की ती जागा मॅंग्रोज विभागाचे वनविभागाचे निर्देश आहेत त्याच्यावरती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब २०१४ साली महापालिकेने पत्र दिलेले आहे दावधीपुरा समाजाला की विषय प्रकरणी आपणास कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका सदरील भाईंदर पुर्व येथील खारी सर्व्हे क्र. २०० ह्या जागेचे आरक्षण क्र. १२२ (ड) हे आरक्षण प्रयोजनकरीता आरक्षित आहे. हे २०१४ साली पत्र दिलेले आहे. आणि त्याप्रमाणे कुंपण भिंत बांधणे, गेट बांधणे, सपाटीकरण करणे याचे महापालिकेने वर्क ऑर्डर दिलेले आहे २०१४ साठी.

**प्रविण पाटील :-**

त्याच्यामध्ये मॅंग्रोजचा उल्लेख आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण तिथे भरणी करतच नाही आहे.

**प्रविण पाटील :-**

तिथे पूर्ण मॅंग्रोज आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तिथे जागा ओपन आहे म्हणून आपण तिथे दफनभुमी करत आहोत. मॅडम आपली सविस्तर चर्चा झालेली आहे. चर्चा आपण भरपुर करु शकता.

**प्रविण पाटील :-**

साहेब उगाच ह्या समाजाची दिशाभुल करण्याचा हा विषय आहे. तुम्ही सांगणार आम्ही ह्या दफनभुमीसाठी जागा देत आहोत ह्या लोकांनी जर विरोध केला पण मुळात तुमची जागा ताब्यात आलेली नाही जी जागा पूर्ण मॅंग्रोजने व्यापलेली आहे ज्या जागेवरती महानगरपालिकेवर केसेस चालु आहेत. ती जागा तुम्ही देत आहेत. तुम्हाला खरोखर द्यायची असेल तर चांगली जागा द्या. त्या समाजाबद्दल तुम्हाला जर किव असेल तर चांगली जागा द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

वास्तविक तुम्ही याच्यामध्ये आरक्षण आहे हे कुठे म्हटलेच नाही. तुम्ही तिथे म्हटलेले आहे जेटी बांधणार आहे जेटीचे पत्र आहे याच्यामध्ये तुम्ही असे म्हणायला पाहिजे होते की हे आरक्षण १९९७ साली पडलेले आहे. आणि याच्यामध्ये आरक्षणाचे काय तुम्ही विषयच घेतलेला नाही.

**प्रविण पाटील :-**

आरक्षणाचा विषय इथे बोलायचा आहे साहेब तो तिथे कशाला बोलु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्मशानभुमी, दफनभुमी तिथे बांधावी लोकांना मिसगाईड करा आणि लोकांना आंदोलन करणेस प्रवृत्त करणे हा तुमचा उद्देश आहे. हे चुकीचे आहे प्रविण.............

**प्रविण पाटील :-**

तुम्ही मँग्रोजबद्दल बोला. तुम्ही ती जागा ताब्यात आली की ते सांगा ना प्रशासनाला सांगा तुमच्या हातात आलेली आहे का?

**गिता जैन :-**

प्रविण पाटील साहेब मला वाटत प्रशासनाला जर तिथे मँग्रोज असणार तर प्रशासनाला तेवढे माहित आहे. आपले आयुक्त आहेत आय.ए.एस आहेत आपले त्यांना जर माहित नसेल..........

**प्रविण पाटील :-**

मॅडम तुम्ही आयुक्तांचा गोषवारा बघा काय आहे ते आता जो दिलेला आहे तो गोषवारा वाचा.

**गिता जैन :-**

जर मँग्रोज असेल तसे असेल तर ते करणारच नाहीत ना.

**मा. उपमहापौर :-**

स्पष्ट त्यांनीच सांगितलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

माझा बोलायचा उद्देश तोच आहे की तिकडची परिस्थिती वेगळीच आहे. तिथे पूर्णपणे मँगोज आहेत. त्या जागेवर महानगरपालिकेचा अधिकारावर ठेकेदारावर गुन्हा दाखल झालेला आहे. आणि फक्त गोलगोल करायचे काम इथे करत आहेत.

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला कोण गोलगोल करत आहेत.

**प्रविण पाटील :-**

त्या बोहरा समाजाला आम्ही दफनभूमीची जागा देतो. द्यायचीच असेल तर डी.पी. मध्ये द्या ना.

**मा. उपमहापौर :-**

आयुक्तांच्या सहीने हा विषय आहे. त्याच्यात स्वयंस्पष्ट म्हटलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

पूर्ण गोषवारा वाचा त्याच्यात काय म्हटलेले आहे. त्याच्यामध्ये कुठे दिलेले आहे जागा मिळू शकते असं.

**मा. उपमहापौर :-**

सदर जागा दफनभुमीसाठी बोहरा समाजाला देण्यासाठी आणि जिल्हाधिका-यांकडे प्रस्ताव देणार आहेत. मग तुमचा विरोध कशाला आहे.

**प्रविण पाटील :-**

विरोध असा आहे की त्यामध्ये जिल्हाधिकारीचे जे म्हणणे आहे. जिल्हाधिका-यांनी जी जागा आपल्याला ज्या पत्रान्वये दिलेले आहे त्याच्या अटीशर्ती वाचा.

**मा. उपमहापौर :-**

हो पण ते जिल्हाधिकारी आणि आयुक्त साहेब बघुन घेतील ना.

**प्रविण पाटील :-**

मँग्रोज विभागाचे व वन विभागाचे.

**मा. उपमहापौर :-**

आपल्या कार्यलयातुन आलेला विषय आहे तो आपण करुन घेतला.

**प्रविण पाटील :-**

वन विभागाचे निर्देश वाचा. माझा बोलायचा उद्देश एवढाच आहे. तुम्ही ह्या समाजाला जी वादग्रस्त जागा आहे.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही समाजाला नाही दिलेली आहे.............

**प्रविण पाटील :-**

चांगली जागा द्या.

**मा. उपमहापौर :-**

जुबेर इनामदार साहेबांनी पत्र वाचून झाले.

**प्रविण पाटील :-**

त्यांनी सांगितले ना ती जागा द्या.

**मा. उपमहापौर :-**

वीस वर्षापासून मागणी करत आहे ही आजची मागणी नाही. वीस वर्षापासून आहे.

**प्रविण पाटील :-**

त्यांची मागणी समाजासाठी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रविणजी तुमच्या बाजूला सन्मा. सदस्यांनी आता म्हटले होते की २-२,३-३ दिवस प्रेत सडत राहते घरामध्ये. त्याला दफनासाठी जागा मिळत नाही त्यांची भावना लक्षात घेऊन ही काळाची गरज आहे.

**प्रविण पाटील :-**

चांगली जागा द्या वादग्रस्त जागा कशाला देत आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ती वादग्रस्त जागा नाही आहे. आरक्षण आहे आणि ते १९९७ चे आहे. ठराव केलेला आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम मला एक सांगा की ही जागा तुम्ही म्हणता आरक्षण आहे. सगळ काही आहे हे साधारणतः याच्यासाठी किती वेळ जाईल. मला एवढे सांगा किती वेळ जाईल? दफनभुमी आणणार असाल तर महापौर मॅडम बोला मला उत्तर द्या. सांगा ही दफनभूमी होण्यासाठी ह्या जागेवर आरक्षितवर करायचे म्हणत आहेत मग त्याच्यावर होण्यासाठी किती वेळ लागेल सांगा.

**मा. महापौर :-**

पाठपुरावा करु ते करणार ना.

**निलम ढवण :-**

किती वेळ जाईल.

**मा. महापौर :-**

ती नंतरची वेळ आहे. मी ठराव मंजूर करते. पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

सचिव साहेब आमचा ठराव आहे.

**मा. उपमहापौर :-**

ठराव असेल तर तुमचा ठराव द्या.

**तारा घरत :-**

महापौर मॅडम मी एक सुचना करते. जसा बोहरा समाज आणि मुसलमान समाज आहेत. तसा एक लिंगाई समाज आहे. हिंदु आहेत त्यांनाही दफनासाठी दफनभुमी जर होत असेल तर त्यांचाही विचार करावा.

**मा. उपमहापौर :-**

त्याचीही नोंद घेतली जाईल.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम माझे म्हणणे एकच आहे की दफनभुमी त्यांना लवकरात लवकर मिळावी. पण हे तुमचे पेपर वर्क करेपर्यंत तुम्ही त्यांना पिरेड द्या नाही तर बोहरी समाजाला खुश करण्यासाठी कुठची वक्तव्य नको. त्यांना जास्तीत जास्त दफनभुमीची गरज आहे. हे मी स्वतः आमच्या वॉर्डात काय अवस्था आहे ती मी बघितलेली आहे. त्यांना लवकरात लवकर गरज आहे. पण मला वाटत नाही हे तुम्ही फक्त वादग्रस्त त्या समाजाला खुश करण्यासाठी हा विषय घेतलेला आहे आणि इथे वादग्रस्त विषय आणून ठेवलेला आहे.

**मा. महापौर :-**

तस काही नाही ताई.

**निलम ढवण :-**

आणि त्या लोकांना सांगायच की विरोधकांनी विरोध केला. आम्हाला गरज आहे दफनभुमी पाहिजे. ते लवकरात लवकर म्हणून डी.पी. मधून घेऊन त्यांना बनवून द्यावी.

**प्रविण पाटील :-**

**मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) मौजे नवघर सर्व्हे क्र. 209 या शासकीय जागेवर दफनभूमी (आरक्षण क्र.1223) आरक्षण आहे. तसेच आरक्षण क्र.122 क मैदानासाठी आरक्षित आहे. सदर दफनभूमीची जागा मा . जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि .7/10/2010 रोजीच्या आदेशानूसार अतिक्रमणा पासून संरक्षणासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेली आहे. परंतु हया जागेवर कांदळवन असून त्याच सर्व्हे वन विभागाकडे आहे. वन विभागामार्फत सदरची जागा ही अतिसंवेदनशिल असल्याने फॉरेस्ट कॉत्सरवेशन ॲक्ट प्रामणे कोणत्याही प्रकारचे कांदनवन येथे काढू शकत नाही असे सक्त आदेश वनविभागाचे आहेत. त्याही पुढे जाऊन याठिकाणी २००५ साली मनपा मार्फत कचरा टाकण्यात आला होता व कांदळवनाचा ऱ्हास झाला होता . त्यामुळे ठेकेदार व मनपाच्या अधिकाऱ्यांवरती मिरारोड पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल आहे . हया सर्व बाबींचे गांभीर्य लक्षात घेवून मा. उच्च न्यायालयाने सदरची जागा पुर्ववत (रिस्टोर) करण्याचे आदेश दिलेले असूनही सदरच्या जागेबाबत असा प्रस्ताव आणणे चुकीचे आहे . तरी सदर प्रकरणी वन विभाग /मा. जिल्हाधिकारी व यांच्या व मा. उच्च न्यायालय यांच्या कांदळवन हरितलवाद व पानथळ क्षेत्र हया सर्व बाबींचा विचार करावा.**

**त्याचप्रमाणे बोहरा समाजाच्या लोकांसाठी दफनभुमी व्हावी अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. परंतु ज्या ठिकाणी त्यांची लोकवस्ती आहे त्याठिकाणी त्याच्या दफनभुमिची प्रस्तावित जागा येणाऱ्या नविन विकास आराखड्यामध्ये मंजूर करावी . त्याचप्रमाणे या जागेवरती २००३ पासून ज्या बंदरवाडी विभागातील रेल्वेच्या हद्दीतील काढण्यात आलेल्या झोपड्या हया ठिकाणी आहेत . त्यांचेही कायदेशीर बाबी तपासून पुर्नवसन करावे व जागेवर पूर्वीपासून असलेले कांदळवनाची जोपासना महानगरपालिकेने करावी असा मी ठराव मांडत आहे.**

**अनंत शिर्के :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. मदन सिंह, अनुमोदन श्रीम. शानु गोहिल. दुसरा ठराव सुचक श्री. प्रविण पाटील, अनुमोदन श्री. अनंत शिर्के. प्रथम दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. प्रविण पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. मदन सिंह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

श्री. मदन सिंह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४८, विरोधात १८, तटस्थ ११ इतकी मते पडलेली आहेत. श्री. मदन सिंह यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ४३ :-**

**नवघर येथील स्मशानभुमी आरक्षण क्र . १२२ क व ड मधील जागा बोहरा समाजाच्या दफनभूमीकरिता देणेबाबत.**

ठराव क्र. ४० :-

**प्रस्तावना :-**

**मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) मौजे नवघर सर्व्हे क्र. 209 या शासकीय जागेवर दफनभूमी (आरक्षण क्र.1223) आरक्षण आहे. तसेच आरक्षण क्र.122 क मैदानासाठी आरक्षित आहे. सदर दफनभूमीची जागा मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि .7/10/2010 रोजीच्या आदेशानूसार अतिक्रमणा पासून संरक्षणासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेली आहे. तथापी सदर जागा हस्तांतरीत करण्यापूर्वीपासून सदर जागेवर झोपड्या आहेत . तथापी अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सदर झोपड्या हया 2000 पूर्वीच्या समजून झोपडीधारकांनी केलेले अपिल**

अशत: मान्य केलेले आहे. तत्पूर्वी सदर झोपड्या या बंदरवाडी येथे रेल्वेच्या जागेवर होत्या व रेल्वेने सदर झोपड्या हटविल्याने 2003 मध्ये ते नवघर येथील दफनभूमीच्या जागेवर स्थलांतरीत झालेले आहेत. सदर झोपड्या ह्या 2003 नंतर सदर जागेवर वसल्याने झोपडी धारकांचे अपिल अमान्य करून सदर झोपड्या हटवून देण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे पाठपूरावा करण्यात येत आहे.

सदर जागेवर दफनभूमी विकसित करण्यासाठी सदर जागा हस्तांतरीत करण्याकरीता मा . जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपूरावा करण्यात येत आहे . दरम्यानच्या काळात सदर जागा ही सी .आर.झेड. ने बाधित होत असल्याने सदर प्राधिकरणाची परवानगी घेऊन तारेचे कुंपण व माती भराव करून जागा समतल करण्यात आलेली आहे.

ठराव क्र.

प्रशासनाच्या प्रस्तावानूसार सदर जागा दफन भूमीसाठी विकास आराखड्यात आरक्षित असून उपलब्ध जागेपैकी काही भाग बोहरा समाजाला दफनभुमीसाठी देण्या त यावा असा मी ठराव मांडत आहे. तसेच इतर समाजाच्या दफन भुमीसाठी मागणी आल्यास त्याबाबत संबंधीत समाजाला दफनभुमीसाठी जागा दयावयाची असल्यास लोकसंख्येनुसार क्षेत्र निश्चित करुन आयुक्तांनी तसा प्रस्ताव मा. महासभेपूढे सादर करावा.

सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह अनुमोदन :- श्रीम. शानु गोहिल

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शाह रिटा सुभाष | १ | ढवण निलम हरीश्चंद्र | १) परदेशी गिता हरीश |
| २ | पांडेय पंकज सूर्यमणि | २ | कदम अर्चना अरुण | २) पाटील नरेश तुकाराम |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | नलावडे दिनेश दगडु | ३) सय्यद नुरजाहॉ नाझर हुसैन |
| ४ | गोहिल शानू जोरावर सिंह | ४ | गुप्ता कुसुम संतोष | ४) शेख अमजद गफार |
| ५ | कांगणे मीना यशवंत | ५ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | ५) शेख रुबीना फिरोझ |
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | घरत तारा विनायक | ६) डिसा मर्लिन मर्विन |
| ७ | शेट्टी गणेश गोपाळ | ७ | पांडे स्नेहा शैलेश | ७) मेहरा राजीव ओमप्रकाश |
| ८ | भोईर गणेश गजानन | ८ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | ८) सपार उमा विश्वनाथ |
| ९ | पाटील प्रभात प्रकाश | ९ | शिर्के अनंत गेणू | ९) अहमद साराह अकरम |
| १० | रावल मेघना दिपक | १० | पाटील वंदना विकास | १०) इनामदार जुबेर अब्दुल्ला |
| ११ | शाह राकेश रतिशचंद्र | ११ | पाटील संध्या प्रफुल्ल | ११) शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम |
| १२ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १२ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १३ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १३ | भोईर कमलेश यशवंत | |
| १४ | जैन गीता भरत | १४ | पाटील अनिता जयवंत | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | भोईर भावना राजू | |
| १६ | जैन राजेंद्र भवरलाल | १६ | भोईर राजू यशवंत | |
| १७ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १७ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| १८ | व्यास रवि वासुदेव | १८ | बांड्या एलायस दुमिंग | |
| १९ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| २० | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| २२ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | | | |
| २३ | मेहता डिंपल विनोद | | | |
| २४ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २५ | थेराडे संजय अनंत | | | |
| २६ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २७ | वैती चंद्रकांत सिताराम | | | |
| २८ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| २९ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| ३० | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३१ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३२ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३३ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ३४ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३५ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३७ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३८ | नाईक विविता विवेक | | | |
| ३९ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ४० | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४१ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ४२ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४३ | भावसार वंदना संजय | | | |
| ४४ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ४५ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४६ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४७ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४८ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४४, **महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणेबाबत.**

रवि व्यास :-

**प्रस्तावना :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) जुन्या रेल्वे फाटकाजवळील चौकाचे नामकरण मा. महासभा दि.19/10/2005 ठराव क्र.52 अन्वये महाराणा प्रताप चौक असे करण्यात आलेले आहे. सदर चौकाचे सुशोभिकरण करुन त्यामध्ये महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणे कामी श्री. महाराणा प्रताप एकता संच , भाईंदर यांनी दि .04/07/2008 रोजी परवानगी मागितलेली होती . सदर पत्राच्या अनुशं गाने श्री. महाराणा प्रताप एकता संच यांना दि .25/07/2008 रोजी परवानगी देण्यात आली असुन त्यांनी सदर चौकाचे बांधकाम केलेले आहे . सदर चौकात महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणेसाठी परवानगी करीता जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे दि .09/06/2009 रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असुन सदर कार्यालयाने दि .16/11/2016 रोजीच्या पत्रान्वये पुतळे उभारण्यासंबधी शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविलेले आहे . सदर पत्राच्या अनुषंगाने मा . महासभेची मान्यता आवश्यक असुन सदर ठिकाणी महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणे कामी मा . महासभेची मान्यता देणेसाठी प्रशासनाने प्रस्ताव दिला आहे.**

**ठराव क्र. :-**

**महापालिकेने भाईंदर (प.) येथे भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणे व भाईंदर (पु.) येथे फाटकाजवळ महाराणा प्रताप यां चा पुतळा बसविणे करीता यापूर्वी मा . महासभेने मान्यता दिली होती. त्याप्रमाणे भाईंदर (प.) येथे भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारून त्याचे अनावरण झाले . भाईंदर (पू.) येथील महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणेकरीता एका खाजगी संस्थेच्या मागणीनुसार परवानगी दिली होती. परंतु त्या संस्थेचे संस्थापक दरम्यानच्या काळात मयत झाल्यामुळे सदरचे काम करणेसाठी त्या संस्थेकडून कोणीही सदस्य पुढे येत नाहीत . तसेच सद्यस्थितीत त्याठिकाणी चौथऱ्याचे काम पूर्ण झाले असून फक्त त्याठिकाणी महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणे बाकी आहे . त्यामुळे सदरचा पुतळा महापालिकेतर्फे बसविण्यात यावा त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक ती शासकीय परवानगी घेण्याची जबाबदारी आयुक्तांची राहील . तसेच पुतळा बसविण्याकामी लागणाऱ्या आर्थिक व प्रशासकीय मंजुरी तसेच येणाऱ्या खर्चाच्या वाढीव रक्कमेस पुर्नविनीयोजन करणेचे अधिकार आयुक्तांना देणेत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**राकेश शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम यहा विषय लाने के लिए मैं आप लोगो का कमीशनर साहब को, उपायुक्त साहब को बहुत बहुत धन्यवाद देती हूँ। विश्वविर हमारे देशके स्वाभिमान एवंम गौरव श्री. महाराणा प्रतापजी पुरे राजस्थान के आनबान और शासन कहे जानेवाले तथा साथही साथ भारत देश के महान पुरुष कहे जानेवाले ऐसे महान पुरुष का पुतला बनाने का जो कार्य करनेका विषय लाए है उसके लिए मैं आप सभी लोगो का बहुत धन्यवाद व्यक्त करती हूँ। मा. श्री. महाराणा प्रतापजी पुरे देश में ही नही बल्की विश्व में उनकी ख्याती बहुत ही महानता और ख्याती फैली हुई है। उदाहरण के तौरपर मैंने एक किताब में पढा है की व्हिएतनाम के देश में जब आझादी के लिए लोग संघर्ष कर रहे थे उनके जो नेता थे उन्होंने श्री. महाराणा प्रतापजी को अपना आदर्श मानकर अपनी आझादी की लढाई को संघर्ष को आगे बढाया था और बाद में उन्होंने यह भी कहा था की महाराणा प्रतापजी अगर हमारे व्हिएतनाम में जन्मे हुए होते तो हमारा देश और की पहले आजादी पा लिया होता। इसके साथ ही मैं मा.श्री. महाराणा प्रताप एकता मंच के सभी संस्थापक स्वर्गीय समाज से भी कोई भाईदौलत सिंग भाटीजी को आज इस अवसर पर नमन करते हुए मैं उन्हें भी धन्यवाद व्यक्त करती हूँ की उन्होंने श्री. महाराणा प्रतापजी का पुतला बनाने का और चौक बनाने का और उनका अश्वरोहित पुतला बनाने का जो कार्य हात में लिया था और सतत उसपे कार्यरत रहे थे उन्हें आज में नमन करते हुए और उन संस्था की में सदस्य होने के नाते आप सभी लोगो से विनंती करती हूँ प्रशासन से विनंती करती हूँ की इस विषय पर उनका पुतला बनाने के लिए जो भी

आवश्यक कार्यवाही हो उसको जल्दी से जल्दी पुरा किया जाए। और मैंने २००९ में एक पत्र दिया था की गोल्डन नेस्ट सर्कल जो मिरा भाईंदर सिटी का हार्ट माना जाता है वहाँ पर स्वातंत्रवीर सावरकर का एक अर्धकृत पुतला लगाया जाए। ऐसा मेरा पत्र २००९ से दिया हुआ है। तो आप सभी लोग उसपे विचार करे स्वतंत्रता सेनानी स्वातंत्रवीर सावरकर का आजादी में बहुत ही बडा योगदान है। उनके उस योगदान को हम मिरा भाईंदर वासियों के तरफ से एक सच्ची श्रध्दांजली समज के जल्द से जल्द उनके पुतला का अनावरण करे यह में आप लोगो से विनंती करती हूँ। धन्यवाद.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, विशेष महासभा दि. ०५/०७/२०१६ ला आपण राष्ट्रपती अब्दुल कलामजी तसेच लोहपुरुष सदार वल्लभभाई पटेल नंतर जिजामाता, लोकमान्य टिळक, सावित्रीबाई फुले आणि वि.दा. सावरकर यांचे देखील आपण ह्या सर्व महापुरुषांचे पुतळे उभारण्यासाठी आपण ठराव केलेला होता. तर त्याची प्रोसिजर कुठपर्यंत आली जरा कळेल का?

**मा. उपायुक्त :-**

याबाबत कन्सल्टन्स नेमण्याची निविदा काढलेल्या होत्या निविदा ओपन झालेली आहे. त्याची प्रोसेस चालु आहे.

**निलम ढवण :-**

सगळ्यांची ना धन्यवाद.

**मा. उपमहापौर :-**

महाराणा प्रताप यांचा पुतळा श्री. महाराणा प्रताप एकता संघ यांच्या माध्यमातून हे प्रयत्न सुरु होते आणि स्व. दौलन सिंग भाटी हे हयात असेपर्यंत त्यांनी जो ग्रुप बनविलेला होता. त्यांच्या माध्यमातून त्या संघटनेने चौथरा बसविण्यापासून सगळी कामे केलेली आहेत. परंतु दुर्देवाने ते आपल्यात आज नाहीत. आणि हा अत्यंत एक स्वाभिमानाचा विषय असा अस्मियतेचा विषय याच्यासाठी महापालिकेने ह्या संदर्भात ज्या-ज्या आवश्यक बाबी आहेत ज्या पाठपुरावा करायच्या आहेत शासनाचे जे मार्गदर्शक तत्व आहेत त्या पध्दतीने ह्या कामाला सुरुवात करायची आहेत. निलम ताईने आता जो विषय मांडला की आपला तो ठराव आहे. ह्या संदर्भात शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे ह्या सगळ्या गोष्टी सुरु आहेत. त्याच प्रोसिजरमध्ये हा विषय व्हावा याच्यात दुसर कोणाचे दुमत असण्याचे कारण मला वाटत नाही.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ४४ :-**

**महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणेबाबत.**

ठराव क्र. ४१ :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) जुन्या रेल्वे फाटकाजवळील चौकाचे नामकरण मा. महासभा दि.19/10/2005 ठराव क्र.52 अन्वये महाराणा प्रताप चौक असे करण्यात आलेले आहे. सदर चौकाचे सुशोभिकरण करुन त्यामध्ये महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणे कामी श्री. महाराणा प्रताप एकता संच, भाईंदर यांनी दि .04/07/2008 रोजी परवानगी मागितलेली होती. सदर पत्राच्या अनुशंगाने श्री. महाराणा प्रताप एकता संच यांना दि .25/07/2008 रोजी परवानगी देण्यात आली असुन त्यांनी सदर चौकाचे बांधकाम केलेले आहे . सदर चौकात महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणेसाठी परवानगी करीता जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे दि .09/06/2009 रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे . सदर कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असुन सदर कार्यालयाने दि .16/11/2016 रोजीच्या पत्रान्वये पुतळे उभारण्यासंबधी शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविलेले आहे . सदर पत्राच्या अनुषंगाने मा . महासभेची मान्यता आवश्यक असुन सदर ठिकाणी महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणे कामी मा . महासभेची मान्यता देणेसाठी प्रशासनाने प्रस्ताव दिला आहे.**

**ठराव क्र. :-**

**महापालिकेने भाईंदर (प.) येथे भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणे व भाईंदर (पु.) येथे फाटकाजवळ महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणे करीता यापूर्वी मा . महासभेने मान्यता**

**दिली होती. त्याप्रमाणे भाईंदर (प.) येथे भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारून त्याचे अनावरण झाले. भाईंदर (पू.) येथील महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणेकरीता एका खाजगी संस्थेच्या मागणीनुसार परवानगी दिली होती. परंतु त्या संस्थेचे संस्थापक दरम्यानच्या काळात मयत झाल्यामुळे सदरचे काम करणेसाठी त्या संस्थेकडून कोणीही सदस्य पुढे येत नाहीत . तसेच सद्यस्थितीत त्याठिकाणी चौथऱ्याचे काम पूर्ण झाले असून फक्त त्याठिकाणी महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणे बाकी आहे . त्यामुळे सदरचा पुतळा महापालिकेतर्फे बसविण्यात यावा त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक ती शासकीय परवानगी घेण्याची जबाबदारी आयुक्तांची राहील . तसेच पुतळा बसविण्याकामी लागणाऱ्या आ र्थिक व प्रशासकीय मंजुरी तसेच येणाऱ्या खर्चाच्या वाढीव रक्कमेस पुर्नविनीयोजन करणेचे अधिकार आयुक्तांना देणेत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. रवि व्यास अनुमोदक :- श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४५, **प्रभाग समितींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ चा ८ प्रमाणे अधिकार प्रदान करणेबाबत.**

राजेंद्र जैन :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील प्रभाग समितींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ चा 8 मधील तरतुदीनुसार सदर समितीला त्याच प्रभाग समितीमधून नागरीकांची कामे सक्षमरित्या करणेकरीता 74 व्या घटना दुरुस्तीप्रमाणे खालीलप्रमाणे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.**

1) **प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रा त पार पाडावयाच्या 10 लाख रुपयापर्यंतच्या खर्चाच्या पालिका बांधकामाच्या नकाशांना प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजुरी देणे , मात्र महानगरपालिकेने मंजुर केलेल्या अर्थसंकल्पात त्यासाठी विर्निदिष्ट तरतुद केलेली असली पाहिजे.**
2) **प्रभाग क्षेत्रातील इमारतींना कर आकारणी करणे, पाणी नळ जोडणी करणे , जाहिरात व होर्डींग्ज लावणेकामी परवानगी देणे, जन्म-मृत्यु दाखले देणे.**
3) **महानगरपालिकेतील नागरीकांना कारखाने, दुकाने यांना नुतनीकरण व नविन परवाना देणे.**
4) **घर दुरुस्ती व कंम्पाऊंड वॉल दुरुस्ती परवानगी देणे.**
5) **आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवून साफसफाई व इतर आरोग्य विषयक बाबींवर कामे करणे.**
6) **महापालिकेच्या शाळांवर नियंत्रण ठेवणे.**
7) **फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्रावर नियंत्रण ठेवणे.**
8) **अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणे काढून टाकणे व अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवणे.**
9) **इतर आवश्यकतेप्रमाणे नियंत्रण ठेवणे.**

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**स्नेहा पांडे :-**

मॅडम इस विषय का गोषवारा नही आया था। मैं आप लोगोसे यह जानना चाहती हूँ की २९ अ, ८ प्रमाणे यह कलम कितने लोगो को हम सभी सदस्य नए है सभागृह में हम लोगो को यह जानकारी तो होना चाहिए की, इस कलम में क्या आता है और क्या-क्या अधिकार है। तो इसके लिए प्रशासन से फिर

से विनंती है की कोई भी विषय आता है तो उसके उपर गोषवारा जरुर दे। कितने लोगो को मालुम है की २९ अ, ८ में क्या है?

**राजेंद्र जैन :-**

सचिव साहेब ने थोडी ही देर पहले बोला है की किताबे वहाँ से कलेक्ट करलो उनके ऑफिस में से।

**स्नेहा पांडे :-**

यह सभा खत्म होने के बाद उनके ऑफीस में से कलेक्ट करने के बाद क्या मतलब है। गोषवारा जब आता है विषयपत्रिका पे आता है तब गोषवारा साथ में आना चाहिए जो भी प्रशासन का मत है वह सामने आना चाहिए। यहाँ के सबसे सिनियर मेंबर काकाजी है। मैं उनसे विनंती करती हूँ की उनको पता होगा तो हम लोगो को बताईए क्योंकी प्रशासन तो हमेशा दिशाभुल करने का ही काम कर रहे है। कोई भी प्रश्न पुछने पे जवाब आपको बाद में मील जाएगा। आप ऑफीस में आके ले लिजीए। फिर महासभा लगाने का मतलब ही क्या है मॅडम। यह बताइए जब विषय आ रहा है तब गोषवारा साथ में आना चाहिए हमको जो समज में आएगा हम उस पर डिस्कस करेंगे। गोषवारा ही नही रहता है हम क्या डिस्कस करेंगे बाद में अधिकारी बोलता है आपको बाद में दे दिया जाएगा यहाँ हम पास करे बाद में उस पर हमको जानकारी मिले सही है, गलत है मतलब क्या है उसका।

**राजेंद्र जैन :-**

मॅडम महासभा अभी कॉलेज बन गई है। करिए प्रायमरी स्कुल नही रही है कॅरी करके आइए, होमवर्क करके आईए प्लीज।

**स्नेहा पांडे :-**

आप भेजोगे गोषवारा तब हम करेंगे ना। डॉ. साहब मैंने आपसे जवाब मांगा नही आप बिच में बोलने की जरुरत नही।

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी बसुन घ्या.

**प्रकरण क्र. ४५ :-**

**प्रभाग समितींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिय म कलम २९ अ चा ८ प्रमाणे अधिकार प्रदान करणेबाबत.**

ठराव क्र. ४२ :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील प्रभाग समितींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ चा 8 मधील तरतुदीनुसार सदर समितीला त्याच प्रभाग समितीमधून नागरीकांची कामे सक्षमरित्या करणेकरीता 74 व्या घटना दुरुस्तीप्रमाणे खालीलप्रमाणे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.**

1) **प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रात पार पाडावयाच्या 10 लाख रुपयापर्यंतच्या खर्चाच्या पालिका बांधकामाच्या नकाशांना प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजुरी देणे , मात्र महानगरपालिकेने मंजुर केलेल्या अर्थसंकल्पात त्यासाठी विर्निदिष्ट तरतुद केलेली असली पाहिजे.**
2) **प्रभाग क्षेत्रातील इमारतींना कर आकारणी करणे , पाणी नळ जोडणी करणे , जाहिरात व होर्डींग्ज लावणेकामी परवानगी देणे, जन्म-मृत्यु दाखले देणे.**
3) **महानगरपालिकेतील नागरीकांना कारखाने, दुकाने यांना नुतनीकरण व नविन परवाना देणे.**
4) **घर दुरुस्ती व कंम्पाऊंड वॉल दुरुस्ती परवानगी देणे.**
5) **आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवून साफसफाई व इतर आरोग्य विषयक बाबींवर कामे करणे.**
6) **महापालिकेच्या शाळांवर नियंत्रण ठेवणे.**
7) **फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्रावर नियंत्रण ठेवणे.**
8) **अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणे काढून टाकणे व अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवणे.**

**9) इतर आवश्यकतेप्रमाणे नियंत्रण ठेवणे.**

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदक :- श्री. मनोज दुबे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६, **महानगरपालिका क्षेत्रातील मोकळया जागेचा वापर लग्न कार्यासाठी केला जातो त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणेबाबत धोरण ठरविणे.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, ४६ आणि ४७ दोन्ही विषय सेम आहेत. दोन्ही विषयांचे वाचन एकदाच करावे. ठराव पण सेमच आहेत.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७, **महानगरपालिकेचे आरक्षणाखाली असलेली जागा जी मनपाकडे हस्तांतरण केलेली नाही त्यावर भाडे वसुल करुन वाणिज्य वापर करतात त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे.**

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम विषय आणला परंतु प्रशासनने गोषवारा दिलेला नाही. ठिक आहे चर्चेसाठी तरी येऊ शकतो प्रशासनाने आपली भुमिका स्पष्ट करावी. असे करता येते का? होऊ शकते का आमच्याकडून काही तरी असे विचित्र घडू नये नियमबाह्य कृती आमच्याकडून होऊ नये म्हणून आम्हाला प्रशासनाने माहिती द्यायची.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ही कृती नियमबाह्य नाही विषय दोन्ही सिमीलर आहेत म्हणून आम्ही विनंती केली.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही दोन्ही एकत्र घ्या त्याचा विषय नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी एक्सेप्ट केली.

**स्नेहा पांडे :-**

पाटील साहेब आप विनंती कर रहे है की मोकळी जागा हमारे बिल्डींग के कम्पाऊंड में भी है। उस पर भी दंडात्मक कारवाई होगी गाव है बंदरवाडी, नवघर गाव, राई, मोर्वा, मुर्धा सब गाव के घरके बाहर उनकी जगह है। उनपर भी होगी। मोकळी जगह की परिभाषा देके विषय लाईए ना मोकळी जगह म्हणजे काय?

**मा. उपमहापौर :-**

स्नेहाजी हा विषय आणण्याचे प्रमुख कारण असे होते की, ह्या शहरामध्ये मोठ्या प्रमाणात आता लग्नसराई सुरु आहेत. ही लग्नसराई सुरु असताना असे निदर्शनास आले की ज्या लोकांच्या प्लॉटमध्ये काही रिझर्व्हेशन आहेत ते महापालिकेकडून टी.डी.आर न घेता किंवा ती जागा तशीच ठेवलेली आहे. ती महापालिकेला हस्तांतरीत केली नाही ते रिझर्व्हेशन आणि त्याचा वापर त्या मोकळ्या जागेचा वापर एकतर ते लग्न सराईच्या हॉलसाठी करत आहेत. मार्बल वाल्यांना ते दिलेले आहेत. गॅरेजवाल्यांना त्या जागा भाड्याने दिलेल्या आहेत. आणि जेव्हा त्या जागेमध्ये महानगरपालिकेच डी.पी. चे आरक्षण आहे त्यावेळेला त्या जागेतुन तो जर उत्पन्न घेत असेल मालक तर त्याच्यावरती महापालिकेचे कुठचे तरी बंधन आले पाहिजे. कंट्रोल आले पाहिजे अशा ठिकाणी ब-याच वेळेला लग्नसराईच्या किंवा इतर प्रकारच्या पार्ट्या होतात किंवा काही लोक दुकाने चालवतात त्याठिकाणी हॉटेल चालवतात अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणात आपण बघितल आपल्या सगळ्या शहरातल्या सगळ्या इंन्फ्रास्ट्रक्चर वापर ते लोक घेत असतात मोठ्या प्रमाणात जेवणाच्या त्या पत्रावळ्या, ताट ते टाकाऊ अन्न पदार्थ, ग्लास, कचरा, प्लास्टीक ह्या सगळ्या गोष्टी त्या ढिगा-यात पडलेले असतात. संभवतः आपल्याला सफाई करण्याची जबाबदारी महापालिकेची बनते. ज्या-ज्या ठिकाणी असे हे कार्यक्रम होत असतात. त्याठिकाणी आपण पाहतो. तुमच्या आमच्यासारखे

लोकप्रतिनिधी ते सांगतात की ह्या ठिकाणी आज लग्न आहे त्या ठिकाणी जावून स्प्रेईंग करा. पावडर टाकायला सांगा जागा लेव्हल करायला सांगा ह्याही गोष्टी ते करुन घेतात. ह्या मोकळ्या जागा याचा अर्थ ज्या जागांचा कमर्शियल उपयोग केला जात आहे. म्हणजे भाड्याने दिल्या जात आहेत आणि त्याच्या ऐवजी काहीतरी मिळकत घेतली जात आहे. मिळकतपासून उत्पन्न घेतले जात आहे अशा जागा त्याठिकाणी सामाजिक कार्यक्रम असतील आणि मोफतमध्ये करत असतील तर त्या जागा आम्ही सांगत नाहीत. सर्वसाधारण कुठेही मोकळ्या जागेत मंडप घालून लग्न केले जातात त्या जागेला तो चार्ज नाही तर त्याचा फक्त कमर्शियल वापर करत आहेत त्यांच्यासाठी काही ना काही चार्ज असावा ह्या भावनेतून हा विषय आणलेला आहे. आणि बघा ते मार्बलवाले वगैरे ते काही अशी जागा विकत घेऊन बसलेले नाहीत. ते कुठचे आरक्षण आहे किंवा एक आर.जी.चा कोपरा त्यावर बसलेला आहे. त्याच्यात ते बसतात मला त्याच्यावरती कुठची शास्ती लागली पाहिजे त्यांच्यावर कुठचे बंधन आले पाहिजे आणि याच्यात आपल्या भावना आपण व्यक्त केल्यात तर अधिक चांगले राहील. हा संपूर्ण शहरात कुठल्याही मोकळ्या जागेला टॅक्स लावायचा नाही त्याला वाणिज्य वापर होत आहे अशा वास्तुंना आपण टॅक्स खाली आणतो.

**मर्लिन डिसा :-**

ज्या प्राईव्हेट आर.जी. प्लॉट आहेत आणि ज्या प्लॉटमुळे घाणीचे साम्राज्य वाढत आहे आणि तिकडे आरोग्याला धोका आहे त्या लॅन्ड ओनर्सचे काय करणार? जी विकासकांची जागा आहे ती शहरांच्या लोकांसाठी त्यांनी डेव्हलप केलेली नाही. तिकडे त्यांची राईट्स आहेत. जे त्यांनी फ्लॅट विकलेले आहेत त्यांचा तो हक्क आहे बिल्डरने त्यांना डेव्हलप करुन द्यायला पाहिजे होते. पण ज्यांनी दिलेले नाही आणि फक्त तिकडे गाभ्यांची डंम्प झालेली आहे. तर त्यांच्यावर आपण काय ॲक्शन घेणार आपण त्यांच्याकडून टॅक्स वसूल करणार का? असे जे विकासक आहेत त्यांच्यावर काय पनिशमेंट आहे तिकडे छोटी मुले आहेत त्यांना खेळायला जागा मिळत नाही. आजुबाजुला शाळा आहेत. तिकडे त्यांना आरोग्याचा धोका आहे.

**जुबेर इनामदार :-**

थोडक्यात कसे आहे मोठ्या संकुलाचा लेआऊट त्याच्यामध्ये सोडलेल्या आर.जी. ह्या आर.जी. चे वापर संस्थेची लोक करत नाही कारण त्याचे जतन तो करु शकत नाही तेवढा खर्च तो करु शकत नाही. ती जागा तशीच पडलेली आहे. त्या जागेवर विकासक ती जागा भाड्यावर देतो किंवा ज्याप्रकारे तुम्ही उल्लेख केला की तेथे खाणीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे. अशा जागेचे कारण ही मोकळी जागा त्याच्यामुळे सुध्दा ते मोडेल ना मग अशा जागेचे काय? असे मोठमोठे संकुल मिरा भाईंदरमध्ये बरेच आहेत आणि त्यांच्या आर.जी. तसेच पडलेले आहेत.

**मर्लिन डिसा :-**

प्राईव्हेट प्लॉट्स पण आहेत.

**जुबेर इनामदार :-**

त्या संस्थेच्या लोकांनी त्याला विकसीत केल नाही कारण त्यांची आर्थिक परिस्थिती तेवढी नसते. आयुक्त महोदय म्हणून हा विषय जो आहे विषय चांगला आहे. मात्र माझी सत्ताधाऱ्यांना विनंती राहील की हा विषय गोषवारासहित आणा. साहेब की मोकळ्या जागेचे डेफिनेशन काय? आर.जी. असणार आहेत. आता काकांची आमची शेतजमीन असेल तर ती मोकळीच जागा आहे. आता त्याच्यावरती त्यांनी शेती करत नाही म्हणून ती जागा त्यांनी बांधकामासाठी घेतलेली नाही. आपण आपला एक नियम आहे मोकळ्या जागेवरती कर सी.सी. टू. ओ.सी. बांधकाम परवानगी दिल्यानंतर ओ.सी. पर्यंत किंवा टॅक्स लागेपर्यंत त्याला आपण मोकळ्या जागेचा कर आकारणी करतो. तसाही प्रकार इथे नाही ह्या शहरामध्ये बरीच शेत जमीन आहेत. आणि त्या लोकांनी अशा जमिनिमध्ये त्यानी स्वतःचा व्यवसाय करायचा किंवा भाड्यावर द्यायचा किंवा लग्न कार्य करायचे किंवा कोणाला गोडाऊनसाठी जागा दिली तर त्या जागेवर सुध्दा आपण अशाप्रकारे त्याच्यावर काय दंडाची कारवाई करणार का? किंवा शुल्क वसुल करणार का? हा स्पष्ट विषय होत नाही म्हणून असे जे विषय आहेत त्या आरक्षणाचा आपण विषय आणलेला आहे. आरक्षणामधली जागा समजा माझे एक आरक्षण आहे. पालिकेने त्याला भुसंपादन करुन घेतलेलेच नाही काही अडीअडचणी असु शकतात त्याच्या आणि अशा आरक्षणाला असच ठेवता येत नाही म्हणून मी त्याला काहीतरी मार्गी लावले काही कामाला दिले, कोणाला नर्सरी लावले. सध्या सध्या आरक्षणामध्ये मॅक्झीमम नर्सरीस चालतात. शहरामध्ये एवढे दिसुन यते. अस समजा त्याने भाड्यावर दिले आहे त्याचे उत्पन्न त्याची मालकी हक्काची जागा आहे. त्याने टी.डी.आर. घेतला नाही म्हणून त्याचा मालकी हक्क काही गेलेला नाही. तो पालिकेचा

नाही. मग अशा भुखंडावर तुम्ही काय विषय चांगला मात्र त्याचा गोषवारा पाहिजे. त्याचा अभ्यास पाहिजे असे माझे त्या विषयावर मत आहे.

**मर्लिन डिसा :-**

२०१० मध्ये शासनाचा जी.आर. आला होता ह्या मोकळ्या जागा ज्यांनी घेतलेल्या आहेत ते घेऊन डेव्हलप करुन द्यायचे म्हणून आला होता.

**मा. उपमहापौर :-**

ह्या विषयामध्ये मी आता जे निवेदन केले किंवा हा विषय आपल्या सभागृहासमोर आणण्याचे एक प्रामाणिक धोरण असे आहे की आता आपण बघितल प्रशासनाने त्याच्यामध्ये टिप्पणी दिली नाही किंवा त्याच त्यात आम्ही आपला विषय येईपर्यंत अभ्यास पूर्ण झाला नसेल. माझे निवेदनाने स्पष्ट सांगितलेले की हे मिरा भाईंदर शहर हे शेतकऱ्यांचे आहे. सगळ्या मोकळ्या जागांवरती हा कर लागणार नाही. ज्याचा वाणिज्य वापर होत आहे बघा आज आपण सुरुवात केली तर कुठेतरी हा विषय किनाऱ्याला लागेल. कमर्शिअल वापर होत आहे बघा मार्बलवाले आहेत. गॅरेजवाले आहेत किंवा कार विकणारे आहेत तर ह्या जागांवरती ते व्यापार करत आहेत. आणि ते व्यापार करताना आपल्या शहराचे इन्फ्रास्ट्रक्चर पूर्ण वापरले जात आहे. तर त्यांना कुठच्या न कुठच्या कराखाली आपण आणले पाहिजे. ह्या शहराच्या रस्त्याचा ह्या शहराच्या स्ट्रीट लाईटचा, ह्या शहरातल्या गटाराच्या सांडपाण्याचा, पाण्याचा सगळयाचा लाभ घेतात तर त्यांना कराखाली आणायचे आहे असे नाही की सरसकट लोकांसाठी आपण टॅक्स जो त्याला व्यापारी तत्वावरती वापर करत असेल त्यांच्यासाठी आहे.

**मर्लिन डिसा :-**

पण कमर्शिअल युज करत आहेत. पण जे काही करत नाहीत आणि तिकडे घाणीचे साम्राज्य आहे त्याचे काय? त्याठिकाणी लोकांना आरोग्याचा धोका आहे.

**मा. उपायुक्त :-**

महापौर मॅडम, तुम्हाला ह्या विषयात उत्तर देत आहेत.

**मर्लिन डिसा :-**

हे ३०-३० वर्षापासुन मोकळी जागा आहेत आर.जी. च्या.

**मा. महापौर :-**

वह जो जगह के लिए रहेंगे उनको हम बुलाऐंगे और तत्काळ कारवाई करेंगे आपको जो भी विषय पे ऐसे लोग रहेंगे तो उनको मेरे पास लेके आईए। हम तात्कालीन रुपसे कारवाई करेंगे।

**मर्लिन डिसा :-**

कई बिल्डर है मेरी रिक्वेस्ट है की पुरे मिरा भाईंदर में सबके लिए करो। सेम रुल्स सबको अप्लाय करो। पुरे मिरा भाईंदर में जो भी बिल्डर्स है जिन्होंने जो भी ओपन जगा रखी है वेदर प्राईव्हेट और प्राईव्हेट आर.जी. लेआऊट आर.जी. सब आरक्षण जो भी अभी स्वच्छता अभियान चालु है। उसके अंतर्गत उसका ध्यान रखा जाए।

**मा. महापौर :-**

बिलकुल हमने यह शुरुवात दि है तो उसकी भी सुरुवात हम जरूर करेंगे। यह विषय पे हमारी चर्चा बहुत हो चुकी है।

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम सकाळी हाच विषय मी घेतला होता तो आर.जी. आणि ओपन स्पेसचा त्याच्यावर काही बांधकाम झालेली आहेत. काही अतिक्रमण झालेले आहेत आणि ती जागा तस बघितल तर सर्वसामान्य लोक आपली पुंजी असते ती जाऊन आपली जागा घेतात आणि त्याचा फायदा त्या लोकांना झाला पाहिजे. सर्वसामान्य लोकांना त्याचा फायदा मिळाला पाहिजे. परंतु असे हे बिल्डर किंवा इतर काही अतिक्रमण होतात तर ती आता पूर्वी जी झालेली आहेत ती देखील काढून त्याच्यावर असे जे बिल्डर असतील की त्याचा वापर पालिकेने तुम्हाला कुठली परमिशन दिलेली आहे किंवा पालिकेने तुमच्यासाठी जेवढी जागा दिलेली आहे त्याचाच वापर त्यांनी करावा. त्याच्या व्यतिरिक्त जी जागा त्याने वापर केला असेल तर अशा बिल्डरला ब्लॅक लिस्ट करा किंवा त्याच्यावर कारवाई करा. काहीतरी पेनल्टी कारण याच्या अगोदर हे झाले पाहिजे होते. आता ह्या बिल्डरांना सगळ्या सुविधा आणि सर्वसामान्य लोक कुठून पळापळ करुन पै-पै पैसा जमा करतात आणि आपले एखादी जागा घेतात रुम घेतात. तर त्यांना ती सोय नाही. आणि नियम कायदे कानून सर्वसाधारण सामान्य लोकांसाठी झालेले आहेत. गरीब लोकांसाठी झालेले आहेत. हे धनवान लोकांसाठी नाहीत. हे बऱ्याच वेळा दिसून येते. तर याच्यापुढे विषय अशा चांगल्याप्रकारे घेण्याची खरोखर तयारी आणि तुम्ही घेत आहेत तर त्याप्रमाणे त्याचा उपयोग त्याच्या

विनयोजित चांगल्या गोष्टींसाठी व्हावा. कारण अशा पध्दतीने ठराव झाल्यानंतर पुन्हा त्याचे तिकडे इम्पलीमेन्टेशन करताना तो वेगळ्या प्रकारे होऊ नये त्यामुळे गरिबांना जो जास्तीत जास्त सुविधा गोरगरिब लोकांनाच मिळाली पाहिजे. ह्या धनधनाढ्याच्या पाठीशी उभे राहण्यापेक्षा ज्याचा उपयोग त्यांनाच मिळाला पाहिजे. त्यांच्यावर कारवाई करा.

**गिता जैन :-**

म्हसाळ साहेब मला फक्त एकच विचारायचे आहे. अशी काही मोकळी जागा बिल्डरची आहे किंवा कुणाची आहे त्यावर कोणीही वाणिज्य वापर केला त्यांना आपण करखाली आणु शकतो का? नियम काय सांगतात?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आर.जीतल्या ज्या जागा आहेत मोस्टली लेआऊट मधल्या तर त्या प्रिमायसीस मधल्या लेआऊट मधल्या लोकांसाठी वापरासाठी खर ती असतील.........

**गिता जैन :-**

मी आर.जी. चे विचारले नाही एखादा प्लॉट एखाद्या बिल्डरचा पडलेला आहे आणि त्याने मार्बलचे दुकाने लावलेली आहेत जस वैती साहेब सांगत आहेत. मग त्यांना आपण करखाली आणु शकतो का? त्या बिल्डरला आपण करखाली आणु शकतो का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

त्याचा वाणिज्य वापर झाला. त्याचा वाणिज्य वापर सुरु झालेला आहे. त्याच्यामध्ये आपल्याकडे जस प्रॉपर्टी टॅक्स संदर्भामध्ये स्ट्रक्चरला आपण हे लावतो आणि आपल्या कराधार नियमामध्ये १२७ नुसार काही आपल्या कर आकारण्याला तरतुदी आहेत. त्यानुसार आपण त्यांना वाणिज्य वापरासाठी कर लावू .

**गिता जैन :-**

आरक्षित जागेवर मग तुम्ही भुसंपादन पण करणार नाही आरक्षित जागेवर तुम्ही करही लावणार कस चालणार. भुसंपादन करुन घ्या मग.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आरक्षणासाठी भुसंपादन किंवा टी.डी.आर मार्फत किंवा वाटाघाटी करुन भुसंपादन करणे हा मुद्दा आहे. परंतु ज्या प्रकरणीमध्ये नसेल तर जागा ओपन राहीली आणि नगरपालिकेला उत्पन्नाचे साधन ह्या दृष्टीने याच्याकडे आपण बघायला पाहिजे.

**गिता जैन :-**

पण आपला नियम आहे का? त्यावर कर लावायचा म्हणजे कुठल्या करखाली? त्याने काही आपली परवानगी घेतली नाही किंवा त्यांचे काही ॲग्रीमेंट नसेलच बहुतेक जोपर्यंत मी बघते. त्यांचे ॲग्रीमेंट नसते एखाद्याला सांगते ठिक आहे तु उद्यापासून इथे ठेव लावू शकतो. मग आपण कुठल्या नियमाखाली त्यांना कर लावणार मला फक्त तेच विचारायचे आहे की आपण कुठल्या नियमाखाली कर लावणार आहेत. त्यांचे काय ॲग्रीमेंट नाही त्यांनी दिलेले काहीच नाही. ॲग्रीमेंट बहुतेक जागी तर असे आहे एन्क्लोज झालेले आहे. आरक्षित जागा एन्क्लोज झालेली आहे. म्हणजे इव्हन बिल्डरला ते माहित नाही किंवा माहित आहे तरी तो काही करु शकत नाही. आरक्षित भुखंड आहे. ते एन्क्लोज झालेली आहे. तिथे गॅरेज झालेले आहे. तिथे नर्सरी व्हॉट एवर. मग त्यावेळी तुम्ही बिल्डरला काय सांगणार म्हणजे कसे कर लावणार.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

जिथे घर तिथे कर आपल्याला आता ॲक्टमध्ये पण तरतुद झालेली आहे. जिथे अधिकृत असेल अनधिकृत असेल तिथे आपण कर लावतो आणि शास्ती सुध्दा कर लावायचे ॲक्टमध्ये २६७ नुसार तरतुद झालेली आहे.

**गिता जैन :-**

पण तिथे काही कन्स्ट्रक्शन नाही आहे.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

काही छोटी फार शेड असतात की नाही. शेड असतात बऱ्याच पैकी शेड अनेक ठिकाणी लागलेले आहेत.

**गिता जैन :-**

ॲग्री पण ते बिल्डरने का भराव म्हणजे ते एन्क्लोज झालेली वस्तु आहे. तिथे कोणीतरी एखाद्या माणसाने येऊन नर्सरी चालु केलेली आहे. एकतर तो बिल्डर परेशान आहे. माझी मोकळी जागा मला मिळत नाही.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

त्याच्यामध्ये टाईटलचा प्रश्न नाही. टायटल वगैरे अतिक्रमण हो किंवा काही हो आपण टाईटलबद्दल काही कमेंट्स करत नाही. इन लिव्हा ऑफ इन्फ्रास्ट्रक्चर आपण हा लिव्हिंग करत असतो.

**गिता जैन :-**

पण कोणावर करणार.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

धारक असेल ना.

**गिता जैन :-**

तुम्ही साफ करायला जात नाही कारण विवादीत आहे. तुम्ही क्लीनिंग काही करत नाही.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

ती जागा क्लीन करायचा प्रश्न येत नाही. ते आपले इन्फ्रास्ट्रक्चर वापरतात. तिथे खरेदी करणारा येणारा माणूस आपला रोड वापरतो. आपला स्ट्रीट लाईट वापरतो.

**गिता जैन :-**

ॲग्री करते. मी सांगितले साहेब मी असे सांगतच नाही कर लावू नका. मी सांगते कुणावर लावणार एक विवादीत जमिनिचा तुकडा आहे. तिथे वाणिज्य वापर होत आहे. मी सांगते माझी आहे तुम्ही सांगता तुमची आहे मग कुणावर लावणार. तुमच्यावर की माझ्यावर?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

म्हणून आपल्याकडे लावण्याचे अधिनियमात आणि कराधार नियमामध्ये पण तरतुद आहे. आपण धारक म्हणून लावणार त्याच्यामध्ये टायटलचा प्रश्न येणार नाही.

**गिता जैन :-**

कस काय येणार नाही. कोर्टात विवाद चालु आहे. त्या जमिनिचा आणि तुम्ही सांगता हे येणार नाही कस काय येणार नाही?

**रिटा शहा :-**

त्याच्यामध्ये कस आहे साहेब जो बसला आहे जो धंदा करतो त्याच्यावर लावणार आहेत. भुखंड मालकावर लावणार आहेत की वादात. जो कोर्टामध्ये केस चालु आहे.

**मा. उपमहापौर :-**

माझे असे मत आहे आपण बाजार वसुली जशी करतो फेरिवाल्यांकडून त्यांनी काही शेड बांधलेला नाही. त्यांच्याकडून आपण रोज बाजार फी घेतो, ह्या ठिकाणी मोठा बाजार लावून मोठ्या जागेचा वापर करत असतात. न्यायप्रविष्ठ प्रकरणे असतील त्याबाबत आपली भुमिका निश्चित वेगळी असेल परंतु जो वापर करतोय. व्यावसायिक वापर करतो त्यावर काही तरी कर पाहिजे काहीतरी बंधने पाहिजे.

**गिता जैन :-**

मी तेच सांगत आहे. आपण कुठल्या नियमाखाली घेणार? मला नियम पाहिजे मी अगेन्स्ट नाही. तुम्ही कर घ्या हे करा बरोबर आहे. पण तुम्ही कुठल्या नियमाखाली घेणार आहेत? आणि कुणाकडून घेणार आहेत?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

अनेक ठिकाणी आता मी बघितले, काही ॲग्रीमेंट आहेत, भाडेकरार आहेत काही ठिकाणी.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम आपने यह विषय लाया है इसके लिए बहुत धन्यवाद. लेकिन इसका फिरसे गोषवारा नही है। तो फिरसे डाऊट है की यह कितना इम्प्लीमेंट हो जाएगा और तिसरी बात महापौर मॅडम आपने मुझे आश्वासन दिया है की, आप इसके उपर ॲक्शन लेंगे ॲटलिस्ट अंडर स्वच्छता अभियान हम लोग स्वच्छता का इतना बडा प्रोग्राम ले रहे है देशभर मे तो उसके अंतर्गत कमसे कम ऐसे ओपन प्लॉट पे उपर जो गारबेज डम्प हुआ है उसके उपर ॲक्शन लेने का।

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रशांत दळवी :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खाजगी मालकीचे भुखंड आहेत. सदर भुखंडावरील मोकळ्या जागेचा वापर खाजगी मालकाकडुन लग्न कार्य, खाजगी कार्यक्रम व वाणिज्य स्वरुपाच्या वापरासाठी करण्यात येतो. सदर वापराकरीता महानगरपालिकेची परवानगी घेण्यात येत**

**नाही. सदर मोकळ्या जागेवर कार्यक्रमानंतर मोठ्या प्रमाणावर कचरा, घाण जमा होऊन परिसर अस्वच्छ होतो. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी होत असल्याने वाहतुकीस, रहदारीस अडथळा निर्माण होत असतो. तसेच काही मोकळ्या जागेवर अनधिकृतपणे मार्बल, नर्सरी इ. व्यावसायिक वापर होत असतो. सदर बाबत अग्निशमन विभाग, पोलिस विभाग व वाहतुक विभागाला देखील याबाबत कल्पना नसल्याने काही अपघात घडल्यास मोठी आपत्कालीन परिस्थिती उद्भवु शकते.**

**सबब खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.**

1) **मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात मोकळ्या जागांवर लग्न कार्य, व्यावसायिक, खाजगी व इतर सार्वजनिक कार्यक्रम मर्यादित कालावधीकरीता असल्यास महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रमासाठी प्रती दिवशी रु.10000/- याप्रमाणे परवानगी शुल्क आकारले जाईल. महानगरपालिकेची परवानगी न घेतल्यास प्रती दिवशी रु.30,000/- याप्रमाणे दंडात्मक शुल्क वसुल करण्यात येईल.**
2) **ज्या मोकळ्या जागांचा वापर मार्बल, नर्सरी व अन्य व्यावसायिक कारणासाठी नियमितपणे होत असेल अशा मालमत्तांची कर आकारणी प्रती रु.1/- चौ. फुट दराप्रमाणे करण्यात येईल. सदर कराचा भरणा झाल्यानंतरच अशा व्यवसायिक वापरासाठी महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात येईल अन्यथा सदर मोकळ्या जागांना प्रती रु.3/- चौ. फुट दराप्रमाणे याप्रमाणे कर आकारणी करण्यात येईल.**
3) **सदर जागेवर निर्माण होणारा कचरा संबधित जागा मालकाने स्व-खर्चाने स्वच्छ करून जागा व परीसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहिल याची दक्षता प्रभाग अधिकारी यांनी घ्यावी.**
4) **मोकळ्या जागेवर महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय कोणताही वापर व दुरूपयोग होणार नाही याची संबंधीत विभागाने दक्षता घेण्यात यावी.**
5) **ज्या मोकळ्या जागेचा वापर महानगरपालिकेची परवानगी न घेता व्यावसायिक कारणासाठी होत आहे. तथापि त्याची कर आकारणी न झाल्यास वरीलप्रमाणे सदर जागेची कर आकारणी किंवा दंडात्मक शुल्काची कार्यवाही महानगरपालिकेने करावी व सदर रक्कमेचा भरणा जमिन मालकाने न केल्यास सदर जमिन मालकाची मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात अन्य् मालमत्ता असल्यास त्यांच्या मालमत्ता कर देयकातून सदर रक्कम वसुल करावी अन्यथा सदरचा बोजा त्यांच्या 7/12 वर चढविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.**
6) **नगररचना विभागाने अशा मोकळ्या जागांवर बांधकाम परवानगी देताना वरीलप्रमाणे शुल्क, दंडात्मक शुल्क किंवा कर भरणा झाले असल्याची खातरजमा करुनच परवानगी दयावी.**

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**गिता जैन :-**

म्हसाळ साहेब मी परत आपल्याला तेच विचारते एखाद्या आरक्षित जागेवर रिझर्व्हेशन प्लॉटवर तुम्ही वाणिज्य वापर करायची परवानगी जेव्हा मागायला येणार तेव्हा तुम्ही देऊ शकता का? मी माझा प्लॉटवर तिथे लग्न करायचे आहे. म्हणून परवानगी मागायला आले जे माझे आरक्षित प्लॉट आहे एक्स.वाय.झेड कुठलाही मग तुम्ही ती परवानगी तिथे लग्न मंडप उभारायची देऊ शकता का? आरक्षित प्लॉटवर तुम्ही त्या-त्या जागेवर ते-ते वस्तु करायची परवानगी देऊ शकता का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आपले जे आरक्षणाचे आहे त्या हेतुसाठी जी जागा रिझर्व्ह झालेली आहे. त्या व्यतिरिक्त आपण म्हणतात की वेगळा वापर जर असेल तो टेम्पररी स्वरुपाचा आहे. तो टेम्पररी वापर आहे.

**गिता जैन :-**

पण तुम्ही देऊ शकता का ते शाळासाठी रिझर्व्ह प्लॉट आहे. तिथे मी मार्बलसाठी परवानगी मागितली तुम्ही देणार का? देऊ शकता का? देणार का राहू द्या, देऊ शकता का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

याच्यावरती विधी विभागाचे मत घेऊ.

**मा. उपमहापौर :-**

अस आहे की आपण मंडपासाठी जेव्हा जेव्हा परवानग्या मागितल्या गेल्या तेव्हा त्या-त्या प्रभाग कार्यालयात प्रभाग अधिकाऱ्याने त्यांना विशिष्ठ चार्ज लावून त्यांना परवानग्या दिलेल्या आहेत साहेब मंडप लावण्यासाठी परंतु हे जे व्यवसाय लावल्यास हे करप्राप्त आहे ना साहेब आमच्या महापालिकेच्या याचा वापर करत आहेत.

**गिता जैन :-**

वैती साहेब ते करप्राप्त आहेत. पण कर प्राप्त केव्हा आहेत जेव्हा तुम्ही परवानगी दिली तुम्ही तिथे दुकाने लावा. गोदाम लावा, काही लावा तेव्हा ते करप्राप्त आहे. मग तुम्ही परवानगी देताना परवानगी देऊ शकता की नाही मी तेच विचारत आहे.

**रिटा शहा :-**

याच्यामध्ये दुसरे एक कन्फ्युजन आहे की जेव्हा-जेव्हा लग्न लावणार तेव्हा आपली पुर्वपरवानगी घ्यायची.

**मा. उपमहापौर :-**

पुर्वपरवानगी घेतली तर त्याच्यावरती आपण वार्षिक मुल्य निश्चित करु. परंतु एखाद्याला कमर्शियल वापरासाठी जागा दिली आहे. त्याला एकच लग्न करायचे आहे. तर त्याच्यासाठी सभागृह ठरवेल ५०००,१०००० जी.फी.............

**रिटा शहा :-**

आपल्या ठरावामध्ये नमुद झालेले आहे परवानगी घेतली की १०,००० लग्नासाठी आणि परवानगी नाही घेतली तर ३०,००० वर्षाची फिज आहे की कशाची आहे.

**गिता जैन :-**

म्हसाळ साहेब माझा प्लॉट माझ्याकडे आहे. माझ्या घरात मुलीचे लग्न आहे. त्याच्यात उल्लेख नाही मंडप करायचा. मला हक्क नाही का तिथे मंडप लावायचा. आहे की नाही.

**मा. उपमहापौर :-**

स्वतःच्या घराचा आपण जो वाणिज्य वापर असा स्पष्ट उल्लेख करतो. तुम्हाला सांगतो शहराच्या विशिष्ट भागामध्ये आपण येता जाताना फिरताना आपण व्यक्तीगत कोणाचे असेल त्याच्यात कोणालाही अपवाद करणार नाही जो त्या जागेचे भाडे आकारतो हे माहिती आहे. आपल्याला जो त्या जागेचा वाणिज्य वापर करता आहे त्याला तो प्रकार लागु होतो.

**गिता जैन :-**

साहेब तुमच्या घरी एखादे लग्न आहे मी सांगेल तुमचा पुत्र माझा दत्तक पुत्र आहे मी त्याच्यासाठी लावला तुम्ही काय करणार?

**मा. उपमहापौर :-**

आपण काहीतरी सांगुन आपण तिचा वेळ मारुन कारण नाही ज्याचा वाणिज्य वापर होत आहे असे स्पष्ट म्हटलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम विषय असा आहे आपण लग्न करतो लग्नामध्ये लाखो रुपये खर्च करतो. मंडप बांधतो मंडपासाठी २ लाख खर्च करतो. कॅट्रेससाठी खर्च करतो. १०००० रुपये आपण पालिकेला दिले मंडपासाठी आपण परवानगी घेतो की नाही. आपण जर गणेश उत्सवाला मंडपाची परवानगी देतो पैसे लावतो, नवरात्री उत्सवाला आपण पैसे देतो. पण लग्नासाठी आपण जर १०००० रुपये पर डे तर काय फरक पडतो मॅडम. लाखो रुपये आपण खर्च करतो.

**गिता जैन :-**

ध्रुवकिशोरजी माझा प्रश्न तो नाही की तिथे कर लावू नका. माझा प्रश्न तो आहे की तुम्ही कुठल्या नियमामध्ये लावणार.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

मंडप हा टेम्पररी स्ट्रक्चरमध्ये येणार की नाही मॅडम तुम्ही टेम्परररी बांधकामाची परवानगी मागु शकता नगररचनेकडे. मंडप हा टेम्परररी येणार माझ्या माहिती प्रमाणे.

**गिता जैन :-**

मी तुम्हाला तेच विचारत आहे की तुम्ही ते कुठल्या नियमाखाली लावणार टेम्पररी कन्स्ट्रक्शन आहे म्हणून लावले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब विषय असा आहे की मोकळ्या जागेवरती कर लावणे एक्झाम्पल एखादी नर्सरी लावलेली आहे त्यावरती आपण टॅक्स जो युज करतो जो नर्सरीवाला आहे त्याला आपण कर लावतो. आता समजा जी जागा डिस्पुट आहे तिथे कोणीच नाही त्याला आपण कर लावत नाही. तुमच्या जागेवरती तुम्ही एखादी नर्सरीला भाड्याने दिले. तुम्ही एखाद्या मार्बलवाल्याला भाड्याने दिले तर आपण त्या मार्बल वाल्यावर कर लावणार आहोत आणि जर त्याने कर भरला नाही तर आपण त्याला शास्ती लावणार आहोत. आपण कन्स्ट्रक्शन करणार नाही आणि दुसरी गोष्ट हे आपल्या पालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आपण करतो. तुम्ही मला सांगा साहेब मोकळ्या जागेवरती आज लग्न कार्य होतात. त्याचा कचरा कोण उचलतो. आपण उचलतो. रोड कोण मेन्टेन करतो, आपण करतो. शेवटी काही तरी इन्कम झाली पाहिजे. तो भुखंडधारक लाखो रुपये कमवितो.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम आपण क्लीअर म्हटलेले आहे की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खाजगी मालकीचे भुखंड आहेत. सदर भुखंडावरील मोकळ्या जागेवर वापर खाजगी मालकाकडून लग्न कार्य खाजगी कार्य व वाणिज्य स्वरुपाचा करण्यात येतो. सदर वापराकरिता महानगरपालिकेची परवानगी घेण्यात येत नाही. सदर मोकळ्या जागेवरती कार्यक्रमाअंतर्गत मोठ्या प्रमाणावर कचरा, घाण जमा होऊन परिसर अस्वच्छ होतो कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी होत असताना वाहतुकीस रहदारी अडथळा निर्माण होत असतो. तसेच काही मोठ्या जागेवर अनधिकृत मार्बल नर्सरी इ. व्यवसाय वापर होत असतो. सदरबाबत अग्निशमन विभाग, पोलीस विभाग व वाहतुक विभाग देखील ह्या रस्त्याने काही अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि म्हणून आपण हे धोरण निश्चित केलेले आहे. आपण कुठल्या शेतकऱ्यावर कर लावणार नाही. किंवा कोणा गरिबावर कर लावणार नाही. याच्यामध्ये गरिब आणि हा काही दुजाभाव नाही आपण जो वाणिज्य वापर होत आहे त्याच्यावरती कर लावत आहे.

**राजु भोईर :-**

शेवटी शेतकरी आले. कामगार शेतकऱ्यांची जमिनी ओपन आहेत. त्यांच्या जागा खुल्या आहेत. आज तुम्हाला माहिती आहे मिरा भाईंदर शहरामध्ये एन.ओ.सी. घ्यावी लागते. शेतकऱ्यांची आज ऐपत नाही की ते एन.ओ.सी. घेऊ शकतात तुम्ही ह्या जिथे आरक्षण आहे तिथे जागेवरती परमिशन द्या. गरिबांच्या जागेवरती नजरा लागलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ज्या शेतकऱ्याने ॲग्रीकल्चरचा वापर केला त्या ॲग्रीकल्चरलवर पण टॅक्स आहे. आपण पीक पाणी करतो की नाही आपण पिक पाणी भरतो ना आपण.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

जो विषय स्वयंस्पष्ट आहे लग्नासाठी किंवा सर्कससाठी, शेतीसाठी शेतकऱ्यांसाठी याच्यासाठी हे कर नाहीत. जो वाणिज्य वापर करतो त्याला होईलच.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम, विषय ऐसा है की कही ना कही समझने में कुछ थोडा जो कन्फ्युजन हो रहा है। प्रशासनने म्हसाळ साहबने क्लिअर कट यह जवाब दिया है और उनसे मैं आपको जानकारी महापौर मॅडम विषय ऐसा है की जो कमर्शियल युज हो रहे है पुरे शहर के अंदर यह सब लोगों को पता है जितने भी हम यहाँ पे बैठे है कोई एखाद केस ऐसा होगा यदी में उदाहरण तौर पर बोलू तो मेरे वॉर्ड में पाच ऐसे प्लॉट है। जो कमर्शियल शादी के लिए उनको कमर्शियल लाख लाख, दो-दो, तीन-तीन लाख रुपये दिए जाते है। मेरा ऐसा अनुभव है की कमर्शियल वापर होने के बाद में उसकी साफसफाई से लेके मच्छर की दवाई से लेके पार्किंगसे लेके महानगरपालिका के हजारो आदमी उधर आते है। कोई फायर की एन.ओ.सी. नही कोई वॉर्ड ऑफिस का नही हम गणपती के लिए छोटासा मंडप बनाते है उसकी परमिशन लेने के लिए वॉर्ड ऑफिस जाते है। प्राईव्हेट प्लॉट के अंदर यदी किसिको मंडप बनाना है कुछ भी करना है तो उसके लिए महानगरपालिका वॉर्ड ऑफिस में जाके मंडप की परमिशन लेनी पडती है। यह कानुन है लेकिन उसके बावजूद कोई भी जितनी भी शादीया होती है कोई भी ना मंजुरी लेता है, ना किसीकी

परमिशन लेता है, ना कुछ पालिका को उत्पन्न है। मेरा यह मानना है की यदी कमर्शियल होटल है जितने भी हायवे पे आप होटल देखेंगे जो भी शादीया वगैरे करते है उसका जो वापर कमर्शियल करते है।

**राजु भोईर :-**

यह शादी वगैरा बंद करेंगे ऐसा लगता है।

**सुरेश खंडेलवाल :-**

जो शादी करते है हमारा उनसे कोई विरोध नही है। मेरा इस ठराव के माध्यम से कहना है की शादी करने वाले को जो कमर्शियल युज कर रहे है उनको पैसे दे रहे है। लेकिन जो लाख-लाख, २-२ लाख रुपया जो प्लाट के माध्यम से उनसे कमा रहे है वह यदी १० हजार रुपया यदी पालिका को उत्पन्न होगी तो यह पालिका का रेव्हेन्यु जनरेट करने के हिसाबसे यदी गलत है..............

**जुबेर इनामदार :-**

वह शादी करने वाले पे डालेगा वह खुदके जेबसे नही भरेगा वह शादी करनेवाले पर ही डालनेवाला है। जो शहर के नागरीक है।

**सुरेश खंडेलवाल :-**

जुबेरजी इतने जो प्लॉट है मार्बल के इतने सारे बिझनेस चल रहे है। नर्सरी के चल रहे है गॅरेज बनाके बिझनेस कर रहे है। जो फेरिवले है उनके ५०-५० रुपये महानगरपालिका वसुल कर रहे है तो इतने जो व्यापार कर रहे है उनसे कुछ नही क्या?

**जुबेर इनामदार :-**

वह पालिका के मालमत्तेपर यह तो खाजगी बात हो रही है।

**सुरेश खंडेलवाल :-**

खाजगी है लेकिन उसकी परमिशन तो लेना चाहिए ना। सर खाजगी पे जो व्यापार हो रहा है उसका सिवरेज लाईनसे लेके उसके कचरे से लेके उसकी साफसफाई से लेके पालिका कर रही है।

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम अर्धा तास झाला, आपआपसामध्ये चर्चा चालु आहे.

**राजु भोईर :-**

महापौर मॅडम स्थानिक रहिवाशांच्या जमिनी आहेत. राई, मोर्वा, मुर्धा, मिरा, पेणकरपाडा, घोडबंदर हे स्थानिक रहिवासी आहेत इस्टेट इन्वेसमेन्टची एन.ओ.सी. घेतल्याशिवाय परमिशन भेटत नाही. जरी आरक्षण जागा असेल तर आपण सरसकट परमिशन द्यावी. सर्व लोक खुशीने तुम्हाला आरक्षण देतील. ते त्यांच्या उदरनिर्वाहासाठी कोणाला भाड्याने देत असतील तर तुम्ही असे नियम आणायचे का? हे बरोबर आहे का?

**गिता जैन :-**

म्हसाळ साहेब शेवटी त्या बिल्डरने त्या प्लॉटमध्ये इन्व्हेस्ट केलेले आहे. त्यांचे लाखो करोडो आहेत तुम्ही ते १०-१० हजार बोलत आहेत ना मग तुम्ही भुसंपादन करुन का घेत नाही?

**राजु भोईर :-**

१० हजार रुपयेसाठी लोकांच्या जमिनिवर डोळा आहे. हा एक प्रकारे दबाव आहे. दबाव आणण्याचा प्रकार चालु आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एक चांगली प्रथा आपण आयोजित केली होती. महासभेच्या अगोदर महासभेच्या विषयावरती आढावा बैठक आपण सगळ्या गटनेत्यांनी घेतली होती. त्यावेळी सन्मा. राजु भोईर साहेब उपस्थित होते. आमगावकर साहेब उपस्थित होते.

**राजु भोईर :-**

त्या टाईमाला आम्ही बोललो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव असेल तर ठराव करा.

**रिटा शहा :-**

ठराव पढने के पहले अभी जो बातचीत चली थी इसमें दो मुद्दे वैती साहबने उठाए की जो वाणिज्य वापर करते है भुखंड चाहे वह आरक्षित हो चाहे आर.जी. के हो, चाहे कोई भी कॅटेगरी के हो भुखंड के उपर आपने यह दो ठराव लाए एक आरक्षित भुखंड के उपर और एक कॉमन भुखंड के उपर

दो ठराव हमारे पास में आए। तो दुसरा ठराव में आपने जो कर आकारणी का विषय लाया है वह सही में सही है। लेकिन कर आकारणी आप भुखंड मालीक के उपर करेंगे की यहाँ जो मेरे दो प्रश्न है की वहाँ जो लगाने वाले दुकानवाले है उनके नामपर करेंगे अगर वहाँ जो दुकान वालो के नाम पर करेंगे तो भुखंड मालीक दुसरा कोई है। कल वह जो सामान लगा रहे हो कल वह जगह का पझेशन बताएगा कोर्ट में जाके मेरा ऐसा मानना है की कर आकारणी करो। उनको अगर १० हजार की परवानगी ले यह परवानगी लेने के लिए ८-१० दिन जाते है। तो जिसकी शादी है परवानगी लेता रहेगा की यह सब करेगा।

**मा. उपमहापौर :-**

यह ग्राऊंड जो ऑपरेट करता है उसको परमिशन मिलेगी और हम जो परमिशन दे रहे है उसका ऐसा कोई परमिशन नही दे रहे है। खाली जो हमारी जगह का वापर कर रहे है उसके लिए भाडे तत्व की पावती ऐसी सदर में रहेगा हर घरपट्टी में यह लिखा जाता है की घरपट्टीचा वापर हा अनधिकृत ऐसा शिक्का रहता है लिख के रहता है।

**रिटा शहा :-**

मेरा बोलना यह है की वहाँ जो दुकानो पर लगा रहे है उनके नाम पे पावती नही देना चाहिए क्योंकी अगर उनके नाम पे पावती दिया तो कल वह वहाँ का पजेशन लाकर कोर्ट में बताऐंगे भुखंड मेरा है करके पजेशन महत्व का होता है। कोर्ट के अंदर जो भी बिल्डर है या जो भी भुखंड मालीक है उनके नाम पे कुछ होना चाहिए।

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आपल्या प्लॉटची बॉन्ड्री करणे, सुरक्षा करणे त्या-त्या मालकाची जबाबदारी आहे.

**रिटा शहा :-**

आपण जबाबदारीने नाही सांगत साहेब. ज्या हिशोबाने तुम्ही कर आकारणी घेणार.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

त्याने प्रोटेक्टमध्ये ठेवावी. तिथे साफसफाई ठेवावी.

**रिटा शहा :-**

साफसफाईची मुद्दा मी उचललेला नाही मी टेक्नीकल आणि फायदेशीर मुद्दा तुम्हाला सांगितलेला आहे की पजेशन द मोस्ट इम्पोंटन्ट थिंग फॉर द ऐनी भुखंड. कुठलाही भुखंड असेल त्याच्यामध्ये पजेशन कोणाचे ते महत्वाचे असते. मग आपण कुठलाही भाडे पावती घेणार की कुठली कर आकारणी करणार. त्या भुखंड मालीकच्या नावावर असायला पाहिजे असे माझे बोलणे आहे. कारण तिकडे १५ लोक लावली की १० लोक लावली त्यांच्या नावावर तुम्ही वेगवेगळ्या पावत्या दिल्या मग त्यांच्या प्रॉपर्टीवर प्रॉब्लेम होणार. भविष्यामध्ये हा सर्व नविन केस चालु होणार.

**रवि व्यास :-**

महापौर मॅडम, काफी सारे प्लॉट ऐसे भी है जोकी रेग्युलरली बिजनेस के कमर्शियल के लिए युज नही होते है। लेकिन अगर कोई गरिब आदमी जाता है और वह रिक्वेस्ट करता है की आपका प्लॉट खाली पडा है तो ऐसे काफी सारे बिल्डर ऐसे है की शादी के लिए एक दिन के लिए या फीर धार्मिक कार्य के लिए वह प्लॉट विदाऊट एनी कन्सीडरेशन के भी लोगो को देते है। तो ऐसी सिच्युएशन के अंदर अगर हम लोग उनपर १०-१० हजार रुपये चार्ज करेंगे तो ॲक्च्युअली जो कॉमन मेन है वह सफर करेगा। प्रभाग अधिकारी के पास हम परमिशन लेने के लिए कम्पलशन किया वह अच्छी बात है। बट वहाँ पे एफिडेव्हीट ले लिया जाए की यह जो जो भी आज शादी के लिए जोभी धार्मिक कार्य के लिए रेट पे दिया गया है। उसके लिए कोई भी पैसा नही लिया गया है। मतलब यह ऐसे ही फ्री ऑफ कॉस्ट दिया चॅरिटी परपजके लिए दिया है तो ऐसी जगह पे ॲटलीस्ट रिलॅक्सेशन देना चाहिए। यह मेरा सुझाव है। मेरी सुचना को लिया जाए।

**मा. महापौर :-**

ठिक है।

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम हे वाद नंतर निर्माण होण्यापेक्षा जे आरक्षित फार पूर्वीपासून हे महासभेमध्ये विषय होत आलेले आहेत की जी महानगरपालिकेची जागा आहे. ती पहिला हस्तांतर करुन बॉड्री टाकायचे हे केव्हापासून प्रत्येक वेळी ठराव होतात पण ठराव कधी अमलात येतच नाही. फक्त ज्याच्यात जास्त इन्टेन्शन असते. काही आपल्या याच्यासाठी जास्त असतील पुरक असतील असे ठराव पटकन पुढच्या याच्यासाठी दिले जातात असे हे ठराव केव्हापासून म्हणजे मी गेल्या ५ वर्षात असे ठराव झालेले आहेत की

कुंपण घालुन ती जागा आपण हस्तांतरीत करुन घ्यावी म्हणून पण आजपर्यंत किती आरक्षणांना महानगरपालिकेच्या जागांमध्ये कुंपणभिंत घातली? हस्तांतरण करुन घेतली.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

जिथे १०० टक्के ॲक्वीवेशन झालेले आहे त्याठिकाणी फेन्शींग किंवा कम्पाऊंड झालेले आहेत.

**निलम ढवण :-**

नाही झालेले आहेत.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

१०० टक्के ठिकाणांवर झालेले आहेत.

**निलम ढवण :-**

नाही जिथे आरक्षण आपल्या ताब्यात जागा आलेली आहे तिथे कम्पाऊंड झालेली नाहीत. मग आरक्षण अतिक्रमण झाली. सगळ झाल की परत फौजफाटा आणतो त्याची हे करतो म्हणजे नाहक खर्च आपल्यालाच होत आहे. मग ते ताबडतोब इम्पलीमिटेशन का नाही होत.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये जिथे झालेली नाही त्याठिकाणी आपण सुचना करून मोस्टली झालेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे

**निलम ढवण :-**

मोस्टली झालेले नाही तसे म्हणा साहेब तुम्ही एके दिवशी आपल्या कार्यालय ऑफिसमध्ये कन्टीन्ह्यू आठ दिवस बसा आम्ही भेटलो की एक एक विषय तुमच्या समोर क्लियर करू.

**मा. महापौर :-**

अभी बहूत चर्चा हो गई है आपला ठराव असेल तर ठराव मांडा.

**तारा घरत :-**

मॅडम मघाशी १२२ आारक्षणाचे मगाशी बोलले तुम्ही बोलले नंतर बोला म्हणून.

**हरिशचंद्र आमगावकर :-**

१२२ नंबर आरक्षण आहे आपल्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. कुंपन भिंत अर्धवट आहे आणि त्या आपल्या जागेमध्ये अतिक्रमण होत आहे. आणि आपण ज्या मालकी जागेच्या याच्यात भाडे आकारणी करतोय तुम्ही पहिला आपल्या जागा आहेत त्या तरी ताब्यात घ्या. ते सोडल आणि दुसरीकडे लोकांना टॅक्स लावायचा विचार करत आहेत. त्या विषयावर जरा तुम्ही निर्णय घ्या.

**तारा घरत :-**

सगळे तबेले, गॅरेज आरक्षणामध्ये टाकलेले आहे ते खाली करता येत नाही ते खाली करून १२२ आरक्षण गेले किती वर्षापासून खाली करायला निघालात आत १५ तारीख दिली तेव्हा तरी खाली होणार आहे का?

**हरिशचंद्र आमगावकर:-**

साहेबांनी १५ तारीख दिली होती आज ८ तारीख आहे. सात दिवस बाकी आहेत.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

त्याठिकाणी आपण टाऊन प्लॅनिंग बांधकाम आणि पोलिस अधिकारी अनधिकृत बांधकाम उपायुक्त यांनी कॉमन बैठक त्याठिकाणी घेतलेली आहे . त्यावेळेस त्यांनी अधिवेशनाच्या अनुषंगाने पोलिस बंदोबस्त किती घेता येईल याबाबत सांगोपांग चर्चा झालेली आहे. आणि ते पोलिस बंदोबस्त उपलब्ध करून दिल्यानंतर आपण पुढची कारवाई करणार आहोत. त्याबाबत आपण आपली जी बैठक झाली त्यानंतर ही बैठक आमची झालेली आहे.

**हरिशचंद्र आमगावकर :-**

१५ तारखेला आपण टाईम दिला होता १५ तारखेला आरक्षणामध्ये अतिक्रमण पूर्णपणे हटवणार .

**मा. उपायुक्त (मु.) :-**

काही तरी त्याच्यामध्ये प्लस माईनस सांगितलेले आहे. त्याच्यानंतर आपण काम करणार आहोत.

**स्नेहा पांडे :-**

उपायुक्त साहेब बंदोबस्त हटानेके लिए अनधिकृत बांधकामके लिए जरूरी है लेकीन जो अपने सिवरेज के कॉन्ट्रॅक्टर की पाईप वहॅपे वेस्टेज पाईप बंद करके रखा है कचरे बंद करके रखे हूए है उसकी साफसफाई के लिए पोलिस बंदोबस्त की क्या जरूरत है? आपने जभी आमदार साहब के साथ हम लोगो ने कमिशनर साहब के साथ बैठक किया था उसमे आपने १५ तारीख डेडलाईन दिया था की १५ के पहले सब हो जायेगा।

**मा. उपायुक्त (मु.) :-**

साफसफाईवाला इश्यूज असेल तेव्हा आरोग्य विभागाकडून आपण करून घेऊ.

**हरिशचंद्र आमगावकर :-**

सर्व साफसफाई तुम्ही बघा त्याची पाहणी करा तिथे मोठ मोठे पाईप अतिक्रमण झोपडपट्टी हे सर्व काम करणारे लोकांच्या झोपड्या बांधलेल्या आहेत.

**स्नेहा पांडे :-**

तिकडे काम पूर्ण झाले मग शिवरेजचा पाईप कॉन्ट्रॅक्टर तिकडून का हटवत नाही? तिकडचा शिवरेजचा पूर्ण आपला नाला आहे तरी पण तो तिथेच डंम्प करून ठेवलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम ठराव मांडण्याच्य आधी ह्या विषयावर चांगला विषय आणला चुकीच्या पध्दतीने पालिकेने उत्पन्न वाढवायचे असेल तर परत दुसरे माध्यम आहेत मालमत्ता कर अजून तरी ह्या शहरामध्ये ४० टक्के मालमत्तेच्या  याच्यावर कर लागले गेलेले नाहीत. ६-६महिने १-१ प्रकरण प्रलंबीत राहतो. साहेब तुमच्याकडे ६-६ महिने होऊन जातात एक एक अर्ज करून की मालमत्ता कर आमचा लावून द्या. तरी लावून देत नाही किती तरी असे किती तरी असे रहिवासी मालमत्ता आहे त्यांनी वाणिज्य वापर करत आहेत. त्याच्यात रूपांतर केले तर त्याच्याकडून आपल्याला उत्पन्न मिळेल ह्या शहरामध्ये छोटे व्यवसाय करणारे लोक किती मार्बल वाले किती किंवा बाकीचे नर्सरी वाले यांच्यावरती असा भुर्दंड आणायचा.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

यासाठीच आपण आता प्रभाग अधिका-याना कर आकारणीचे पूर्ण अधिकार देऊन टाकलेले आहेत. फॉर्म डिलीगेशन केलेले आहेत. कर आकारणी परवाना वैगेरे जे विषय आहेत ते सगळे आपण प्रभाग अधिका-यांना पावर डेलीगेट केलेले आहेत. मा. आयुक्तानी आता दोन दिवसापूर्वीच पावर डेलीगेशन केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब प्रभाग अधिका-यावर तुम्ही केले आहे. परंतू त्यांना तुम्ही लिमिटेशन द्या टाईम लिमीट की ह्या इतक्या झाल्या दिवसामध्ये ही फाईल पूढे गेली पाहिजे किंवा त्यांची कर आकारणी झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

चला आता तुमचा ठराव मांडा.

**जुबेर इनामदार :-**

महानगरपालिका क्षेत्रातील मोकळ्या जागेचा वापर लग्न कार्यासाठी केला जातो. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई कारवाई करणेबाबत धोरण ठरविणे बाबत प्रस्ताव मा. महासभेमध्ये आलेला आहे. परंतु प्रशासनाने सदर विषयबाबत गोषवारा दिलेला नाही. त्यामुळे त्याबाबत प्रशासनाची भुमिकाही स्पष्ट होत नाही. तरी प्रशासनाने सर्व कायदेशीर बाबींचा विचार करुन सदर विषय गोषवा-यासहित फेरसादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**हरिशचंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत दळवी, अनुमोदन श्रीम. हेतल परमार. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. श्री. जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री. प्रशांत दळवी यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४५, विरोधात २८, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ४६ :-**

**महानगरपालिका क्षेत्रातील मोकळया जागेचा वापर लग्न कार्यासाठी केला जातो त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणेबाबत धोरण ठरविणे.**

ठराव क्र. ४३ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खाजगी मालकीचे भुखंड आहेत. सदर भुखंडावरील मोकळ्या जागेचा वापर खाजगी मालकाकडुन लग्न कार्य, खाजगी कार्यक्रम व वाणिज्य स्वरुपाच्या वापरासाठी करण्यात येतो. सदर वापराकरीता महानगरपालिकेची परवानगी घेण्यात येत नाही. सदर मोकळ्या जागेवर कार्यक्रमानंतर मोठ्या प्रमाणावर कचरा, घाण जमा होऊन परिसर अस्वच्छ होतो. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी होत असल्याने वाहतुकीस, रहदारीस अडथळा निर्माण होत असतो. तसेच काही मोकळ्या जागेवर अनधिकृतपणे मार्बल, नर्सरी इ. व्यावसायिक वापर होत असतो. सदर बाबत अग्निशमन विभाग, पोलिस विभाग व वाहतुक विभागाला देखील याबाबत कल्पना नसल्याने काही अपघात घडल्यास मोठी आपत्कालीन परिस्थिती उद्भवु शकते.

सबब खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

1) मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात मोकळ्या जागांवर लग्न कार्य, व्यावसायिक, खाजगी व इतर सार्वजनिक कार्यक्रम मर्यादित कालावधीकरीता असल्यास महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रमासाठी प्रती दिवशी रु.10000/- याप्रमाणे परवानगी शुल्क आकारले जाईल. महानगरपालिकेची परवानगी न घेतल्यास प्रती दिवशी रु.30,000/- याप्रमाणे दंडात्मक शुल्क वसुल करण्यात येईल.
2) ज्या मोकळ्या जागांचा वापर मार्बल, नर्सरी व अन्य व्यावसायिक कारणासाठी नियमितपणे होत असेल अशा मालमत्तांची कर आकारणी प्रती रु.1/- चौ. फुट दराप्रमाणे करण्यात येईल. सदर कराचा भरणा झाल्यानंतरच अशा व्यवसायिक वापरासाठी महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात येईल अन्यथा सदर मोकळ्या जागांना प्रती रु.3/- चौ. फुट दराप्रमाणे याप्रमाणे कर आकारणी करण्यात येईल.
3) सदर जागेवर निर्माण होणारा कचरा संबधित जागा मालकाने स्व-खर्चाने स्वच्छ करून जागा व परीसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहिल याची दक्षता प्रभाग अधिकारी यांनी घ्यावी.
4) मोकळ्या जागेवर महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय कोणताही वापर व दुरूपयोग होणार नाही याची संबंधीत विभागाने दक्षता घेण्यात यावी.
5) ज्या मोकळ्या जागेचा वापर महानगरपालिकेची परवानगी न घेता व्यावसायिक कारणासाठी होत आहे. तथापि त्याची कर आकारणी न झाल्यास वरीलप्रमाणे सदर जागेची कर आकारणी किंवा दंडात्मक शुल्काची कार्यवाही महानगरपालिकेने करावी व सदर रक्कमेचा भरणा जमिन मालकाने न केल्यास सदर जमिन मालकाची मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात अन्य् मालमत्ता असल्यास त्यांच्या मालमत्ता कर देयकातून सदर रक्कम वसुल करावी अन्यथा सदरचा बोजा त्यांच्या 7/12 वर चढविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
6) नगररचना विभागाने अशा मोकळ्या जागांवर बांधकाम परवानगी देताना वरीलप्रमाणे शुल्क, दंडात्मक शुल्क किंवा कर भरणा झाले असल्याची खातरजमा करुनच परवानगी दयावी.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शाह रिटा सुभाष | १ | ढवण निलम हरीश्चंद्र | निरंक |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | गोहिल शानू जोरावर सिंह | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | कांगणे मीना यशवंत | ४ | परदेशी गिता हरीश | |
| ५ | सिंह मदन उदितनारायण | ५ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | शेट्टी गणेश गोपाळ | ६ | शेख अमजद गफार | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ८ | रावल मेघना दिपक | ८ | घरत तारा विनायक | |
| ९ | शाह राकेश रतिशचंद्र | ९ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १० | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ११ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ११ | शिर्के अनंत गेणू | |
| १२ | जैन सुनिता रमेश | १२ | पाटील वंदना विकास | |
| १३ | जैन राजेंद्र भवरलाल | १३ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १४ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १४ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १५ | व्यास रवि वासुदेव | १५ | भोईर कमलेश यशवंत | |
| १६ | रकवी वैशाली गजेंद्र | १६ | पाटील अनिता जयवंत | |
| १७ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | खंडेलवाल सुरेश जगदीश | १८ | भोईर राजू यशवंत | |
| १९ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | मेहता डिंपल विनोद | २० | डिसा मर्लिन मर्विन | |
| २१ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २१ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २२ | थेराडे संजय अनंत | २२ | भट दीप्ती शेखर | |
| २३ | मुखर्जी अनिता बबलू | २३ | सपार उमा विश्वनाथ | |
| २४ | वैती चंद्रकांत सिताराम | २४ | अहमद साराह अकरम | |
| २५ | पारधी सुजाता यशवंत | २५ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| २६ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| २७ | यादव मिरादेवी रामलाल | २७ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २८ | म्हात्रे मोहन गोपाळ | २८ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २९ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३० | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ३१ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३२ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ३३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३४ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३५ | नाईक विविता विवेक | | | |
| ३६ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ३७ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३८ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३९ | जैन दिनेश तेजराज | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४० | भावसार वंदना संजय | | | |
| ४१ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ४२ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४३ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४४ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४५ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४७, **महानगरपालिकेचे आरक्षणाखाली असलेली जागा जी मनपाकडे हस्तांतरण केलेली नाही त्यावर भाडे वसुल करुन वाणिज्य वापर करतात त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे.**

विनोद म्हात्रे :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खाजगी मालकीचे आरक्षित भुखंड आहेत. सदर भुखंडावरील आरक्षित जागेचा वापर खाजगी मालकाकडुन लग्न कार्य, खाजगी कार्यक्रम व वाणिज्य स्वरुपाच्या वापरासाठी करण्यात येतो. सदर वापराकरीता महानगरपालिकेची परवानगी घेण्यात येत नाही. सदर आरक्षित जागेवर कार्यक्रमानंतर मोठ्या प्रमाणावर कचरा , घाण जमा होऊन परिसर अस्वच्छ होतो. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी होत असल्याने वाहतुकीस , रहदारीस अडथळा निर्माण होत असतो . तसेच काही आरक्षित जागेवर अनधिकृतपणे मार्बल , नर्सरी इ . व्यावसायिक वापर होत असतो. सदर बाबत अग्निशमन विभाग, पोलिस विभाग व वाहतुक विभागाला देखील याबाबत कल्पना नसल्याने काही अपघात घडल्यास मोठी आपत्कालीन परिस्थिती उद्भवु शकते.**

**सबब खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.**

1) **मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात आरक्षित जागांवर लग्न कार्य , व्यावसायिक, खाजगी व इतर सार्वजनिक कार्यक्रम मर्यादित कालावधीकरीता असल्यास महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रमासाठी प्रती दिवशी रु .10000/- याप्रमाणे परवानगी शुल्क आकारले जाईल. महानगरपालिकेची परवानगी न घेतल्यास प्रती दिवशी रु .30,000/- याप्रमाणे दंडात्मक शुल्क वसुल करण्यात येईल.**
2) **ज्या आरक्षित जागांचा वापर मार्बल , नर्सरी व अन्य व्यावसायिक कारणासाठी नियमितपणे होत असेल अशा मालमत्तांची कर आकारणी प्र ती रु.1/- चौ. फुट दराप्रमाणे करण्यात येईल. सदर कराचा भरणा झाल्यानंतरच अशा व्यवसायिक वापरासाठी महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात येईल अन्यथा सदर आरक्षित जागांना प्रती रु .3/- चौ. फुट दराप्रमाणे याप्रमाणे कर आकारणी करण्यात येईल.**
3) **सदर जागेवर निर्माण होणारा कचरा संबधित जागा मालकाने स्व-खर्चाने स्वच्छ करून जागा व परीसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहिल याची दक्षता प्रभाग अधिकारी यांनी घ्यावी.**
4) **आरक्षित जागेवर महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय कोणताही वापर व दुरूपयोग होणार नाही याची संबंधीत विभागाने दक्षता घेण्यात यावी.**
5) **ज्या आरक्षित जागेचा वापर महानगरपालिकेची परवानगी न घेता व्यावसायिक कारणासाठी होत आहे. तथापि त्याची कर आकारणी न झाल्यास वरीलप्रमाणे सदर जागेची कर आकारणी किंवा दंडात्मक शुल्काची कार्यवाही महानगरपालिकेने करावी व सदर रक्कमेचा भरणा जमिन**

**मालकाने न केल्यास सदर जमिन माल   काची मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात अन्य् मालमत्ता असल्यास त्यांच्या मालमत्ता कर देयकातून सदर रक्कम वसुल करावी अन्यथा सदरचा बोजा त्यांच्या 7/12 वर चढविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.**

6) **नगररचना विभागाने अशा आरक्षित जागांवर बांधकाम परवानगी देताना वरीलप्र   माणे शुल्क, दंडात्मक शुल्क किंवा कर भरणा झाले असल्याची खातरजमा करुनच परवानगी दयावी.**

**जयेश भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय आरक्षणाची जागा आहे करता येईल का? नियमावली काय बोलते? साहेब आपली विकास नियंत्रण नियमावली ह्या विषयावर काय बोलते? करता येईल का? टेम्पररी वापर करता येईल ना. मी अजुन ती आरक्षणाची जागा तुमच्या ताब्यात दिली नाही.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

भुसंपादन ज्या कारणासाठी आहे आरक्षण ज्यासाठी आहे त्यासाठी आपण भुसंपादन करु. टेम्पररी वापरासाठी नगररचना विभागाकडे ते लोक परवानगी मागतात. तिथुन ते देतात.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे. टेम्पररी वापरासाठी मागितली जाते. पण हे सगळ कर आकारणीचा विषय चालु आहे याच्यावर.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

कर आकारणी नाही साहेब. जर एखाद्याला त्याने त्याचा वापर एकतर ओपन ठेवायला पाहिजे. जोपर्यंत नगरपालिकेकडे भुसंपादन होत नाही. तोपर्यंत आणि जर त्यांनी तिथे काही वापर केला त्यापासुन ४ पैसे मिळाले...............

**जुबेर इनामदार :-**

साहेब आरक्षणाचा विषय तुम्हालाही माहिती आहे किती स्पष्ट आहे. एका आरक्षणामध्ये ५-५,६-६,१०-१० मालक असतात. एकाला दुसरा भेटत नाही सापडत नाही. मालक तो नाही अशी परिस्थिती आहे पालिकेची. म्हणून आरक्षण पूर्णपणे ताब्यात आले नाही म्हणून ते विकसित होत नाही ही खरी परिस्थिती आहे साहेब. प्रशासन अशी भुमिका घेऊ शकते का? पूर्ण आरक्षणाचा विषय चालू आहे. त्याच्यामध्ये कसे शोधणार? हा आमगावकरचा आहे हा राजु भोईरचा आहे की ध्रुवकिशोरचा आहे. तो कुठेही करेल मग त्याला शोधायचं तो माणूस कुठे गेला. ह्या माणसाचे आहे का रे बाबा हे तुझ्यावरच लागेल. ध्रुवकिशोरला लागणार नाही. आमगावकरला लागेल. हा विषय उजळणार म्हणजे असा विषय झाला देशामध्ये अर्थ व्यवस्था बिघडून गेलेली आहे. एका बाजूला जी.एस.टी. चा प्रकार चालू आहे. डिमॉनिटरेशन नाही ना काही खुद का विकास गाव का सर्वनाश हा प्रकार चाललेला आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव मांडा.

**जुबेर इनामदार :-**

महानगरपालिकेचे आरक्षणाखाली असलेली जागा जी मनपाकडे हस्तांतरण केलेली नाही त्यवर भाडे वसुल करुन वाणिज्य वापर करतात त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणेबाबत महानगरपालिका आरक्षणाखली असलेली जागा हस्तांतरण न करता त्याच्यावर वाणिज्य वापर भाडे वसुल करण्याबाबत दंडात्मक कारवाई करणेबाबत धोरण ठरविणेबाबत हा प्रस्ताव मा. महासभेस आणलेला आहे. परंतु प्रशासनाने सदर विषयबाबत गोषवारा दिलेला नाही. त्यामुळे त्याबाबत प्रशासनाची भुमिकाही स्पष्ट होत नाही. तरी प्रशासनाने सर्व कायदेशीर बाबींचा विचार करुन सदर विषय गोषवा-यासहित फेरसादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. विनोद म्हात्रे, अनुमोदन श्री. जयेश भोईर. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी

हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री. विनोद म्हात्रे यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. विनोद म्हात्रे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४८, विरोधात २८, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. विनोद म्हात्रे यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ४७ :-**

**महानगरपालिकेचे आरक्षणाखाली असलेली जागा जी मनपाकडे हस्तांतरण केलेली नाही त्यावर भाडे वसुल करुन वाणिज्य वापर करतात त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे.**

ठराव क्र. ४४ :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खाजगी मालकीचे आरक्षित भुखंड आहेत. सदर भुखंडावरील आरक्षित जागेचा वापर खाजगी मालकाकडुन लग्न कार्य, खाजगी कार्यक्रम व वाणिज्य स्वरुपाच्या वापरासाठी करण्यात येतो. सदर वापराकरीता महानगरपालिकेची परवानगी घेण्यात येत नाही. सदर आरक्षित जागेवर कार्यक्रमानंतर मोठ्या प्रमाणावर कचरा, घाण जमा होऊन परिसर अस्वच्छ होतो. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी होत असल्याने वाहतुकीस , रहदारीस अडथळा निर्माण होत असतो . तसेच काही आरक्षित जागेवर अनधिकृतपणे मार्बल , नर्सरी इ. व्यावसायिक वापर होत असतो. सदर बाबत अग्निशमन विभाग, पोलिस विभाग व वाहतुक विभागाला देखील याबाबत कल्पना नसल्याने काही अपघात घडल्यास मोठी आपत्कालीन परिस्थिती उद्भवु शकते.**

**सबब खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.**

1) **मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात आरक्षित जागांवर लग्न कार्य , व्यावसायिक, खाजगी व इतर सार्वजनिक कार्यक्र म मर्यादित कालावधीकरीता असल्यास महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रमासाठी प्रती दिवशी रु.10000/- याप्रमाणे परवानगी शुल्क आकारले जाईल. महानगरपालिकेची परवानगी न घेतल्यास प्रती दिवशी रु.30,000/- याप्रमाणे दंडात्मक शुल्क वसुल करण्यात येईल.**
2) **ज्या आरक्षित जागांचा वापर मार्बल , नर्सरी व अन्य व्यावसायिक कारणासाठी नियमितपणे होत असेल अशा मालमत्तांची कर आकारणी प्रती रु .1/- चौ. फुट दराप्रमाणे करण्यात येईल. सदर कराचा भरणा झाल्यानंतरच अशा व्यवसायिक वापरासाठी महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात येईल अन्यथा सदर आरक्षित जागांना प्रती रु .3/- चौ. फुट दराप्रमाणे याप्रमाणे कर आकारणी करण्यात येईल.**
3) **सदर जागेवर निर्माण होणारा कचरा संबधित जागा मालकाने स्व -खर्चाने स्वच्छ करून जागा व परीसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहिल याची दक्षता प्रभाग अधिकारी यांनी घ्यावी.**
4) **आरक्षित जागेव र महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय कोणताही वापर व दुरूपयोग होणार नाही याची संबंधीत विभागाने दक्षता घेण्यात यावी.**
5) **ज्या आरक्षित जागेचा वापर महानगरपालिकेची परवानगी न घेता व्यावसायिक कारणासाठी होत आहे. तथापि त्याची कर आकारणी न झाल्यास वरीलप्रमाणे सदर जागेची कर आका रणी किंवा दंडात्मक शुल्काची कार्यवाही महानगरपालिकेने करावी व सदर रक्कमेचा भरणा जमिन मालकाने न केल्यास सदर जमिन मालकाची मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात अन्य् मालमत्ता असल्यास त्यांच्या मालमत्ता कर देयकातून सदर रक्कम वसुल करावी अन्यथा सदरचा बोजा त्यांच्या 7/12 वर चढविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.**
6) **नगररचना विभागाने अशा आरक्षित जागांवर बांधकाम परवानगी देताना वरीलप्रमाणे शुल्क , दंडात्मक शुल्क किंवा कर भरणा झाले असल्याची खातरजमा करुनच परवानगी दयावी.**

सुचक :- श्री. विनोद काशिनाथ म्हात्रे                    अनुमोदन :- श्री. जयेश भानुदास भोईर

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शाह रिटा सुभाष | १ | ढवण निलम हरीशचंद्र | |
| २ | तिवारी अशोक सुर्यदेव | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | पांडेय पंकज सूर्यमणि | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | परदेशी गिता हरीश | |
| ५ | गोहिल शानू जोरावर सिंह | ५ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| ६ | कांगणे मीना यशवंत | ६ | शेख अमजद गफार | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ८ | शेट्टी गणेश गोपाळ | ८ | घरत तारा विनायक | |
| ९ | भोईर गणेश गजानन | ९ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १० | पाटील प्रभात प्रकाश | १० | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ११ | रावल मेघना दिपक | ११ | शिर्के अनंत गेणू | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | पाटील वंदना विकास | |
| १३ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १३ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १४ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | भोईर कमलेश यशवंत | |
| १६ | जैन राजेंद्र भवरलाल | १६ | पाटील अनिता जयवंत | |
| १७ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १७ | भोईर भावना राजू | निरंक |
| १८ | व्यास रवि वासुदेव | १८ | भोईर राजू यशवंत | |
| १९ | रकवी वैशाली गजेंद्र | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २० | डिसा मर्लिन मर्विन | |
| २१ | खंडेलवाल सुरेश जगदीश | २१ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २२ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २२ | भट दीप्ती शेखर | |
| २३ | मेहता डिंपल विनोद | २३ | सपार उमा विश्वनाथ | |
| २४ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २४ | अहमद साराह अकरम | |
| २५ | थेराडे संजय अनंत | २५ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| २६ | मुखर्जी अनिता बबलू | २६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| २७ | वैती चंद्रकांत सिताराम | २७ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २८ | पारधी सुजाता यशवंत | २८ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २९ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| ३० | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३१ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३२ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ३४ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३५ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३७ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३८ | नाईक विविता विवेक | | | |
| ३९ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ४० | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४१ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ४२ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४३ | भावसार वंदना संजय | | | |
| ४४ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ४५ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४६ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४७ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४८ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४८, **शहरात ठिकठिकाणी गॅरेजेस सुरु आहेत त्यामुळे वाहने रस्त्यावर पार्किंग केले जातात त्यावर कार्यवाही करणेबाबत.**

निला सोन्स :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध भागात मोठया प्रमाणावर वाहने दुरुस्तीची गॅरेजेस आहेत. सदर गॅरेज व्यवसाय करणाऱ्यांनी परवानगी घेऊन त्यांच्या जागेत व्यवसाय करणे आवश्यक आहे. तथापी सदर व्यवसाय करणाऱ्यांकडुन सर्व्हीस रस्त्यावर वाहने उभी करुन व्यवसाय चालविण्यात येत आहे. त्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होऊन रस्ते व सार्वजनिक ठिकाणे गलिच्छ होत असतात.**

**विनापरवानगी व्यवसाय करणाऱ्या तसेच त्यांच्या क्षेत्रापेक्षा महानगरपालिकेच्या क्षेत्रातील रस्त्यांवर, सार्वजनिक जागेवर, व्यवसाय करणाऱ्या गॅरेज वाल्यांवर शास्तीसह दंडात्मक कारवाई करणे गरजेचे असल्याने धोरण ठरविणेकामी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | महापौर | अध्यक्ष |
| २. | उप-महापौर, | सदस्य |
| ३. | स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | सभागृहनेते | सदस्य |
| ५. | विरोधी पक्षनेते | सदस्य |
| ६. | गटनेते | सदस्य |

**टिप :-सदर समितीला शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व उप-आयुक्त (अनधिकृत बांधकाम) सहाय्य करतील.**

**विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी . तरी सदर समिती मार्फत धोरण अंतिम करून सदर धोरणाची कडक अमंलबजावणी करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.**

**शानु गोहिल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४८ :-**

**शहरात ठिकठिकाणी गॅरेजेस सुरु आहेत त्यामुळे वाहने रस्त्यावर पार्किंग केले जातात त्यावर कार्यवाही करणेबाबत.**

ठराव क्र. ४५ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध भागात मोठया प्रमाणावर वाहने दुरुस्तीची गॅरेजेस आहेत. सदर गॅरेज व्यवसाय करणाऱ्यांनी परवानगी घेऊन त्यांच्या जागेत व्यवसाय करणे आवश्यक आहे. तथापी सदर व्यवसाय करणाऱ्यांकडुन सर्व्हीस रस्त्यावर वाहने उभी करुन व्यवसाय चालविण्यात येत आहे. त्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होऊन रस्ते व सार्वजनिक ठिकाणे गलिच्छ होत असतात. विनापरवानगी व्यवसाय करणाऱ्या तसेच त्यांच्या क्षेत्रापेक्षा महानगरपालिकेच्या क्षेत्रातील रस्त्यांवर, सार्वजनिक जागेवर, व्यवसाय करणाऱ्या गॅरेज वाल्यांवर शास्तीसह दंडात्मक कारवाई करणे गरजेचे असल्याने धोरण ठरविणेकामी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | महापौर | अध्यक्ष |
| २. | उप-महापौर, | सदस्य |
| ३. | स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | सभागृहनेते | सदस्य |
| ५. | विरोधी पक्षनेते | सदस्य |
| ६. | गटनेते | सदस्य |

**टिप :-सदर समितीला शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व उप-आयुक्त (अनधिकृत बांधकाम) सहाय्य करतील.**

**विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी . तरी सदर समिती मार्फत धोरण अंतिम करून सदर धोरणाची कडक अमंलबजावणी करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्रीम. निला सोन्स अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४९, **शहरामध्ये ॲमेनिटी ओपन स्पेसमध्ये मध्यवर्ती ठिकाणी महिला व बालकल्याण भवन उभारणेबाबत.**

**शानु गोहिल :-**

**प्रस्तावना :-**

मिरा-भाईंदर शहरातील विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.**14/05/2017** रोजी मंजुर झालेली असून दि **.15/07/2017** पासून अंमलात आलेली आहे . वगळलेला भागाची विकास योजना

दि.**25/08/2000** रोजी मंजुर झालेली असून दि .**15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे . मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय टिपीएस **-1208/1346/**प्र.क्र.**267/08/**नवि**-12** दि.**29/08/2009** अन्वये फेरबदल मंजुर झाले आहेत.

मंजुर विकास योजना व विकास नियंत्रण नियमावली विनिमय क्र .**26** नुसार **2000** चौ.मीटर पेक्षा जास्तीचे भुखंड क्षेत्रासाठी **5%** नुसार नागरी सुविधा क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय दि.**29/08/2009** रोजीच्या विकास नियत्रंण नियमावलीतील मंजुर विनिमय **55 -** अ प्रमाणे औदयोगिक क्षेत्रा रहिवास क्षेत्रात संपादित केलेल्या भुखंडाचे क्षेत्रासाठी **2000** चौ.मीटर क्षेत्रापर्यंत **20%** व **5000** चौ.मीटर पेक्षा जास्तीचे क्षेत्रासाठी **25%** नुसार नागरी सुविधा क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. विकासक/ अधिकार पत्र धारक यांनी नागरीसुविधा क्षेत्राने बाधित जागेचा महानगरपालिका सोबत नोंदणीकृत करारनामा करुन सदरचे क्षेत्राची मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे नावे महसुली अभिलेखी नोंद झालेला **7/12** उतारा सादर केल्यानंतर सदर क्षेत्राचा अतिरिक्त चटईक्षेत्र मोबदला देण्यात येतो.

सद्यस्थीतीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी दिल्याने प्राप्त होणाऱ्या **25** नागरी सुविधा क्षेत्राचे भुखंडा पैकी **12** भुखंड हस्तातरीत झालेले असून त्यापैकी **07** भुखंड विकसित झालेले असून **04** भुखंडावर विकासकांना महानगरपालिकेने नकाशे मंजुर करुन महानगरपालिकेने सुचविलेल्या कामासाठी इमारत बांधण्यासाठी कळविलेले आहे. त्यापैकी **02** भुखंडावर कामे सुरु आहेत.

उर्वरित **14** नागरी क्षेत्राचे भुखंड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे . सदर नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडावर विकासकाकडून विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात महिला व बालकल्याण भवन इमारचे काम करुन घेता येईल **असा प्रस्ताव प्रशासनाने दिला आहे.**

**ठराव क्रमांक ( ) :-**

**उपरोक्त प्रशासनाचा प्रस्ताव पाहता मौजे गोडदेव सर्व्हे क्र .30(327)1, 2,4,5,6,8,9,11,12,14,16,17,18,21,22,25, 29(328)/1,2,3,4 पै.,5,7,11,22(340)/1,2,3,4,6,8,9,12, 20(341)/6 या ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेवर महिला व बालकल्याण भवन इमारत टीडीआर च्या मोबदल्यात बांधून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे किंवा पूर्णत: महापालिकेच्या खर्चात बांधून घेण्यात यावे . सदरचे काम हे विकासकाने टीडी .आरच्या मोबदल्यात न केल्यास महानगरपालिकेच्या निधीतून आवश्यक तरतूद करून सदरचे काम करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी सुविधा क्षेत्र भुखंड (ॲमिनिटी ओपन स्पेस ) तरतुदी खाली उपलब्ध होणाऱ्या जागा विकसित करण्या साठी खालील प्रमाणे नव्याने धोरण निश्चित करण्यात येत आहे.**

**1) विकासकास बांधकाम परवानगी देताना मंजुर नकाशानुसार त्यांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाचा भुखंड हा नोंदणीकृत करारनामा करुन सदर भुखंडास कुंपणभित घालुन हस्तांतरीत करुन घेण्यात यावा. सदर भुखंड हा स्वतंत्र व पोहच रस्ता असेल अशा ठिकाणी घेण्यात यावा.**

**2) नागरी सुविधा क्षेत्र भुखंडावर महानगरपालिकेस बांधावयाच्या बांधकामाचा नकाशा महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या आवश्यकतेनुसार तयार करुन घेण्यात येऊल प्रथमत : अतिरिक्त चटई क्षेत्राच्या मोबदल्यात विकासकाकडून बांधून घेण्यासाठी परवानगी देताना प्रयत्न करण्यात यावा, जेणेकरुन महानगरपालिकेचा निधी खर्च होणार नाही.**

**3) विकासकाकडून अतिरिक्त चटई क्षेत्राच्या मोबदल्यात बांधकाम करण्याची ईच्छा नसल्यास तसे लेखी**

**घ्यावे व महानगरपालिकेमार्फत सदर नागरी सुविधा क्षेत्र भुखंड विकसीत करण्याची प्रक्रिया सुरु करावी.**

**4) नागरी सुविधा क्षेत्र तरतुदी खालील अतिरिक्त चटई क्षेत्राच्या मोबदल्यात बांधकामासाठी विकासकास**

**परवानगी देताना सदर काम पुर्ण करुन देण्याची मुदत ठरविण्यात या वी व तसे हमी पत्र घ्यावे . मुदतीत बांधकाम करुन न दिल्यास रु . 20 प्रति चौ.फुट प्रति महिना विलंब दंड वसुल करण्यात यावा. तसेच विकासकाच्या कामास स्थगिती देण्यात यावी . एखादया विशेष कारणामुळे विलंब झाल्यास मुदतवाढ देण्याचा अधिकार आयुक्त यांना राहिल.**

**5) विकासक अतिरिक्त चटई क्षेत्राच्या मोबदल्यात बांधकाम करुन देत असल्यास विकासकाने त्याचे काम व महानगरपालिकेचे बांधकाम एकत्रित सुरु करेल याची दक्षता घेण्यात यावी.**

**6) मिरा-भाईदर महानगरपालिकेने आतापर्यंत नागरीसुविधा क्षेत्राच्या तरतुदीखाली परवानगी दिलेल्या आतापर्यंत विकासकानी ताब्यात न दिलेल्या भुखंडाबाबत 15 दिवसाच्या आत नोंदणीकृत करारनामे करुन कुंपणभित बांधकामासह सदर भुखंड महानगरपालिकेने ताब्यात घ्यावेत.**

**7) ज्या विकासकांना सुविधा क्षेत्र भुखडांवर अतिरिक्त चटई क्षेत्राच्या मोबदल्यात परवानग्या देण्यात आल्या आहेत. त्यांना बोलावून सदर कामे पुर्ण करण्यासाठी मुदत ठरवुन देण्यात याव्यात . तसेच त्याबाबत हमीपत्र घ्यावे , अन्यथा वरीलप्रमाणे विलंब दंड आकारण्यात यावा व सदर धोरणांची लेखी माहिती विकासकांना देण्यात यावी . तसेच जे विकासक नागरी सुविधा क्षेत्राचे भुखंड हस्तांतरीत करणार नाहीत अथवा परवानगी प्रमाणे कामे सुरु करणार नाहीत त्यांच्या परवानग्या त्वरीत स्थगित करण्यात याव्यात.**

**वरील प्रमाणे धोरणाची कडक अमंलबजावणी तातडीने करण्यात यावी.**

**सिमा शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४९ :-**

**शहरामध्ये ॲमेनिटी ओपन स्पेसमध्ये मध्यवर्ती ठिकाणी महिला व बालकल्याण भवन उभारणेबाबत.**

**ठराव क्र. ४६ :-**

**प्रस्तावना :-**

मिरा-भाईदर शहरातील विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.**14/05/2017** रोजी मंजुर झालेली असून दि **.15/07/2017** पासून अंमलात आलेली आहे . वगळलेला भागाची विकास योजना दि.**25/08/2000** रोजी मंजुर झालेली असून दि **.15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे . मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय टिपीएस **-1208/1346/**प्र.क्र.**267/08/**नवि**-12** दि.**29/08/2009** अन्वये फेरबदल मंजुर झाले आहेत.

मंजुर विकास योजना व विकास नियंत्रण नियमावली विनिमय क्र **.26** नुसार **2000** चौ.मीटर पेक्षा जास्तीचे भुखंड क्षेत्रासाठी **5%** नुसार नागरी सुविधा क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय दि.**29/08/2009** रोजीच्या विकास नियत्रंण नियमावलीतील मंजुर विनिमय **55 -** अ प्रमाणे औदयोगिक क्षेत्रा रहिवास क्षेत्रात संपादित केलेल्या भुखंडाचे क्षेत्रासाठी **2000** चौ.मीटर क्षेत्रापर्यंत **20%** व **5000** चौ.मीटर पेक्षा जास्तीचे क्षेत्रासाठी **25%** नुसार नागरी सुविधा क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. विकासक/ अधिकार पत्र धारक यांनी नागरीसुविधा

क्षेत्राने बाधित जागेचा महानगरपालिका सोबत नोंदणीकृत करारनामा करुन सदरचे क्षेत्राची मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे नावे महसुली अभिलेखी नोंद झालेला **7/12** उतारा सादर केल्यानंतर सदर क्षेत्राचा अतिरिक्त चटईक्षेत्र मोबदला देण्यात येतो.

सद्यस्थीतीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी दिल्याने प्राप्त होणाऱ्या **25** नागरी सुविधा क्षेत्राचे भुखंडा पैकी **12** भुखंड हस्तातरीत झालेले असून त्यापैकी **07** भुखंड विकसित झालेले असून **04** भुखंडावर विकासकांना महानगरपालिकेने नकाशे मंजुर करुन महानगरपालिकेने सुचविलेल्या कामासाठी इमारत बांधण्यासाठी कळविलेले आहे. त्यापैकी **02** भुखंडावर कामे सुरु आहेत.

उर्वरित **14** नागरी क्षेत्राचे भुखंड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे . सदर नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडावर विकासकाकडून विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात महिला व बालकल्याण भवन इमारचे काम करुन घेता येईल **असा प्रस्ताव प्रशासनाने दिला आहे.**

**ठराव क्रमांक (     ) :-**

**उपरोक्त प्रशासनाचा प्रस्ताव पाहता मौजे गोडदेव सर्व्हे क्र .30(327)1, 2,4,5,6,8,9,11,12,14,16,17,18,21,22,25, 29(328)/1,2,3,4 पै.,5,7,11,22(340)/1,2,3,4,6,8,9, 12, 20(341)/6 या ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेवर महिला व बालकल्याण भवन इमारत टीडीआर च्या मोबदल्यात बांधून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे किंवा पूर्णत: महापालिकेच्या खर्चात बांधून घेण्यात यावे. सदरचे काम हे विकास काने टीडी.आरच्या मोबदल्यात न केल्यास महानगरपालिकेच्या निधीतून आवश्यक तरतूद करून सदरचे काम करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी सुविधा क्षेत्र भुखंड (ॲमिनिटी ओपन स्पेस ) तरतुदी खाली उपलब्ध होणाऱ्या जागा विकसित करण्यासाठी खालील प्रमाणे नव्याने धोरण निश्चित करण्यात येत आहे.**

**1) विकासकास बांधकाम परवानगी देताना मंजुर नकाशानुसार त्यांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाचा भुखंड हा नोंदणीकृत करारनामा करुन सदर भुखंडास कुंपणभित घालुन हस्तांतरी त करुन घेण्यात यावा. सदर भुखंड हा स्वतंत्र व पोहच रस्ता असेल अशा ठिकाणी घेण्यात यावा.**

**2) नागरी सुविधा क्षेत्र भुखंडावर महानगरपालिकेस बांधावयाच्या बांधकामाचा नकाशा महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या आवश्यकतेनुसार तयार करुन घेण्यात येऊल प्रथमत : अतिरिक्त चटई क्षेत्राच्या मोबदल्यात विकासकाकडून बांधून घेण्यासाठी परवानगी देताना प्रयत्न करण्यात यावा, जेणेकरुन महानगरपालिकेचा निधी खर्च होणार नाही.**

**3) विकासकाकडून अतिरिक्त चटई क्षेत्राच्या मोबदल्यात बांधकाम करण्याची ईच्छा नसल्यास तसे लेखी घ्यावे व महानगरपालिकेमार्फत सदर नागरी सुविधा क्षेत्र भुखंड विकसीत करण्याची प्रक्रिया सुरु करावी.**

**4) नागरी सुविधा क्षेत्र तरतुदी खालील अतिरिक्त चटई क्षेत्राच्या मोबदल्यात बांधकामासाठी विकासकास परवानगी देताना सदर काम पुर्ण करुन देण्याची मुदत ठरविण्यात यावी व तसे ह मी पत्र घ्यावे. मुदतीत बांधकाम करुन न दिल्यास रु . 20 प्रति चौ.फुट प्रति महिना विलंब दंड वसुल करण्यात यावा. तसेच विकासकाच्या कामास स्थगिती देण्यात यावी . एखादया विशेष कारणामुळे विलंब झाल्यास मुदतवाढ देण्याचा अधिकार आयुक्त यांना राहिल.**

**5) विकासक अतिरिक्त चटई क्षेत्राच्या मोबदल्यात बांधकाम करुन देत असल्यास विकासकाने त्याचे काम व महानगरपालिकेचे बांधकाम एकत्रित सुरु करेल याची दक्षता घेण्यात यावी.**

**6) मिरा-भाईदर महानगरपालिकेने आतापर्यंत नागरीसुविधा क्षेत्राच्या तरतुदीखाली परवानगी दिलेल्या आतापर्यंत विकासकानी ताब्यात न दिलेल्या भुखंडाबाबत 15 दिवसाच्या आत नोंदणीकृत करारनामे करुन कुंपणभित बांधकामासह सदर भुखंड महानगरपालिकेने ताब्यात घ्यावेत.**

**7) ज्या विकासकांना सुविधा क्षेत्र भुखडांवर अतिरिक्त चटई क्षेत्राच्या मोबदल्यात परवानग्या देण्यात आल्या आहेत. त्यांना बोलावून सदर कामे पुर्ण करण्यासाठी मुदत ठरवुन देण्यात याव्यात . तसेच त्याबाबत हमीपत्र घ्यावे , अन्यथा वरीलप्रमाणे विलंब दंड आकारण्यात यावा व सदर धोरणांची लेखी माहिती विकासकांना देण्यात यावी . तसेच जे विकासक नागरी सुविधा क्षेत्राचे भुखंड हस्तांतरीत करणार नाहीत अथवा परवा नगी प्रमाणे कामे सुरु करणार नाहीत त्यांच्या परवानग्या त्वरीत स्थगित करण्यात याव्यात.**

**वरील प्रमाणे धोरणाची कडक अमंलबजावणी तातडीने करण्यात यावी.**

सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५०, **फेरीवाला/ना फेरीवाला क्षेत्राचे पुर्नविलोकन करणे व धोरण ठरविणे.**

**मदन उदित नारायण सिंह :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील फेरीवाला ना फेरीवाला क्षेत्रातील पुर्नविलोकन करणे व धोरण ठरविणेकामी निर्णय घेणेकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | महापौर | अध्यक्ष |
| २. | उप-महापौर | सदस्य |
| ३. | स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | सभागृहनेते | सदस्य |
| ५. | विरोधी पक्षनेते | सदस्य |
| ६. | गटनेते | सदस्य |

टिप :- सदर समितीला शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व संबंधीत उप-आयुक्त सहाय्य करतील.

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी. तरी वरील समितीने शिफारस केलेल्या निर्णयानूसार अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे.

**रिटा शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

हे जे धोरण ठरवतो यापूर्वी देखील फेरिवाला आणि ना फेरिवाला धोरण ठरलेले होते. परंतु अद्यापी ते पूर्ण ना फेरिवाला झोनमध्ये फेरिवाले बसत आहेत. तर त्याच्यावर कदापी कारवाई केली गेली नाही. आता पण तसेच होणार आहे का? की कागदोपत्री फक्त?

**मा. उपमहापौर :-**

आता आपण जे नव्याने आणि ती स्थापन करणार आहोत. कोर्टाचे वेगवेगळे आदेश आहेत. आता महाराष्ट्र सरकारने नविन दिशा निर्देश दिलेले आहेत. त्यांची अंमलबजावणी ह्या समितीच्यामार्फत आपण करु. कारवाई करणार नक्की होणार.

**निलम ढवण :-**

कारण आपले नवघर रोड, बी.पी.रोड, ना फेरिवाला झोन आहे तरी देखील इतक्या वर्षापासून तक्रार करुन देखील लोकांना चालायला प्रॉब्लेम होत आहे. तर त्या पध्दतीने जर कारवाई होणार असेल तर ही सगळी धोरणे ठरवून उपयोग आहे. तर त्यानुसार कारवाई व्हावी अशी आपणास विनंती.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ५० :-**

**फेरीवाला/ना फेरीवाला क्षेत्राचे पुर्नविलोकन करणे व धोरण ठरविणे.**

**ठराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील फेरीवाला ना फेरीवाला क्षेत्रातील पुर्नविलोकन करणे व धोरण ठरविणेकामी निर्णय घेणेकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | महापौर | अध्यक्ष |
| २. | उप-महापौर | सदस्य |
| ३. | स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | सभागृहनेते | सदस्य |
| ५. | विरोधी पक्षनेते | सदस्य |
| ६. | गटनेते | सदस्य |

टिप :- सदर समितीला शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व संबंधीत उप-आयुक्त सहाय्य करतील.

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी. तरी वरील समितीने शिफारस केलेल्या निर्णयानूसार अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह** **अनुमोदक :- श्रीम. रिटा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५१, **पार्कींग व नो-पार्कींग क्षेत्राचे पुर्नविलोकन करणे व धोरण ठरविणे.**

**राकेश शहा :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रतील लोकसंख्या ही वेगाने वाढत असुन नागरीकरण देखील वेगाने होत आहे. शहरातील रस्ते हे वाहतुकीस, रहदारीस अपूरे पडत असुन वाहने पार्कीग ची समस्या निर्माण झालेली आहे. शहरातील रस्ते व सार्वजनिक ठिकाणी वाहने पार्कीगसाठी सर्वेक्षण करण्यासाठी सी.आय.आर.टी. या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. सदर संस्थेमार्फत अंतिम अहवाल महानगरपालिकेस सादर करण्यात आला आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पार्कीग व नो-पार्कीग धोरण अंतिम करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | महापौर | अध्यक्ष |
| २. | उप-महापौर, | सदस्य |
| ३. | स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | सभागृहनेते | सदस्य |
| ५. | विरोधी पक्षनेते | सदस्य |
| ६. | गटनेते | सदस्य |

टिप :- सदर समितीला शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व संबधीत उप-आयुक्त सहाय्य करतील.

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी.

तरी सदर समिती मार्फत धोरण अंतिम करून सदर धोरणाची कडक अमंलबजावणी करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**अशोक तिवारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, ह्या संदर्भातले आता तुम्ही धोरण किंवा त्या संदर्भातले सुझाव घेणार आहोत का?

**मा. उपमहापौर :-**

सभागृहाला सांगु इच्छितो की विस एक दिवसापूर्वी ह्या महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या दालनामध्ये सन्मा. आमदार नरेंद्र मेहता साहेब सन्मा. महापौर मॅडम आम्ही उपस्थित होतो. ठाणे जिल्ह्याचे एस.पी. ठाण्याचे ट्राफीक कमीशनर मिरा भाईंदरचे वाहतुक इन्चार्ज, मिरा भाईंदरचे सहा पोलिस स्टेशनचे इंचार्ज आणि आपले अधिकारी, आयुक्त साहेब अशी एक मिटींग झाली आणि मिटींगमध्ये अनेक विषयांवरती आपण चर्चा केली. मग शहरात चालणा-या ज्या चुकीच्या गोष्टी आहेत ह्या आपल्या इललिगल कंस्ट्रक्शन तोडण्याचे कारवाई वगैरे ह्या ब-याच गोष्टींवर विषय झाला. ह्याच शहराची पार्किंग-नो पार्किंग सिग्नल यंत्रणा आणि आपण काय काय करु शकतो कारण मुंबईला एक गाडी उचलल्यानंतर ज्या टोईंगव्हॅन असतात त्यांच्यावरती किती मोठे संकट कोर्टाच्या माध्यमातून आले तर अशा गंभीर बाबींना सामोरे जाण्याची वेळ आपल्यावरती येऊ नये म्हणून ह्या दृष्टीकोनातून आपण पोलिसांचे सहकार्य घेतले. पूर्ण चर्चा केलेली आहे. पोलिसांनी पुन्हा पुन्हा आपल्याला सांगितले की ज्या-ज्या वेळेला आमची मदत लागेल कारण आपल्याला फेरिवाल्यांचे धोरण निश्चित करताना कोर्टानी दिलेल्या गोष्टी आहेत तशा पार्किंगसाठीच्या आहेत अशा अनेक गोष्टी आहेत.

**निलम ढवण :-**

आपण माहिती दिल्यानुसार लक्षात आले की एक माझ्यातर्फे शिवसेनेच्या सगळ्या नगरसेवकांच्या वतीने आपणास एक सुचना देत आहे जेव्हा ह्या शहराचा विषय असतो आणि त्यावेळी शहराच्या विषयावर चर्चा करण्यासाठी जेव्हा एस.पी. म्हणा किंवा काही शासकीय लेव्हलच्यावरचे लोक येतात त्यावेळी ह्या शहराला दोन आमदार असल्या कारणाने याची सुचना शिवसेनेचे आमदार आदरणीय सरनाईक साहेब यांना देखील आपण बोलवावे. जेणेकरुन त्यांच्या माध्यमातून आमच्यापर्यंत पण ज्या गोष्टी घडतात त्या आम्हाला कळतील आणि इथले स्थानिक आमदार असल्यामुळे त्यांनाही महानगरपालिकेच्या त्या मिटींगमध्ये सामावून घेण्यात यावे. असे मी प्रशासनाला देखील विनंती करते. दुसरी गोष्ट पार्किंगचा जो विषय आहे जो आपल्या पध्दतीने एस.पी. किंवा आपण हॅन्डल करतो. ज्या ठिकाणी ग्रामपंचायत काळातल्या इमारती आहेत त्या इमारती कशाही उभारल्या गेलेल्या आहेत. त्यावेळी परवानगी किंवा इतर काही गोष्टी जे रुल्स आणि रेग्युलेशन होते बांधकामासाठी त्यावेळी ते नव्हते आणि त्यामुळे कशाही उभारल्या गेल्या. अक्षरशः त्या एखाद्या गल्लीत जाताना पण एखादी ॲम्ब्युलन्स जाताना फायर ब्रिगेडची गाडी जाताना देखील बराच प्रॉब्लेम होतो. त्यामुळे तिथे पार्किंगची व्यवस्था नाहीच कुठल्या बिल्डींगला प्रत्येक जण येतो आपल्या गाडी खाली किंवा गल्लीत आपली गाडी पार्क करतो. त्यामुळे प्रथमतः अशी मागणी आहे की भाईंदर पूर्व नवघर रोड आणि बी.पी. रोड असु देत पण नवघर रोडला एक जागा आहे जी जागा आम्ही त्यावेळी पण सजेस केली होती. आरक्षण क्र. ११० की तिथे शाळेचे होणार पण नाही पण तात्पुरत्या स्वरुपात पे ॲन्ड पार्क उभारावे. जेणेकरुन रस्त्यावरच्या आणि गल्लीतली वाहतुक तिकडे आपल्याला घेता येईल. त्यामुळे आपणांस विनंती आहे की लवकरात लवकर तिथे एक पे ॲन्ड पार्क आपण करण्यात यावे. आणि त्याचे आदेश आपण देण्यात यावे. जेणेकरुन ही समस्या कमी प्रमाणात होईल कारण पर्यायी व्यवस्था केल्याशिवाय आपण त्याच्यावर काहीही करु शकत नाही.

**मा. महापौर :-**

समितीच्यासमोर तुम्ही हे विचारा आणि तुमचे पत्र द्या की ही जमीन आहे पार्किंगसाठी.

**निलम ढवण :-**

मी पत्र दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

चालेल. ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ५१ :-**

**पार्कींग व नो-पार्कींग क्षेत्राचे पुर्नविलोकन करणे व धोरण ठरविणे.**

**ठराव क्र. ४८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रतील लोकसंख्या ही वेगाने वाढत असुन नागरीकरण देखील वेगाने होत आहे. शहरातील रस्ते हे वाहतुकीस, रहदारीस अपूरे पडत असुन वाहने पार्कींग ची समस्या निर्माण झालेली आहे. शहरातील रस्ते व सार्वजनिक ठिकाणी वाहने पार्कीगसाठी सर्वेक्षण करण्यासाठी सी.आय.आर.टी. या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. सदर संस्थेमार्फत अंतिम अहवाल महानगरपालिकेस सादर करण्यात आला आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पार्कीग व नो-पार्कीग धोरण अंतिम करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | महापौर | अध्यक्ष |
| २. | उप-महापौर, | सदस्य |
| ३. | स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | सभागृहनेते | सदस्य |
| ५. | विरोधी पक्षनेते | सदस्य |
| ६. | गटनेते | सदस्य |

टिप :- सदर समितीला शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व संबधीत उप-आयुक्त सहाय्य करतील.

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी.

तरी सदर समिती मार्फत धोरण अंतिम करून सदर धोरणाची कडक अमंलबजावणी करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदक :- श्री. अशोक तिवारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५२, **पुर्नविनियोजन करणेबाबत.**

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रकात सुरु असलेल्या महसुली व भांडवली कामांसाठी ज्या ज्या लेखाशिर्षात तरतूदी अभावी विकास कामे पुढे सुरु ठेवणे अडचणीचे होत आहे. त्यामध्ये उदा. परिवहन, सार्व. बांधकाम, पाणीपुरवठा, आरोग्य विभाग या विभागांना निधीची आवश्यकता असल्याने सदर विभागांची कामे प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. परंतु प्रशासनाकडून महासभेसाठी गोषवारा प्राप्त न झाल्यामुळे पुर्नविनोयोजन करणे शक्य होत नाही. तरी आयुक्तांनी पुढील मा. महासभेकरीत पुर्नविनोयोजनाचा प्रस्ताव सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे. महापौर मॅडम आता ठराव मांडला. काका जे आपण बोलले खुप चांगला विषय असा होतो की आता आपले महापौर मॅडम परिवहन किंवा आरोग्य आयुक्त साहेब, म्हसाळ साहेब हा पुर्नविनियोजनचा आपल्याला अस काही वाटत नाही की हा विषय महासभेमध्ये किंवा कुठे तुम्हाला आपल्याला द्यायला पाहिजे होता. कारण की परिवहनची अशी अवस्था आहे की त्यांना पगार देण्यासाठी पैसे नाहीत. आरोग्याचे पानपट्टे साहेब बसलेले आहेत. तुमची अशी परिस्थिती आहे की हे शहरामध्ये २-२, ३-३ पहिला हडताल झालेले आहेत म्हणजे हे परत आपल्याला बघायचे आहे का? म्हणजे आपण का वाट बघत आहात का परिवहन व्यवस्था ठप्प पडायची किंवा आरोग्याने सर्वांना हडताल वर जायचं. आपण ही

वाट बघत आहात की काय? प्रशासनाला अस वाटत नाही की ह्या सर्व गोष्टी इमरजन्सी आहेत. आयुक्त साहेब आता महासभेपुढे किती दिवसानंतर होणार. इलेक्शन किंवा काय असेल साहेब थोडस ही जी वस्तुस्थिती आहे याची थोडी गांभिर्याने लक्ष घालुन प्रशासनाला थोडे कडक करा.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

ठिक आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ५२ :-**

**पुर्नविनियोजन करणेबाबत.**

**ठराव क्र. ४९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रकात सुरु असलेल्या महसुली व भांडवली कामांसाठी ज्या ज्या लेखाशिर्षात तरतूदी अभावी विकास कामे पुढे सुरु ठेवणे अडचणीचे होत आहे. त्यामध्ये उदा. परिवहन, सार्व. बांधकाम, पाणीपुरवठा, आरोग्य विभाग या विभागांना निधीची आवश्यकता असल्याने सदर विभागांची कामे प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. परंतु प्रशासनाकडून महासभेसाठी गोषवारा प्राप्त न झाल्यामुळे पुर्नविनोयोजन करणे शक्य होत नाही. तरी आयुक्तांनी पुढील मा. महासभेकरीत पुर्नविनोयोजनाचा प्रस्ताव सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५३, **शहरातून जाणाऱ्या प्रस्तावित मेट्रो रेल्वे स्थानकांच्या नामकरणाबाबत.**

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन मेट्रो रेल्वे जाणार असुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) मार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरण यांनी मिरा भाईंदर शहरात मेट्रो साठी खालील ठिकाणी स्टेशन निश्चित करुन सदर स्टेशनची नावे अंतिम करुन कळविणेसाठी पत्र दिले आहे.

1) पांडुरंगवाडी, (राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वर)

2) अमर पॅलेस, (राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वर)

3) झंकार कंपनी (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर)

4) साईबाबा नगर (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर)

5) दिपक हॉस्पीटल (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर)

6) शहीद भगतसिंग उद्यान (मॅक्सस मॉल समोरील मैदानाजवळ)

7) सुभाषचंद्र बोस स्टेडीयम (भाईंदर (पश्चिम) येथे)

8) महानगरपालिका क्रिडा संकुल (गोल्डन नेस्ट रस्त्यावर)

9) इंद्रलोक (गोल्डन नेस्ट रस्त्यावर)

वरील प्रमाणे एकुण नऊ स्टेशनची नावे अंतिम करुन एम.एम.आर.डी.ए. यांना कळवावयाचे आहे. प्रशासनाच्या प्रस्तावानुसार सदर स्टेशनची नामकरणे खालील प्रमाणे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | मा. महासभेने दिलेले नाव |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | पांडुरंगवाडी, (राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वर) | **पेणकरपाडा** |
| 2 | अमर पॅलेस, (राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वर) | **मिरागाव** |
| 3 | झंकार कंपनी (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर) | **छत्रपती शिवाजी महाराज** |
| 4 | साईबाबा नगर (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर) | **सरदार वल्लभभाई पटेल** |
| 5 | दिपक हॉस्पीटल (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर) | **नानासाहेब धर्माधिकारी** |
| 6 | शहीद भगतसिंग उद्यान (मॅक्सस मॉल समोरील मैदानाजवळ) | **महावीर स्वामी** |
| 7 | सुभाषचंद्र बोस स्टेडीयम (भाईंदर (पश्चिम) येथे) | **सदानंद महाराज टर्मिनल** |
| 8 | महानगरपालिका क्रिडा संकुल (गोल्डन नेस्ट रस्त्यावर) | **महाराणा प्रताप** |
| 9 | इंद्रलोक (गोल्डन नेस्ट रस्त्यावर) | **नवघर** |

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, आपले लक्ष कृपया सभागृहापुढे द्या, आता जो विषय आलेला आहे. आणि काकांनी जो विषय वाचला नऊ स्टेशन आपल्या मिरा भाईंदरमध्ये आपण दाखविलेले नावे दिलेले आहेत. मी आपल्याला विनंती करतो की काका तुम्ही जे साईबाबा नगर दिले त्या ठिकाणी मी एक सुचना करतो की त्या स्टेशनला भाईंदरचे शान जे पहिल्यापासुन जी गाव ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये आहेत त्या सगळ्यांचे देवस्थान ब्रम्हदेव मंदिर आहे. आज शंभर वर्षाअगोदर पासुन ते मंदिर त्या ठिकाणी जिर्णोध्दार झाला त्या मंदिराचे तर येता जाता गाववाले होते सगळे होते तर त्या देवाचे दर्शन घेऊन गावाच्या बाहेर पडायचे. त्या गावामध्ये येताना ब्रम्हदेव मंदिराचे दर्शन घेऊन गावामध्ये यायचे तर काका माझी एक सुचना आहे की साईबाबा नगर स्टेशनला ब्रम्हदेव मंदिराचे नाव देण्यासाठी मी शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांच्या वतीने ह्या ठिकाणी एक सुचना करत आहे. ती जर सुचना मान्य केली तर ह्या शहराला खऱ्या पध्दतीने ब्रम्हदेव मंदिर पावेल अशा पध्दतीचे एक आपण ह्या शहराला संदेश देऊ इच्छितो. ब्रम्हदेव मंदिर फार महत्वाचे आहे आणि हे तुम्हाला आम्हाला कोणाला टाळता येणार नाही अशा पध्दतीने नाव द्यावे ही विनंती.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम चांगला प्रकल्प ह्या शहरामध्ये राबविला जाणार आहे. मेट्रो ह्या शहरामध्ये यावी सर्वांची इच्छा आहे. आमच्या हयातीमध्ये यावी मोठा विषय तो आहे. चर्चा चालु आहे मेट्रोची कधी येते त्याला अजून काही लागलेला नाही. कधी मुहुर्त निघेल आणि कधी हे काम सुरु होईल. तरी एम.एम.आर.डी.ए. ने आपल्याला काही स्थान पाठविलेले होते. आमची प्रामाणिक इच्छा होती की एकमताने हा ठराव झाला पाहिजे होता. काही नावात बदल आम्ही सुचविलेले होते अजुन जमत नसेल तर तुम्ही करु शकता मी माझ्या ह्या विषयावर ठराव मांडत आहे. **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन मेट्रो रेल्वे जाणार असुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) मार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. मिरा भाईंदर शहरात तयार होणाऱ्या रेल्वे स्टेशनीची नावे अंतिम करुन कळविणेबाबत प्राधिकरणाने कळविले आहे.**

| अ.क्र. | ठिकाण | मा. महासभेने दिलेले नाव |
|---|---|---|
| 1 | पांडुरंगवाडी, (राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वर) | **पेणकरपाडा** |
| 2 | अमर पॅलेस, (राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वर) | **मिरागाव** |
| 3 | झंकार कंपनी (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर) | **काशिगांव** |
| 4 | साईबाबा नगर (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर) | **ब्रम्हदेव मंदिर** |
| 5 | दिपक हॉस्पीटल (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर) | **नानासाहेब धर्माधिकारी** |

| | | |
|---|---|---|
| 6 | शहीद भगतसिंग उद्यान (मॅक्सस मॉल समोरील मैदानाजवळ) | **शहिद भगतसिंग** |
| 7 | सुभाषचंद्र बोस स्टेडीयम (भाईंदर (पश्चिम) येथे) | **सदानंद महाराज** |
| 8 | महानगरपालिका क्रिडा संकुल (गोल्डन नेस्ट रस्त्यावर) | **गोडदेव** |
| 9 | इंद्रलोक (गोल्डन नेस्ट रस्त्यावर) | **नवघर** |

तरी वरील प्रमाणे एकुण नऊ स्टेशनची नावे अंतिम करुन नामकरणाचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

आमची याच्यामध्ये नावे बदलण्याचे कारण फक्त एकच महसुली गावे आहेत ह्या शहरामध्ये १८ ह्या महसुली गावांचा उल्लेख झालाच पाहिजे. ज्या जागा महसुली गावात म्हणजे दुबार येत आहेत त्याच्यात आम्ही बदल केलेला आहे. ही १८ महसुली गावे आहेत. ह्या शहरामध्ये त्यातुन आपल्याला समोर आपल्या क्षेत्रामध्ये येतात जिथुन मेट्रो जाणार आहेत. त्याच्यासाठी महापौर मॅडम आम्ही असा हा प्रस्ताव मांडलेला आहे. मला असे वाटते आपण एकमतांनी केला तर हा एक चांगला मॅसेज जाईल. एकच बदल आहे ब्रम्हदेव मंदिर हे ऐतिहासिक मंदिर आहे ह्या शहराचे आणि खरतर कुठलेही स्थान ह्या क्षेत्राला लक्षात घेऊनच ठेवायला पाहिजे. आता नविन नावे दिली तर लोकांना कन्फ्युजन होणार आम्ही कुठे उतरायचे. गोडदेवला उतरायचे की नवघरला उतरायचे की काशिगावला उतरायचे. त्याला नविन नावे दिली तर लोकांना ते समजणार सुध्दा नाही. आता सुभाषचंद्र बोस आज तिथे नाव पडले त्या परिसराला सुभाषचंद्र बोस हाच परिचय पडलेला आहे. म्हणून आपल्याला त्या स्थानाला फक्त तेच नाव द्यायला पाहिजे. आपण आपल्या नेत्यांशी चर्चा करावी आणि निर्णय घ्यावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम आपण हे नाव दिलीच नाही ह्या नावामध्ये आपण सगळ्या गावांना प्राधान्य दिलेले आहे. पेणकरपाडा आहे, मिरागाव आहे, नवघर आहे तस आपण गावाचे गाव पण टिकवलेले आहे. फक्त एकच जे होते क्रिडा संकुल तिकडचे जे स्थानिक रहिवासी होते त्यांनी सांगितले महाराणा प्रताप नाव द्या म्हणून आपण ते दिलेले आहे तरी आमची भुमिका अशी आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब त्या गोडदेवला कोणी मागणी केलेली आहे आम्हाला सांगा?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तिकडच्या स्थानिक तिकडच्या मंडळाचे येऊन मागणी केली की तिकडे महाराणा प्रताप नाव देणे म्हणून आम्ही ते सुचविलेले आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

स्थानिक नगरसेवक आम्ही मागणी करतो की त्यांच्या ऐकण्यावर करणार तुम्ही सांगा?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रश्न स्थानिक नगरसेवकांचा नाही त्यांच्यामध्ये भरपूर जी अशी नावे आहेत ती स्थानिक नगरसेवकांनी दिलेली नाहीत. आमचा उद्देश चांगला आहे. बाकी तुम्ही स्वतंत्र आहेत तुम्ही तुमचा ठराव करु शकता.

**जुबेर इनामदार :-**

हा पूर्ण देश विरपुरुषांचाच आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हंडरेट परसेंट, आता महाराणा प्रताप नावाची ही केलेली आहे. तर आम्ही केले ना. ठिक आहे आम्ही ठराव केलेला आहे ह्यांचा ठराव घ्या.

**निलम ढवण :-**

माझा याच्यामध्ये दुसरा उद्देश हा असेल जेव्हा स्टेशनला नाव देतात त्या-त्या वेळी ते-ते परिसरच्या नावाने ओळखला जातो तर त्या पध्दतीने जर नावे दिली तर ती आणखी लोकांच्या चांगल्या

लक्षात राहतील जसे भगतसिंग, शहिद भगतसिंग. ध्रुवजी हे लहान वाटतात का? त्यांच नाव तिथ त्यांच्या एरियात भगतसिंग म्हणून द्यायला पाहिजे.

**सुरेश खंडेलवाल :-**

कुठला एरिया कोणाला माहिती पडायला पाहिजे. शहीद भगतसिंग आला कुठे विचारा त्याला मॅक्सेस मॉल बोलतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे पण खूप मोठे आहेत.

**निलम ढवण :-**

ते नाव तिथे प्रचलित आहे. नावावर वाद घालायचा नाही आम्हाला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दोघांमध्ये तुलना न करता आम्ही जे नाव सुचवले आहे तुम्ही पण तुमची नाव सुचवा.

**प्रभात पाटील :-**

भगतसिंग नाव आपण दुसऱ्या ठिकाणी देऊ शकतो पण गोडदेवचे नाव आपण दुसऱ्या ठिकाणी देऊ शकत नाही.

**निलम ढवण :-**

ते एरियाव्हाईज दिले तर लोकांच्या लक्षात राहील. जेव्हा स्टेशन येतात त्यावेळी एरिया लक्षात येतो. म्हणून त्यानुसार नावे द्या आमचे म्हणून द्या असे आम्ही म्हणत नाही. फक्त एरियानुसार नावे दिली तर लोकांच्या लक्षात येतील.

**जुबेर इनामदार :-**

शहीद भगत सिंग तो मॅक्सेस मॉलच्या नावाने ओळखला जातो. आम्ही मॅक्सेस मॉल नाव थोडी देत आहोत. आम्ही शहीद भगतसिंग देत आहोत. इतिहास त्यांच्या मागे आहे ह्या देशाचा.

**निलम ढवण :-**

म्हणूनच तो एरिया ओळखला जातो. म्हणूनच त्या नावाने द्या स्टेशनला नावे अशी द्या की त्याचा एरिया कुठच्या नावाने ओळखला जातो अशीच नावे घ्या स्टेशनला.

**दिनेश नलावडे :-**

मॅडम आपण जो विषय मांडलेला आहे तो मंजूर होणार आहे हे आम्हाला माहित आहे परंतु काका एका नावासाठी ब्रम्हदेव मंदिर हे मात्र तुम्हाला त्याच्यामध्ये बदलावे लागेल. काका हा तुमचा मुद्दा आहे. तिथल्या स्थानिक आगरी लोकांचे देवस्थान आहे आणि त्याचे तुम्ही कस काय ब्रम्हदेव मंदिराला विरोध करत आहात. काका तुम्हाला हे एक नाव घ्यावे लागेल. एक मान्य करावे लागेल. जागृत देवस्थान आहे. आजही त्या रोडवर जाताना प्रत्येकाचे हात त्या मंदिराकडे जातो. आम्ही आज पण दर्शन घेऊन पुढे जातो. आणि येताना ब्रम्हदेवाचे आर्शिवाद घेऊन आम्ही ह्या शहरामध्ये येतो आणि या नावाला तुमचा विरोध का असावा फक्त एकाच नावासाठी आमचा आग्रह आहे. महापौर मॅडम तुम्ही मनासह मोठे मन दाखवा आणि ब्रम्हदेव मंदिराचे नाव घ्या.

**मा. महापौर :-**

मतदानाची प्रक्रिया सुरु करा.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५३ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. रोहिदास पाटील, अनुमोदन श्री. ध्रुवकिशोर पाटील. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. रोहिदास पाटील यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

श्री. रोहिदास पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४६, विरोधात २७, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. रोहिदास पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ५३ :-**

**<u>शहरातून जाणाऱ्या प्रस्तावित मेट्रो रेल्वे स्थानकांच्या नामकरणाबाबत.</u>**

**ठराव क्र. ५० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन मेट्रो रेल्वे जाणार असुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) मार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरण यांनी मिरा भाईंदर शहरात मेट्रो साठी खालील ठिकाणी स्टेशन निश्चित करुन सदर स्टेशनची नावे अंतिम करुन कळविणेसाठी पत्र दिले आहे.

1) पांडुरंगवाडी, (राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वर)

2) अमर पॅलेस, (राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वर)

3) झंकार कंपनी (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर)

4) साईबाबा नगर (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर)

5) दिपक हॉस्पीटल (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर)

6) शहीद भगतसिंग उद्यान (मॅक्सस मॉल समोरील मैदानाजवळ)

7) सुभाषचंद्र बोस स्टेडीयम (भाईंदर (पश्चिम) येथे)

8) महानगरपालिका क्रिडा संकुल (गोल्डन नेस्ट रस्त्यावर)

9) इंद्रलोक (गोल्डन नेस्ट रस्त्यावर)

वरील प्रमाणे एकुण नऊ स्टेशनची नावे अंतिम करुन एम.एम.आर.डी.ए. यांना कळवावयाचे आहे. प्रशासनाच्या प्रस्तावानुसार सदर स्टेशनची नामकरणे खालील प्रमाणे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | मा. महासभेने दिलेले नाव |
|---|---|---|
| 1 | पांडुरंगवाडी, (राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वर) | **पेणकरपाडा** |
| 2 | अमर पॅलेस, (राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वर) | **मिरागाव** |
| 3 | झंकार कंपनी (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर) | **छत्रपती शिवाजी महाराज** |
| 4 | साईबाबा नगर (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर) | **सरदार वल्लभभाई पटेल** |
| 5 | दिपक हॉस्पीटल (छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर) | **नानासाहेब धर्माधिकारी** |
| 6 | शहीद भगतसिंग उद्यान (मॅक्सस मॉल समोरील मैदानाजवळ) | **महावीर स्वामी** |
| 7 | सुभाषचंद्र बोस स्टेडीयम (भाईंदर (पश्चिम) येथे) | **सदानंद महाराज टर्मिनल** |
| 8 | महानगरपालिका क्रिडा संकुल (गोल्डन नेस्ट रस्त्यावर) | **महाराणा प्रताप** |
| 9 | इंद्रलोक (गोल्डन नेस्ट रस्त्यावर) | **नवघर** |

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदन :- श्री. धृवकिशोर पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शाह रिटा सुभाष | १ | ढवण निलम हरीश्चंद्र | निरंक |
| २ | तिवारी अशोक सुर्यदेव | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | पांडेय पंकज सूर्यमणि | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | परदेशी गिता हरीश | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | गोहिल शानू जोरावर सिंह | ५ | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | |
| ६ | कांगणे मीना यशवंत | ६ | शेख अमजद गफार | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ८ | शेट्टी गणेश गोपाळ | ८ | घरत तारा विनायक | |
| ९ | भोईर गणेश गजानन | ९ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १० | पाटील प्रभात प्रकाश | १० | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ११ | रावल मेघना दिपक | ११ | शिर्के अनंत गेणू | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | पाटील वंदना विकास | |
| १३ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १३ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १४ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | भोईर कमलेश यशवंत | |
| १६ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १६ | पाटील अनिता जयवंत | |
| १७ | रकवी वैशाली गजेंद्र | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | १८ | भोईर राजू यशवंत | |
| १९ | खंडेलवाल सुरेश जगदीश | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २० | डिसा मर्लिन मर्विन | |
| २१ | मेहता डिंपल विनोद | २१ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २२ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २२ | सपार उमा विश्वनाथ | |
| २३ | थेराडे संजय अनंत | २३ | अहमद साराह अकरम | |
| २४ | मुखर्जी अनिता बबलू | २४ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| २५ | वैती चंद्रकांत सिताराम | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| २६ | पारधी सुजाता यशवंत | २६ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २७ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २८ | यादव मिरादेवी  रामलाल | | | |
| २९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३० | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३१ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ३२ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३३ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ३४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३५ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३६ | नाईक विविता विवेक | | | |
| ३७ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ३८ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **३९** | **परमार हेतल रतिलाल** | | | |
| **४०** | **जैन दिनेश तेजराज** | | | |
| **४१** | **भावसार वंदना संजय** | | | |
| **४२** | **शाह सीमाबेन कमलेश** | | | |
| **४३** | **दुबे मनोज रामनारायण** | | | |
| **४४** | **भोईर जयेश भानुदास** | | | |
| **४५** | **म्हात्रे नयना गजानन** | | | |
| **४६** | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५४, **सार्वजनिक शौचालय देखभाल दुरुस्ती व संचलनाबाबत धोरण ठरविणे.**

**दिनेश जैन :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची एकुण 177 शौचालये असुन त्यामध्ये 3457 सीट्स आहेत. सदर शौचालयाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. सदर दैनंदिन देखभाल व संचनल कामासाठी अकरा संस्थाची नेमणुक करण्यात आली असुन त्यांचा 30 सीट्ससाठी प्रतिमहीना रु.24,000/- प्रति मजुर हा दर मंजुर आहे. शौचालयाची दैनंदिन दुरुस्ती, बांधकाम विभागामार्फत करण्यात येते. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासनाकडील विविध समित्यामार्फत शौचालयाची नियमित पहाणी होत असते. दैनंदिन वापरासाठी शौचालये सुसज्ज ठेवण्यात येत आहेत. सी आर झेड व सॉल्ट विभागाच्या जागेवर झोपडपट्टयात प्री-फॅब्रिकेटेड शौचालये ठेवण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदर शौचालये दैनंदिन स्वच्छता, देखभाल तसेच दुरुस्ती कामांवर मोठया प्रमाणावर खर्च होत आहे. तथापी स्वच्छतेबाबत मोठया प्रमाणावर तक्रारी येत आहे. महानगरपालिकेची शौचलयामधील दैनंदिन स्वच्छता देखभाल व दुरुस्ती या सर्व कामासाठी एकच यंत्रणा नेमण्यास संबधित संस्थेस सर्व कामाची एकत्रित जबाबदारी नेमुन देता येईल. प्रशासनाच्या प्रस्तावानुसार आवश्यक प्रक्रीया करण्यास, कार्यवाहीस व खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता देण्यात येत आहे.

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ५४ :-**

**सार्वजनिक शौचालय देखभाल दुरुस्ती व संचलनाबाबत धोरण ठरविणे.**

**ठराव क्र. ५१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची एकुण 177 शौचालये असुन त्यामध्ये 3457 सीट्स आहेत. सदर शौचालयाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. सदर दैनंदिन देखभाल व संचनल कामासाठी अकरा संस्थाची नेमणुक करण्यात आली असुन त्यांचा 30 सीट्ससाठी प्रतिमहीना रु.24,000/- प्रति मजुर हा दर मंजुर आहे. शौचालयाची दैनंदिन दुरुस्ती, बांधकाम विभागामार्फत करण्यात येते. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासनाकडील विविध समित्यामार्फत

शौचालयाची नियमित पहाणी होत असते. दैनंदिन वापरासाठी शौचालये सुसज्ज ठेवण्यात येत आहेत. सी आर झेड व सॉल्ट विभागाच्या जागेवर झोपडपट्टयात प्री-फॅब्रिकेटेड शौचालये ठेवण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदर शौचालये दैनंदिन स्वच्छता, देखभाल तसेच दुरुस्ती कामांवर मोठया प्रमाणावर खर्च होत आहे. तथापी स्वच्छतेबाबत मोठया प्रमाणावर तक्रारी येत आहे. महानगरपालिकेची शौचलयामधील दैनंदिन स्वच्छता देखभाल व दुरुस्ती या सर्व कामासाठी एकच यंत्रणा नेमण्यास संबधित संस्थेस सर्व कामाची एकत्रित जबाबदारी नेमुन देता येईल. प्रशासनाच्या प्रस्तावानुसार आवश्यक प्रक्रीया करण्यास, कार्यवाहीस व खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदक :- श्रीम. मिरादेवी यादव

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५५, **मोकळया जागेत मार्केट शेड बांधणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.**

**गणेश भोईर :-**

**प्रस्तावना :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या स्वरुपात मार्केट इमारती नसल्याने सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत तसेच समावेशक आरक्षणाच्या तरतुदीतुन मार्केट इमारती बांधुन प्राप्त करुन घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. शहरात विविध भागात मार्केट असणे आवश्यक असल्याने सुधारीत विकास योजनेत मार्केट आरक्षणे ठेवण्याची कामे प्रस्तावित आहेत.**

**सद्यस्थितीत संपुर्ण मिरा -भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावर फेरीवाले बसत असुन नियमानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. याबाबत फेरीवाला धोरण तयार करण्याची प्रक्रीया देखील सुरु आहे.**

**महानगरपालिकेमार्फत शहरवासियांना मार्केट इमारती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असुन महानगरपालिकेच्या विकास योजनेतील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या तथापी सद्यस्थितीत विकसित नसलेल्या अशा भुखंडावर, सार्वजनिक जागावर तात्पुरत्या स्वरुपात मार्केट शेड बांधल्यास रहिवाशांना मार्केट मध्ये जाऊन दैनंदिन लागणारा भाजीपाला व इतर वस्तु खरेदी करता येऊ शकतील. महानगरपालिकेमार्फत असे भुखंड निविदा प्रक्रीयाद्वारे खाजगी संस्थाकडुन तात्पुरत्या स्वरुपात विकसित करुन घेऊन चालविण्यास देता येतील, जेणेकरुन महानगरपालिकेस सदर मार्केट शेड व इतर सुविधासाठी खर्च न येता भाडे देखील मिळु शकेल व रस्ते मोकळे ठेवता येतील असा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.**

**ठराव ( ) :-**

**प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विकास योजनेतील महापालिकेच्या ताब्या त आलेल्या व सद्यस्थितीत विकसीत नसलेल्या भुखंडावर , सार्वजनिक जागांवर तात्पुरत्या स्वरुपात मार्केट शेड बांधावे तसेच महानगरपालिकेमार्फत असे भुखंड निविदा प्रक्रीयाद्वारे खाजगी संस्थांकडून तात्पुरत्या स्वरुपात विकसीत करुन घ्यावेत व भाडे आकारावे . जेणेकरुन सदर मार्केट शेड व इतर सुविधांसाठी महापालिकेस खर्च होणार नाही तसेच आरक्षणाखाली बांधकाम अनुज्ञेय असलेल्या जागेवर मार्केट बांधणेसाठी परवानगी द्यावी असा मी ठराव मांडत आहे . आरक्षण वगळून खाजगी भुखंड धारकांनी त्यांच्या जागेत मार्केट सुरु करणेकरीता परवानगी मागितल्यास त्यांना तात्पूरत्या स्वरुपात मार्केट सुरु करणेकामी परवानगी देण्यात यावी.**

**पंकज पांण्डे :-**

माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, मोकळ्या जागेत मार्केट शेड बांधणेबाबत, आयुक्त साहेब ह्या मोकळ्या जागेत मार्केट शेड बांधण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे हे असे किती वेळा विषय आणणार आणि किती वेळा ठराव आणणार त्याची अंमलबजावणी का होत नाही? ह्यापूर्वी देखील २८/८ ह्याच्यात पण आयुक्तांना अधिकार दिले होते. आपण मिरा भाईंदर महानगरपालिका विभागात तात्पुरत्या स्वरुपात मार्केट सुरु करण्याबाबत निर्णय घेणे. तो ठराव आहे. त्यानंतर १२/०८/२०१६ ला देखील आपण मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फेरिवाल्याचे तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतर करणेबाबत हे केले पाहिजे त्यामुळे रस्त्यावरचे फेरिवाले किंवा रस्ते मोकळे होतील परंतु हे ठराव ठरावच राहतात. त्याची अंमलबजावणी का नाही होत आणि आज पण हा ठराव करुन त्याच्यावर अंमलबजावणी होईल की नाही. मागच्या मिटींगमध्ये पण ठराव केलेले आहेत. त्याच्यामध्ये सरळ सरळ नमुद आहेत. महापौर मॅडम मागच्या महासभेत पण काही ठराव झाले आहेत. त्या ठरावामध्ये सरळ नमुद केलेले आहे की ठरावाच्या दिवशी पासून त्याची अंमलबजावणी करावी. अद्यापी ही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. हे अगोदर झालेले आहेत. मग हे परत विषय का येतात?

**दिपक खांबित :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो यापूर्वी ठराव झाला होता. त्यानुसार आपण निविदा प्रक्रिया करुन ६ ठिकाणी मार्केट बांधण्याकरिता मागच्या स्थायी समितीमध्ये निविदा मंजूर झाली आणि त्या ६ ठिकाणी मार्केट करतो. आणि ह्या ठरावानुसार सुध्दा आपण काही जागा असतील ठिकठिकाणी त्या शोधुन त्या ठिकाणी सुध्दा खाजगी एजन्सीमार्फत मार्केट बांधण्याकरिता आपण आता निविदा प्रक्रिया करु. ह्या ठरावाची अंमलबजावणी केलेली आहे.

**निलम ढवण :-**

मागची.

**दिपक खांबित :-**

हो.

**निलम ढवण :-**

आयुक्तांना अधिकार दिलेले होते जागा बघून तो करा म्हणून. ती झाली आहे का?

**दिपक खांबित :-**

झाली आहे परवाच्या स्टॅन्डिंगमध्ये ते टेंडर मंजूर केले.

**स्नेहा पांडे :-**

खांबित साहेब ६ स्थान कहाँ पे है मार्केट के लिए हुए। कहाँ ६ जगह पे शुरु होनेवाला है मार्केट?

**दिपक खांबित :-**

एक भाईंदर पूर्व आशानगर, एक प्लॉट है वहाँ पे ओत्सवाल पार्क के बाजु में, एक मंगल नगर है रिर्झव्हेशन २५५ है बाद में रिझर्व्हेशन २३० है ऐसी जगह है।

**निलम ढवण :-**

आपल्या नवघर बाजूला?

**दिपक खांबित :-**

नवघरला आशा नगरच बाकी आहे, जागा तुम्ही सुचवली तर तिकडे करुया. आता हा ठराव झालेला आहे.

**निलम ढवण :-**

आणि दुसरे एक होते साहेब तुम्ही उत्तर द्या संत शिरोमणी सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार अभियान राबविणेबाबत. जागा उपलब्ध करुन तो आठवडे बाजार आपण चालू करणार होतो. हे २९/०९/२०१६ चा ठराव आहे.

**दिपक खांबित :-**

ह्या ठरावाची सुध्दा आपण अंमलबजावणी केलेली आहे आणि दोन ठिकाणी आठवडे बाजार सुरु केला आहे. भाईंदर पश्चिमेला एक, एल.बी.टी. ऑफिसच्या समोर आणि रामदेव पार्कला जे मार्केट आहे त्याच्या समोर. गेल्या एक महिन्यापासून तिकडे आठवडा बाजार सुरु केला आहे आणि तो व्यवस्थित चालत आहे.

**निलम ढवण :-**

साहेब प्रत्येक डिपार्टमेन्टची जेव्हा आढावा घेत आहेत त्यानुसार मला वाटत सगळ्यांचे प्रेम मिरारोड आणि वेस्टला जास्त दिसत आहे. कारण मागे मी पानपट्टे साहेब पण इथे बसलेले आहेत. महिला बालकल्याणतर्फे महिलांसाठी हे राबवेल ते देखील आमच्या नवघर किंवा गोडदेव किंवा बी.पी. रोड म्हणजे भाईंदर पूर्व एरिया कुठेही अभियान राबविले गेले नाही हे तुमचे आठवडे बाजार पण तिकडचे आहेत. टेम्पररी तुम्ही मार्केट बनवत आहेत ते पण तिकडचे सर्व जागा आहेत. मग भाईंदर पूर्वेला वाळीत टाकल का?

**दिपक खांबित :-**

मॅडम आपण जागा सुचवा.

**निलम ढवण :-**

आम्हाला विचारा तर खर जेव्हा ह्या गोष्टी ठरतात आम्हाला माहिती पण नसते आठवडे बाजार त्या नवघरच्या मैदानावर पण होऊ शकतो. त्या शाळेला आठवड्याला सुट्टी असते.

**दिपक खांबित :-**

ठिक आहे आपण ती जागा घेऊ.

**निलम ढवण :-**

मागे पानपट्टे साहेबांना पण सुचवल त्यावेळेस गाड्या जात नाही म्हणून सांगितले. तिथे लक्झरी जातात. आमच्याकडे भाईंदर पूर्वेला दुर्लक्षित करु नका. पूर्ण ३१ पासून वॉर्ड असाच राहतो.

**हरिश्चंद्र आमगाकवर :-**

तस पाठच्या मैदान गोडदेव विमल डेरी रोडला तिथे पण आठवडे बाजार करा.

**दिपक खांबित :-**

विमल डेरी कुठे?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

कलावती मंदिर आहे.............

**प्रभात पाटील :-**

पाशाण क्रिडा घर.............

**निलम ढवण :-**

स्थानिक नगरसेवकांकडून माहिती घ्या.

**रोहिदास पाटील :-**

निलम मॅडम पाण्याच्या टाकीजवळ पण होऊ शकते.

**मा. उपमहापौर :-**

निलम ताई ह्या संदर्भात आपल्याकडे ज्या-ज्या जागा उपलब्ध आहेत पणन संस्थेची जी माणसे येत आहेत. आठवडे बाजारसाठी त्या संस्थेकडून आपण जरा पाहणी करुन घेऊ या. ग्राहकांची उपलब्ध झाल्यावर त्या पध्दतीने आपण स्पॉट ठरवू या.

**निलम ढवण :-**

हो चालेल पण त्याचे हे करा.

**गिता जैन :-**

आपण जो आठवडा बाजार चालू करतो ते कुठल्या रजिस्टर शेतकरी संघाला देऊ शकतो का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

पणन महासंघाकडून जे आपल्याकडे येतात त्यांना आपण परत देत नाही. कारण महासभेकडून त्यांना रजिस्ट्रेशन त्यांच्याकडे असायला पाहिजे.

**गिता जैन :-**

बरोबर आहे मग आपण जे आता बोलत आहोत खांबित साहेब बोलत आहेत. आपण तिथेही चालू करु आपल्याकडे ॲप्लीकेशन आलेले आहे का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आपल्याकडे ह्या मागण्या समजा आल्या तर आपण पणन......

**गिता जैन :-**

मग तस सांगा की पणनकडून रजिस्टर झालेली संस्थानी जर मागणी केली तरच आपण ते देऊ शकतो नाही तर देऊ शकत नाही. मग ते कोण क्लिअर करेल.

**मा. उपमहापौर :-**

अस नाही पणन संस्थेकडे रजिस्टर झालेले जे लोक आहेत ते सप्लाय करतील.

**गिता जैन :-**

त्यांनी इथे मागणी करायला पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

आपली जे मागणी करणारे रजिस्टर नको मागणी करणा-या संस्था आपल्या शहरातल्या चालतील. आपण एखाद्या ग्राऊंड दिले.

**गिता जैन :-**

वैती साहेब ते चालत नाही. आपल्या जे रजिस्टर झालेली संस्था आहे त्यांनी पणनमध्ये रजिस्टर करुन घ्यायचे असते.

**मा. उपमहापौर :-**

आपण सुचना काय केली तुम्ही स्पॉट निश्चित करा ती संस्था येईल तेव्हा त्यांना घेऊन आपण त्यांची मान्यता घेऊ.

**गिता जैन :-**

आपला जेव्हा तो ठराव झाला तेव्हा स्पॉट निश्चित झाले आहेत. आपल्या ठरावात किती स्पॉट आहेत?

**मा. उपमहापौर :-**

ह्यांनी आता काय सांगितले एक शाळेचा स्पॉट आहे. तर आपण मान्यता घेऊ त्या संस्थेला बोलवू आणि त्यांच्या बरोबर रजिस्ट्रेशन करून घेऊ.

**दिपक खांबित :-**

आपल्याला त्यांना कळवावे लागते. पणन महासंघाला मग ते लोक संस्था त्यांच्याकडे लिखीत असते.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहाला माहितीसाठी ज्यांना असे आयुक्त साहेबाकडे तशा प्रकारचे प्रस्ताव द्या म्हणजे एक दिवशी आपल्याला त्याना इथे संस्थेच्या पदाधिका-याला बोलवता येईल आणि निश्चित करता येईल.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय माझी एक सुचना आहे मोकळ्या जागेवर आम्हाला एक मार्केट दिली तयार करणार आहोत ठेकेदाराच्या माध्यमातून बांधून घेऊ सगळ व्यवस्थित होईल. असे व्हायला नको ज्या कारणासाठी आपण करायला निघालो आहोत ते रस्त्यावर बसणारे फेरीवाले त्यांना आतमध्ये बसवायचे आहे.ह ते आतमध्ये नवीन बसतील आणि जे आहेत ते आपल्या जागेवरच उपस्थित राहतील. असे व्हायला नको. हे होणार आहे हे खरे आहे १०० टक्के मी तुम्हाला बोलतो त्याच्यामध्ये काही वादच नाही कारण आपले लोक नंतर नसतात. उचलायला फेरीवाला पथक नसतात. आज नाहीत ते उद्या कूठून येतील ठेकेदाराला पोसायला घेत आहोत. असा काही प्रकार करू नका.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आजच्या महासभेमध्ये दोन्ही विषय आहेत मोकळ्या जागेमध्ये ज्या लोकांना शिफ्ट करायचे आहे. आणि तिथले धोरण फेरीवाला ना फेरीवाला.

**जुबेर इनामदार :-**

ते धोरण आम्ही त्याच्यामध्ये ठरवलेले आहे त्याचा फक्त पुर्नविलोकन आम्ही करणार आहोत त्याच्यामध्ये काही बदल करायचा ते करू. धोरण प्रत्येक वॉर्डमध्ये ठरलेले आहे. त्याची अंमलबजावणी कूठे होते.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आता हे रिव्हाईज डे पूर्वी जेव्हा सुरूवातीला राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ आले त्यावेळेस सन्मा. महापौर त्याचे चेअरमन होते शहर फेरीवाला समिती आणि प्रभाग समित्यावरती प्रभाग समिती चेअरमन त्यानंतर शासनाकडे पुन्हा धोरण रिव्हाईज केले आणि आता हे तीस-यांदा रिव्हाईज झालेले आहे. त्यामुळे हे अंतीम होईल याच्यामध्ये सगळ्या शहराचे प्रतिनिधी आपण त्याच्यामध्ये घेऊ शकतो.

**जुबेर इनामदार :-**

माझी फक्त तुम्हाला सुचना आहे की अशी दक्षता घ्या नाही तर आहेत ते अजून वाढतील.

प्रकरण क्र. ५५ :-

**मोकळया जागेत मार्केट शेड बांधणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.**

ठराव क्र. ५२ :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या स्वरुपात मार्केट इमारती नसल्याने सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत तसेच समावेशक आरक्षणाच्या तरतुदीतुन मार्केट इमारती बांधुन प्राप्त करुन घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. शहरात विविध भागात मार्केट असणे आवश्यक असल्याने सुधारीत विकास योजनेत मार्केट आरक्षणे ठेवण्याची कामे प्रस्तावित आहेत.**

**सद्यस्थितीत संपुर्ण मिरा -भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावर फेरीवाले बसत असुन नियमानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. याबाबत फेरीवाला धोरण तयार करण्याची प्रक्रीया देखील सुरु आहे.**

**महानगरपालिकेमार्फत शहरवासियांना मार्केट इमारती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असुन महानगरपालिकेच्या विकास योजनेतील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या तथापी सद्यस्थितीत विकसित नसलेल्या अशा भुखंडावर, सार्वजनिक जागावर तात्पुरत्या स्वरुपात मार्केट शेड बांधल्यास रहिवाशांना मार्केट मध्ये जाऊन दैनंदिन लागणारा भाजीपाला व इतर वस्तु खरेदी करता येऊ शकतील. महानगरपालिकेमार्फत असे भुखंड निविदा प्रक्रीयाद्वारे खाजगी संस्थाकडुन तात्पुरत्या स्वरुपात विकसित करुन घेऊन चालविण्यास देता येतील, जेणेकरुन महानगरपालिकेस सदर मार्केट शेड व इतर सुविधासाठी खर्च न येता भाडे देखील मिळु शकेल व रस्ते मोकळे ठेवता येतील असा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.**

**ठराव (    ) :-**

**प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विकास योजनेतील महापालिकेच्या ताब्यात आलेल्या व सद्यस्थितीत विकसीत  नसलेल्या भुखंडावर, सार्वजनिक जागांवर तात्पुरत्या स्वरुपात मार्केट शेड बांधावे तसेच महानगरपालिकेमार्फत असे भुखंड निविदा प्रक्रीयाद्वारे खाजगी संस्थांकडून तात्पुरत्या स्वरुपात विकसीत करुन घ्यावेत व भाडे आकारावे . जेणेकरुन सदर मार्केट शेड व इतर सुविधांसाठी महापालिकेस खर्च होणार नाही तसेच आरक्षणाखाली बांधकाम अनुज्ञेय असलेल्या जागेवर मार्केट बांधणेसाठी परवानगी द्यावी असा मी ठराव मांडत आहे . आरक्षण वगळून खाजगी भुखंड धारकांनी त्यांच्या जागेत मार्केट सुरु करणेकरीता परवानगी मागितल्यास त्यांना तात्पूरत्या स्वरुपात मार्केट सुरु करणेकामी परवानगी देण्यात यावी.**

सुचक :- श्री. गणेश भोईर     अनुमोदक :- श्री. पंकज पांडेय

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५६, सन्मा. सदस्या सौ. निलम हरिश्चंद्र ढवण यांचा दिनांक ०२/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मुख्य कार्यालय व प्रभाग कार्यालयामध्ये कर्मचारी उपलब्ध नसण्याबाबत.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम हा जो विषय आहे प्रभाग कार्यालयामध्ये कर्मचारी उपलब्ध नसल्याबाबत हा विषय माझ्या एकट्या पूरता सिमीत नसून मला वाटत पूर्ण सभागृहातील सन्मा नगरसेव  या मतांशी सहमत असतील ज्या ज्या वेळी आपण आम्ही प्रभाग कार्यालयामध्ये कामासाठी जातो किंवा इथे पण काहीवेळी तीच परिस्थिती निर्माण होते. त्याच्यामागे कारणे देखील भरपूर आहेत. मी त्या संदर्भातील ठराव वाचून दाखवते. त्यामध्ये बरीचशी कारणे समाविष्ठ आहेत आणि त्यानुसार आपण कार्यवाही करावी. आदेश द्यावेत अशी आपल्याला विनंती आहे. मी ठराव वाचते. मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांवर कधी निवडणूक कधी टॅक्स वसुली, पाणी बीले, अतिक्रमणे, मुख्यालयातील मिटींग अशा

प्रकारच्या जबाबदाऱ्या दिल्या जातात. या जबाबदार दिल्यावर तेथील कर्मचारी नेहमीच कार्यालयाबाहेर असतात. टॅक्स वसुली, पाणी बीले ही जबाबदारी पालिकेच्या कर्मचाऱ्यांचीच असल्याने तिथे जाणे क्रमप्राप्त आहे. परंतु त्यासाठी देखील वेळ ठरवून घेवून काही काळ नागरीकांच्या सेवेसाठी देण्यात यावा. प्रभाग कार्यालयात केव्हा केव्हा कोणीच भेटत नसल्याने नागरीक, जेष्ठ नागरीक यांना केप्या माराव्या लागतात व त्यांना पाहिजे तेव्हा कागदपत्रे प्राप्त होवू शकत नाहीत. आपल्याकडे यापूर्वी देखील आवश्यक कर्मचारी व कनिष्ठ अभियंता यांच्यासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार करुन देखील कुठलीही कार्यवाही झालेली नाही.

निवडणूकीच्या कामासाठी नेहमीच कर्मचारी सकाळपासून संध्याकाळपर्यंत दिलेल्या विभागात काम करत असतात. परंतु नेहमीच काही कर्मचारी नवघर वरुन उत्तन येंथे कामासाठी जातात. जाण्या-येण्यामध्येच त्यांचा वेळ जातो व नेहमीच तोच तोच सर्व्हे करणे, नाव डिलीट करणे, दुबार नाव नोंदणी असे अहवाल वांरवार देवूनही नाव नोंदवणे त्यावर कार्यवाही न करता त्यांना पुन्हा नोटीस बजावणी अशी तीच तीच कामे या कर्मचाऱ्यांना दिली जातात. यातुन काय निष्पन्न होतय? त्यामुळे कर्मचाऱ्यांचा वेळ फुकट जातो व नागरीकांचे हाल होतात. तरी आवश्यक असणारे पुरेसे कर्मचारी नसल्याने त्या त्या विभागात, प्रभाग कार्यालया अंतर्गत लोकांची कामे होण्यास दिरंगाई होत आहे. तरी प्रभाग कार्यालयामध्ये आवश्यक कर्मचारी व कनिष्ठ अभियंते देऊन सकाळच्या सत्राचा वेळ (१०.३० ते १.००) हा नागरीकांसाठी ठेऊन तिथे सर्व कर्मचाऱ्यांना उपस्थित राहणे बंधनकारक करावे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रविण पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम प्रत्येक प्रभाग कार्यालयामध्ये ह्या सगळ्या ही कारणे देऊन त्यात काही असे पण असतात की ही कारणे सांगून तिकडे जर सांगितल तर मुख्यालयात मिटींग आहे. दुसरे कोणी सांगणार इलेक्शनच्या कामासाठी गेलो कोणी काय गेले प्रामाणिक पणे ह्या गोष्टी करणारे पण आहेत काही ह्या नावावर साईट वर आहे हे आहे ते आहे करून पण दांडी मारणारे देखील पण आहेत. आमचे म्हणणे हेच आहे की प्रभाग कार्यालये ही त्या-त्या विभागामध्ये नागरिकांच्या सोयीसाठी केलेली कार्यालये आहेत आणि त्या कार्यालयामध्ये जी कामे असतात. त्यावेळी एक सकाळची वेळी काही लोक हाफ डे घेऊन येतात आणि काही ज्येष्ठ नागरिक पण इथे फेऱ्या मारत असतात महिला असतात. आम्ही स्वतः देखील गेलो तेव्हा कार्यालयात कर्मचारी उपलब्ध नसतात ही जी कारण आहेत स्टाफ कमी आहे. हे १०० टक्के ह्या संदर्भात देखील वेळोवेळी आपण पत्रव्यवहार देखील केलेला आहे. पण त्या संदर्भात कुठलीही कार्यवाही आजपर्यंत झालेली नाही. मग आम्ही तिथल्या नागरिकांच्या समस्या सोडवायच्या असतील तर कुठे जायचे? प्रभाग कार्यालयात तर नाहीच इथे आले तर केव्हा केव्हा तीच परिस्थिती असते. मग त्याच्यावर तोडगा काढायला नको का? मग त्या विषयी काय करणार आहेत? उपायुक्त साहेब सांगा.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

सन्मा. महापौर मॅडम सर्व सन्मा. सभागृह हे जे बी.एल.ओ. च्या ड्युटीज दिलेल्या आहेत. त्या जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयाकडून आपल्याला आलेल्या असतात. आणि आपल्या लोकांनी आदेशाचे पालन केले नाही तर निवडणूक कायदेअंतर्गत त्याच्यावरती कारवाई होत असते. आता याअनुषंगाने आपण एक मध्यम वर्ग करण्याच्या दृष्टीने नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपण परिपत्रक काढलेले आहे सर्व विभागप्रमुखांना त्यांच्या कॉपी आपण निर्गमित केलेल्या आहेत. आणि याच्यासाठी आपल्याला मी परिपत्रक वाचून दाखवितो. सर्व विभाग प्रमुखांना कळविण्यांत येते की आपले अधिनस्त कर्मचाऱ्यांना कार्यालयात वेळेवर येणे आणि कार्यालयीन वेळेत कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित राहणे. कार्यालयीन कामकाजानिमित्त कार्यालयाच्या बाहेर जायचे असल्यास कार्यालयाच्या हालचाल नोंदवहीमध्ये त्याची नोंद करणे बंधनकारक राहील. तसेच आपले अधिनस्त कर्मचाऱ्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांची निवडणूक कामी बी.एल.ओ. म्हणून नेमण्यात आलेली आहे. त्यांना बी.एल.ओ. चे कामकाज करणेसाठी कार्यालयात भेटीसाठी येणाऱ्या अभिकर्त्यांसाठी तक्रारींचे निराकरण करण्याच्या अनुषंगाने आपल्या स्तरावरती ठराविक वेळ निश्चित करायची अशाप्रकारे विभाग प्रमुखांना आम्ही परिपत्रकाद्वारे सुचना केलेल्या आहेत. आणि तसेच बायोमॅट्रीक ज्या ठिकाणी चालु होणार आहे. त्याठिकाणी कालच आम्ही एक डेमो घेतलेला आहे आणि चांगल्या प्रकारे बायोमॅट्रीक मशीनच आपण एक एजन्सी करत आहोत. आपल्या हेड कॉटरला तसेच विभाग कार्यालयांना सुध्दा नविन टाईपची मशीन उपलब्ध होतील त्याच्यामुळे कर्मचाऱ्यांना दोन्ही वेळेचा अटेन्डन्स त्याच्यावरती आम्ही चांगल्याप्रकारे कंट्रोल आणू शकू.

**निलम ढवण :-**

साहेब याची अंमलबजावणी तिथे रजिस्टर वगैरे कुठे कोण गेलेले आहे कुठच्या कामासाठी गेले आहे.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

हालचाल रजिस्टर ठेवले की नाही.

**निलम ढवण :-**

नाही ठेवलेले आहेत.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

ज्यांनी ठेवलेले नाहीत त्याच्याबद्दल आम्ही आता त्यांना सुचना ऑलरेडी केलेल्या आहेत. त्यांनी ठेवलेलेल्या आहेत की नाही त्याचा फिडबॅक आम्ही आता पुढच्या आठवड्यामध्ये घेऊ. किती लोकांनी ठेवले आहेत त्यांची आम्ही नोंद घेऊ.

**निलम ढवण :-**

ती घेणार परंतु एखाद जसे आपल्याकडे परवा जेव्हा आम्ही आलो होतो. तेव्हा आपल्याकडे देखील ४-५ याचे चार्ज होते की ज्याच्यामध्ये एकाच कामामध्ये लक्ष देता येत नाही. म्हणजे अशा पध्दतीने जेव्हा कामकाज तिथे होते तिथे लोकांना विवाह नोंदणी करायला येतात त्यांचे सर्टिफिकेट वेळेवर मिळत नाही. टॅक्सच्या नोंदी करायची त्याच्या नावे बदलायची असतील आता ते प्रभाग कार्यालयाला अधिकार दिलेले आहेत. तिथे कर्मचारी उपस्थित नसतात. म्हणजे बऱ्याच अशा गोष्टी आहेत की एकही कोणी उपस्थित नसतील तर ती कामे कशी होणार.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

त्यांच्याकडून आता कुठल्या कर्मचाऱ्याला कुठले काम आता जे आपण पावर डिलीगेशन केलेले आहेत त्याअनुषंगाने कुठल्या कर्मचाऱ्याला कुठले काम असाईन केलेले आहेत याचा संपूर्ण तपशिल आपण सिटीझनच्या अंडरमध्ये लावू. बाहेरच लावू की कोणाला कुठल काम दिलेले आहेत त्यामुळे ते जबाबदारी इव्हेअर करणार नाहीत.

**निलम ढवण :-**

प्रभाग कार्यालयामध्ये इंजिनिअर नाही त्यासंदर्भात काय?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

त्यासंदर्भामध्ये आपण ठेकेदार पध्दतीवरती इंजिनियर नेमण्याची जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. त्याची आता निविदा प्रक्रिया चालू आहे. म्हणजे निविदा भरल्यानंतर स्थायी समिती पुढे आम्ही ठेऊ.

**निलम ढवण :-**

साहेब ठेकेदार पध्दतीने पण त्या ठरावात अस पण होत की महापौर मॅडम तुम्हाला देखील ही गोष्ट माहित आहे की जो मागे ठराव झाला पुढच्या महासभेला त्या दिवसापासून जे पहिल्यापासून होते त्यांना आपण हजर करुन घ्यायचे म्हणून तर त्यामुळे इंजिनिअर नसल्यामुळे बरीचशी कामे रखडलेली आहेत. कोणी तिथे ऐकायला तयार नाही. अतिक्रमणची जी कामे असतात आमच्या प्रभागाअंतर्गत.........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी प्रस्ताव दिलेला आहे. आणि आयुक्तांनी परिपत्रक काढलेले आहे त्याच्यात मतलब नाही आणि हा "ज" चा प्रस्ताव होऊ शकत नाही. हे कार्यालयीन बाब आहे. आणि आयुक्तांचे काम आहे.

**निलम ढवण :-**

कार्यालय आम्हाला मागणी का नाही आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्यांना फक्त लक्षात आणून दिले तुम्ही ते केलेले आहे विषय संपला.

**निलम ढवण :-**

ध्रृवजी सर्व अधिकार तुम्हालाच दिलेले आहेत का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी हा प्रस्ताव दिलेला आहे तुम्ही तुमचे उत्तर दिलेले आहे.

**निलम ढवण :-**

पण तुम्ही कशाला बोलत आहात. तुम्ही पण माझ्यासारखे सर्वसामान्य आहात तुम्ही पण बसून घ्या. तुम्ही ह्या विषयावर मला सांगायचे नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रत्येक विषयावरती लिमिटेशन असले पाहिजे. तीच गोष्ट परत रिपीट करत आहात.

**निलम ढवण :-**

माझे समाधान होत नाही तोपर्यंत मी विचारणार तेवढा मला अधिकार आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम ही महासभा आहे. हा सभागृहाचा विषय नाही त्यांनी त्याच्या केबीनला त्यांनी जाव आणि त्यांनी समाधान करुन घ्यावे ही महासभा आहे. एका व्यक्तीच्या समाधानाचा विषय नाही मॅडम. ही महासभा आहे ही जनरल बॉडीची मिटींग आहे. ही एका व्यक्तीचे समाधान करण्यासाठी मिटींग लावलेली नाही.

**निलम ढवण :-**

हा विषय सगळ्या नगरसेवकांचा नाही आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम त्यांचा ठराव झालेला आहे आणि ऑलरेडी आयुक्तांनी परिपत्रक काढलेले आहे. त्यांना क्लेरीफिकेशन दिलेले आहे. मेहरबानी करुन पुन्हा ह्या विषयावरती तोच तो प्रश्न विचारुन हा काही प्रश्नोत्तराचा तास नाही. हे काही कोर्ट नाही तुम्ही विचारणार आणि हे उत्तर देत बसणार. लिमिट पाहिजे.

**निलम ढवण :-**

ध्रुवजी याच्यापूर्वी कोर्ट होत का सभागृह यांच्यापूर्वी कोर्ट होत का दुसऱ्यांना विचारतात सत्तेत गेल्याबरोबर सर्व विचार बदललेत का? माझे जोपर्यंत समाधान होत नाही तोपर्यंत त्याची उत्तरे द्यावीत.

**मेघना रावल :-**

**मुख्य कार्यालय व प्रभाग कार्यालयामध्ये कर्मचारी उपलब्ध नसण्याबाबतचा विषय प्रशासनाच्या अखत्यारीत असल्याने या प्रकरणी आयुक्त यांचेकडे पाठपुरावा करावा.**

**मदन उदितनारायण सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**निलम ढवण :-**

ही गैरसोय सगळ्यांची असताना देखील दुसरा ठराव मांडला गेला याचा अर्थ यांची कामे किती असतात आणि लोकांच्या सेवेसाठी लोकांच्या विकासासाठी किती तत्पर आहेत हे याच्यातुन दिसून येते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणून जनतेने भारतीय जनता पार्टीला ६१ नगरसेवक निवडून दिले.

**निलम ढवण :-**

कसे निवडून दिले हे लोकांना जगजाहिर आहे.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

सर्व प्रभाग समितीमध्ये एवढे अधिकार दिलेले आहेत आता होईल. बघा तुम्ही आता बी.जे.पी.चे सरकार आहे.

**निलम ढवण :-**

अधिकार दिलेले आहेत पण स्टाफ नसेल तर कोण काय करणार आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

बघा होईल थोडे दिवस बघा आता गतीशील सरकार आहे. इच्छाशक्ती आहे आम्हाला काम करायची आम्ही करुन दाखवू.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५६ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. निलम ढवण, अनुमोदन श्री. प्रविण पाटील. दुसरा ठराव सुचक श्रीम. मेघना रावल, अनुमोदन श्री. मदन उदितनारायण सिंह. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्रीम. मेघना रावल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. श्रीम. निलम ढवण यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. मेघना रावल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४७, विरोधात २७, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. मेघना रावल यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ५६ :-**

सन्मा. सदस्या सौ. निलम हरिश्चंद्र ढवण यांचा दिनांक ०२/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मुख्य कार्यालय व प्रभाग कार्यालयामध्ये कर्मचारी उपलब्ध नसण्याबाबत.

**ठराव क्र. ५३ :-**

मुख्य कार्यालय व प्रभाग कार्यालयामध्ये कर्मचारी उपलब्ध नसण्याबाबतचा विषय प्रशासनाच्या अखत्यारीत असल्याने या प्रकरणी आयुक्त यांचेकडे पाठपुरावा करावा.

सुचक :- श्रीम. मेघना रावल अनुमोदक :- :- श्री. मदन उदितनारायण सिंग

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शाह रिटा सुभाष | १ | ढवण निलम हरीशचंद्र | |
| २ | तिवारी अशोक सुर्यदेव | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | पांडेय पंकज सूर्यमणि | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | परदेशी गिता हरीश | |
| ५ | गोहिल शानू जोरावर सिंह | ५ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| ६ | कांगणे मीना यशवंत | ६ | शेख अमजद गफार | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ८ | शेट्टी गणेश गोपाळ | ८ | घरत तारा विनायक | |
| ९ | भोईर गणेश गजानन | ९ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १० | पाटील प्रभात प्रकाश | १० | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ११ | रावल मेघना दिपक | ११ | शिर्के अनंत गेणू | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | पाटील वंदना विकास | |
| १३ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १३ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १४ | पाटील प्रविण मोरेश्वर | निरंक |
| १५ | जैन गिता भरत | १५ | भोईर कमलेश यशवंत | |
| १६ | जैन सुनिता रमेश | १६ | पाटील अनिता जयवंत | |
| १७ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | रकवी वैशाली गजेंद्र | १८ | भोईर राजू यशवंत | |
| १९ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | खंडेलवाल सुरेश जगदीश | २० | डिसा मर्लिन मर्विन | |
| २१ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २१ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २२ | मेहता डिंपल विनोद | २२ | सपार उमा विश्वनाथ | |
| २३ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २३ | अहमद साराह अकरम | |
| २४ | थेराडे संजय अनंत | २४ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| २५ | मुखर्जी अनिता बबलू | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| २६ | वैती चंद्रकांत सिताराम | २६ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | पारधी सुजाता यशवंत | २७ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २८ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २९ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३० | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३१ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३२ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ३३ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३४ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ३५ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३६ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३७ | नाईक विविता विवेक | | | |
| ३८ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ३९ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४० | परमार हेतल रतिलाल | | | |
| ४१ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४२ | भावसार वंदना संजय | | | |
| ४३ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ४४ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४५ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४६ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४७ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**
**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५७, सन्मा. सदस्य श्री. अशरफ म. शेख यांचा दिनांक ०४/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- ''उल्फत मंजिल ते नरेंद्र पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजुस तसेच हैदरी कॉम्पलेक्स ते अस्मिता हेरिटेज (बेक हाऊस) च्या दोन्ही बाजुस'' ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेबाबत.

**अशरफ शेख :-**

हा ऑलरेडी विषयपटलावर असल्यामुळे मी माघार घेत आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५८, के अन्वये प्रस्ताव – खाजगी करणामार्फत प्रभाग समितीनिहाय दैनंदिन वॉर्डसफाई व घनकचरा व्यवस्थापन कामाच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मुन्ना सिंग :-**

महापौर मॅडम पानपट्टे साहब से जानकारी लेना है। ३० एप्रिल २०१७ को उसका टेंडर खलास हुआ था तो कभी महासभा में लाए उसको समय पर लेने के लिए सभा बढाने का समय कभी लिया गया था?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो १९/०५/२०१७ मध्ये ठराव झाला होता त्यावेळी आम्ही विषय दिला होता...............

**मुन्ना सिंग :-**

कभी..........

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

१९/०५/२०१७ त्यावेळी महासभेत ठरावानुसार आम्हाला मुदतवाढ दिलेली आहे.

**मुन्ना सिंग :-**

ठराव हुआ था २०१७ म ५ वे महिने में.........

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

१९/०५/२०१७.

**मुन्ना सिंग :-**

५ वे महिने में.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हो.

**मुन्ना सिंग :-**

अभी इतना एमरजन्सी क्यों हो गया की "क" खाली विषय लेना पडा।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मध्यंतरी काय झाले सभागृहाला मी माहितीसाठी सांगतो मध्यंतरी ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंटला ५ वर्षासाठी दिला होता. मध्यंतरी काही महिन्यांसाठी त्यांना मुदतवाढ दिली होती. परंतु तो आता नंतर करायला तयार नाही. मध्यंतरी २-३ दिवस कामसुध्दा बंद झाले होते. तो म्हणतो मी ह्या गावामध्ये काम करायला तयार नाही. त्यामुळे तात्काळ आम्ही आरोग्य विभागाने सविस्तर अभ्यास करुन हा प्रस्ताव दिलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

पानपट्टे साहेब काम बंद का झाले ते पहिला सांगा. कशाला बंद झाले ते सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

काही कर्मचाऱ्यांची आपण बदली केली त्या संदर्भात.

**नयना म्हात्रे :-**

बदली कशाला केली ते तरी सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

काही लोक काम करत नव्हते म्हणून बदली केली.

**मुन्ना सिंग :-**

साहब उनको बदली कब किया, उनको समय कब दिया, आपने समय कब लिया, और आज इमरजन्सी में आप विषय दे रहे है की अब हमने ३ दिन में सब कर लिया।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मध्यंतरी त्यांनी पत्र दिलेले होते ऑक्टोबरमध्ये मी काय करु शकत नाही म्हणून. त्यामुळेच हा तात्काळ विषय आणावा लागला.

**मुन्ना सिंग :-**

तो उसके पहले आपको मालुम नही था की ३० तारीख को टेंडर............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आचार संहितेत होते मध्यंतरी महासभेने सांगितले..............

**मुन्ना सिंग :-**

आचारसंहिता कितना दिन था? ३० एप्रिल को उसका टेंडर खलास हुआ।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मला खुलासा करु द्या. महासभेने सविस्तर प्रस्ताव होता डी.पी.आर तयार करणे आम्हाला मंजुरी दिली होती. मग शासनाने मध्यतरी डी.पी.आर साठी शासनाने एजन्सी नेमून दिली आय.सी.ओ.सी. म्हणून ते आय.सी.ओ.सी. ने काम सुरु केलेले आहे. काम सुरु करुन ते आम्हाला माहिती देणार आहेत. इमरजन्सी सिच्युएशन अत्यावश्यक सेवा असल्यामुळे हे काम तात्काळ निविदा काढून आपल्याला मंजूरी देणे अपेक्षित होते म्हणून आर्थिक प्रशासकीय मंजूरी निश्चित ठेवलेली आहे.

**मुन्ना सिंग :-**

विषय तो पास होगा ही विषय लिया है हम लोग तो पास करेंगे लेकिन इसको एक साल लग गया छाटणी करने में समजने में एक साल लग गया आपको विषय मतबल ३० एप्रिल को उसका टेंडर खलास उसके पहले आपको मालुम नही था टेंडर खलास होनेवाला है उसका?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

इसलिए मैंने सब्जेक्ट दिया था।

**मुन्ना सिंग :-**

किसको दिया था?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महासभा में दिया था।

**मुन्ना सिंग :-**

महासभा में आपने खाली टाईमपास के लिए बताया था।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मंजुरी के लिए दिया था आर्थिक प्रशासकीय निविदा काढली की मंजुरी दिया था उसमें दिया था।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रभाग समिती निहाय वॉर्ड साफसफाई करणे व घनकचरा व्यवस्थापन करणेकामी मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट यांना पाच वर्षासाठी ठेका देण्यात आलेला होता. सदर कामाची मुदत पुर्ण झाली असल्याने कंत्राटदार पुढील मुदतवाढ घेणेस उत्सुक नाही. तसेच यापूर्वी दोन ते तीन वेळेस साफसफाई काम बंद करुन कामात व्यत्यय आलेला होता. यापूर्वी महानगरपालिकेने मा.महासभा दि.१९/०५/२०१७, ठराव क्र. १२ अन्वये डी.पी.आर तयार करण्यासाठी ठराव पारीत केला होता. सदरचा डी.पी.आर तयार करण्यासाठी जास्त कालावधी लागत आहे. सदरची बाब अत्यावश्यक आहे. मागील वर्षी साफसफाईच्या ठेक्याचा विचार करता त्यामध्ये अनेक अडचणी आल्या होत्या त्यावर महाराष्ट्र अधिनियमचे कलम ३१ नुसार स्वतंत्र समिती गठीत करुन त्या समितीला अधिकार देऊन दैनदिन वॉर्डसफाई व घनकचरा व्यवस्थापन याबाबत सखोल अभ्यास करुन अ त्यामध्ये उदा. मनुष्यबळ किती लागेल? किती वाहने लागतील? या बाबीवर रितसर विचार करुन अंतिम अहवाल देणेकरिता खालील सदस्यांची समिती गठीत करीत आहेत सदर समितीला अंतिम निर्णय घेणेकरिता ही महासभा अधिकार देत आहे.

| अ.क्र. | नांवे | पद |
|---|---|---|
| १ | महापौर | अध्यक्ष |
| २ | उप-महापौर | सदस्य |
| ३ | स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४ | सभागृह नेते | सदस्य |
| ५ | विरोधी पक्षनेते | सदस्य |
| ६ | गटनेते | सदस्य |

**टिप :-** सदर समितीला शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व संबधित उप-आयुक्त व स्वच्छता निरिक्षक सहाय्य करतील. विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी. तरी वरील समितीने शिफारस केलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी ०४ वर्षाचा ठेका देण्यात यावा तसेच समितीने घेतलेल्या निर्णयास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर विषय संपला.

**प्रकरण क्र. ५८ :-**

**के-प्रस्ताव - खाजगीकरणामार्फत प्रभाग समिती निहाय दैनदिन वॉर्ड सफाई व घनकचरा व्यवस्थापन कामाच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ५४ :-**

प्रभाग समिती निहाय वॉर्ड साफसफाई करणे व घनकचरा व्यवस्थापन करणेकामी मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट यांना पाच वर्षासाठी ठेका देण्यात आलेला होता. सदर कामाची मुदत पुर्ण झाली असल्याने

कंत्राटदार पुढील मुदतवाढ घेणेस उत्सुक नाही. तसेच यापूर्वी दोन ते तीन वेळेस साफसफाई काम बंद करुन कामात व्यत्यय आलेला होता. यापूर्वी महानगरपालिकेने मा.महासभा दि.१९/०५/२०१७, ठराव क्र. १२ अन्वये डी.पी.आर तयार करण्यासाठी ठराव पारीत केला होता. सदरचा डी.पी.आर तयार करण्यासाठी जास्त कालावधी लागत आहे. सदरची बाब अत्यावश्यक आहे. मागील वर्षी साफसफाईच्या ठेक्याचा विचार करता त्यामध्ये अनेक अडचणी आल्या होत्या त्यावर महाराष्ट्र अधिनियमचे कलम ३१ नुसार स्वतंत्र समिती गठीत करुन त्या समितीला अधिकार देऊन दैनदिन वॉर्डसफाई व घनकचरा व्यवस्थापन याबाबत सखोल अभ्यास करुन अ त्यामध्ये उदा. मनुष्यबळ किती लागेल? किती वाहने लागतील? या बाबीवर रितसर विचार करुन अंतिम अहवाल देणेकरिता खालील सदस्यांची समिती गठीत करीत आहेत सदर समितीला अंतिम निर्णय घेणेकरिता ही महासभा अधिकार देत आहे.

| अ.क्र. | नांवे | पद |
|---|---|---|
| १ | महापौर | अध्यक्ष |
| २ | उप-महापौर | सदस्य |
| ३ | स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४ | सभागृह नेते | सदस्य |
| ५ | विरोधी पक्षनेते | सदस्य |
| ६ | गटनेते | सदस्य |

**टिप :-** सदर समितीला शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व संबधित उप-आयुक्त व स्वच्छता निरिक्षक सहाय्य करतील. विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी. तरी वरील समितीने शिफारस केलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी ०४ वर्षाचा ठेका देण्यात यावा तसेच समितीने घेतलेल्या निर्णयास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विधान परिषदेवरती आमदार प्रसाद लाड निवडून आल्याबद्दल त्यांच्या सभागृहाच्या वतीने आम्ही हार्दिक अभिनंदन करतो. शिवसेना व भारतीय जनता पार्टीचे उमेदवार श्री. प्रसाद लाड हे विधानपरिषदेवरती बहुमतांनी निवडून आल्याबद्दल त्यांचा सभागृहाच्या वतीने मी त्यांचे अभिनंदन करत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे नागरी नेते प्रख्यात पत्रकार मराठाकार आचार्य अत्रे यांच्या पत्रकारातील एक साक्षिदार आणि साक्षीदार असलेले पत्रकार लेखक व आमदार प्रताप सरनाईक यांचे वडील श्री. बाबूराव मारूतीराव सरनाईक सर्वाचे आवडते बाबुजी आयुष्यातले निश्चितपणे पार करतील असे वाटत असतानाच गुरूवार दि. ३० नोव्हेबर २०१७ रोजी दिर्घ आजाराने त्यांचे निधन झाले त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**रोहिदास पाटील :-**

त्याच बरोबर ह्या सभागृहाचा माजी नगरसेविका कैलासवासी कैलास बेन यांचे पती माजी नगरसेविका रक्षा शहा यांचे वडील श्री दिनेश चंद्र जाणी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांचा आत्म्यास शांती लाभो तसेच आपल्या महापालिकेत मिरा भाईदर मध्ये राहणा-या बंदरवाडी मध्ये राहणा-या कैलासवासी मोतूबाई श्रावण कोळी यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ९८ व्या वर्षी दि. २२/११/२०१७ रोजी निधन झाले त्यांनी आपल्याला त्यांच्या उल्लेख करावासा योग्य ठरेल की, त्यांनी आपली मालकीची ५ गुंठे जागा शैक्षणिक महत्व लक्षात घेऊन महापालिकेत दान दिलेली आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो असा मी ठराव मांडत आहे.

**निलम ढवण :-**

त्याचप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सन्मा. उपायुक्त डॉ. पानपट्टे साहेब यांच्या मातोश्री यांचे देखील वृध्दापकाळाने देहावसन झालेले आहे. त्यांच्या देखील आत्म्यास शांती लाभो आणि त्यांच्या दुःखात आम्ही सर्वजण शामील आहोत.

**प्र. नगरसचिव :-**

सर्वांनी काही क्षण शांत उभे राहून श्रध्दांजली वाहायची आहे.

**दुःखवठा ठराव क्र. ५५ :-**

आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमधील बंदरवाडी परिसरामध्ये राहणाऱ्या कै. मोतुबाई श्रावण कोळी यांचे दि. २२/११/२०१७ रोजी वयाच्या ९६ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा उल्लेख करावयास योग्य ठरेल की, त्यांनी आपल्या मालकीची ५ गुंठे जागा शैक्षणिक महत्व लक्षात घेवून मिरा भाईंदर महापालिकेस दान केलेली आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सन्मा. उपायुक्त डॉ. पानपट्टे साहेब यांच्या मातोश्री यांचे देखील वृध्दापकाळाने देहावसन झालेले आहे. त्यांच्या देखील आत्म्यास शांती लाभो असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्रीम. निलम ढवण**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली.

**(सभा संपल्याची वेळ सायं. ६.०० वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका